अहवाल क्रमांक : १९४

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२४-२०२५)

## (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या यवतमाळ जिल्हा परिषदेच्या सन २०१०-२०११ व २०१६-२०१७ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# पहिला अहवाल

(सदर अहवाल दिनांक २५ मार्च २०२६ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२६

# पंचायती राज समिती

## (२०२४-२०२५)

## (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या यवतमाळ जिल्हा परिषदेच्या सन २०१०-२०११ व २०१६-२०१७ च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# पहिला अहवाल

# पंचायती राज समिती
## (सन २०२४-२०२५)

**समिती प्रमुख :**

(१) श्री. संतोष दानवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. सुरेश धस, वि.स.स.

(३) श्री. महेश लांडगे, वि.स.स.

(४) श्री. प्रताप अडसड, वि.स.स.

(५) श्री. सुनिल कांबळे, वि.स.स.

(६) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स.

(७) श्री. संजय पुराम, वि.स.स

(८) श्री. गोपीचंद पडळकर, वि.स.स.

(९) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स.

(१०) श्री. दीपक केसरकर, वि.स.स.

(११) श्री. निलेश राणे, वि.स.स.

(१२) श्री. संजय गायकवाङ, वि.स.स

(१३) श्री. रमेश बोरनारे, वि.स.स

(१४) श्री. किरण लहामटे, वि.स.स.

(१५) श्री. विजयसिंग पंडित, वि.स.स.

(१६) श्री. नितीन पवार, वि.स.स

(१७) श्री. दिलीप सोपल, वि.स.स

(१८) श्री. नितीन देशमुख, वि.स.स.

(१९) श्री. संजय मेश्राम, वि.स.स.

(२०) श्री. संदिप क्षिरसागर, वि.स.स

(२१) डॉ. परिणय फुके, वि.प.स.

(२२) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स.

(२३) श्री. विक्रम काळे वि.प.स.

(२४) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.

(२५) श्री. सचिन अहिर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. योगेश टिळेकर, वि.प.स.

(२७) *डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स

(२८) **श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. शिवदर्शन साठ्ये, सचिव - ४

(२) श्री. रविंद्र जगदाळे, उप सचिव

(३) श्री. सुरेश मोगल, अवर सचिव

(४) श्री. पवन म्हात्रे, कक्ष अधिकारी.

(२७)* डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी "निमंत्रित सदस्य" म्हणून दिनांक १९ मे, २०२५ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

(२८)** श्री. सदाशिव खोत, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी "निमंत्रित सदस्य" म्हणून दिनांक २१ मे, २०२५ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

# पंचायती राज समिती
## (सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. प्रदिप जैस्वाल, वि.स.स.

(३) श्री. कैलास पाटील (घाडगे), वि.स.स.

(४) डॉ. राहूल पाटील, वि.स.स.

(५) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(६) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(९) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(१०) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरीभाऊ बागडे, वि.स.स.

(१३) डॉ. विजयकुमार गावीत, वि.स.स.

(१४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(१६) *श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर जोरगेवार , वि.स.स.

(२१) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२३) श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.

(२४) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.

(३१) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(३२) श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

* डॉ. संजय कुटे, वि.स.स. यांनी समिती सदस्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. विजय रहांगडाले, वि.स.स. यांची "समिती सदस्य" म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजीपासून नामनियुक्ती केली.

## पंचायती राज समिती

**(सन २०१७-२०१८)**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सहसचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा पहिला अहवाल सादर करीत आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरिता समिती दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१०-२०११ व २०१६-२०१७ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २०२०-२०२१ साठी गठीत झालेल्या समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेस दिनांक १६, १७ व १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी भेट देऊन डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

तसेच सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी जिल्हा परिषद, यवतमाळ संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी संबंधित विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव व इतर मंत्रालयीन अधिकारी तसेच संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे तसेच जिल्हा परिषदेचे श्री. श्रीकृष्ण पांचाळ, तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या यवतमाळ जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२४-२०२५ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १८ मार्च, २०२६.

**संतोष दानवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | भरारी पथकामार्फत आदिवासी व दुर्गम भागामध्ये आरोग्य सेवा पुरविण्याकरिता खरेदी केलेल्या औषधांवरील खर्चातील अनियमितता. | ... | १ |
| (२) | दोन | ग्रामपंचायत अभ्यासिकेसाठी सौर दिप पुरविणे योजनेमधील अनियमिततेबाबत | ... | ६ |
| (३) | तीन | अंगणवाड्यांना पुरवठा केलेल्या पुरक पोषण आहाराबाबत | ... | ११ |
| (४) | चार | प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, शालेय पोषण आहार व उपस्थिती भत्त्यातील अनियमिततेबाबत. | ... | १६ |
| (५) | पाच | जिल्हा परिषद यवतमाळ येथील ग्रामपंचायतीच्या अपहार प्रकरणांबाबत | ... | ४० |
| (६) | सहा | ई वर्ग जमिनीचे मालकी व हर्रासामधील अनियमितता प्रकरणांबाबत | ... | ४६ |
| (७) | सात | प्रजिमा - ३४ ते लोहारा बुटी इसापूर मार्ग राज्य मार्ग - २५७ ला जोडणारा रस्ता सा. क्रं. ८/०० ते ११/०० ता. पुसद उष्णमिश्रीत पद्धतीने डांबरी नूतनीकरण करणे. | ... | ५२ |
| (८) | आठ | जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे | ... | ५९ |
| (९) | नऊ | सर्वसाधारण शिफारशी | ... | ७० |
| | | **परिशिष्ट - "अ"** शासन निर्णय व परिपत्रके | ... | ७३ |
| | | **परिशिष्ट - "ब"** समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | ... | १०३ |

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, यवतमाळ

## भरारी पथकामार्फत आदिवासी व दुर्गम भागामध्ये आरोग्य सेवा पुरविण्याकरिता खरेदी केलेल्या औषधांवरील खर्चातील अनियमितता.

**परिच्छेद क्रमाक ३.५५४**

**जिल्हा परिषद, यवतमाळ (सन २०१०-११)**

जिल्हा परिषद, यवतमाळ सन २०१०-११ यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी व दुर्गम भागात आरोग्य सेवा पुरविण्यासाठी शासन निर्णय आदिवासी विभाग क्रमांक/बीडीयु /२०१०/प्र.क्र ५/अका/६, दिनांक १९/०७/२०१० अन्वये अनुदान प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने रक्कम रु. ६३,९९७/- खर्च नमूद करण्यात आल्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. विभागाने ४ भरारी पथकाची आठ महिन्याकरिता नेमणूक केली सदर कालावधीत प्रति भरारी पथकास रु. २०००/- प्रमाणे आयुर्वेदिक व इतर आवश्यक औषधी प्रति महिन्याप्रमाणे पुरवठा करणे व भरारी पथकाने दुर्गम भागात जनतेला आरोग्य सेवा पुरविणे आवश्यक होते. परंतु, आदेशाचे पालन न करता उपरोक्त भरारी पथकाचा कालावधी संपल्यानंतर औषधी खरेदी करण्यात आली आहे. त्यामुळे भरारी पथकाद्वारे ज्या दुर्गम भागात आरोग्य सेवा पुरविणे अडचणीचे आहे. अशा भागात वेळीच औषधी खरेदी करून पुरवठा न केल्यामुळे भरारी पथकावरील औषधीवरील खर्च निरर्थक झाला.

२. ज्या वाहनाने वाहतूक केली त्याचे डिलेव्हरी मेमो व त्यामध्ये नमूद केलेली औषधी प्रत्यक्ष रक्कम प्रदानाच्या अनुषंगाने बरोबर आहे काय तसेच प्रत्यक्ष औषधी केव्हा मिळाली याची तपासणीकरिता डिलेव्हरी मेमो दर्शविले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. भरारी पथक हे प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येत असल्याने सदर औषधी प्राथमिक आरोग्य केंद्राना दिली जाते प्राथमिक आरोग्य केंद्राकडून सदर औषधी व इतर लागणारी औषधी प्राप्त करून भरारी पथकाद्वारे रुग्णाला वितरित केल्या जाते. तसेच भरारी पथकांची नियुक्ती ही एका महिन्याचा खंड देऊन नियमित पणे केली जाते त्यामुळे रुग्णावर विपरीत परिणाम झाला नसून औषधी खरेदीचा विनियोग झाला आहे.

२. सदरची औषधी ही आरको ट्रान्सपोर्ट एल.आर.नं ३५३०१९, दिनांक १६/०४/२०२१ यवतमाळ आर.एल.नं. ३५१४ दि. १८/०४/२०२१ रोजी प्राप्त झाल्यानंतरच संबंधित कंपनीला धनादेश वितरित करण्यात आला आहे. सोबत सत्यप्रत जोडण्यात आली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ यांची साक्ष :**

**यवतमाळ जिल्हा परिषदेस समितीने भेट दिली असता, जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी साक्ष घेतली.** समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, प्रत्यक्ष औषधी प्राप्त झाल्याबाबतचे डिलेव्हरी मेमो का सादर केले नाही, तसेच औषधी वेळेवर का खरेदी करण्यात आली नाहीत? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सचिवांना विदित केले की, भरारी पथकाला दर आठ महिन्यांनी मुदतवाढ देतो. मुदत संपल्यानंतर त्यांना पुन्हा मुदतवाढ देण्यात येते. यामध्ये हा एक मुद्दा होता. प्राथमिक आरोग्य केंद्राकडून वेळोवेळी औषधांची मागणी केली जाते. प्राथमिक आरोग्य केंद्राला देण्यात येणाऱ्या औषधांपैकी आवश्यक औषधी ही भरारी पथकांना देण्यात येतात. त्यामुळे भरारी पथकाला जेव्हा औषधांची आवश्यकता भासते तेव्हा संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राकडून औषधांचा पुरवठा केला जातो. यावर समितीने भरारी पथकामध्ये कोण कोण असतात? असा प्रश्न विचारला असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला उत्तर दिले की, भरारी पथकामध्ये कंत्राटी डॉक्टर असतात. तसेच तपासणी पथक देखील असते.

तदनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, या जिल्ह्यातील अनेक शासकीय डॉक्टरांनी खाजगी हॉस्पिटलमध्ये सेवा देऊन कोरोनाच्या काळामध्ये मोठ्या प्रमाणावर पैसे कमावले आहेत. या कोरोनाच्या काळामध्ये येथील डॉक्टरांनी केलेल्या गैरप्रकाराबाबत अनेक तक्रारी या समितीकडे प्राप्त झालेल्या आहेत. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीला विदित केले की, असा प्रकार कोठेही झालेला नाही. कोरोनाच्या काळामध्ये काही शासकीय हॉस्पिटलमध्ये डॉक्टर उपस्थित नव्हते, अशा डॉक्टरांवर

कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. शासकीय डॉक्टर प्रायव्हेट प्रॅक्टिस करीत असल्यामुळे सर्वसामान्य माणसांना शासकीय हॉस्पिटलमध्ये उपचार मिळू शकला नाही. त्यामुळे त्यांना खाजगी हॉस्पिटलमध्ये अधिकचे पैसे देऊन उपचार घ्यावे लागले आहेत. कोरोनाच्या काळामध्ये येथील डॉक्टरांनी जनतेची लूट केलेली आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, या कोरोनाच्या काळामध्ये मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य जनतेचे हाल झाले आहेत. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी समितीची सूचना आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला खुलासा केला की, सदर प्रकरणी कारवाई सुरू कलेली आहे. काही डॉक्टर हे मुख्यालयी राहतात आणि चांगली सेवा देखील देत आहेत. परंतु जे डॉक्टर मुख्यालयी राहत नाहीत किंवा व्यवस्थित सेवा देत नाहीत, अशा डॉक्टरांची यादी तयार करण्याचे काम सुरू आहे. ही सर्व प्रक्रिया झाल्यानंतर विभागाकडून अशा डॉक्टरांवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, कोणत्या आरोग्य केंद्रातील कोणते डॉक्टर आरोग्य केंद्रामध्ये उपस्थित राहत आहेत की नाही, हे पाहण्याची सर्व जबाबदारी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांची आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, जिल्ह्यातील आरोग्य केंद्रांना भेटी देण्याचा कार्यक्रम आखलेला आहे. त्यानुसार आम्ही भेटी देत आहोत. यावर समितीने या जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी प्रभारी आहेत काय? असा प्रश्न विचारला असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारात्मक संमत्ती दर्शवून समितीला विदित केले की, जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना आम्ही आकस्मित भेटी देण्यास सुरुवात केली आहे. भेटी दरम्यान २६ जणांवर कारवाई प्रस्तावित केली आहे. अनधिकृत गैरहजर राहिलेल्या सर्व डॉक्टरांवर कारवाई करण्यात येत आहे. यावर समितीने पुढीलप्रमाणे सूचना केल्या की, डॉक्टर मुख्यालयी राहत नाहीत, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. कोरोनाच्या काळामध्ये यवतमाळमधील डॉक्टरांचा मुद्दा खूप गाजला आहे. त्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

आपण या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करावी व उक्त चौकशी अहवाल समितीला सादर करण्यात यावा. सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांची साक्ष घेण्यात येईल, असे समितीने निर्देश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली:-**

१. प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधे नियोजीत वेळेत खरेदी न केल्यामुळे रुग्णांची गैरसोय झाल्याबाबत सखोल चौकशी करून संबधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे? नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

२. जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयामध्ये डॉक्टर उपस्थित रहात नसल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना उपचार मिळत नाहीत हे खरे आहे काय?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :-**

१. सन २०१०-११ या वित्तीय वर्षात आदिवासी विभागांतर्गत प्राप्त अनुदानामधून भरारी पथकाकरिता औषधी खरेदी करणे या करिता रु. ६४,०००/- अनुदान निश्चित करण्यात आले होते. सदर निधी बीडीएस द्वारे माहे जाने-२०११ अखेर प्राप्त झाले.

२. सदर अनुदानामधून माहे मार्च-२०११ ला पहिल्या आठवड्यात पुरवठा आदेश देण्यात आले असून औषधांचा पुरवठा दिनांक १६.०४.२०११ व १८.०४.२०११ रोजी झाला.

**विलंबाची कारणे**

कंपनीने विहित मुदतीत पुरवठा न केल्याने विलंब झाला.

**विभागाने केलेली कार्यवाही**

१. आदिवासी दुर्गम भागातील भरारी पथकांना आवश्यक असलेली औषधी व साहित्य सामग्री जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडे उपलब्ध असलेल्या तसेच प्राथमिक आरोग्य केन्द्राना वितरित औषधी व साहित्य सामुग्री साठ्यामधून भरारी पथकाच्या मागणी प्रंमाणे पुरविण्यात आलेली आहे.

२. औषधी अभावी भरारी पथकास दुर्गम व आदिवासी भागाकरिता सेवा देण्यास कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्या नाहीत वा रुग्णाची गैरसोय औषधी अभावी भरारी पथकास दुर्गम व आदिवासी भागाकरिता झालेली नाही, कारण लागणारी औषधे भरारी पथकांनी संबंधित प्राथमिक आरोग्य केन्द्राकडून घेतली आहे. भरारी पथकांना पुरविण्यात आलेल्या औषधीचा उपयोग आदिवासी दुर्गम भागातील रुग्णासाठी झालेला आहे.

यवतमाळ जिल्ह्यामध्ये आरोग्य विभागा मार्फत एकूण ६६ प्राथमिक आरोग्य केन्द्राद्वारे तसेच ४३५ प्राथमिक आरोग्य उप केन्द्राद्वारे आरोग्य सेवा पुरविण्यात येते. वैद्यकीय अधिकारी यांची रजा मंजूर करण्यात येते.

जिल्हा स्तरावरून तसेच तालुका स्तरावरून भेटी मध्ये गैरहजर आढळलेले वैद्यकीय अधिकारी एकूण १० यांना कारणे दाखवा नोटीस देऊन प्रशासकीय कारवाई प्रस्तावित केली आहे.

संबधित सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना मुख्यालयी हजर राहून आरोग्य सेवा देण्याबाबत वेळोवेळी सभेमध्ये लेखी व तोंडी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय.—**जिल्हा परिषदेने दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**समितीच्या निदेशानुसार विभागाकडून प्राप्त झालेला चौकशी अहवाल**

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद यवतमाळ येथे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी भेट देऊन चर्चेच्या वेळी, शासकीय डॉक्टर प्रायव्हेट प्रॅक्टीस करीत असल्यामुळे सर्वसामान्य माणसांना शासकीय हॉस्पिटलमध्ये उपचार मिळू शकला नाही. त्यामुळे त्यांना खाजगी हॉस्पिटलमध्ये अधिकचे पैसे देऊन उपचार घ्यावे लागत आहे. करोना काळामध्ये येथील डॉक्टरांनी जनतेची लुट केलेली आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यात यावी असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

यवतमाळ जिल्हा परिषदे अंतर्गत ६६- प्राथमिक आरोग्य केंद्रे, १९- आयुर्वेदीक दवाखाने, ५- आदिवासी फिरते पथक, १ प्रा.आ. केंद्र पथक, २- फिरते पथक व १- मोफोसियल दवाखाना इत्यादि संस्था कार्यरत आहेत. सदर संस्थेमध्ये १००- एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी, ४२- बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी व २५९- सामुदायीक आरोग्य अधिकारी कार्यरत आहेत.

कोवीड -१९ अंतर्गत कोरोना या साथरोगाची मागील एक वर्षापासून साथ सुरू आहे. सदर साथरोगाच्या साथीमध्ये जिल्हा परिषदे अंतर्गत १६ कोवीड केअर सेंटर कार्यरत होते. व आता ३८ कोवीड सेंटर कार्यरत आहेत. सदर कोवीड केअर सेंटरमध्ये तालुक्या अंतर्गत प्रा.आ. केंद्रातील एक डॉक्टर व सामुदायिक आरोग्य अधिकारी हे कोवीड केअर सेंटरला सेवा देत होते. तसेच कोवीड-१९ अंतर्गत कोरोना या साथरोगामध्ये प्रा.आ. केन्द्रामध्ये कोवीड रूग्णांना सेवा देण्यात आली नाही.

यवतमाळ जिल्हा परिषदे अंतर्गत १६- तालुका आरोग्य अधिकारी यांना शासकीय डॉक्टर मुख्यालयी राहतात का व खाजगी वैद्यकीय व्यवसाय करतात काय याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक १०४८/१५.६.२०२१ दिनांक अन्वये विचारणा करण्यात आली असून सदर तालूका अधिकारी यांचे कार्यालयाकडून पत्र प्राप्त असून कोवीड-१९ अंतर्गत कोरोना या साथरोगाच्या काळात शासकीय डॉक्टर मुख्यालयी राहून सेवा देत आहेत. तसेच खाजगी वैद्यकीय व्यवसाय करीत नसल्याबाबत या कार्यालयाला कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने याबाबतची लेखी अथवा वृत्त पत्राद्वारे जिल्हा परिषद आरोग्य विभागा अंतर्गत शासकीय डॉक्टर खाजगी वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याबाबत या कार्यालयाला कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सर्वसामान्य माणसांना जिल्हा परिषदे अंतर्गत आरोग्य केंद्रामधून उपचार मिळू शकले नाही व खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यात आला नाही. त्यामुळे अधिकचे पैसे घेऊन उपचार घ्यावा लागला नाही.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

**यवतमाळ जिल्हा परिषदेस समितीने भेट दिली असता, जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी** समितीने विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधे नियोजित वेळेत खरेदी न केल्यामुळे रुग्णांची गैरसोय झाल्याबाबत सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याबाबत समितीने सांगितले होते. त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणामध्ये चौकशी करण्यात आलेली आहे. अनुपालनाच्या वेळेस देखील याचे उत्तर आम्ही दिले होते. परत चौकशी करून त्याची सविस्तर माहिती घेतलेली आहे. आपल्या परवानगीने या प्रकरणाची पार्श्वभूमी थोडक्यात सांगतो. बीडीएस साधारणतः डिसेंबर, जानेवारी या आर्थिक वर्षात प्राप्त होतो. ६४ हजार रुपयांचे अनुदान त्यांना प्राप्त होते. प्राथमिक आरोग्य केंद्र, उप केंद्र यासाठी डीपीसी, टीएसपी, ओटीएसपी, एसीपी यामधून बराचसा म्हणजे साधारणतः ४ ते ५ कोटी रुपयांचा निधी प्राप्त होतो. त्यामधून औषधी खरेदी करण्यात येते. हे भरारी पथक प्राथमिक आरोग्य केंद्राला जोडलेले (अटॅच) असल्यामुळे गरज पडल्यानंतर त्यांना तेथून औषध पुरवठा झाला होता. त्यांच्या भेटी (व्हिजिट्स)

व त्यांचे काम त्या वर्षात झाले होते. त्या वर्षाचे बीडीएस जानेवारी, २०११ मध्ये प्राप्त होते. ऑर्डर मार्च, २०११ मध्ये प्रक्रिया करून दिली होती. साधारणतः एप्रिलच्या पहिल्या आठवड्यामध्ये पुरवठा (सप्लाय) झाला होता. यावर आपण चौकशी अहवालाच्या प्रती समितीला दिल्या आहेत काय? समितीने चौकशी करून समितीला अहवाल देण्याबाबतचे रुलिंग दिले होते. अशी समितीने विचारणा केली असता, त्यांच्याकडे चौकशी अहवाल आहेत असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला उत्तर दिले. यावर समितीने स्पष्ट केले की, सर्व प्रकरणांचा चौकशी अहवाल समितीला पाठवावा. समितीला आपला अहवाल विधानसभेच्या पटलावर ठेवताना त्यामध्ये विभागाने दिलेली सर्व माहिती अंतर्भूत करावी लागते. त्याकरिता समिती तो अहवाल मागत आहे. चौकशी अहवालच नसेल तर साक्षीला काही अर्थच राहणार नाही. कारण ती माहिती समितीला अहवालात अंतर्भूत करता येणार नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले ज्या मुद्यांबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगितले होते, ते सर्व अहवाल समितीला पाठवले आहेत. त्या अनुषंगाने पुरवठा झाला होता. त्या वर्षामध्ये भरारी पथकाने कामसुद्धा केलेले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राकडे उपलब्ध औषध साठ्यामधून ते झाले. ज्या मुद्यांबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगितले होते, ते सर्व अहवाल समितीला पाठवले आहेत.

**अभिप्राय व शिफारशी :**

यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी व दुर्गम भागात आरोग्य सेवा पुरविण्यासाठी प्राप्त झालेल्या अनुदानामधुन रु. ६३,९९७/- इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे. आदिवासी उपाय योजनेंतर्गत चार भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली होती. भरारी पथकाने दुर्गम भागातील जनतेला औषधांसह आरोग्य सेवा पुरविणे आवश्यक असताना, या भरारी पथकाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर औषधी खरेदी करण्यात आली आहे. त्यामुळे भरारी पथकावरील औषधांवरील खर्च निरर्थक झाला आहे. ज्या वाहनाने आदिवासी भागात वाहतूक केली त्याचे डिलेव्हरी मेमो व त्यामध्ये नमूद केलेली औषधी प्रत्यक्ष रक्कम प्रदानाच्या अनुषंगाने बरोबर आहे काय व प्रत्यक्ष औषधी केव्हा मिळाली याची तपासणी करिता डिलेव्हरी मेमो दर्शविण्यात आले नाहीत.

या जिल्ह्यास भेट दिली असता समितीस तक्रारींच्या अनुषंगाने अशीही माहिती प्राप्त झाली की, कोरोना प्रादुर्भावाच्या कालावधीत जिल्ह्यातील शासकीय रूग्णालयात डॉक्टर उपस्थित नसल्याने उपचारा अभावी सामान्य रूग्णांची गैरसोय झाली. त्यामुळे सर्वसामान्य रूग्णांना अधिकची रक्कम खर्च करून खाजगी रूग्णालयात उपचार घ्यावे लागले. परंतु याच कालावधीत अनेक शासकीय डॉक्टरांनी खाजगी रूग्णालयात सेवा देऊन मोठ्या प्रमाणात पैसे मिळवले आहेत. वास्तविक आरोग्य केंद्रातील डॉक्टर कर्तव्यावर उपस्थित राहतात किंवा नाहीत, डॉक्टर मुख्यालयी राहतात किंवा नाहीत याबाबतची तपासणी करण्याची सर्व जबाबदारी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांची आहे. तथापि, आरोग्य सेवेच्या तपासणीचे व नियंत्रणाचे काम योग्य प्रकारे झाले नसल्याने लेखा आक्षेपाच्या मुद्यासह प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करून दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्याबाबतचे निदेश समितीने दिले.

त्यानुसार जिल्हा परिषदेने सादर केलेली माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, आदिवासी विभागांतर्गत भरारी पथकाकरिता औषधी खरेदी करण्यासाठी रु. ६४,०००/- इतकी रक्कम माहे जानेवारी, २०११ मध्ये प्राप्त झाली असून माहे मार्च च्या पहिल्या आठवड्यात पुरवठा आदेश देण्यात आले असून औषधीचा पुरवठा माहे एप्रिल, २०११ मध्ये झालेला आहे. आदिवासी व दुर्गम भागातील भरारी पथक प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत येत असल्याने या भरारी पथकांनी आरोग्य केंद्राकडून औषधी व साहित्य सामुग्री प्राप्त करून रूग्णांना वितरित केली आहे. भरारी पथकाची नियुक्ती एक महिन्याचा खंड देऊन केली असल्याने रूग्णांवर कोणताही परिणाम झालेला नसुन औषधी खरेदीचा विनियोग आदिवासी दुर्गम भागातील रूग्णांसाठी झाला आहे. सदर औषधीचे डिलेव्हरी मेमो प्राप्त झाल्यानंतरच कंपनीला धनादेश वितरित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना आकस्मित भेट देण्यास सुरवात केली आहे. जिल्हा व तालुका स्तरावरील भेटीमध्ये गैरहजर आढळून आलेल्या एकूण १० वैद्यकीय अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन प्रशासकीय कारवाई प्रस्तावित केली आहे. सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना मुख्यालयी हजर राहून आरोग्य सेवा देण्याबाबत लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

कोरोना प्रादुर्भावाच्या कालावधीत जिल्ह्यातील शासकीय रूग्णालयात उपस्थित न राहता खाजगी रूग्णालयात सेवा दिलेल्या शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांची केलेल्या चौकशीचा अहवाल सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले होते. त्यानुसार सादर केलेल्या चौकशी अहवालात नमूद केले आहे की, जिल्ह्यात ६६ प्राथमिक आरोग्य केंद्र, १९ आयुर्वेदिक दवाखाने, ५ आदिवासी फिरते पथक, १ प्राथमिक आरोग्य केंद्र पथक, २ फिरते पथक व १ मोफोसियल दवाखाना इत्यादी संस्था कार्यरत आहेत. १०० एम.बी.बी.एस.वैद्यकीय अधिकारी, ४२ बी.ए.एम.एस.वैद्यकीय अधिकारी व २५९ सामुदायिक आरोग्य अधिकारी कार्यरत आहेत. कोरोना प्रादुर्भाव कालावधीत ३८ कोवीड सेंटर कार्यरत होते. या कोविड केअर सेंटरमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर व सामुदायिक आरोग्य अधिकारी यांनी कोवीड रूग्णांना सेवा दिली आहे. कोरोना कालावधीत शासकीय डॉक्टरांनी मुख्यालयी राहून सेवा दिली असून खाजगी वैद्यकीय व्यवसाय केलेला नाही. यासंदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

**पंचायती राज समितीने माहे फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत यवतमाळ जिल्ह्याचा दौरा केला होता. त्यावेळी कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झालेला होता. परंतु मागील कालावधीत कोरोनाचा प्रादुर्भाव राज्यात सर्वत्र पसरलेला होता. त्यावेळी कोवीड रूग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने शासकीय व खाजगी रूग्णालयांसह राज्यातील संपूर्ण आरोग्य यंत्रणा कार्यरत झालेली होती. वैद्यकीय क्षेत्रातील वैद्यकीय अधिकारी व अन्य कर्मचारी वर्ग पूर्ण क्षमतेने काम करत असतानाही वैद्यकीय सेवेवर ताण येऊन ती अपूरी पडत होती. कोवीडचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक असलेले पीपीई किट, मास्क, सॅनीटाईझर यासह अन्य साहित्य सामुग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसताना जीवितास धोका असतानाही डॉक्टर व कर्मचारी दिवस रात्र प्रमाणिकपणे काम करत होते. अशा बिकट वैद्यकीय परिस्थितीत काही शासकीय वैद्यकीय अधिकारी शासकीय रूग्णालयात उपस्थित न राहता खाजगी रूग्णालयांना सेवा देत असल्याच्या तक्रारी समितीस जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना प्राप्त झाल्या होत्या. त्यानुषंगाने समितीने या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याबाबत निदेश दिले होते. त्यानुसार सादर करण्यात आलेल्या अहवालात नमूद केले आहे की, "जिल्ह्यात शासकीय सेवेतील आरोग्य सेवेत एकूण १४२ वैद्यकीय अधिकारी व २५९ सामुदायिक आरोग्य अधिकारी कार्यरत असून** कोरोना प्रादुर्भाव कालावधीत ३८ कोवीड सेंटर कार्यरत होते. या कोविड सेंटरमध्ये आरोग्य केंद्रातील डॉक्टर व सामुदायिक आरोग्य अधिकारी यांनी कोवीड रूग्णांना सेवा दिली आहे. **त्यापैकी कोणीही खाजगी वैद्यकीय व्यवसाय व खाजगी रूग्णालयात सेवा देत नाहीत."**

**वास्तविक शासनाच्या अन्य कोणत्याही कामांमधील गैरप्रकार निदर्शनास आल्यास प्रकरण निहाय तपासणी व चौकशी करून चुक क्षमापित करता येईल परंतु वैद्यकीय क्षेत्रातील कोणत्याही स्वरूपाचा गैरप्रकार सामान्य जनतेच्या जिवितास धोका निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील कोणत्याही गैरप्रकारास क्षमापित करता येणार नाही असे समितीचे मत आहे. त्यामुळे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कोरोना काळातील डॉक्टरांच्या कामांची चौकशी करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत समितीने निदेश दिलेले असतानाही या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात न घेता, शासकीय कर्तव्यात बेजबाबदारपणे काम करणाऱ्या काही संबंधितांना कारवाईपासून वाचविण्यासाठी सदरहू चौकशी अहवाल सकारात्मक तयार करण्यात आलेला असल्याने समिती यावर तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. तसेच जिल्हा व तालुका स्तरावरील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या भेटीमध्ये गैरहजर आढळून आलेल्या १० वैद्यकीय अधिकाऱ्यांवर प्रस्तावित करण्यात आलेली प्रशासकीय कारवाई तातडीने पूर्ण करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**आदिवासी भागातील भुप्रदेश दुर्गम व डोंगराळ असून तेथील लोकवस्तीही विखुरलेली असते. तेथे दळणवळणाची साधने कमी प्रमाणात असतात. त्यामुळे या भागात पुरेशा प्रमाणात आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे शक्य होत नाही. या भागातील मागासलेपणा, कुपोषण, निरक्षरता व जंतु संसर्ग इत्यादीमुळे रोगाचे प्रमाण अधिक असतानाही योग्य उपचार केले जात नाहीत. यासाठी या भागाच्या विकासाबरोबरच आरोग्य सेवा वेळेवर व प्रभाविपणे पुरविण्यासाठी शासन प्रयत्नशील असते. त्यानुसार आदिवासी बांधवांना थेट वैद्यकीय सेवा मिळावी त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात भरारी पथके नियुक्त करण्यात आलेली आहेत. आदिवासी उपाययोजनेंतर्गत "आरोग्य सेवा" या उपशिर्षाखाली निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. या निधीचा विहित वेळेत व योग्य प्रकारे वापर करून भरारी पथकांना आवश्यक औषधांसह अन्य साहित्य सामुग्री तातडीने उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. या पथकातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक मानधनांवर करण्यात येत असल्याने त्यांना स्वतःची वाहन व्यवस्था करणे शक्य होत नाही. अशावेळी जिल्हा परिषदेने पुरेशा प्रमाणात वाहन या पथकांना उपलब्ध करून दिली पाहिजेत. यासह आवश्यक त्या सोयी सुविधा या पथकास उपलब्ध करून दिल्या तरच त्यांच्याकडून शासनास अपेक्षित असलेली उत्तम दर्जाची आरोग्य सेवा मिळू शकेल असे समितीचे मत आहे. जिल्हास्तरीय योजना राबविण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आलेली असून या योजनेंसाठी प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकारही जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. आदिवासी क्षेत्रातील आरोग्य सेवा अधिक सक्षम होण्याच्या दृष्टीने या भरारी पथकाचे काम प्रभाविपणे होण्यासाठी जिल्हाधिकारी, आयुक्त आदिवासी विकास, क्षेत्रीय अधिकारी व प्रकल्प अधिकारी यांनी समन्वयाने काम करावे. तसेच या योजनेच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेऊन यातील त्रुटी व येणाऱ्या समस्यांचे तातडीने निराकरण करून पथकास आवश्यक औषध, वैद्यकीय साहित्य सामुग्री व सोयी सुविधा पुरविण्याबाबतची कार्यपद्धती राबवावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

# प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, यवतमाळ

## ग्राम पंचायत अभ्यासिकेसाठी सौर दिप पुरविणे योजनेमधील अनियमिततेबाबत.

**परिच्छद क्रमांक ३.६१९(सन २०१०-११)**

जिल्हा परिषद, यवतमाळ सन २०१०-११ यवतमाळ जिल्ह्यातील महाऊर्जा यांचे ९०% अनुदानावर व विदर्भ वैधानिक विकास महामंडळ यांचे तर्फ सदर योजनेस अनुदान देण्यात आले ग्राम पंचायती अंतर्गत असलेल्या अभ्यासिकेमध्ये सौर दिप आस्थापित करण्याची सदर योजना आहे. यासाठी ९ किंवा ११ वॅट चे ४ दिवे व ४ तास चालणारी बॅटरी लागणार आहे. सौर घरगुती दिप प्रकार ५ म्हणजे Model 5 असे या सिस्टिमचे नांव असून तीचे खरेदी किंमत २६,२९०/- प्रति नग याप्रमाणे आहे. महाऊर्जा पुणे यांचे दर करारानुसार पुसद तालुक्यासाठी पुंका, पूणे यांनी व दिग्रस तालुक्यासाठी रश्मी इंडस्ट्रीज यांना पुरवठा आदेश देण्यात आले आहे. यावर रक्कम रुपये ३५.५१८७९/- खर्च करण्यात आला याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

१. महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस १०८८/२५१२/उद्योग-६, मंत्रालय, मुंबई -३२, दिनांक २ जानेवारी, १९९२ नुसार काही विशिष्ट वस्तुंची खरेदी ही ठराविक संस्थेकडूनच करावी असे बंधनकारक करण्यात आले आहे. सौर उत्पादने ही बाब महाराष्ट्र ऊर्जा विकास यंत्रणा या संस्थेकडून खरेदी कशाचे आधारे केली.

२. महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र भाखस १०८८/२५१२ उद्योग-६, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २ जानेवारी १९९२ मधील परिच्छेद क्रमांक ७ मध्ये शासनाचे अंगीकृत व्यवसायकाकडून खरेदी करतांनाची सविस्तर प्रणाली निश्चित केली असून त्यानुसार अशी खरेदी ही शासनाचे मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेने केलेल्या दर करारानुसार करावयाची आहे. अशा प्रकारचा दर करार मध्यवर्ती भांडार संघटनेकडून महाराष्ट्र ऊर्जा विकास यंत्रनेकरिता करून दिलेला नाही मध्यवर्वी भांडार संघटनेकडे शासनाचे अंगीकृत व्यवसायाकरिता किंमती निश्चीत करून देण्याचे अधिकार असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. महाराष्ट्र ऊर्जा विकास यंत्रनेने त्यांचेकडे नोंदणी असलेल्या पुरवठादाराकडून खरेदी करणे नियमबाह्य ठरते.

३. महाराष्ट्र शासनाचे दर करार उपलब्ध नसल्यामुळे जिल्हा परिषदेने जि. प. व पं. स. लेख संहिता १९६८ चे नियम ८३ मधील तरतुदीनुसार जाहीर निविदाद्वारे खरेदी करणे आवश्यक होती परंतु तशी कार्यवाही सुद्धा विभागाने केली नाही.

४. महाराष्ट्र जि.प. व पं. स. लेखा संहीता नियम ८९ (२) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी हे महासंचालक पुरवठा व विनियोग नवी कार्यकारी अधिकारी हे महासंचालक पुरवठा व विनियोग नवी दिल्ली यांच्या दर कराराखाली समाविष्ट करण्यात आलेले सामान आणि पुरवठा त्या अधिकाऱ्याचे नांव नोंदविल्यास मिळविण्यास सक्षम होईल. सदर तरतूद नियमात असतांना खरेदी ही शासनाचा दर करार नसलेल्या संस्थेकडून करण्यात आली. तसेच क्रमांक एसपीसी/ आरसिटि/दर करार/संकिर्ण/०५/८२० उद्योग संचालनालय, नविन प्रशासन भवन, मुंबई-३२, दिनांक १७/०२/२००५ नूसार राज्य शासनाचा दर करार अस्तितवात नसल्यास (DGS & D) यांचे कडून खरेदी करण्याची मूभा देण्यात आली आहे.

५. ज्या कालावधीत पुरवठा आदेश देण्यात आला त्याच कालावधीत पुनका या कंपनीची (DGS & D) सोबतचा दर करार क्र Solar light /it-2 RC-D/ ३०२०००/१०१० /८२ /०४९१० /७९३, Date १ Dec २००९, ०१/११/२००९ ते ३१/१२/२०१० पर्यंत वैध असलेला पुनका कंपनीचा दर करार अस्तित्वात होता. पुरवठा आदेशात नमूद सौर घरगुती दिवे प्रकार -५ म्हणजे Model No. - 5 ची किंमत दर करारानुसार २२,०२४/- अधिक ४% वॅट एवढी आहे. परंतु, प्रत्यक्षात वरील नग खरेदी केली आहे. नियमानुसार कार्यवाही न केल्यामुळे रु. ३३८६/- प्रति नग एकूण १४७, नगामार्ग रु. ४९७,५९५/- शासकीय निधीचे नुकसान झाल आहे.

६. पुरवठा केलेल्या साहित्याचा गुणवत्ता चाचणीचा अहवाल उपलब्ध करण्यात आला नाही.

७. अर्धसमास पत्र दिनांक ३०/०८/२०११ व ३/९/२०२१ देऊन ग्रा. पं. स्तरावरील साठा नोंदवह्याची मागणी करून सुद्धा उपलब्ध करून दिल्या नाही. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० चे कलम ०५ अन्वये लेखा परीक्षेसाठी अभिलेख उपलब्ध करून देण्याची जबाबदार ही स्थानिक प्राधिकरणाची आहे.

८. सयंत्रे अस्थापित करताना तसेच आस्थापित केल्या नंतर त्याची पूर्ण तपासणी जिल्हा परिषद मार्फत करणे आवश्यक असताना तशी तपासणी करण्यात आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांचे पत्र क्र ३२४६, दिनांक १८ मे, २००९ चे पत्रामध्ये महाऊर्जाच्या सन २००९-१० चे दर कराराप्रमाणे कार्यदेश देण्यात यावे असे नमूद असल्यामुळे संबंधित संस्थेकडून महाऊर्जाचे दरकरारानुसार खरेदी करण्यात आले.

२. सहायक आयुक्त (विकास) आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्रमांक विकास/पंचायात-१/कवि/३२२/२००९, दिनांक १६/०६/२००९ नुसार महाऊर्जा विकास अभिकरण पुणे यांचे मार्गदर्शन सूचनेचे पत्र क्र. ३२४६, दि. १८ मे २००९ अवलोकनासाठी सादर.

३. सहायक आयुक्त (विकास) आयुक्त कार्यालय अमरावती यांचे पत्र क्रमांक विकास /पंचायत-१ कावि/३३२/२००९ दिनांक १६/०६/२००९ नुसार महाऊर्जा विकास अभिकरण पुणे यांचे मार्गदर्शन सूचने प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश प्राप्त होते. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण पुणे यांचे दर करार असल्यामुळे जाहीर निविदेद्वारे खरेदी करण्याची आवश्यकता भासली नाही.

४. सहायक आयुक्त (विकास), आयुक्त कार्यालय अमरावती यांचे पत्र क्रमांक विकास/ पंचायत-१/कावि/३२२/ २००९ दिनांक १६/०६/२००९ नुसार महाऊर्जा विकास अभिकरण पुणे यांचे मार्गदर्शन सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश प्राप्त होते. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण पुणे ही महाराष्ट्र शासन पुरस्कृत संस्था असल्यामूळे तसेच त्यांचीच योजना असल्यामूळे महाराष्ट्र ऊर्जा विकास यंत्रणेकडे नोंदणी असलेल्या पुरवठादाराकडून खरेदी केली आहे.

५. (DGS & D) चा दरकरार हा केंद्र सरकार चा असतो तसेच सहायक आयुक्त कार्यालय अमरावती यांचे पत्र क्रमांक विकास/ पंचायत-१ /कावि/३२२/२००९, दिनांक १६/०६/२००९ नुसार महाऊर्जा विकास अभिकरण पूणे यांचे मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश प्राप्त होते. त्यामुळे महाऊर्जा विकास अभिकरण पूर्ण यांचे मार्गदर्शन सूचनेप्रमाणे व त्यांचे दर करारानुसार खरेदी करून कार्यवाही करणे आवश्यक होते. त्यानुसार खरेदीची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

६. सौर दिप पुरवठा केल्यानंतर ते योग्य दर्जाचे असल्याबाबतचा अहवाल व दर तीन महिन्यांनी सयंत्र तपासणीचे अहवाल उपलब्ध करण्यासाठी संबधित पुरवठा संस्थेला कळविलेले आहे परंतु तसे अहवाल प्राप्त झालेले नसल्यामुळे ५% टक्के सुरक्षा ठेव त्यांना देण्यात आलेली नाही.

७. लेखा परिक्षणाकरिता ग्रामपंचायतचे सहित्य पोच पावत्या उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तथापि ग्रामपंचायतचे मुळ अभिलेख या स्तरावर उपलब्ध नसल्याने अभिलेखे उपलब्ध करून देण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक २०६१, दिनांक ३०/०८/२०११ अन्वये गट विकास अधिकारी पंचायत समिती दिग्रस व पत्र क्रमांक २०६२ दिनांक ३०/०८/२०११ अन्वेय गट विकास अधिकारी पंचायात समिती पुसद यांना कळविण्यात आले होते. त्यांचे अभिलेख लेखापरिक्षा कालावधी संपल्यानंतर उपलब्ध झाल्याने तत्कालीन वेळी ग्रामपंचायतीचे मुळ अभिलेख निरिक्षणास उपलब्ध करून देता आले नाही. आज रोजी सदर साठा नोंद वह्याची छायांकीत प्रती सोबत जोडण्यात येत आहे.

८. सयंत्रे आस्थापित करतांना तसेच आस्थपित केल्यानंतर त्याची पुणे तपासणी जिल्हा परिषद मार्फत करणे आवश्यक असताना तशी तपासणी करण्यात आली नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

**यवतमाळ जिल्हा परिषदेस समितीने भेट दिली असता, जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी साक्ष घेतली.** समितीने सौर उत्पादने महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्थेकडून खरेदी करणे बंधनकारक नसताना सुद्धा त्यांच्याकडून यासंबंधी खरेदी कशाच्या आधारे करण्यात आली? अशी विचारणा केली असता कृषि विकास अधिकारी (प्र) यांनी समितीला विदित केले की, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांच्याकडील दिनांक १८ मे, २००९ च्या पत्रानुसार महाऊर्जाच्या सन २००९-२०१० च्या दर करारानुसार संबंधित यंत्रणेकडून सौर दीप खरेदी केली आहे. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे निदेश दिले की, अनेक वेळा चांगल्या क्वॉलिटी व क्वांटिटीनुसार जास्त पैसे घेतले जातात. या संदर्भात संपूर्ण चौकशी करून समितीकडे सविस्तर माहिती पाठवावी. त्यानंतर त्या अनुषंगाने सचिवांची साक्ष घेण्यात येईल. यावर कृषि विकास अधिकारी (प्र) यांनी होकारात्मक संमत्ती दर्शविली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :-**

सौर उत्पादने महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्थेकडून खरेदी करणे बंधनकारक नसतांनासुद्धा त्यांच्याकडून खरेदी करण्याची कारणे काय आहेत ? सदरहू खरेदीप्रकरणातील गैरव्यवहारासंदर्भात सखोल चौकशी करून संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे? नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :**

मा.पंचायती राज समितीने दिलेल्या सुचनेनुसार चौकशी करण्यात आली त्यानुसार सदरचा निधी हा विदर्भ वैधानिक विकास मंडळ यांचेकडून महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण मार्फत निवडक जिल्ह्यांना प्राप्त होता. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांचे पत्र क्र. ३२४६ दिनांक १८ मे २००९ चे पत्रामध्ये महाऊर्जाच्या सन २००९-१० चे दर कराराप्रमाणे कार्यादेश देण्यात यावे, असे नमूद असल्यामुळे संबधित संस्थेकडून महाऊर्जाचे दर करारानुसार खरेदी करण्यात आली.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण पुणे ही महाराष्ट्र शासन पुरस्कृत संस्था असल्यामुळे व त्यांनी दर करार केल्यामुळे तसेच त्यांचीच योजना असल्यामुळे महाराष्ट्र ऊर्जा विकास यंत्रणनेकडे नोंदणी असलेल्या पुरवठादाराकडून खरेदी केली आहे. यामध्ये कोणतीही अनियमितता आढळून आली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**ग्रामविकास विभाग यांचे अभिप्राय.—**जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या अभिप्रायाशी ग्रामविकास विभाग सहमत आहे.

**चौकशी अहवाल :**

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद यवतमाळ येथे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी दिलेल्या भेट व बैठकी दरम्यान झालेल्या चर्चेत ग्राम पंचायत अभ्यासिकेसाठी सौर दिप पुरविणे योजनेमधील अनियमिततेबाबत सविस्तर चौकशी करून वस्तुस्थिती अहवाल समितीसमोर ठेवण्याच्या सुचना समिती कडून देण्यात आल्या त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे चौकशी अहवाल सादर करण्यात येत आहे.

सन २००९-२०१० या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद कृषि विभागास ९०% अनुदानावर ग्राम पंचायत अभ्यासिकेसाठी सौर दिप पुरविणे ही योजना अंतर्गत निधी विदर्भ विकास महामंडळ यांचे कडून महाऊर्जा यांना प्राप्त झाले व महाऊर्जा यांचे कडून जिल्हा परिषदेस प्राप्त झाला. त्या अनुषंगाने सदर योजना सन २००९-२०१० या वित्तीय वर्षात राबविण्यात आली व त्या बाबातचे देयेक सन २०१०-११ या वित्तीय वर्षात अदा करण्यात आले आहे.

सदर योजनेसाठी पुसद तालुक्यातील ११९ ग्रामपंचायती व दिग्रस तालुक्यातील ५४ ग्रामपंचायती असे एकूण १७३ ग्रामपंचायती निवड करण्यात आली. योजनेचे निकषानुसार सदर ग्रामपंचायतीकडून लोक वर्गणीची १०% रक्कम रु. ४,५५,०००/- घेण्यात आली.

ग्रामपंचायत अभ्यासिकेसाठी सौर दिप पुरविणे ह्या योजनेचा पुरवठा आदेश मेडा पुणे यांचे दरकरार नुसार पुसद तालुक्यासाठी पुंका पुणे यांना व दिग्रस तालुक्यासाठी रश्मी इंडस्ट्रीज यांना देण्यात आला. त्यानुसार ग्रामपंचायतीमध्ये सौरदिप आस्थापित करण्यात आले. पुरवठा आदेशातील अटी नुसार पाच वर्ष कालावधीसाठी सयंत्राची देखभाल दुरूस्तीचा करार करून घेण्यात आला. तसेच ०५ वर्ष कालावधी येणाऱ्या कुठल्याही दुरूस्तीसाठी व सयंत्र कार्यरत ठेवण्यासाठी एखादा भाग (पार्ट) उत्पादनाच्या उनीवा असल्यामुळे बदलण्यासाठी कोणत्याही प्रकारचा मोबदला देण्यात येणार नाही.

सदर योजना सन २००९-२०१० मध्ये कार्यान्वित करण्यात आली. सद्यःस्थितीत योजनेस १० वर्षाचा कालावधी झालेला आहे. यादरम्यान कोणत्याही ग्रामपंचायतीकडून अथवा इतर यंत्रणेकडून याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदर योजनेतील साहित्य निकृष्ट असल्याचे म्हणता येणार नाही. ०५ वर्षानंतर बॅटरी व इतर आवश्यक साहित्य बदलविण्याची जबाबदारी ही ग्रामपंचायतीची आहे. पुरवठा आदेश महाऊर्जा विकास अभिकरण यांचे स्पेसीफीकेशन व दर करारानुसार पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. पुरवठादार कंपनीने पुरवठा आदेशातील अट क्रमांक ९ नुसार दर तीन महिन्यांनी सादर करावयाचा अहवाल सादर न केल्यामुळे पुरवठादाराची ०५ टक्के सुरक्षा ठेव रक्कम रोखुन ठेवण्यात आलेली आहे.

याबाबत पंचायती राज समितीने सचिव, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांची साक्ष लावण्याबाबत निदेशित केले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, सौर उत्पादने महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्थेकडून खरेदी करणे बंधनकारक नसतानासुद्धा त्यांच्याकडून खरेदी करण्याची कारणे काय आहेत, सदरहू खरेदी प्रकरणातील गैरव्यवहारासंदर्भात चौकशी केली आहे काय व त्या चौकशीच्या निष्कर्षानुसार आपण कोणती कारवाई केली आहे? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, यामध्ये जो फंड होता तो विदर्भ वैधानिक विकास मंडळ यांना दिला होता. त्यांनी मेडासोबत ॲग्रिमेंट करून महाऊर्जा मार्फत ती योजना राबविली होती.

यावर समितीने या योजनेंतर्गत कशाची खरेदी केली होती? असा प्रश्न विचारला असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उत्तर दिले की, सोलार लाईट्सची खरेदी केली होती. तसेच यामध्ये अनियमितता आढळून आली नाही. ग्राम पंचायतीची एकूण ४ लक्ष ५५ हजारांची खरेदी होती. यावर समितीने विदित केले की, ग्रामविकास विभागाने सहमती दिलेली आहे की, यामध्ये अनियमितता नाही.

अपर मुख्य सचिव (ग्रामविकास) यांनी समितीला यासंदर्भात पुढीलप्रमाणे खुलासा केली की, ऑडिटचा मुख्य मुद्दा असा आहे की, महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्थेकडून सौर उत्पादनांची खरेदी केलेली आहे. आपले असे म्हणणे आहे की, ती बंधनकारक नाही. परंतु, त्या वर्षी ते बंधनकारक होते. त्यांचा दर करार होता. यावर समितीने विचारणा केली की, राज्यामध्ये ग्रामीण भागात बऱ्याच ठिकाणी सोलार लाईट्स दिल्या जातात. आपण मार्केटमधून त्या विकत घेतल्या तर त्यांची किंमत १८ हजारांपासून ते २० ते २५ हजार इतकी असते. आपले स्टँडर्ड एस्टीमेट १ लाख ६० हजार, १ लाख २५ हजार असे असते, याबाबत सांगावे. यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीला विदित केले की, पुण्याला जे प्राधिकरण आहे ते याचे स्टँडर्ड ठरवून देतात त्याप्रमाणे करतो. यावर समितीने या सोलार लाईट्स गावाच्या फायद्यापेक्षा त्या कॉंट्रॅक्टरच्या फायद्यासाठी घेतल्या जातात असे वाटावे असे चित्र आहे. त्या एका लाईटच्या किंमतीमध्ये मार्केटमध्ये ४ लाईट्स मिळू शकतात असे अपर मुख्य सचिव यांच्या निर्दशनास आणून दिले असता, अपर मुख्य सचिव यांनी हायमास्टचे लाईट्स आता बंदच केले आहेत तसेच या सर्व योजनांमध्ये पॉप्युलर स्कीम आहे असे समितीला सांगितले. यावर समितीने मत व्यक्त केले की, तसाच निर्णय घ्या. बंद करा. नाही तर ग्रामीण भागात याच्या नावाखालील निव्वळ पैसे काढणे सुरू आहे. गावामध्ये स्ट्रिट लाईट्स आहेतच. त्यावर लाईट लावली तर ती लाईन मिळू शकते. परंतु, हे केवळ ठेकेदार लोकांसाठीच चाललेले दिसते. मार्केटमध्ये १८ ते २० हजारात लाईट मिळते. मात्र यांचे एस्टीमेटच १ लाख ६० हजारांचे आहे. यावर अपर मुख्य सचिव यांनी समितीला विदित केले की, आता हायमास्ट यांना बॅन केले आहे. एमएसईबीचे बिल पाहून निर्णय घेतला की, कोणत्याही योजनेत हायमास्ट यांना घेऊ नये. यावर समितीने अपर मुख्य सचिव यांचे अभिनंदन करून आपण चांगला निर्णय घेतला आहे असे विदित केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

यवतमाळ जिल्ह्यातील महाऊर्जा यांचे ९० टक्के अनुदानावर व विदर्भ वैधानिक विकास महामंडळ यांचे तर्फे ग्रामपंचायती अंतर्गत असलेल्या अभ्यासीकेमध्ये सौर दिप आस्थापित करण्याची सदर योजना आहे. महाऊर्जा पुणे यांच्या दर करारानुसार पुसद तालुक्यातील पुंका, पुणे यांना व दिग्रस तालुक्यासाठी रश्मी इंडस्ट्रीज यांना पुरवठा आदेश देण्यात आला असून रूपये २६,२९०/- प्रति नग याप्रमाणे रूपये ३५,५१,८७९/- इतका खर्च करण्यात आला आहे. शासनाचे दर करार उपलब्ध नसल्यामुळे जाहीर निविदाद्वारे खरेदी करणे आवश्यक होते, परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. नियमानुसार कार्यवाही न केल्यामुळे ३३८६/- रूपये प्रति नग याप्रमाणे रूपये ४,९७,५९५/- इतक्या शासकीय निधीचे नुकसान झाले आहे. पुरवठा केलेल्या साहित्याचा गुणवत्ता चाचणीचा अहवाल उपलब्ध करण्यात आला नाही. ग्रामपंचायत स्तरावरील साठा नोंदवह्याची मागणी करून सुद्धा उपलब्ध करून दिल्या नाहीत. समितीस सादर करण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने या प्रकरणाची चौकशी करून याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

त्यानुसार जिल्हा परिषद यांनी चौकशी अहवालासह सादर केलेली माहिती, मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिव यांच्या घेण्यात आलेल्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, सन २००९-२०१० या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद कृषी विभागास ९० टक्के अनुदानावर ग्रामपंचायत अभ्यासीकेसाठी सौर दिप पुरविणे ही योजना अंतर्गत विदर्भ विकास महामंडळ यांचेकडून महाऊर्जा यांना प्राप्त झालेला निधी जिल्हा परिषदेस प्राप्त झाला. सदर योजनेसाठी पुसद तालुक्यातील ११९ ग्रामपंचायती व दिग्रस तालुक्यातील ५४ ग्रामपंचायती असे एकूण १७३ ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली. ग्रामपंचायत अभ्यासीकेसाठी सौर दिप पुरविण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांच्याकडे नोंदणी असलेल्या पुरवठादाराकडून निश्चित केलेल्या दर करारानुसार पुसद तालुक्यासाठी पुंका, पुणे व दिग्रस तालुक्यासाठी रश्मी इंडस्ट्रीज यांना पुरवठा आदेश देण्यात आले. पुरवठादाराची ०५ टक्के सुरक्षा ठेव रक्कम रोखुन ठेवण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत योजनेस १० वर्षाचा कालावधी झालेला

असून कोणत्याही ग्रामपंचायती अथवा इतर यंत्रणेकडून याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. या प्रकरणामध्ये कोणतीही अनियमितता आढळून आलेली नाही.

**ग्रामीण भागात रात्रीच्या वेळेस विद्यार्थ्यांना अभ्यास करता यावा, वाचन संस्कृतीला चालना मिळावी, गावातील तरूणांमध्ये संवाद वाढावा व त्यांच्यामधील संपर्क कायम रहावा या उद्देशाने ग्रामपंचायतीच्या अभ्यासीकेसाठी सौर दिप पुरविणे योजना शासनाकडून राबविण्यात येते. अनेक ग्रामपंचायतींनी या सौर दिव्यांची व्यवस्था अतिशय चांगल्याप्रकारे केली असून त्याची देखभालही नियमित करण्यात येत असल्याने सदरहू सौर दिवे कार्यरत आहेत.या योजनेंतर्गत पुसद व दिग्रस तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील अभ्यासीकेसाठी पुरविण्यात आलेल्या सौर दिप प्रकरणामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नसताना लेखापरिक्षकांकडून अर्धसमास पत्रान्वये ग्राम स्तरावरील साठा नोंदवहींची मागणी करून सुद्धा उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याच्या वेळी त्या तारखेसबंधी आवश्यक कालावधीची नोटीस जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना पाठविण्यात येते. अभिलेखे सादर करण्यास संधी दिल्यानंतरही साठा नोंदवह्या लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे या प्रकरणाची तपासणी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी व त्यानुसार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये कारवाई करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**ग्रामपंचायतींना सौर दिप पुरविण्याबाबतच्या योजनेवर चर्चा करत असताना समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणले की, "राज्यात विजेची बचत करून अपारंपारिक ऊर्जास्त्रोतांचा वापर वाढावा आणि गावापासून दूर अंतरावर असलेल्या वाड्या वस्त्यांना जाणाऱ्या रस्त्यांवरील अंधार दूर करण्यासाठी ग्रामीण भागात सौर पथ दिवे लावण्याबाबतचे धोरण शासनाने राबविले आहे. ग्रामीण भागातील पथ दिव्यांसाठी सौर पथदिवे हा एक उत्तम पर्याय असून त्याची कार्यक्षमता देखील चांगली असते. सदरहू सौर पथदिवे सामान्यपणे बाजारात २० ते २५ हजारात मिळत असताना त्याचे अंदाजपत्रक १ लाख ६० हजार पर्यंत असते. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर हायमास्ट पथदिवे लावण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांवरील पथदिव्यांच्या विद्युत देयकावरील खर्च भागविण्यासाठी १०० टक्के अनुदान राज्य शासन देते. बहुतांश ग्रामपंचायती त्यांच्या हद्दीत अनेक ठिकाणी हायमास्ट पथदिवे बसवित असल्याने विद्युत देयकावरील खर्चात गेल्या काही वर्षात वाढ झालेली आहे". या सर्व बाबींचा विचार करता सदरहू खर्चाची बचत करण्यासाठी एलईडीचे दिवे वापरण्यासह ग्रामीण भागातील रस्त्यांवरील दिवे सौर ऊर्जेवर आधारित करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यक असल्याने याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी असे निदेश समितीने विभागीय सचिवांना दिले. यावर यापुढे ग्रामीण भागात ग्रामपंचायतीच्या रस्त्यांवर हायमास्ट दिवे न लावण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असल्याचे समितीस विभागीय सचिवांनी आश्वासीत केले. त्यानुसार ग्रामविकास विभागाने दिनांक ८ डिसेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील दिवे हायमास्टचे न बसविण्याबाबत" सर्व संबंधितांना आदेशित केले. पथदिव्यांबाबत चांगला निर्णय घेतल्याने समिती शासनाचे अभिनंदन करत आहे.**

# प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, यवतमाळ

## अंगणवाड्यांना पुरवठा केलेल्या पुरक पोषण आहाराबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८७७ (सन २०१०-११)**

महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद यवतमाळचे लेखा परिक्षण केले असता सलोखा प्रशिक्षण कालावधित एकात्मीक बालविकास सेवा योजना अंतर्गत पुरवठा दारामार्फत अंगणवाडी स्तरावर टि.एच.आर. पुरवठा केला असून त्या संबंधात देयकाची रक्कम अदा करणेकरिता अंगणवाडी स्तरावरून पंचायत स्तरावरील बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे मार्फत देयकाचे संकलन करून जिल्हा स्तरावरील उप मुख्य कार्यकारी अधिकारी बा.क.यांचेकडे सादर केले आहे. तद्नंतर मागणी केलेल्या रकमा संबंधात योग्य ती तपासणी करून शिफारशिंसह प्रतिस्वाक्षरी करून देयक अदा करणेसाठी महिला बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्रमांक १०७४ दिनांक ११.२.२०११ अन्वये रक्कम रुपये ११,२६,६१,५७७/- ची देयके पाठविण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

१. शासन निर्णय महिला बाल कल्याण विकास विभाग शासन निर्णय एबावि/२००८/प्र.क्र.५९/का-५, दिनांक २४.५.२००९ नुसार एकात्मीक बाल विकास सेवा योजने अंतर्गत पुरक पोषण आहाराच्या विवरणाबाबत सुधारित कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार बालकांना व गरोदर मातांना आहार घरी घेऊन जाण्यासाठी take home ration परवानगी दिली आहे. सदर शासन निर्णयातील परिपत्रक क. ३.१ नुसार टि.एच.आर. जिथे द्यावयाचा आहे त्या क्षेत्रातील स्वयंसहायता महिला बचत गटाची आयुक्त एबाविसेयो नवी मुंबई यांनी कार्यवाह करावयाची आहे. त्यानुसार आयुक्तालय एबाविसेयो नवी मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक जा.क्र. एबाविसे/का-२/३२६४/ दिनांक २८ मे २०१० नुसार यवतमाळ जिल्ह्यासाठी व्यंकटेश्वर महिला औद्योगिक सहकारी संस्था उदगीर युनिट कापसी खुर्द, नागपूर यांची पुरवठादार म्हणून नियुक्ती केली आहे.

   वरील परिपत्रकातील परिशिष्ट क्रमांक इ (२) नुसार पहीले तीन पुरवठादाराचे देयके अदा करण्यासाठी आयुक्तस्तरावर पाठविणेबाबत निर्देशित केले आहे. तसेच आयुक्तलयाचे समक्रमांकीत पत्रक्रमांक १०७४, दि १०.२.२०११ नुसार पुढील सुचनापर्यंत THR ची देयके आयुक्तालयात दर्शविलेले देयके उप मुख्य म. बालकल्याण अधिकारी यांनी सादर केली आहे. वास्तविक पाहता सदरची योजना महाराष्ट्र जि. प. अधिनियम १९६१ चे कलम १२३ नुसार अभिकरण तत्वावर राबविण्यासाठी जिल्हा परिषदेस सुर्पूद केली आहे. त्यामुळे सदर योजना अर्थसंकल्प तरतुदीसह योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करणे बंधनकारक आहे. शासन निर्णय दि. २४.८.२००९ मध्ये सुद्धा देयके आयुक्तालयाच्या स्तरावरून अदा करणे बाबत निर्देश दिले नाही. परंतु वर नमूद केल्याप्रमाणे अनाकलनीय रित्या आयुक्त एबाविसेयो यांनी देयके आयुक्तस्तरावरून अदा केली आहे. सदर देयकांच्या अदायगीपूर्वी आवश्यक असणारी वित्तिय तपासणी व प्रमाणपत्रे संबंधित प्रकल्प अधिकारी व उप मुकाअ बाल कल्याण अधिकारी यांचेकडून देयक आयुक्तस्तरावर मागणी केली आहे. यावरून पुरवठादाराने आर्थिक हित संबध जोपासण्याच्या हेतुने अर्थसंकल्पीय तरतूद थेट जिल्हा परिषदेला वितरित करतांना आयुक्तस्तरावर ठेवुन उपलब्ध नसुन ती आयुक्त यांचेकडे आहेत. खर्चाच्या मुळ प्रमाणकाशिवाय लेखा परिक्षण शक्य नाही. शासन निर्णय दिनांक २४/८/२००९ ची प्रत मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा म.रा.मुंबई यांना पृष्ठांकित केली असल्याने योजनेच्या लेखा परिक्षणाची सवेधानिक स्थानिक निधी लेखा विभागाची आहे. याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी बाक यांनी शासनाकडून यथायोग्य आदेश प्राप्त करून घेऊन मुळ प्रमाणकासह अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करून द्यावे.

२. आयुक्त एबाविसेयो नवी मुंबई यांना सन २०१०-११ या वर्षामध्ये एकूण रुपये ११,२६,६१,५७७/- ची देयके अदायगीसाठी पाठविण्यांत आली. अधिनियमाचे कलम १२३ नुसार अभिकरण तत्वावर सुपर्द केलेल्या योजनांना एकूण योजना खर्चाच्या ५ टक्के अभिकरण शुल्क देय आहे. त्यानुसार जिल्हा परिषद, यवतमाळ वरिल योजना खर्चाचे ५ टक्के रक्कम रुपये ५६,३३,०७८/- देय आहे. तथापी आयुक्तालयानी वरील देयके त्यांचेस्तरावर अदा केल्याने जिल्हा परिषदेस अभिकरण शुल्क मिळू शकले नाही. ही योजना राबविण्यासाठी आयुक्तालयाने कर्मचारी वर्गासह संपूर्ण यंत्रणा जिल्हा परिषदेची वापरल्याने जिल्हा परिषदेला निश्चितपणे अभिकरण शुल्क देय आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. शासन निर्णय महिला बाल कल्याण विकास विभाग शासन निर्णय एबावि/२००८/प्र.क्र.५९/का-५, दिनांक २४.५.२००९ नुसार एकात्मीक बाल विकास सेवा योजने अंतर्गत पुरक पोषण आहाराच्या विवरणाबाबत सुधारित कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार आयुक्तालय एबाविसेयो मुंबई यांचे परिपत्रक क्रमाक जाक्र/एबाविसेयो/का- २/३२६४/२०१० दि. २८.५.२०१० नुसार यवतमाळ जिल्ह्यासाठी व्यंकटेश्वर महिला औद्योगिक सहकारी संस्था उदगीर युनिट कापसी खुर्द, नागपूर यांची पुरवठादार म्हणून नियुक्ती केली आहे. वरिल परि. क्र./२ नुसार पहिले ३ पुरवठ्याची देयके आयुक्तस्तरावर पाठविणे निर्देशीत केले आहे. तसेच आयुक्तालयाचे समक्रमाकींत पत्र क्रमाक १०७४ दि. ११.२.२०११ नुसार पुढील सुचनेपर्यंत टि.एच.आर. ची देयके आयुक्तालयात सादर करण्याबाबत वरिष्ठांचे आदेश असल्यामुळे संपूर्ण देयके मुळ प्रमाणकासह आयुक्त कार्यालयास सादर करण्यात आलेले असल्याने सदर खर्च आयुक्तालयाचे स्तरावरून झालेला आहे. खर्चासंबधि मुळ प्रमाणके ही आयुक्त कार्यालयाचे स्तरावरील व त्यांचे ताब्यातील असल्याने त्या कार्यालयाचे लेखा परिक्षण हे महालेखाकार कार्यालयाकडून स्वतंत्र रित्या होत असल्याने त्यांचेकडून सदर मुळ प्रमाणक जिल्हा परिक्षण हे महालेखाकार कार्यालयाकडून स्वतंत्र रित्या होत असल्याने त्यांचेकडून सदर मुळ प्रमाणक जिल्हा परिषदेला उपलब्ध होवु शकली नाही. यासंबधी आयुक्त कार्यालयास दस्त ऐवज मागणी बाबत पत्राची प्रत संलग्न करण्यात येत आहे.

२. सन २०१०-११ या वित्तिय वर्षाअंतर्गत झालेल्या रुपये ११,२६,६१,५७७/- खर्चावर आधारीत अभिकरण शुल्कांची सन २००९-१० मधील उर्वरित सन २०१०-११ मधील ५ टक्के अभिकरण शुल्कांची रक्कम जिल्हा परिषद सेसफंडात रुपये २४,१७,१७३/- व रुपये ४०,००,०००/- जमा करण्यात आलेली आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

**यवतमाळ जिल्हा परिषदेस समितीने भेट दिली असता, जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी साक्ष घेतली.** साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सदर पूरक पोषण आहार शिजवून दिला जातो का यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केली की, सध्या कोविड काळात पूरक पोषण आहार शिजवून दिला जात नाही. आपल्याला महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कंझ्युमर फेडरेशनकडून पॅकबंद स्वरुपात तांदुळ, गहु, चना, चवळी, मटकी येते. सदर आहार व्यवस्थित असल्याबाबत त्यांच्याकडील प्रमाणपत्र सुद्धा असते. सदर लाभ ३ ते ६ वयोगटातील मुलांना दिला जातो. यावर समितीने विचारण केली की, सध्या कोरोना काळ सुरू असल्यामुळे आलेल्या मालाचे नमुने तपासले जातात का तसेच समितीला सदर आहाराचा दर्जा योग्य नसल्याबाबत काही ठिकाणी निदर्शनास आले आहे. सदर पोषण आहाराची अंगणवाडीमध्ये जाऊन तपासणी केली आहे का? तसेच त्या किटचे वजन केले आहे का ?

यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, एनएलबी लॅबकडे सदर नमुने पाठवून त्यांची तपासणी करून घेतली जाते. परंतु कोरोना काळात या संदर्भात तपासणी केलेली नाही. यापूर्वी सदर तपासणी केली आहे.

तद्नंतर समितीने विदित केले की, वजनासंबंधी सांगायचे झाल्यास अनेक वेळा सदर पॅकिंग २० ते ३० ग्रॅम वजन कमी असते. त्यामुळे सदर पोषण आहाराचा दर्जा, वजन तपासणे ही आपली जबाबदारी आहे. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले केले की, त्यांच्याकडे डिजीटल वजन काटे आहेत. वजन कमी असल्याची शंका आल्यास डिजीटल वजन काट्यांवर त्यांचे वजन केले जाते. यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने त्यांच्या निदर्शनास आणून दिले की, त्यांच्याकडून पोषण आहाराचा पुरवठा न करता सब एजंटकडून मालाचा पुरवठा केला जातो. तसेच या संदर्भात सचिव, महिला बाल विकास विभाग आणि संचालक, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कंझ्युमर फेडरेशन यांची साक्ष घेण्यात येईल असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :-**

१. अंगणवाड्यांच्या पुरक पोषण आहारासंदर्भातील गुणवत्ता, मालाचा दर्जा व गुणवत्ता योग्य नसल्याबाबत माहिती न मिळणे तसेच पोषण आहाराच्या किटसच्या पॅकींगमध्ये २० ते ३० ग्रॅम वजन कमी असणे, पोषण आहाराच्या मालाचा पुरवठा सब एजंटकडून करणे इत्यादीबाबत समितीने निर्देश दिल्यानुसार उप मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली आहे काय ?

असल्यास उक्त चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :**

मा. पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार महिला व बाल कल्याण विभाग यांचा केलेल्या चौकशी अहवालामध्ये नमूद केल्यानुसार सदर बाबतीत अहवालामध्ये नमूद केल्यानुसार सदर बाबतीत दिनांक ०८/०९/२०२१ रोजी नेर प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या अंगणवाडी केंद्रांना भेटी दिल्या सदर भेटीच्या वेळी अंगणवाडी केंद्रातील आहाराची मोजणी करण्यात आली अंगणवाडी मध्ये पुरवठा करण्यात आलेला आहार पुरवठ्याचे पाकिटांचे वजन करण्यात आली असता सर्व पाकिटांचे वजन निकषानुसार बरोबर भरली. ती खालीलप्रमाणे आहेत.

१. ३ वर्षे ते ६ वर्षे लाभार्थीकरिता पुरवठा करण्यात येणारा आहार १) तांदुळ १९०० ग्रॅम पाकीट २) गहु १९०० ग्रॅम पाकीट ३) चना १५०० ग्रॅम पाकीट ४) दाळ १००० ग्रॅम पाकीट ५) मिरची पावडर २०० ग्रॅम पाकीट ६) हळदी पावडर २०० ग्रॅम पाकीट ७) मिठ ४०० ग्रॅम पाकीट ८) साखर १००० ग्रॅम पाकीट या प्रमाणे भरला .

२. ६ महिने ते ३ वर्षे लाभार्थीकरिता पुरवठा करण्यात येणारा आहार १) गहु ४००० ग्रॅम पाकीट २) चना ग्रॅम पाकीट ३) दाळ १००० ग्रॅम पाकीट ४) मिरची पावडर २०० ग्रॅम पाकीट ५) हळदी पावडर २०० ग्रॅम पाकीट ६) मिठ ४०० ग्रॅम पाकीटी ७) साखर १००० ग्रॅम पाकीट या प्रमाणे भरला.

३. गरोदर व स्तनदा माताकरिता पुरवठा करण्यात येणारा आहार- १) गहु ४४०० ग्रॅम पाकीट २) चना २००० ग्रॅम पाकीट ३) दाळ १५७५ ग्रॅम पाकीट ४) मिरची पावडर २०० ग्रॅम पाकीट ५) हळदी पावडर २०० ग्रॅम पाकीट ६) मिठ ४०० ग्रॅम पाकीट ७) साखर १००० ग्रॅम पाकीट या प्रमाणे भरला.

सदर आहाराचे नमुने ताब्यात घेऊन NABL लॅब मधून तपासणी करण्यात आली, त्या आहाराचा तपासणी अहवाल निकषानुसार योग्य आहे. (सदर अहवाल या सोबत संलग्न करण्यात येत आहे.) तसेच सदर बाबतीत सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प सर्व यांना तपासणी करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहे. त्या नुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी त्यांचे पर्यवेक्षीय भेटीमध्ये आहाराचे वजन व दर्जा बाबत खात्री करतात. तसेच प्रत्येक पुरवठ्याचा नमुना पुरवठा पश्चात रॅन्डमली तपासणी करून आहाराच्या दर्जाबाबत खात्री करण्यात येते. बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प पुसद, नेर, दारव्हा यवतमाळ व आर्णी येथील नमुना तपासणी नजीकच्या काळात NABL लॅब मधून तपासणी करण्यात आली. त्या आहाराचा तपासणी अहवाल निकषानुसार योग्य आहे.(सदर अहवाल या सोबत संलग्न करण्यात येत आहे.) अंगणवाडी सेविका ह्या अंगणवाडी केद्रांत असणाऱ्या वजन काट्यावर अंगणवाडी केंद्रात पुरवठा करण्यात येणारा आहार प्रत्येक वेळी मोजुन घेतात, तसेच अंगणवाडी पर्यवेक्षिका, बाल विकास प्रकल्प अधिकारी आपले पर्यवेक्षिय भेटीमध्ये आहाराचे वजन व दर्जाबाबत खात्री करतात. टि.एच.आर. आहारा मधील धान्याचे/मालाचे वजन कमी असल्याबाबत तक्रार प्राप्त नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**महिला व बालकल्याण विभाग यांचे अभिप्राय.—**जिल्हा परिषदेने दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, अंगणवाड्यांच्या पूरक पोषण आहारासंदर्भातील गुणवत्ता मालाचा दर्जा व गुणवत्ता योग्य नसल्याबाबत माहिती न मिळणे, तसेच पोषण आहाराच्या किट्सच्या पॅकिंगमध्ये २० ते ३० ग्रॅम वजन कमी असणे, पोषण आहाराच्या मालाचा पुरवठा सब एजंटकडून करणे इत्यादीबाबत समितीने गंभीर आक्षेप नोंदविले होते. त्या संदर्भात विभागाने काय कारवाई केली.

सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, आम्ही आपल्याला सांगू इच्छितो की, सध्या जे टि.एच.आर. दिले जाते त्यामध्ये येथे उल्लेख केल्याप्रमाणे शिरा, उपमा दिला जात नाही. सन २०११ मध्ये तो दिला जात असे. परंतु, सन २०१९ मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयातील एका रिट पिटिशनमध्ये एक डायरेक्शन देण्यात आले. त्या अनुषंगाने हे सर्व टेंडर रद्द करण्यात आले होते.

दिनांक ३० मार्च २०१९ रोजी माननीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली हायपॉवर कमिटीची बैठक झाली. त्या हायपॉवर कमिटीने निर्णय घेतला की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे पालन करायचे. पहिला आदेश असा होता की, जे टेंडर सुरू होते, ते रद्द करावे. त्यानुसार ते रद्द करण्यात आले. दुसरा आदेश असा होता की, तात्पुरत्या स्वरुपात टि.एच.आर.ची व्यवस्था करण्याबाबतचा निर्णय घ्यावा.

तिसरा आदेश असा होता की, तुम्ही रि-टेंडरची प्रोसेसिंग सुरू करा. अशाप्रकारे माननीय सर्वोच्च न्यायालयाने ६-७ डायरेक्शन्स दिले होते. त्या अनुषंगाने ज्या टेंडरमार्फत उपमा, शिरा याकरिताची प्री कुक सामग्री दिली जात होते ते टेंडर कॅन्सल झाले.

सन २०१९ नंतर हायपॉवर कमिटीच्या निर्णयानंतर या सर्व एजन्सीमार्फत जो काही पुरवठा केला जात होता ते सर्व टेंडर रद्द झाले. हाय पॉवर कमिटीने कन्झ्युमर फेडरेशनकडे ही सर्व जबाबदारी दिलेली आहे. तेव्हापासून कन्झ्युमर फेडरेशनमार्फत टेक होम रेशनचा पुरवठा अंगणवाडी स्तरावरील लाभार्थ्यांना केला जातो. सध्या त्यांना फक्त ड्राय रेशन दिले जाते. प्री कुक मिल ज्याचा उल्लेख यामध्ये आहे तो शिरा, उपमा तो त्यांना सध्या देत नाही. सन २०१९ मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले. त्यानंतर हायपॉवर कमिटीने डायरेक्शन्स दिले की, कॉंट्रॅक्टरला जे कॉंट्रॅक्ट दिले होते ती सर्व प्रक्रिया बंद करा. ती नंतर बंद झाली. सन २०१९ नंतर हायपॉवर कमिटीने निर्णय घेतल्यानंतर कन्झ्युमर फेडरेशन मार्फत सध्या आपण फक्त ड्राय रेशन देतो. कोविडच्या काळात ३ ते ६ या वयोगटातील मुलांना हॉट कुक मिल दिले जात होते. परंतु, अंगणवाडी बंद झाल्यामुळे तेथे हॉट कुक मिल देता आले नाही. त्यामुळे त्यांना देखील टेक होम रेशन देण्यास सुरू केले ते अजूनही सुरू आहे.

यावर समितीने लेखा आक्षेप क्रमांक ३.८७७ मध्ये महालेखाकारांनी पूरक पोषण आहारासंदर्भात अंगणवाड्यांना पुरवठा केलेला पुरक पोषण आहार टि.एच.आर. (सत्तू, शिरा, उपमा, सुकडी) याबाबत आक्षेप काढलेला आहे. आपण असे म्हणत आहात की, आपण आता ते देणे बंद केले आहे. महालेखाकारांनी याबाबत लेखा आक्षेप काढलेला आहे. याबाबतची वस्तुस्थिती सांगावी.

यावर सचिवांनी पुढीलप्रमाण खुलासा केला की, जेव्हा ऑडिट ऑब्जेक्शन झाले होते तेव्हा ती पद्धत सुरू होती. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सन २०१६ पासून रिट पिटिशन दाखल होते. त्यावर सन २०१९ मध्ये निर्णय झाला. त्यानंतर ती सर्व प्रक्रिया बंद झालेली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या डायरेक्शन्सच्या अनुषंगाने विभाग कार्यवाही करीत आहे. टेक होम रेशन देत आहे. सुखडी वगैरे देणे बंद झालेले आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

एकात्मिक बालविकास सेवा योजने अंतर्गत पुरवठादारा मार्फत अंगणवाडी स्तरावर टि.एच.आर. पुरवठा केला असून त्या संबंधात देयकाचे रु.११,२६,६१,५७७/- इतकी रक्कम अदा करण्याकरिता अंगणवाडी स्तरावरून पंचायत स्तरावरील बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडून देयकाचे संकलन करून जिल्हास्तरावरील उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) यांच्याकडे सादर करण्यात आले. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी यवतमाळ जिल्ह्यासाठी व्यंकटेश महिला औद्योगिक सहकारी संस्था, नागपूर यांची पुरवठादार म्हणून नियुक्ती केली. सदरची योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम, १९६१ चे कलम १२३ नुसार अभिकरण तत्वावर राबविण्यासाठी जिल्हा परिषदेस सपुर्द केली आहे. त्यानुसार सदर योजना अर्थसंकल्पीय तरतुदीसह योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करणे बंधनकारक आहे. परंतु अनाकलनीयरित्या आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी देयके आयुक्तस्तरावरून अदा केली आहेत. सदर देयकाच्या अदायगीपूर्वी आवश्यक असणारी वित्तीय तपासणी व प्रमाणपत्रे संबंधित प्रकल्प अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) यांच्याकडून देयक आयुक्तस्तरावर मागणी केली आहे. त्यामुळे मूळ प्रमाणकाशिवाय लेखा परिक्षण शक्य नसल्याने मूळ प्रमाणकासह अभिलेखे उपलब्ध करून द्यावेत. तसेच सन २०१०-२०११ या वर्षामध्ये या योजनेतील एकूण रु. ११,२६,६१,५७७/- इतक्या रकमेचे देयके अदायगीसाठी आयुक्तांना पाठविण्यात आलेली आहेत. अभिकरण तत्वानुसार एकूण योजना खर्चाच्या ५ टक्के म्हणजेच रु. ५३,३३,०७८/- इतकी अभिकरण शुल्काची रक्कम देय असताना जिल्हा परिषदेस प्राप्त झालेली नाही. पुरक पोषण आहाराबाबत लेखा परिक्षणाच्या आक्षेपाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या उपरोक्त माहिती संदर्भात स्पष्टीकरणात्मक माहिती सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

या प्रकरणाबाबत समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेकडून मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झालेली की, महिला बाल कल्याण विकास विभाग यांच्या दिनांक २४ मे, २००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुरक पोषण आहाराबाबत विहित केलेल्या सुधारित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यानुसारच यवतमाळ जिल्ह्यासाठी पुरवठादार म्हणून व्यंकटेश महिला औद्योगिक सहकारी संस्था यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच पहिले ३ पुरवठ्याची देयके आयुक्तस्तरावर पाठविणे निर्देशित केले असून टि.एच.आर ची देयके आयुक्त कार्यालयास सादर करण्याबाबत वरिष्ठांचे आदेश असल्यामुळे संपूर्ण देयके मूळ प्रमाणकासह आयुक्त कार्यालयास सादर करण्यात आलेले आहेत. पुरक पोषण आहाराचा संपूर्ण खर्च आयुक्तालयाच्या स्तरावर झालेला असल्याने खर्चासंबंधी मूळ प्रमाणके आयुक्त कार्यालयाच्या ताब्यात असून त्या कार्यालयाचे लेखा परिक्षण महालेखाकार कार्यालयाकडून स्वतंत्ररित्या होते. त्यामुळे सदर मूळ प्रमाणक जिल्हा परिषदेला उपलब्ध होऊ शकले नाहीत. सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षाअंतर्गत झालेल्या रु. ११,२६,६१,५७७/- खर्चावर आधारीत ५ टक्के अभिकरण शुल्कांची रक्कम जिल्हा परिषद सेस फंडात रु. २४,१७,१७३/- व रु. ४०,००,०००/- जमा करण्यात आलेली आहे. या आक्षेपात नमूद असलेला पुरक पोषण आहार (सत्तु, शिरा, उपमा व सुकडी) आता अंगणवाडी स्तरावर देण्यात येत नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लाभार्थ्यांना फक्त ड्राय रेशन दिले जाते.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना गेल्या तीन दशकाहून अधिक काळापासून राबविण्यात येत असून या योजनेमुळे मुलांच्या विकासात लक्षणीय सुधारणा झालेली आहे. परंतु कुपोषणावर नियंत्रण आणण्यासाठी पुरक पोषण आहार कार्यपद्धतीमध्ये व्यापक सुधारणा होणे आवश्यक आहे. ग्रामीण/आदिवासी आणि नागरी प्रकल्पातील सर्व अंगणवाडी केंद्रातील सर्वसाधारण क्षेत्रातील लाभार्थ्यांना व नवसंजीवन अतिसंवेदनशील प्रकल्पातील सर्व अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना त्यांच्या लाभार्थी प्रकारानुसार (६ महिने ते ३ वर्षा पर्यंतची सर्वसाधारण बालके/ अति-तीव्र कमी वजनाची बालके, ३ वर्ष ते ६ वर्षापर्यंतची बालके/ अति-तीव्र कमी वजनाची बालके व गरोदर स्त्रिया व स्तनदा माता) शासनाने विहित केल्यानुसार उष्मांक व प्रथिनांचे प्रमाण असलेला पुरक पोषण आहार प्रतिदिनी पुरवण्याची जबाबदारी जिल्हास्तरावरील सर्व शासकीय यंत्रणांची आहे.

या पुरक पोषण आहारामध्ये सकाळच्या न्याहारीमध्ये दूध, अंडी, फळे इत्यादी व आहारात पालेभाज्या, कडधान्ये, तूप, गुळ, शेंगदाणे, सोयाबीन सारख्या खाद्यांचा समावेश असलेला आहार सर्व लाभार्थ्यांना योग्य प्रमाणात पुरविण्यात येतो काय, अधिकारी तीन महिन्यातुन एकदा अचानकपणे पाहणी करून आहाराची तपासणी करतात काय, निकृष्ट आहार, कमी पुरवठा, खंडीत पुरवठा इत्यादींबाबत दंडात्मक कारवाई करण्यात येते काय, या सर्व बाबींवर देखरेख जिल्हास्तरावर करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीची आहे. त्यामुळे सदर योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम, १९६१ चे कलम १२३ नुसार अभिकरण तत्वावर अर्थसंकल्प तरतुदीसह योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करणे बंधनकारक आहे. परंतु यवतमाळ जिल्ह्यातील पुरक पोषण आहार संदर्भातील संपूर्ण कार्यपद्धती जिल्हास्तरावर राबविण्यात आलेली असताना संपूर्ण देयके मूळ प्रमाणकासह आयुक्त कार्यालयास सादर करून त्यांच्या स्तरावर अदा करण्यात आलेली आहेत.

केंद्र शासनाच्या दिनांक २४ फेब्रुवारी, २००९ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचना व केंद्र शासन निर्णयाच्या अनुषंगाने आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २८ मे, २०१० रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी/बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना पुरक पोषण आहार कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. सदर परिपत्रकात नमूद केले आहे की, "पहिले ३ पुरवठा आदेश आयुक्त स्तरावर देण्यात येतील त्यानंतर जिल्हास्तरावर/प्रकल्प स्तरावरून पुरवठा आदेश निर्गमित करण्याबाबतचे स्वतंत्र आदेश देण्यात येतील."

**यवतमाळ जिल्ह्यात पुरक पोषण आहाराच्या पुरवठादाराची नियुक्ती नियमानुसार आयुक्त स्तरावर केली आहे. परंतु माहे जुलै, २०१० ते माहे मार्च, २०११ या कालावधीतील एकूण १६ टि.एच.आर. पुरवठा आदेशान्वये मागणी केलेल्या पुरक आहारांची रु. ११,२६,६१,५७७/- इतक्या रकमेची एकूण ५२ देयके आयुक्त कार्यालयाकडून अदा करण्यात आलेली आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार काढण्यात आलेल्या परिपत्रकानुसार पहिले ३ पुरवठ्याची देयके आयुक्तस्तरावर पाठविणे निर्देशित केलेले असताना उर्वरित संपूर्ण सर्व देयके आयुक्त कार्यालयास सादर करण्याबाबतचा आदेश कोणत्या नियमान्वये काढण्यात आला व ३ पुरवठा आदेशानंतर सदरहू योजना जिल्हा परिषदेकडे का वर्ग करण्यात आली नाही याबाबतची सविस्तर माहिती तसेच या खर्चासंबंधित मूळ प्रमाणकांसह अभिलेख्यांचे महालेखाकार कार्यालयाकडून करण्यात आलेले लेखा परिक्षण व त्यांनी काढलेल्या आक्षेपांची सविस्तर माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण चार

### जिल्हा परिषद, यवतमाळ

### प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, शालेय पोषण आहार व उपस्थिती भत्त्यातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.५२ (सन २०१०-११) :**

प्राथमिक शाळेतील विविध योजना अंतर्गत शालेय गणवेश वाटप करण्याची योजना राबवून रुपये ९,२०,२६९/- खर्च केला आहे. खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई-२००३/९१७/२००३/प्राशी-४, मुंबई दिनांक २० मे २००४ नुसार योजनांतर्गत कापड खरेदी व शिलाई करून घेण्याची कार्यवाही ग्राम शिक्षण समितीने करावयाची असून स्थानिक पातळीवर रोजगार वाढावा व पात्र विद्यार्थ्यांना गणवेश चांगल्या दर्जाचे व लवकर प्राप्त व्हावे या दृष्टीकोनातून स्थानिक स्तरावरील महिला बचत गट, नंतर नजीकच्या ठिकाणच्या महिला बचत गट व हे दोन्ही उपलब्ध नसेल तर स्थानिक स्तरावरील शिंप्याकडून प्राधान्य क्रमाने गणवेश शिलाई करून घ्यावयाची आहे.

वरीलप्रमाणे कार्यवाही न झाल्यामुळे व गणवेश कापड खरेदी शिलाई शाळा स्तरावर झाल्यामुळे, विद्यार्थ्यांना गणवेश चांगल्या दर्जाचा व लवकर मिळावा व महिला बचत गटाचे उत्पन्न वाढून स्थानिक रोजगाराला चालना मिळावी हा शासनाचा उददेश असफल झाला आहे.

२. ग्रामसभेत लाभार्थ्यांची निवड व गाव पातळीवर योजनेचे नियोजन करून प्रत्यक्षात, विद्यार्थाची शारीरिक मापे घेण्यात आल्याबाबत नस्तीसोबत अभिलेख उपलब्ध झाले नाही.

३. सदर गणेवश पात्र व मंजूर लाभार्थी वापरत असल्याबाबत उपयोगीता प्रमाणपत्र नस्ती सोबत जोडले नाही.

४. अल्पसंख्याक लाभार्थी विद्यार्थी बाबत विवरणपत्र व पहावयास मिळाले नाही. त्यामुळे एकूण अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची संख्या व अल्पंसख्याक विद्यार्थ्यांची संख्या व अल्पसंख्याक समाजातील प्रत्यक्षात गणवेश वाटप करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या या विषयी पडताळणी करता आली नाही.

५. खर्च अहवाल शाळांकडून प्राप्त करून नस्ती सोबत ठेवला नाही. त्यामुळे संपूर्ण रक्कम गणवेश वितरणावर खर्च झाल्याची व अनुदान शिल्लक नसल्याबाबत तपासणी करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई-२००३/(१७/२००३)/ प्राशि-४, मंत्रालय मुंबई ३२, दिनांक २० मे २००४ नुसार सदर योजनांतर्गत कापड खरेदी व शिलाई करून घेण्याची कार्यवाही ग्रामशिक्षण/शाळा व्यवस्थापन समितीने करावयाची होती. या योजनेमध्ये लाभार्थ्यांना गणवेशासाठी निधी प्राप्त झाला त्यानुसार व महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक पी.आर.इ २००४/(२०९/०४), प्रा.शि.-४, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२, दिनांक ४ फेब्रुवारी २००५ नुसार गणवेशाचे कमाल दर मुलींसाठी गणवेश स्कर्ट व शर्ट (ब्लाउज) करिता ६९ रुपये ७५ पैसे व महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विभाग शासन निर्णय क्र./असंम-२००९/ प्र.क्र.३६/कार्यासन १, मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक २४ फेब्रुवारी २००९ अन्वये वर्ग १ ते ४ मध्ये शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थांना प्रती गणवेश २०० रुपये याप्रमाणे होता. सदर शासन पत्रानुसार निश्चित करण्यात आलेला गणवेश दर अत्यल्प असल्यामुळे उपरोक्त निश्चित करण्यात आलेल्या उरात महिला बचत गट यांचेकडून गणवेश तयार करून घेणे शक्य झाले नाही. तसेच कापड व्यवस्थापन समितीने पात्र लाभार्थींना गणवेश वितरित करता यावेत या सद्भावनेने त्यांच्या स्तरावर ठरावाद्वारे रेडीमेड गणवेशाची खरेदी करून विद्यार्थांना गणवेश वितरित केलेले आहे. परिच्छेदात गणवेश वाटप योजनेअंतर्गत योजना राबवून खर्च ९,२०,२६९/- दाखविला आहे. तथापि प्रत्यक्षात प्राप्त रक्कम ९,७८,४३०/- असून शाळा व्यवस्थापन स्तरावर गणवेश वाटपांकरिता झालेला खर्च रुपये ९,७८,२७५/- आहे.

१. शाळा व्यवस्थापन समिती मार्फत शासनाने दिलेल्या वर्गवारी नुसार (सामान्य, OSTP,TSP, विशेष घटक योजना, अल्पसंख्याक) याप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करून शाळा व्यवस्थापन समितीने विद्यार्थ्यांची शारीरिक मापदंडानुसार नियोजन करून आवश्यक असलेल्या मापानुसार गणवेश खरेदी करण्यात आले. लाभार्थ्यांना लाभ देण्यात आल्याबाबत विद्यार्थी व पालक यांचे स्वाक्षरीच्या सत्यप्रत सोबत जोडलेला आहे.

२. सदर गणवेश पात्र व मंजूर लाभार्थी वापरत असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सोबत जोडलेला आहे.

३. अल्पसंख्याक लाभार्थी विद्यार्थी यांचे बाबतचे स्वतंत्र विवरणपत्र (ब) नाही तथापि या कार्यालयाचे पत्र क्रमांक पंसय/शिवि/२६०/२०१०, दि.२७/०८/२०१० अन्वये अल्पसंख्याक विद्यार्थी गणवेश करिता ४६२५ विद्यार्थ्यांसाठी गणवेश निधी मागणी करण्यात आली होती. प्रत्यक्षात एकूण २९०४ विद्यार्थ्यांना ५८०८००/- रुपये प्राप्त झाले होते. सदर निधी शाळास्तरावर वितरित करण्यात आला, संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयानूसार त्यामधून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शाळास्तरावरून गणवेश वाटप करण्यात आलेले आहेत. वाटपाबाबत विद्यार्थ्यी व पालकांच्या स्वाक्षरीच्या सत्यप्रती सोबत जोडलेल्या आहे.

४. खर्च विवरण अहवाल गणवेश वितरणकरिता एकूण ९,७८,४३०/- प्राप्त झाले असून शाळास्तरावर रूपये ९,७८,४३०/- वितरित करण्यत आले. यामधून ९१५६ विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सोबत जोडले आहेत.

**परिच्छेद क्रमांक ४.५३ :**

**शालेय पोषण आहार योजना शिजविलेले अन्न देण्याकरिता अनुदान वाटपातील अनियमीतता पंचायत समिती दिग्रस.जि.यवतमाळ सन २०१०-११ (परिच्छेद क्र. १५)**

शालेय पोषण आहार योजने अंतर्गत अनुज्ञेय शाळांमध्ये वर्ग १ ते ८ च्या विद्यार्थ्यांना दुपारचे भोजन देण्याकरिता रुपये ६९,६२,३९६/- अनुदान पंचायत समितीला प्राप्त झाले असून त्यातून रुपये १८,२५,००५/- शाळांना वितरित करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत

१. शिक्षणाधिकारी (प्राथ) यांचे अनुदान वितरण आदेशानुसार पंचायत समिती स्तरावर शाळांना अनुदान वितरित करतांना ३० सप्टेंबरची पटसंख्या विचारात घेऊन अनुदान वितरित करावे असे नमूद असतांना शाळास्तरावर पटसंख्ये नुसार अनुदान वितरित केल्याबाबत देयकाचे तसा तपशील नाही. तसेच शाळांना त्यांच्या मागणीप्रमाणे अनुदान वितरित केल्याबाबत मुख्याध्यापकांचे मागणी पत्र आढळून आले नाही. त्यामुळे पटसंख्या व मागणीनुसार अनुदान वितरित केल्याची सत्यता पडताळता आली नाही.

२. शाळा स्तरावर वितरित केलेल्या अनुदाना संदर्भात मुख्याध्यापकांचे खर्चाचे अहवाल लेखा परिक्षणात तपासणी करिता उपलब्ध झाले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. शिक्षणाधिकारी प्राथ. यांचे वितरण आदेशानुसार दि. ३० सप्टेंबरची लाभार्थी शाळांची पटसंख्या विचारात घेऊनच आणि गट शिक्षणाधिकारी यांनी मागणी केल्यानुसार अनूदान वितरित करण्यात येत असल्याचे शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प. यवतमाळ यांचे पत्र क्र. १६२३ दि. ३१/०३/२०११ (राज्य हिस्सा) या दोन्ही पत्रांमध्ये अनुदान वितरणाबाबत नमूद आहे. तसेच तालुका स्तरावरून शाळांना मुख्याध्यापकाकडून दरमहा प्राप्त होणाऱ्या मागणी पत्रानुसारच प्रत्यक्ष शाळास्तरावर विद्यार्थांना अन्न शिजवून दिल्यानंतर मुख्याध्यापकाकडून प्राप्त होणाऱ्या देयकानुसार सत्यता पडताळून शाळा स्तरावर अनुदान वितरित करण्यात येतात.

२. तालुका स्तरावरून शाळास्तरावर वितरित केलेल्या अनुदाना संदर्भात मुख्याध्यापकांकडून शालेय पोषण आहार योजनेचे खर्चाचे अहवाल पं.स.दिग्रस येथे दरमहा मुख्याध्यापकाकडून उपलब्ध होतात.

**परिच्छेद क्रमांक ४.५४ :**

**प्राथमिक शाळेतील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश वाटपातील अनियमीतता पंचायत समिती दिग्रस जि.यवतमाळ सन २०१०-११ (परि.क्र.२३)**

सन २०१०-११ मध्ये पंचायत समिती दिग्रस यांना शिक्षणाधिकारी (प्रा) यांचे पत्र क्र. १४५४, दि. २८/३/२०११ अन्वये १ ली ते ४ थी च्या प्राथमिक शाळेतील अल्पसंख्याक विद्यार्थाना गणवेश पुरविल्याबाबत एकूण रक्कम रुपये ४,३४,०००/- तरतूद उपलब्ध झाली त्या अनुषंगाने रुपये ५,३८,८००/- खर्चाची नोंद करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. प्रथमतः एकूण ३० शाळेतील ५५८ विद्यार्थ्याकरिता प्रति विद्यार्थी २००/- प्रमाणे एकूण रुपये १,११,६००/- संबंधीत शाळांना वितरित केलेले आहेत. त्याचप्रमाणे पुन्हा एकूण ४९ शाळेतील २१३६ विद्यार्थ्याकरिता शाळांना रुपये ४,२७,२००/- वितरित केले आहे.

परंतु या २१३६ विद्यार्थ्यामध्ये ५५८ विद्यार्थी संख्या यामध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे वरील तिस शाळा विद्यार्थी संख्या ५५८ यांना रुपये १,११,६००/- चे दोनदा वितरण झाले आहे. महाराष्ट्र शासन जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ३७ (१) (२) नुसार मागणीची तपासणी न करता रकमा अदा करण्यात आल्यात.

२. उपरोक्तप्रमाणे अदा केलेल्या रक्कमाबाबत संबंधीत शाळेच्या मागणी प्रस्तावाची पडताळणी केली असता पुढीलप्रमाणे त्रुटी आढळुन आल्यात.

(अ) जिल्हा परिषद प्राथ.उर्दू शाळा कलगाव १६० विद्यार्थ्याकरिता प्रति विद्यार्थी २००/- प्रमाणे एकूण रुपये ३२०००/- वितरित केल्याचे विवरण पत्रावरून दिसून येते. परंतु सदर शाळेचा मागणी प्रस्ताव संचिकेत आढळून आला नाही.

(ब) मुख्याध्यापकाचे अहवालानुसार जिल्हा परिषद प्राथ.उर्दु शाळा चिरकुटा ०७ विद्यार्थ्याना प्रति विद्यार्थी २००/- प्रमाणे रुपये १४००/- वितरित केले आहेत. परंतु ७ व्या वर्गातील दोन विद्यार्थ्याना प्रत्येकी रुपये २००/- प्रमाणे रुपये ४००/- चे नियमबाहय प्रदान झाले आहे.

(क) जिल्हा परिषद प्राथ.उर्दु शाळा डेहणी एकूण ३२ विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी २००/- प्रमाणे रुपये ६४००/- अदा केले आहेत. परंतु मुख्याध्यापकाचे मागणी प्रस्तावाप्रमाणे फक्त ३० विद्यार्थी प्रस्तावीत आहेत. त्यामुळे रुपये ४००/- चे जादा प्रदान झाले आहे.

(ड) एकूण ०४ शाळांचे मागणी प्रस्ताव दि. ३१/०३/२०११ नंतर प्राप्त झाले आहेत. यावरून प्रत्यक्षात संबंधीत शाळांची गणवेश अनुदानाची मागणी नसतांना रक्कमा वितरित करून नंतर मागणी पत्रे घेतली असल्याचे दिसून येते.

३. शिक्षणाधिकारी (प्रा) जिल्हा परिषद यांचे तरतुदी संबंधातील पत्र क्र. १४५४, दि. २८/३/२०२१ प्रमाणे रुपये ४,३४,०००/- तरतूद प्राप्त असून सन २००८-०९ व २००९-१० मध्ये वंचीत राहीलेल्या विद्यार्थ्यावर प्राधान्याने खर्च होणे आवश्यक होते. परंतु शिक्षण विभागाचे सन २००८-०९ व २००९-१० मध्ये लाभ दिलेले विद्यार्थी त्याचप्रमाणे लाभापासून वंचित राहीलेले विद्यार्थी या संबंधातील माहीती न ठेवल्याने व संपूर्ण खर्च सन २०१०-११ मधील प्राप्त विद्यार्थ्यावर केल्याने विभागाने घालुन दिलेल्या अटींचे उल्लंघन झाले आहे.

४. प्राथमिक शाळेतील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश पुरविणे याकरिता रुपये ४,३४,०००/- अनूदान उपलब्ध होते. मात्र सदरचे बाबीवर पंचायत समितीने एकूण रुपये ५,३८,३०००/- खर्च नोंदविला आहे. त्यामुळे रुपये १,०४,८००/- तरतूद नसतांना खर्च झाला आहे.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता अधिनियम, १९६८ परिशिष्ट (४) सामान्य तत्वामधील परि क्र. २ नुसार प्रत्येक विभागाध्यक्ष हा आपल्या विभागासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचे मर्यादेतचे खर्च करण्यास बंधनकारक आहे. सबब गट विकास अधिकारी यांनी जादा खर्चाची देयके नियमबाहयपणे मंजूर केलेली आहेत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. प्रथमतः एकूण ३० शाळेमधील एकूण विद्यार्थी संख्या ५५८ यांना रुपये २००/- प्रमाणे जादा शोधन झालेले रुपये १,११,६००/- बाबत गट शिक्षणाधिकारी पं.स. यांनी सदर बाब लक्षात येताच वरील शाळेकडून दर्शविलेली विद्यार्थी संख्येनुसार रुपये १,११,६००/- चलान नंबर ९/७, दिनांक १४/३/२०१२ रु. १,११,६००/- खात्यात भरणा करण्यात आले.

२. पुढील प्रमाणे आहे.

(अ) जि.प.प्राथमिक उर्दु शाळा कलगाव इयत्ता १ ली ते ४ थी ची उर्दु माध्यमाची शाळा असून सन २०१०-११ मध्ये या शाळेत शिकत असलेले १ ते ४ चे १६० विद्यार्थी हे अल्पसंख्याक विद्यार्थी असल्यामुळे अल्पसंख्याक विद्यार्थी असल्यामुळे अल्पसंख्याक विद्यार्थ्याना गणवेश पुरविण्याचे योजनेसाठी सर्व १६० विद्यार्थ्याना पात्र असल्यामुळे प्रति विद्यार्थी २०० प्रमाणे ३२,०००/- रुपये अनुदान शाळेला वितरित करण्यात आले होते.

(ब) उच्च प्राथमिक उर्दु शाळा चिरकुटा येथे येथील मुख्याध्यापकाच्या मागणीनुसार ०७ विद्यार्थ्याकरिता रुपये २००/- प्रमाणे रुपये १४००/- वितरित करण्यात आले होते. त्यापैकी ०२ विद्यार्थी हे इयत्ता ७ चे असल्यामुळे ते या योजनेचे लाभार्थी नसल्याचे मुख्याध्यापक लक्षात येताच त्यांनी चलान क्रमांक ९/६३, दि. २२/०२/२०१२ नुसार रुपये ४००/- भरणा केले आहे.

(क) जिल्हा परिषद प्राथ.उर्दू शाळा डेहणी येथील ३२ विद्यार्थ्यांना रुपये २००/- प्रमाणे ६४००/- वितरित करण्यात आले होते परंतु मुख्याध्यापकाची मागणी ३० विद्यार्थ्यांची असल्यामुळे ०२ विद्यार्थ्यांकरिता जादा शोधन झालेले रुपये ४००/- चलान क्र. ९/६२ दि.२२/०२/२०१२ नुसार वसूल करून भरणा केले आहे.

(ड) जि.प.प्राथ. मराठी शाळा वाईलिगी, फेटरी, निंभा, सिंगद या ४ शाळांनी लेखी मागणी पत्र विहित मुदतीत सादर केले नव्हते परंतु दिनांक ३१/०३/२०११ ला शाळेतील विद्यार्थी मागणी पत्र अभावी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये याकरिता केंद्र प्रमुखाकडून माहिती घेऊन सदर देयकामध्ये संबंधीत विद्यार्थ्याचा समावेश करण्यात आला आहे.

३. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाकरिता शिक्षणाधिकार प्राथ.जि.प. यवतमाळ यांचेकडून दि.२८/०३/२०११ चे आदेशानुसार रुपये ४,३४,४००/- अनुदान प्राप्त झाले. सन २००८-०९ व २००९-१० मध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाकरिता निधी प्राप्त न झाल्यामुळे वंचित झालेले विद्यार्थी त्याच शाळेत वरच्या वर्गात शिकत असल्यामुळे कोणताही पात्र विद्यार्थी सदर योजने वंचित राहीलेला नाही.

४. प्राथमिक शाळेतील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश पुरविणेबाबत रुपये ५,३८,०००/- खर्च झालेला होता. त्यामध्ये जादा प्रदान झालेली रक्कम रुपये १,११,६००/- चलान नंबर ९/७, दि. १४/३/२०१२ अन्वये वसूल करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात खर्च ४,२६,४००/- झालेला आहे. त्यामुळे रुपये १,०४,८००/- जादा खर्च झालेला नाही.

५. जादा खर्चाची देयके चुकुन पारीत झाल्यानंतर, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना सन २०१०-११ मध्ये गणवेश वाटप करण्याचे बाबीवर अतिप्रदान रक्कमे बाबतची बाब लक्षात येताच सदर रक्कम शाळेकडून वसूल करून रक्कमेचा भरणा करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर योजनेवर झालेला खर्च अनुदान मर्यादेतच झालेला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.५५ :**

**शालेय पोषण आहार खर्चातील अनियमितता पंचायत समिती कळंब, जि.यवतमाळ सन २०१०-११ (परि.क्र.११)**

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत सन २०१०-११ या वित्तीय वर्षात सर्व शाळांना रु.४,०८,४८१/- अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. शालेय पोषण आहार देयकाची पडताळणी केली असता बॅकेकडे पाठविण्यात आलेल्या व देयकासोबत जोडण्यात आलेल्या शेडयुलवर शाळेचे खाते क्रमांक नमूद नसतांना सदरील रक्कम बॅकेकडे पाठविल्याचे निदर्शनास येते.

२. दिनांक ३०/०९/२०१० चे पटसंख्येच्या ८५ टक्के पटसंख्या गृहित धरून अनुदान वितरित करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत शाळानिहाय मुख्याध्यापकांचे पटसंख्येचे अहवाल लेखी परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

३. पंचायत समिती अंतर्गत निवडक शाळांच्या अभिलेख्याची तपासणी केली असता अन्न शिजवण्याचे मानधन व किराणा साहित्य खरेदीचे प्रदान धनादेशा ऐवजी रोखीने केल्याचे आढळुन आले.

४. प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रमांक १९९२, दि. ०८/०२/२००५ नुसार साठा नोंदवहीवर मुख्याध्यापकांनी अन्न शिजवून देणाऱ्यांची रोज सही घ्यावी. तसेच अध्यक्ष/सदस्य ग्रामस्थ समिती यांनी आठवडयातुन एकदा स्वाक्षरी घ्यावी असे स्पष्ट आदेश असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळत नाही.

५. विस्तार अधिकारी शिक्षण यांनी नियमीत शाळेला भेटी देऊन मार्गदर्शन केल्याबाबत शेरेबुक लेखा परिक्षणास उपलब्ध केले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. बॅकेला पाठविलेल्या रक्कम अदा करावयाच्या यादीवर सर्व शाळेचे बॅक खाते क्रमांक व बॅक शाखेचे नाव नमूद केलेले आहे. कार्यालयाकडून बॅकेला पाठविण्यात आलेले ८ देयक व बॅक यादीचे छायांकित प्रती सोबत जाडलेली आहेत.

२. शासन निर्णय क्रमांक शापोआ २०१०/प्र.क्र/प्रशि-४, दिनांक ०२/०२/२०१२ नुसार प्रत्यक्ष उपस्थीतीनुसार आहार वाटप करण्यात आले आहे.

३. किरकोळ साहित्य रु. ५०० पर्यत भाजीपाला खरेदी करतांना रोखीने केले आहे. किराणा साहित्याची खरेदी शाळेकडून करण्यात येत नाही. तो शासनामार्फतच पुरविण्यात येतो. अन्न शिजवण्याचे काम स्थानिक पातळीवरील नेमणूक केलेल्या व्यक्तीकडून केल्या जात असल्याने व त्यांचे मानधन अत्यल्प असल्याने व त्यांचेकडे बॅक खाते नसल्याने रोखीने रु. ७५०/- इतके मानधन दिले असून त्याची पोच ठेवण्यात आली आहे.

४. साठा नोंदवहीवर मुख्याध्यापक व समिती अध्यक्ष, सचिव यांचे स्वाक्षरी घेण्यात आलेली सांक्षाकित/छायांकित प्रती सोबत जोडलेले आहे.

५. शेरेबुक प्रत्येक शाळेत ठेवलेले असते, विस्तार अधिकारी (शिक्षण) शाळांना नियमित भेटी देऊन मार्गदर्शन करतात व त्याची नोंद भेट नोंदवहित करतात. याबाबतचे अभिलेखाच्या प्रती सोबत जोडण्यात आले आहे.

**परिच्छेद क्रमांक : ४.५६ :**

शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तालुक्यातील शाळांना रुपये १८,३५,३३०/- अनुदान वितरित केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. मुख्याध्यापकाने रोज अन्न शिजवून देण्याऱ्याची स्वाक्षरी घेतल्याचे आढळत नाही.

२. गट शिक्षणाधिकारी तसेच विस्तार अधिकारी शिक्षण यांनी भेटी देऊन वेळोवळी मार्गदर्शन अहवाल उपलब्ध नाही.

३. अनुदानाचे उपयोगीता प्रमाणपत्र तसेच खर्चाचे अहवाल जिल्हा परिषदेला विहित मुदतीत सादर केले नाही.

३. अखर्चीत अनुदान परत केल्याचे आढळत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. शालेय पोषण आहार योजने अंतर्गत शाळा स्तरावर अन्न शिजविण्याकरिता महिला बचत गट/ स्वंयसेवी संस्था/ परित्यक्त्या / गरजु महिलांना शाळा व्यवस्थापन समिती मार्फत करार पद्धतीवर अन्न शिजवून वाटप करण्याचे काम दिले जाते. अन्न शिजवून दिल्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेतल्या जात नाही. परंतु अन्न शिजविणे संबधात दैनंदिनी नोंद वही क्र.१ वर नोंदी असतात. सदर नोंदवही मुख्याध्यापक व अध्यक्ष व्यवस्थापण समिती यांनी सांक्षाकिंत केली असते.

२. गट शिक्षणाधिकारी तसेच विस्तार अधिकारी शिक्षण यांनी वेळोवेळी भेटी देऊन मार्गदर्शन केलेले आहे. सदरहू बाबी संबंधात गट शिक्षणाधिकारी तसेच विस्तार अधिकारी व केंद्र प्रमुख यांच्या भेटीच्या अहवालाच्या सत्यप्रती जोडण्यात येत आहे.

३. वित्तीय वर्ष सन २०१०-११ चे अनुदान उपयोगीता प्रमाणपत्र व खर्च अहवाल या कार्यालयचे पत्र क्रमांक जाक्र/पंसरा/शापोआ/ ५१७, दिनांक ६/४/२०११ अन्वये वरिष्ठ कार्यालयाला सादर केलेलेआहे. सोबत अहवालाची सत्यप्रती जोडण्यात येत आहे.

४. वित्तीय वर्ष सन २०१०-११ चे अखर्चीत अनुदान रुपये १७०१९१५/- खर्च करण्याची अनुमती शासनाचे पत्र क्र./शापोआ/२०११/ प्र.क्र./३०८/प्राशि/४, दिनांक ८/०७/२०११ अन्वये देण्यात आलेली होती. सदर पत्राची सत्यप्रत जोडण्यात येत आहे. शाळांना अन्न शिजवून दिल्यामुळे अखर्चित अनुदान खर्च करण्यात आले.

**परिच्छेद क्रमांक : ४.५७ :**

दुर्बल घटकातील विद्यार्थिनींना सन २०१०-११ वर्षामध्ये रुपये १३७४८१४/- उपस्थिती भत्ता प्रदान केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. उपस्थिती भत्ता प्रदानाबाबतची नस्ती पडताळली असता संबधित विद्यार्थ्यांनी अनुसुचित जाती/जमाती, भटक्या जाती व विमुक्त जमातीमधील तसेच विशेष मागास प्रवर्गातील असल्याबाबत खात्री पटविणे करिता आवश्यक ते अभिलेख /प्रमाणपत्रे तसेच संबधित विद्यार्थ्यांनी दारिद्रय मागास प्रवर्गातील असल्याबाबत खात्री पटविणेकरिता आवश्यक ते अभिलेखे/प्रमाणपत्रे संबधित विद्यार्थ्यांनी दारिद्रय रेषेखालील असल्याचे दाखले नस्तीसोबत पहावयास मिळाले नाही.

२. दुर्बल घटकातील पात्र व गरजु विद्यार्थिनींना उपस्थिती भत्ता प्रदान केल्याचे पृष्ठार्थ संबधित शाळांचे मुख्याध्यापक यांनी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती महागाव यांना उपयोगिता प्रमाणपत्र व लाभार्थी विद्यार्थिनींचे उपस्थिती बाबतचे अहवाल सादर करणे आवश्यक आहे. परंतु नस्तीसोबत प्रमाणपत्र व अहवाल संलग्तीत केलेले आढळुन आले नाही.

३. शाळेच्या संबधित मुख्याध्यापकांनी संबधित पात्र व गरजु मुलींना ग्राम शिक्षण समिती समोर उपस्थिती भत्ता वाटप केल्याबाबत व रक्कम मिळाल्याबाबत विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या नोंदवह्या लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. उपस्थिती भत्ता अनुसूचित जाती/जमाती, भटक्या जाती व विमुक्त जमातली विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्याबाबतची शाळेच्या दस्ता ऐवजावरून खात्री करून भत्ता वाटप करण्यात आलेला आहे. शाळेच्या उपस्थिती भत्ता वाटप रजिस्टरवर जाती चा उल्लेख आहे. सोबत शाळेचे हजेरीपटाची छायाप्रत संलग्न केली आहे.

२. उपस्थिती भत्ता वाटपाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त असून सोबत छायाप्रत संलग्न केली आहे.

३. मुख्याध्यापकांनी उपस्थिती भत्ता ग्रामशिक्षण समितीसमोर वाटप केल्याबाबत व रक्कम मिळाल्याबाबतची विद्यार्थ्यांची स्वाक्षरी नोंदवही ठेवी आहे. त्यावर ग्रामशिक्षण समितीचे सदस्यांच्या स्वाक्षरी आहेत. नमुन्या दाखल काही नोंदवहयांच्या छायाप्रती संलग्न केल्या आहेत.

**परिच्छेद क्रमांक : ४.५८ :**

पंचायत समिती महागाव यांनी शालेय पोषण आहार योजना अंतर्गत शिजविलेले अन्न देण्यासाठी सन २०१०-११ या वित्तीय वर्षात रुपये १४९५०४१/- शाळा निहाय खर्च कल्याचे आढळुन आले याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

१. महाराष्ट्र शासन पुरक पत्र क्र. शापोआ २००६/८२०१-०६/प्राशि-४/दिनांक ११ सप्टेंबर २००६ नुसार शालेय पोषण आहार योजना अंतर्गत शिजविलेले अन्न विद्यार्थ्यांना देण्याकरिता प्रतिविद्यार्थी, प्रति शाळा अनुदान वितरित करण्यात आले परंतु प्रतिदिन विद्यार्थी उपस्थित असल्याची संख्येनुसार अन्नाचे वाटप केल्याबाबत संबधित मुख्याध्यापकांचा अहवाल प्राप्त झाला नाही.

२. अन्न शिजविण्यासाठी आवश्यक तांदुळ, दाळ, तेल, साखर इत्यादी बाबत पावत्या प्राप्त केल्या नाहीत त्यामुळे दर दिवशी प्रती विद्यार्थी उपयोगात आलेल्या धान्यानुसार पोषण आहाराची मागणी करून त्यानुसार पंचायत समितीने अनुदानाची रक्कम प्रदान केल्याची खात्री पटत नाही.

३. शासन निर्णय शापोआ -२००९/प्रक-१३६/प्राशि-४/दिनांक १८ जुन २००९ मधील परिशिष्ट अ मधील वर्ग १ ते ५ मधील विद्यार्थ्यांना साधारणतः ३०० ते ३२५ ग्रॅम व वर्ग ६ ते ८ मधील विद्यार्थ्यांना ४५० ते ४७५ ग्रॅम व वर्ग ६ ते ८ मधील विद्यार्थ्यांना ४५० ते ४७५ ग्रॅम दिवसानुसार सोयाबिन युक्त डाळ तांदळाची खिचडी, कडधान्य उसळ व आमटीभात इत्यादी विद्यार्थ्यांना पोषण आहार म्हणून दिल्या जात असल्याबाबत भेटीद्वारे पाहणी अहवाल नस्तीत आढळला नाही.

४. दिनांक ३१ मार्च २०११ अखेरपर्यंत शालेय पोषण आहारासाठी शाळा निहाय अनुदान देण्यात आले त्यामुळे सन २०१०-११या आर्थिक वर्षात विद्यार्थ्यांना सकस आहाराचा प्रत्यक्ष लाभ त्याच आर्थिक वर्षात देण्यात आला नाही. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे कडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. महाराष्ट्र शासन पुरक पत्र क्र.शापोअ -२००६/८२०१-०६/प्राशि-४/ दिनांक ११ सप्टेंबर २००६ नुसार शालेय पोषण आहार योजना अंतर्गत शिजविलेले अन्न विद्यार्थ्यांना देण्यासाठी मुख्याध्यापकांच्या अहवालानुसार व विद्यार्थ्यांचे उपस्थितीनुसार अन्न शिजवून देणे करिता अनुदान वाटप करण्यात आले आहे. सोबत काही निवडक मुख्याध्यापकांचा उपस्थिती अहवाल संलग्न केला आहे.

२. अन्न शिजविण्यासाठी तांदुळ, डाळ, तेल, साखर इत्यादी साहित्याचा शाळा स्तरावर शासनाकडून पुरवठा झाला आहे. त्याबाबतच्या पावत्या संलग्न केल्या आहेत. त्यानुसारच मागणीची खात्री करूनच अनुदान वितरण केले आहे.

३. मुख्याध्यापकांनी इयत्ता १ ते ५ करिता १०० ग्रॅम तांदुळ, २० ग्रॅम डाळ, १० ग्रॅम सोयाबिन, ५ ग्रॅम तेल व इतर २ ग्रॅम साहित्य असे एकूण १३७ ग्रॅम साहित्य मिळवुन शिजविलेले अन्न ३०० ते ३२५ ग्रॅम देण्यात आलेले आहे. तसेच इयत्ता ६ ते ८ करिता ४५० ते ४७५ ग्रॅम शिजविलेले अन्न नियमित विद्यार्थ्यांना देण्यात आले विस्तार अधिकारी शिक्षण व केंद्र प्रमुखांनी तपासण्या केल्या आहेत. उदाहरणादाखल काही शेरेबुक नोंदवहीच्या छायप्रती संलग्न केल्या आहेत.

४. मुख्याध्यापकांनी सादर केलेल्या थकित देयकानुसार दिनांक ३१/०३/२०११ रोजी प्राप्त झालेल्या अनुदानाप्रमाणे खर्चाची देयक अदा करण्यात आले. सदर देयके त्याच आर्थिक वर्षातील होती. तसेच सकस आहाराचा विद्यार्थ्यांना त्याच आर्थिक वर्षात लाभ देण्यात आला आहे.

**परिच्छेद क्रमांक : ४.५९ :**

पंचायत समिती महागांव यांनी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना विविध योजनांतर्गत शालेय गणवेश वाटप करण्याची योजना राबवुन रुपये ८७७४२५/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

१. महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक/पीआरई- २००३/११७/२००३/प्राशि-४, मुंबई, दिनांक २० मे २००४ नुसार योजनाअंतर्गत कापड खरेदी व शिलाई करून घेण्याची कार्यवाही ग्रामशिक्षण समितीने करावयाची असून स्थानिक पातळीवर रोजगार वाढावा व पात्र विद्यार्थ्यांना गणवेश चांगल्या दर्जाचे व लवकर प्राप्त व्हावे या दृष्टीकोनातुन स्थानिक स्तरावरील महिला बचत गट, नंतर नजिकच्या ठिकाणच्या महिला बचत गट व हे दोन्ही उपलब्ध नसेल तर स्थानिक स्तरावरील शिंप्यांकडून प्राधान्यक्रमाने गणवेश शिलाई करून घ्यावयाची आहे.

वरीलप्रमाणे कार्यवाही न झाल्यामुळे व गणवेश कापड खरेदी, शिलाई शाळा स्तरावर झाल्यामुळे विद्यार्थ्यांना गणवेश चांगल्या दर्जाचा व लवकर मिळावा व महिला बचत गटाचे उत्पन्न वाटुन स्थानिक रोजगाराला चालना मिळावी हा शासनाचा उद्देश सफल झाला नाही.

२. ग्रामसभेत लाभार्थ्यांची निवड व गावपातळीवर योजनेचे नियोजन करून प्रत्याक्षात विद्यार्थ्यांची मापे घेण्यात आल्याबाबत नस्तीसोबत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

३. सदर गणवेशपात्र व मंजूर लाभार्थी वापरत असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडले नाही.

४. अल्पसंख्याक लाभार्थी विद्यार्थ्यांबाबत विवरणपत्र पहावयास मिळाले नाही एकूण अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची संख्या व अल्पसंख्याक समाजातील प्रत्यक्षात गणवेश वाटप ९ करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या या विषयी पडताळणी करता आली नाही.

५. खर्च अहवाल शाळांकडून प्राप्त करून नस्तीसोबत ठेवला नाही त्यामुळे संपूर्ण रक्कम गणवेश वितरणावर खर्च झाल्याचे व अनुदान शिल्लक नसल्याबाबतची तपासणी करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक/पीआरई- २००३/९१७/२००३/ प्राशि-४, मुंबई, दिनांक २० मे २००४ नुसार या योजनेअंतर्गत गणवेशाकरिता कापड खरेदी व शिलाई करून घेण्याची कार्यवाही ग्रामशिक्षण समितीचे ठरावानुसार केली आहे. परंतु ग्रामिण भागात व आजूबाजुच्या परिसरात सर्वच ठिकाणी महिला शिलाई बचत गट स्थापन नसल्यामुळे स्थानिक शिंप्याकडून गणवेश शिलाई करून

घेतले आहेत. त्यामुळे स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध झाला आहे व शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना शासनाने ठरवून दिलेल्या अनुदानात त्वरित व चांगल्या दर्जाचे गणवेश वाटप करण्यात आले.

१. मुख्याध्यापकांनी शाळास्तरावर स्थानिक शिंप्यांकडून ग्राम शिक्षण समितीसमोर गणवेशाची मापे घेऊन गणवेश शिलाई करून घेतलेले आहेत. मापांबाबत नोंदवही ठेवली नाही परंतु स्थानिक शिंप्याकडून प्रत्यक्ष मापे घेत्याल्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य व चांगल्या दर्जाचे गणवेश प्राप्त झाले आहेत. याबाबतची काही शाळास्तरावरील नोंदवहीची छायाप्रत संलग्न केली आहे.

२. सदर गणवेश पात्र विद्यार्थ्यांनाच देण्यात आले असून याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्राची छायाप्रत संलग्न केली आहे.

३. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले असून गणवेश प्राप्त झाल्याबाबत विद्यार्थ्यांची स्वाक्षरी नोंदवहीची छायाप्रत सोबत संलग्न केली आहे.

४. प्राप्त अनुदानानुसार खर्चाचे नियोजन केल्यामुळे अनुदान अखर्चीत राहिले नाही. याबाबतचा फलश्रुती अहवाल सोबत जोडला आहे.

**परिच्छेद क्रमांक : ४.६० :**

पंचायत समिती मारेगाव यांनी शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत शिजवलेले अन्न देण्यासाठी सन २०१०-११ या वित्तीय वर्षात वर्ग १ ते ५ च्या विद्यार्थ्याना प्रतिदिन प्रति विद्यार्थी रुपये २.०८/व वर्ग ६ व ८च्या विद्यार्थ्यांना प्रतिदिन प्रति विद्यार्थी रुपये २.६०/- प्रमाणे शाळास्तरावर अन्न शिजवून देणारे महिला बचत गट, महिला मंडळे किंवा स्थानिक स्वयंपाकी यांना रक्कम प्रदान करण्याकरिता शाळास्तरावर अनुदान वितरित करून रुपये २१७६२४२/- शाळानिहाय खर्च केल्याचे आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे :—

१. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ/२०३०/३४/०३ प्रशि/४, दि. ०३ मार्च २००३ च्या आदेशात विहित केल्याप्रमाणे या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले किंवा लागलेले तांदुळ व इतर पुरक पदार्थ यांचा हिशेब विहित केलेल्या प्रपत्रात शाळास्तरावरून केंद्रप्रमुखांकडे, केंद्रप्रमुखांकडून पंचायत समिती स्तरावरील गटशिक्षणाधिकारीकडे व गटशिक्षणाधिकारी यांचेकडे संपूर्ण तालुक्याची माहिती संकलीत करून पंचायत समितीच्या लेखा शाखेमध्ये मागणी योग्य असल्याचे तपासणी करून देयके सादर करणे व संवितरण अधिकाऱ्यांकडून मंजूर करून घेणे आवश्यक होते. परंतु याप्रमाणे कार्यवाही केली नसल्याचे लेखापरिक्षणात दिसून आले.

२. पंचायत समिती स्तरावर रक्कम प्रदान संबंधित खर्च उपप्रमाणके रक्कम मिळाल्याबाबत संबंधताचे पाच पावत्या अन्न शिजवून देणाऱ्यास देय असलेल्या रकमेबाबत मुलांचे उपस्थिती हजेरीपट व त्या अनुषंगाने अनुज्ञेय रकमेचे हिशेबशाळास्तरावरच ठेवले जाते. तसेच अन्न शिजवण्यासंबंधी लागणारे इतर पुरक पदार्थ (उदा. कडधान्य, दाळी, मिठ, मिरची, तेल, इत्यादी) खरेदीसंबंधात उपप्रमाणके शाळास्तरावरच ठेवले जाते. त्याअनुषंगाने एकूण शाळेच्या १० ते १५% शाळेच्या अभिलेख्याची आवश्यक ती तपासणी करता आली नाही.

३. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक शापोआ २००९/३४/०३ प्रशि ४, दि. १८ जून २००९ च्या आदेशातील बाब क्रमांक १० मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेमध्ये तांदुळाबरोबर पाककृतीनुसार आवश्यक लागणारे धान्य माल (उदा. कडधान्य, दाळी, मिठ, मिरची, तेल इत्यादी) हनवेदनामार्फत निच्छीत करून याद्वारे पुरविण्यात येत असल्याने फक्त अन्न शिजवूनदेण्यासाठी म्हणजे इंधन व मजुरी यासाठी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रुपये ०.५०/- म्हणजे ५० पैसे याप्रमाणे ग्रामशिक्षण समितीला अनुदान देण्यात यावे म्हणून स्पष्ट नमूद आहे. त्याअन्वये फक्त ५० पैसे प्रमाणेच अनुदान देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करता नियमाबाहयरित्या शाळांना वेगवेगळ्या प्रमाणकाद्वारे ५० पैसे व्यतिरीक्त उर्वरित रक्कम रुपये १.५८/- व रुपये २.१०/- प्रतिविद्यार्थ्यांप्रमाणे सुद्धा शाळास्तरावर रक्कम प्रदान केली आहे. सबब आदेशाप्रमाणे फक्त ५० पैसे प्रमाणे रक्कम प्रदान करणे अनुज्ञेय असल्याचे दिसून येत नाही.

४. पंचायत राज समितीच्या समितीच्यासुचनेप्रमाणे तथा वरील बाब क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या आदेशाची परि. क्र. ९ मध्ये विहित केल्याप्रमाणे गावपातळीवर जास्तीत जास्त रोजगार निर्माण होऊन आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी महिला बचत गट किंवा महिला मंडळ यांना अन्न शिजवण्याचे काम देणे अनिवार्य केले आहे. ते न मिळाल्यास गावातील विधवा, मागासवर्गीय गरजूमहिलांची प्राधान्याने नियुक्ती करून त्यांचे मार्फत अन्न शिजवून घेणे अनिवार्य केले आहे. परंतु वरीलप्रमाणे नियुक्तीची कार्यवाही टाळण्याकरिता

कोणत्याही बचत गटाचे नाव दर्शवून त्यांचा सदस्य किंवा बचत गट असल्याचे नोंदवून साध्या पावतीवर रक्कम मिळाल्याबाबत पोचपावती घेतल्या गेल्या. त्यामुळे शासनाचा बचतगटांना रोज उपलब्ध करून देणे व ग्रामिण भागाचा विकास व्हावा हा उद्देश सफल झाला नाही.

५. शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाच्या उपलब्धतेनुसार पंचायत समिती स्तरावरून शाळास्तरावर रक्कम प्रदान करणे संबंधी वेगवेगळ्या महिन्यांचे वेगळे वेगळे प्रमाणके तयार केले गेले आहे. त्यामध्ये पंचायत समिती अंतर्गत असणाऱ्या शाळा व काही शाळांचे वेळीच मागणी करून अभिलेखे उपलब्ध न झाल्याने पुन्हा त्याच महिन्यातील उर्वरीत शाळांची प्रमाणके केंद्रशासनाचा हिस्सा व काही राज्य शासनाचा हिस्सा प्रदान करण्यासाठी तयार केले आहे. तसेच खाजगी शाळा यांचेसुद्धा पंचायत समिती मार्फत रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या कालावधीचे तसेच केंद्र व राज्यशासनाचा हिस्सा प्रदान करण्याबाबत मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला आहे. त्यासंबंधात योग्य ते नियंत्रण राहावे याकरिता शिक्षण विभागामध्ये महाराष्ट्र जिल्हा व पंचायत समित्या लेखसंहीता १९३ चे नियम ५१ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नमुना १२ मध्ये सविस्तर नोंदी घेतलेले साठा नोंदवहीत ठेवण्यात आली आहे. त्यामुळे प्रदान केलेली रक्कम दुबार झाले नसल्याबाबत लेखापरिक्षणात तपासणीकरिता आले नाही.

६. पुरक पोषण आहार संबंधीत केलेल्या प्रदान रकमेबाबत सर्व शाळेकडून अनुदान विनीयोग व उपयोगात असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :–**

१. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले तांदुळ व धान्य माल (किराणा) पुरक पदार्थ यांचा हिशेब नोंदवहीत दरमहा नोंदी मुख्याध्यापक घेतात. वर्ग १ ते ५ व वर्ग ६ ते ८ अशा २ गटात शाळेतील विद्यार्थ्यांची वर्गवारी नोंदवहीत केली जाते. वर्ग १ ते ५ च्या विद्यार्थ्यांना प्रतिदिन प्रतिविद्यार्थी १०० ग्रॅम तांदुळ वर्ग ६ ते ८ करिता प्रतिदिन प्रतिविद्यार्थी १५० ग्रॅम तांदुळ असे प्रमाण घेऊन सदर महिन्यातील एकूण कामाचे दिवस याला गुणाकार करून तांदुळ महागणी केंद्रप्रमुखांकडे केली जाते. तसेच वर्ग १ ते ५ व वर्ग ६ ते ८ च्या विद्यार्थ्यांची पूरक पदार्थंची मागणी केंद्रप्रमुखांकडे मुख्याध्यापक करतात. केंद्रप्रमुख केंद्रातील एकूण शाळांची (वर्ग १ ते ८) जि.प. व खाजगी व्यवस्थापनाच्या लाभार्थी शाळा नोंदवून संकलीत तक्ता केंद्रनिहाय तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी यांचेकडे सादर करतात. केंद्रातील एकूण केंद्रसंख्या यांचे संकलनकरून सदरहू माहिती जिल्हा शाखेकडे एक प्रत तसेच एक प्रत पंचायत समितीच्या लेखा विभागात सहायक लेखा अधिकारी यांचेकडे सादर करतात. सदर मागणी मंजूर झाल्यावर अंतीम मंजुरी घेऊनच देयके पारीत केली जाते.

२. एकूण शाळेच्या १० ते १५% शाळेच्या अभिलेख्यांची तपासणी करणे आवश्यक आहे. काही शाळांचे अभिलेखे उपलब्ध करून देता आले यापुढे नियमाप्रमाणे शाळांचे अभिलेखे तपासणी करिता उपलब्ध करून देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक शापोआ २००९/३४/०३ प्रशि ४, दि. १८ जून २००९ च्या आदेशातील बाब क्रमांक १० मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेमध्ये तांदुळाबरोबर पाककृतीनुसार आवश्यक लागणारे धान्यादी माल (उदा. कडधान्य, दाळी, मिठ, मिरची, तेल इत्यादी) निविदा मार्फत कंत्राटदारा मार्फत मागणीप्रमाणे पुरवठा लाभार्थी शाळेत केला जातो. इंधन व मजुरी प्रतिविद्यार्थी रु. ०.५०/- म्हणजेच ५० पैसे प्रमाणे ग्रामशिक्षण समितीला अनुदान देण्याचे निर्देश आहे. शासन निर्णय दिनांक १८ जून २००९ नुसार रुपये १.५८/- व रुपये २.१०/- प्रति विद्यार्थी खर्च करण्यात आलेला आहे.

४. शाळेची पटसंख्या कमी असल्यामुळे बचत गट इच्छुक नव्हते त्यामुळे स्थानिक विधवा, मागासवर्गीय गरजू महिलांची प्राधान्याने नियुक्ती करून शालेय पोषण आहार शिजविण्यात आला.

५. शासनाकडे शाहनिहाय देयकाची रक्कम अदा करण्यासाठी लेखा विभागाकडे मंजुरीसाठी देयके ठेवण्यात येते. देयके मंजूर झाल्यावर सदर देयक मुख्याध्यापकांच्या शाळेच्या खात्यात रक्कम जमा करतात. (उदा. पुरक पोषण आहाराची व इंधनाची रक्कम) स्वयंपाकी, मदतनीस मानधनाची रक्कम संबंधीतांच्या बँकेच्या खात्यात जमा करतात. शासनाकडून ज्याप्रमाणे रक्कम प्राप्त होते त्याच नियमाप्रमाणे पंचायत समिती स्तरावर लेखाधिकारी रक्कम मंजूर करतात व बँकेमार्फत शाळेच्या खात्यामध्ये जमा करतात. शिक्षण विभागामध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६१ चे नियम ५१ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नमुना १२ मध्ये शाळास्तरावर साठानोंदवही ठेवण्यात आलेली आहे. केंद्रप्रमुख यांनी तपासणी करून अहवाल पंचायत समिती स्तरावर सादर करतात. तसेच या अंतर्गत रक्कम दुबार प्रदान झाली नाही.

६. पुरक पोषण आहार करिता प्राप्त अनुदानाच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधीत शाळेचे मुख्याध्यापकाकडून घेण्यात आलेली आहे. अवलोकनार्थ सादर.

**परिच्छेद क्र. : ४.६१ :**

**शिक्षण विभागामार्फत इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाकरिता शाळा स्तरावर वितरित केलेल्या रकमेबाबत. पंचायत समिती मारेगाव जिल्हा यवतमाळ सन २०१०-११ (परिच्छेद क्रमांक ०९)**

सन २०१०-११ मध्ये पंचायत समिती मारेगाव येथे विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करणे करिता पंचायत समिती अंतर्गत असलेल्या शाळांना वेगवेगळ्या शिर्षाखाली खालील रु. ९३०४४ रक्कम वितरित करून अनुदान खर्ची घातलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे :—

१. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शि. नि. क्र. पी. आर. ई. २००३ (१७)/२००३ प्राश-४, दि. २० मे २००४ च्या आदेशात विहित केल्याप्रमाणे योजनेअंतर्गत विद्यार्थ्यासाठी कापड खरेदी शाळास्तरावर ग्रामशिक्षण समिती मार्फत मुख्याध्यापकाने खरेदी करावा ह्या ठरावावरील व शिलाईकाम स्थानिक महिला बचत गट यांच्याकडे द्यावे. ते नसेल तर नजीकच्या ठिकाणातील बचत गटामार्फत शिलाई करून विद्यार्थ्यांना वेळीच पूर्ण शैक्षणिक वर्षात उपयोगात येईल अशा पद्धतीने शाळा सुरू झाल्याबरोबर वाटप करणे आवश्यक आहे. उपरोक्त अनुदान सन २०१०-११ मध्ये शिकणाऱ्या जून २०१०-११ चे सत्र सुरू होते वेळीच गणवेश कापड खरेदी करणे, शिलाई करणे व विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करणे असे उपरोक्त आदेशात विहित आहे. परंतु सन २०१०-२०११ चे अनुदान मार्च २०११ मध्ये पंचायत समिती मारेगाव येथे प्राप्त झाले व ते वरील प्रमाणे दि. ३१/०३/२०११ ला खर्ची घालण्यात आले. खर्ची घातलेले अनुदान शाळेच्या खात्यावर माहे मे, जून २०११ मध्ये जमा झाले. इयत्ता १ ते ४ मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उपरोक्त अनुदानातुनच लाभ दिला गेला नाही हे स्पष्ट आहे. वरील अनुदानाची रक्कम खर्ची घालून कागदोपत्री विद्यार्थ्यांना गणवेश दिल्याचे दर्शविले गेले. परंतु सन २०१०-११ या वित्तीय वर्षामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उपरोक्त अनुदानाचा लाभ देण्यातच आला नाही, त्यामुळे सन २०१०-११ मध्ये प्राप्त झालेल्या अनुदानाच्या गणवेश वाटप लाभापासून विद्यार्थी वंचित योजनेचा उद्देश सफाल झाला नाही.

२. वरील प्राप्त अनुदान पंचायत समिती स्तरावर, खर्च प्रमाणकाद्वारे रक्कम खर्ची घातलेली आहे. परंतु सदर रक्कम शाळेच्या खात्यावर जमा केली गेली व ते अनुदान शाळास्तरावर उपप्रमाणकाद्वारे खर्च करण्यात आले आहे. त्यासंबंधीत गणवेश अनुदान मागणीचे अभिलेखे, उपप्रमाणके साठानोंदी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केल्याबाबत विल्हेवाट, पोचपावत्या इ. अभिलेखे शाळास्तरावरच ठेवल्या जाते. त्या अनुषंगाने एकूण शाळेच्या १० ते १५% शाळेच्या अभिलेख्यांचे आवश्यक ती तपासणी होणे आवश्यक आहे. त्याकरिता शाळास्तरावरील अभिलेख्यांची मागणी व लेखापरिक्षणाचे अर्धसमासपत्र क्र. १ दि. ११/०८/२०११ अन्वये मागणी केली त्यासंदर्भात ७-८ शाळा वगळता समितीचे गटशिक्षणाधिकारी तथा विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. तसेच लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध करून देण्याबाबत पूर्ण दुर्लक्ष केले गेले. सबब शाळास्तरावरील अभिलेखे उपलब्ध न झाल्याने वरील खर्च अनुदानाचा वापर विनीयोग शाळेचे मुख्याध्यापक व ग्रामशिक्षण समितीचे सभापती यांनी शासन आदेशान्वये व वित्तीय औचीत्याचे पालन करून नियमानुसार खर्च व विनीयोग केला किंवा कसे याची तपासणी करता आली नाही.

३. वरील खर्चाचे विनीयोग प्रमाणपत्रे तसेच गणवेश कापड खरेदी, शिलाई करणे व विद्यार्थ्यांना वाटप केल्यास त्यांना गणवेश प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरीने मुळ अभिलेखे सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करून सादर केले नाही.

४. वरील दर्शविलेल्या खर्च दिनांक ३१/०३/२०११ ला खर्ची घातल्याने शाळेच्या खात्यावर सन २०११-२०१२ मध्ये सत्र संपल्यानंतर प्राप्त झाले व गणवेश अनुदान सन २०१०-२०११ मध्ये शिकत असणाऱ्या एकूण विद्यार्थी संख्या व त्यामधुन वेगवेगळ्या प्रवर्गातील (सर्वसाधारण, दुर्बल घटक, दारीद्र्य रेषेखालील, एससीपी, टिएसपी, ओटीएसपी, अल्पसंख्याक) विद्यार्थी कोणत्या प्रवर्गातील किती मुले, मुली आहेत? व किती गणवेशाची आवश्यकता आहे? इत्यादी संख्या निच्छीत करून अनुदानाची रक्कम मागितली जाते. परंतु वर नमूद केल्याप्रमाणे सन २०१०-२०११ च्या विद्यार्थी संख्येवर गणवेश मागणी केली व प्रत्यक्ष अनुदान पुढिल सत्र सन २०११-२०१२ मध्ये प्राप्त झाले. त्यामुळे पुढिल सत्रातील गणवेश खरेदी करिता खर्च करावयाचे झाल्यास पहिल्या वर्गात वेगवेगळ्या प्रवर्गातील मुलांमुलींची संख्या वेगवेगळी राहू शकते तसेच चौथ्या वर्गातील मुले दुसरीकडे निघुन गेलेली असल्याने प्राप्त अनुदान व प्रत्यक्ष विद्यार्थी संख्या यानुसार गणवेश याचा ताळमेळ जुळत नाही. त्यामुळे वरील वितरित अनुदान पुढिल वर्षात खर्च करणे नियमबाह्य ठरते.

५. अल्पसंख्याक योजनेअंतर्गत देण्यात येणारे गणवेश अनुदान हे प्रति विद्यार्थी रुपये २००/- प्रमाणे दोन गणवेशाकरिता मुलामुलींना अनुदान प्राप्त होवून वितरित केले गेले व इतर योजनांतर्गत प्राप्त अनुदान एक ड्रेस प्रती मुलगा विद्यार्थी मुले रुपये ५७.२१/- प्रमाणे व प्रती मुलगी रुपये ६९.७५/- प्रमाणे प्राप्त झाल्याने एकाच वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटप व देण्यात येणारे अनुदान यामध्ये तफावत आहे. त्यामुळे गणवेश खरेदी व त्यामधील दर्जा यामध्ये मोठी तफावत होते. त्यामुळे गणवेश वाटपाचे विद्यार्थ्यासह पालकांमध्ये गैरसमज होवू शकते. एकसुत्रता आणण्याच्या दृष्टीने योग्य ती सुधारणा करणे संबंधीत शासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे.

६. महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शा. नि. क्र. असस २००९/प्रक्र३६/कार्यासन-१, दि. २४ फेब्रुवारी २००९ च्या आदेशान्वये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांमध्ये मुस्लीम, बौद्ध, शिख, जैन व पारसी या धर्माच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यापैकी बौद्ध धर्माचे विद्यार्थी एससीपी योजनेअंतर्गत सुद्धा येतात तसेच इतर धर्माचे विद्यार्थी दुर्बल घटक, दारिद्र रेषेखाली येतात त्यामुळे काही विद्यार्थी करिता गणवेश योजनेअंतर्गत नोंदवून प्राप्त निधीचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद यवतमाळ, यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :–**

१. सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षातील सदर योजनेचे अनुदान मार्च २०११ मध्ये प्राप्त झाले. त्यामुळे सदर अनुदान शाळास्तरावर उशिराने प्रदान करण्यात आले. परंतु सन २०१०-२०११ याच सत्रातील लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ देण्यात आलेला आहे.

२. सदर लाभ शाळानिहाय विद्यार्थ्यांना मिळाला किंवा नाही याची खात्री शाळाभेटीत गटशिक्षणाधिकारी/विस्तार अधिकारी (शिक्षण) व केंद्रप्रमुखांच्या सहाय्याने करण्यात आली. प्रत्येक शाळेत गणवेश वितरण रजिस्टर ठेवण्यात आले आहे. त्यात वर्षनिहाय नोंदी ठेवण्यात आल्या आहे. गणवेश वितरण ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्ष व सदस्यांच्या उपस्थितीत वितरित करण्यात येते. तसेच त्यावर गणवेश मिळाल्याबाबत संबंधीत विद्यार्थ्यांची किंवा विद्यार्थ्याच्या पालकांची स्वाक्षरी घेतल्या जाते. पंचायत समिती स्तरावर सदर टिपणी लेखा परिक्षणास सादर केली आहे व त्याची तपासणी करण्यात आली आहे.

३. वरील खर्चाचे विनीयोग प्रमाणपत्रे पंचायत समिती स्तरावर शाळांमध्ये ठेवण्यात आलेले आहे. सदर गणवेश कापड खरेदी शिलाई करणे व विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करणे त्यांना गणवेश प्राप्त झाल्याबाबतचा स्वाक्षरीचे मुळ अभिलेख मुख्याध्यापकांनी प्रमाणित केले आहे तसेच शाळा तपासणीच्या वेळी सदर अभिलेख केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी तपासून प्रमाणित केले आहे.

४. उपरोक्त २०१०-११ मध्ये मंजूर झालेला गणवेश निधीची रक्कम जरी शाळेला उशिरा प्राप्त झाली तरी सदर मागणी शाळेच्या UDISE च्या विद्यार्थी संख्येवर अधीन राहून मागणी करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देतांना UDISE च्या विद्यार्थी संख्येवर अधिन राहूनच लाभ देण्यात आला.

५. अल्पसंख्याक योजनेअंतर्गत देण्यात येणारे गणवेश अनुदान हे प्रती विद्यार्थी रुपये २००/- प्रमाणे दोन गणवेशाकरिता मुलांमुलींना अनुदान प्राप्त झाले. त्याचे स्थानिक पातळीवर बचत गटाकडून गणवेश शिवून विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले. इतर योजने अंतर्गत प्राप्त अनुदान एक ड्रेस प्रती मुलगा रुपये ५७.२१/- प्रमाणे व प्रति मुलगी रुपये ६९.७५/- प्रमाणे प्राप्त रक्कम खर्ची घालण्यात आली. ग्रामशिक्षण समिती व मुख्याध्यापक यांनी सभा घेऊन तसे ठरविण्यात आले व शासनाच्या मिळालेल्या अनुदानातून फक्त कापड खरेदी करावा व शिलाई विद्यार्थ्यांच्या पालकांना द्यावी असा ठराव प्रत्येक शाळेत घेण्यात आला त्याप्रमाणे कार्यवाही मुख्याध्यापकांनी केली व विद्यार्थ्यांना दोन गणवेश मिळाले.

६. महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शा.नि.क्र. असस २००९/प्रक्र ३६/कार्यासन-१, दि. २४ फेब्रुवारी २००९ च्या आदेशान्वये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांमध्ये मुस्लीम, बौद्ध, शिख, जैन व पारसी या धर्माच्या विद्यार्थ्याच्या समावेश आहे. त्यापैकी बौद्ध धर्माचे विद्यार्थी एससीपी योजनेअंतर्गत सुद्धा येतात ही जरी बाब खरी असली तरी मुख्याध्यापकांच्या सभेत गणवेशाचा लाभ कोणत्याही योजनेतुन देऊ शकतात फक्त सदर विद्यार्थी गणवेशाकरिता दुसऱ्या योजनेत येता कामा नये. अशा प्रकारच्या सुचना सभेतून दिल्यानंतर सदर लाभार्थी कोणत्याही एकाच योजनेमध्ये समाविष्ट केला जातो.

**परिच्छेद क्र. : ४.६२**

**अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रोत्साहन भत्ता अनुदान वाटपातील अनियमितते बाबत. पंचायत समिती आर्णी, जिल्हा यवतमाळ (परिच्छेद क्रमांक ११)**

पंचायत समिती स्तरावरून अल्पसंख्याक विद्यार्थी असलेल्या शाळांना रु. २,७०,८४८/- अनुदान वितरित करण्यात आले याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

१. महराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय क्रमांक नुसार वर्ग १ ते ४ मध्ये शिकणाऱ्या व शाळेत नियमीत उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्याचा पालकांना प्रती दिवस २ रु. ऐवढा प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे ही योजना २३ जुन ते ३१ मार्च या कालावधीसाठी असून या कालावधी मध्ये कमाल २२० ऐवढ्या दिवसासाठी देय ठरते. तसेच प्रोत्साहन भत्ता पात्र करण्यासाठी संबंधित विद्यार्थ्याची शाळेची उपस्थिती एकूण शैक्षणिक दिवसाच्या किमान ७५% असने आवश्यक आहे.

२. पंचायत समिती आर्णी शिक्षण विभाग यांनी अनुदान वाटप केलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांकडून विद्यार्थी ७५% उपस्थित असण्याबाबत हा अहवाल मागीतला नाही. प्रत्यक्षात एकूण विद्यार्थीची संख्या लक्षात घेऊन ते किती दिवस उपस्थित होते. यांचे नियोजन करून हे विद्यार्थी शैक्षणिक वर्षात उपस्थित असल्याबाबत दिवसाला २ ने परिगणित करून येणाऱ्या रकमेनुसार वितरण केले नाही. केवळ खर्ची घालण्याच्या दृष्टीने वितरित करण्यात आले. त्यामुळे शाळास्तरावरील विद्यार्थ्यांना उपस्थितीनुसार अनुदान वितरित झाले नाही. त्यामुळे शाळा निहाय अनुदान रक्कम शिल्लक असल्याचे स्पष्ट होते. तरी शाळानिहाय आढावा घेऊन शिल्लक असलेली अनुदानाची रक्कम शासन खाती जमा करावी.

३. दि. ३१/८/२००९ चे शासन निर्णयनुसार परिच्छेद क्र. २ राज्य शासनाचे शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग मार्फत राबविण्यात येत असलेल्या व केंद्र शासनाच्या स्वता. विद्यामान योजनेच्या माध्यमातुन अल्पसंख्याक विद्यार्थ्याच्या प्रोत्साहन उपस्थिती भत्ता शासनाच्या प्राप्त अनुदानातुन पंचायत समिती स्तरावर शाळानिहाय लाभ देण्यात येतो. परंतु एका शाळेतील विद्यार्थ्यांना दुहेरी लाभ देण्यात आला नसल्याने आवश्यक अभिलेख्या अभावी पडताळणी करता आला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद यवतमाळ, यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. विहित शासन निर्णयानुसार अल्पसंख्याक विद्यार्थ्याच्या पालकांना प्रती दिवस २ रु. प्रमाणे प्रोत्साहन भत्ता दिला जातो सदर उपस्थिती भत्यासाठी आवश्यक असणारी विद्यार्थ्यांची उपस्थिती, ७५% उपस्थिती बाबतची प्रमाणपत्रे मुख्याध्यापक / केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी शिक्षण यांचे स्वाक्षरीसह संलग्न करण्यात येत आहे. कमाल मर्यादेचे वर कोणालाही लाभ दिला नाही.

२. शाळानिहाय विद्यार्थी निहाय ७५% उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थी व वाटप केलेल्या पालकांची यादी व प्रोत्साहन भत्ता वाटप केल्याचे मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र व केंद्रप्रमुख यांचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. तसेच उपयोगीता प्रमाणपत्र सुद्धा घेण्यात आलेले आहे. शाळानिहाय आढावा घेतला असता अनुदान वितरित झालेले असून कोणतेही अनुदान शिल्लक नाही.

३. सदर योजनेच्या मध्यामातुन अल्पसख्यांक विद्यार्थ्यांनाच्या पालकांना प्रति दिन २ रु. प्रमाणे प्रोत्साहन भत्त वितरित करण्यात आला. याशिवाय विद्यार्थ्यांना दुहेरी लाभ देण्यात आला नाही. गट शिक्षण अधिकारी यांचे प्रमाणपत्र सोबत संलग्न करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्रमांक : ४.६३**

पंचायत समिती आर्णी यांनी शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत शिजविलेले अन्न देण्यासाठी रुपये १०९४२०९/- अनुदान वितरित करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

१. महाराष्ट्र शासन पुरक क्र. शासन -२००६ /२०१-०६ / प्रशि-४, दिनांक ११ सप्टेंबर २००६ नुसार शालेय पोषण आहार योजना अंतर्गत शिजवलेले अन्न विद्यार्थ्यांना देण्यासाठी प्रती विद्यार्थी, प्रती शाळा, अनुदान वितरण करण्यात आले. परंतु प्रती दिन विद्यार्थी उपस्थित झाल्याची पटसंख्येनुसार त्यांना शासन निर्णय प्रमाणे अनुदानाचे वाटप केल्याबाबत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाचा अहवाल प्राप्त केला नाही.

२. अन्न शिजविण्यासाठी तांदुळ, दाळ, तेल, साखर इत्यादी बाबत प्राप्त साठा व दररोज प्रति विद्यार्थी अन्न वाटपाचे साठा नोंद वहीची प्रती पंचायत समितीने प्राप्त केली नाही. त्यामुळे दरवर्षी प्रति विद्यार्थी अन्नासाठी मागणी करून त्यानुसार पंचायत समिती अनुदानाची रक्कम प्रदान केल्याची खात्री पटत नाही.

३. पंचायत समिती कडून शाळास्तरावर वेळोवेळी भेटी देऊन शासन निर्णय शापोआ-२००९/प्र.क्र./१३६/प्रशि-४/दिनांक १८ जून २००९ मधील परिशिष्ट **अ** मधील वर्ग १ ते ५ मधील विद्यार्थ्यांना ४५० ते ४७५ ग्रॅम दिवसानुसार सोयाबीन युक्त दाळ तांदुळाची खिचडी, कडधान्य उसळ व आमटी भात इत्यादी विद्यार्थ्यांना पोषण आहार म्हणून दिल्या जात असल्याबाबत भेटी पाहणी अहवाल नस्तीत आढळला नाही.

४. दिनांक ३१ मार्च २०११ पर्यंत शालेय शिक्षण पोषण आहारासाठी शाळानिहाय अनुदान देण्यात आले त्यामुळे सन २०१०-११ या आर्थिक वर्षात विद्यार्थ्यांना सकस आहाराचा प्रत्यक्ष लाभ त्याच आर्थिक वर्षात देण्यात आला नाही त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :–**

१. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक पुरक क्र.शा.पो.आ./२००६/२०१/०६/प्रशि- ४, दिनांक ११ सप्टेंबर २००६ अन्वयेशालेय पोषण आहार योजना अंतर्गत शासन निर्णयाप्रमाणे पटसंख्येनुसार प्रतिदिन विद्यार्थी उपस्थिती झाल्याच्या पटसंख्येनुसार अनुदानाचे वाटप केल्याबाबत संबंधित मुख्याध्यापकांचा अहवाल प्राप्त आहे.

२. अन्न शिजविण्यासाठी आवश्यक तांदुळ, दाळ, तेल, साखर इत्यादी बाबत प्राप्त साठा व दररोज प्रति विद्यार्थी अन्न वाटपाचे शाळास्तरावरील साठापंजी रजिस्टर प्राप्त आहे तसेच प्रति विद्यार्थी अन्नासाठी उपयोगात आलेल्या धान्यानुसार शालेय पोषण आहाराची मागणी केलेली आहे.

३. शाळा स्तरावरील पर्यवेक्षकीय यंत्रणांच्या भेटीमध्ये विद्यार्थ्यांना वेळापत्रकानुसार व ठरवून दिल्यानुसार आहार दिला जातो. याची वेळोवेळी पडताळणी केली जाते. पर्यवेक्षकीय यंत्रणेचा पाहणी अहवाल उपलब्ध आहे.

४. शालेय पोषण आहारातंर्गत प्रमाणक क्र. ९८१, ९८२, १०६३, १०६४, १०८९ सर्व देयके डिसेंबर २०१० मध्ये पारित करण्यात आले असून एकच प्रमाणक क्र. १६५१, दि. ३१.३.११ ला पारित करण्यात आलेले आहे. सर्व उपप्रमाणके सन २०१०-११ मधीलच आहे. प्रत्यक्ष लाभ त्याच आर्थिक वर्षामध्ये देण्यात आलेला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

यवतमाळ जिल्हा परिषदेस समितीने भेट दिली असता, जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप योजनेतील (परिच्छेद क्रमांक ४.५२) अनियमिततेबाबत समितीस माहिती द्यावी. यावर शिक्षणाधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला की, गणवेश वाटपामधून महिला बचत गटांना रोजगार मिळणे अपेक्षित होते परंतु सदर उद्देश साध्य न झाल्यामुळे हा आक्षेप घेण्यात आलेला आहे. यामध्ये गणवेशांचे दर अतिशय अत्यल्प होते. मुलींसाठी ते ५७ रुपये २१ पैसे तर मुलांसाठी ६९ रुपये ७५ पैसे एवढे होते. दर अत्यल्प असल्यामुळे कापड खरेदी करून गणवेश शिवणे शक्य नव्हते. त्यामुळे ज्यांनी या दरात पुरवठा केला त्यांच्याकडूनच खरेदी करण्यात आली. यावर शिक्षणाधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीवरून समितीने समाधान व्यक्त केले.

यानंतर समितीने शालेय पोषण आहार योजनेतील शिजविलेले अन्न देण्याकरिता अनुदान वाटपातील अनियमितता (परिच्छेद क्रमांक ४.५३) याबाबत समितीला माहिती देण्यात यावी असे विदित केले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, शालेय पोषण आहार योजनेंतर्गत प्राप्त निधी व खर्च झालेला निधी याची सर्व कागदपत्रे शिक्षण विभागाकडे उपलब्ध आहेत.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विदित केले की, शालेय पोषण आहाराचा विषय देखील विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये घ्यावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत चौकशी करून समितीस अहवाल सादर करावा. समिती त्या अनुषंगाने सचिवांची साक्ष घेईल. तसेच पटसंख्या व शालेय पोषण आहाराचा करण्यात आलेला पुरवठा यामध्ये आढळलेल्या नक्कीच तफावत आढळून येईल, असे वाटते. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर बाबींची नोंद घेऊन चौकशीमध्ये याचा अंतर्भात करावा. तसेच कोविड काळात अंगणवाडी व शालेय पोषण आहार कशा प्रकारे वितरित केला गेला त्याचीही सविस्तर माहिती सादर करावी व शालेय पोषण आहार खर्चातील अनियमितता (परिच्छेद क्रमांक ४.५५) यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारात्मक संमती दर्शविली समितीने परिच्छेद क्रमांक ४.५५ व ४.५६ हे देखील शालेय पोषण आहाराशीच संबंधित आहेत. याबाबत देखील चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत सूचना दिली यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संमती दर्शविली. समितीने **परिच्छेद क्रमांक : ४.५४ :** प्राथमिक शाळेतील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश वाटपातील

अनियमितता या परिच्छेदाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत समितीस माहिती देण्याबाबत सूचित केले यावर विभागीय अधिकारी यांनी समितीस विदित केले की, दिग्रस पंचायत समितीला गणवेश वाटपासाठी सुमारे ५ लाख ३८ हजार रुपये प्राप्त झाले होते. त्यापैकी पहिल्यांदा १ लाख १६ हजार रुपये व दुसऱ्यांदा ४ लाख २७ हजार २०० रुपयांचे देयक अदा करण्यात आले आहेत. दोन शाळांना दोन-दोन विद्यार्थ्यांचे जास्तीचे पैसे गेले होते. ते चलानद्वारे भरणा करण्यात आले आहेत यावर समितीने होकारात्मक संमती दर्शविली. पुढे समितीने **परिच्छेद क्रमांक : ४.५७ : दुर्बल घटकातील विद्यार्थिनींना उपस्थिती भत्ता प्रदानातील अनियमिततेबाबत** माहिती देण्याबाबत सूचित केले यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २०१०-११ मध्ये दुर्बल घटकातील विद्यार्थिनींना उपस्थिती भत्ता प्रदान केला नसल्याचा परिच्छेद आहे. परंतु शाळेचे अहवाल, हजेरी रजिस्टर व नोंदवहीवरून उपस्थिती भत्ता प्रदान केल्याचे दिसून येत आहे. शाळेच्या मुख्याध्यापकांचे उपयोगिता प्रमाणपत्र देखील उपलब्ध आहेत. यावर समितीने होकारात्मक संमती दर्शविली व क्रमांक ४.५८ तसेच परिच्छेद क्रमांक ४.६० हा देखील शालेय पोषण आहाराशी संबंधित आहे. त्यामुळे हे परिच्छेद देखील विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी घेण्यात यावेत अशी सूचना दिली. समितीने **परिच्छेद क्रमांकः ४.५९ :** प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप योजनेतील अनियमिततेबाबत तसेच विद्यार्थ्यांना गणवेशांचे वाटप करण्यात आले आहे का अशी विचारणा केली असता गट विकास अधिकारी यांनी गणवेशांचे वाटप करण्यात आलेले आहे तसेच **परिच्छेद क्रमांक : ४.६१ : शिक्षण विभागामार्फत इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाकरिता शाळा स्तरावर वितरित केलेल्या रकमेबाबत.** या परिच्छेदातील अनियमितता दूर करून गणवेश वाटप करण्यात आलेले आहेत अशी माहिती समितीला देण्यात आली. समितीने **परिच्छेद क्रमांक : ४.६२ : अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रोत्साहन भत्ता अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत** अशी विचारणा केली असता गट विकास अधिकारी यांनी समितीला विदित केले की, सदर परिच्छेदाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबतची प्रमाणपत्रे आहेत. तसेच इतर रेकॉर्ड तपासले असता बरोबर असल्याचे आढळून आले यावर समितीने होकारात्मक सहमती दर्शविली तसेच परिच्छेद क्रमांक (४.६३) हा देखील शालेय पोषण आहाराशी संबंधित आहे. त्यामुळे हा परिच्छेद विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी घेण्यात यावा असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविलीः-**

**प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, शालेय पोषण आहार योजनेतील शिजवलेले अन्न देण्याकरिता अनुदान वाटपातील आणि प्रोत्साहन भत्ता यामध्ये झालेली अनियमितताबाबत चौकशी करण्यात आली आहे काय? नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?**

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

मा.पंचायती राज समिती इतिवृतामध्ये १६/०२/२०२१ ला ४.५२, ४.५४, ४.५७, ४.६०, ४.६१, ४.६२ बाबत चर्चा झाली होती. याबाबत चौकशीचे आदेश नसल्याने स्वंतत्रपणे चौकशी करण्यात आली नाही. तथापि मूळ परिच्छेदातील अनियमितता बाबत पुढील प्रमाणे अनुपालन सादर :—

**परिच्छेद क्र.४.५२ पंचायती समिती यवतमाळ : प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप योजनेतील अनियमिततेबाबत.**

१. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई- २००३/(१७/२००३)/प्राशि-४, मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक २० मे २००४ नुसार सदर योजनांतर्गत कापड खरेदी व शिलाई करून घेण्याची कार्यवाही ग्रामशिक्षण / शाळा व्यवस्थापन समितीने करावयाची होती. या योजनेमध्ये लाभार्थ्याला गणवेशासाठी निधी प्राप्त झाला त्यानुसार व महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक पी.आर.इ २००४/(२०९/०४), प्रा.शि.-४, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२, दिनांक ४ फेब्रुवारी २००५ नुसार गणवेशाचे कमाल दर मुलांसाठी गणवेश शर्ट व पॅन्ट करिता ५७ रूपये २१ पैसे व मुलींसाठी गणवेश स्कर्ट व शर्ट (ब्लाउज) करिता ६९ रूपये ७५ पैसे व महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विभाग शासन निर्णय क्र/असंम-२००९/प्र.क्र. ३६/कार्यासन १, मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक २४ फेब्रुवारी २००९ अन्वये वर्ग १ ते ४ मध्ये शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना प्रती गणवेश २०० रूपये याप्रमाणे होता. सदर शासनपत्रानुसार निश्चित करण्यात आलेला गणवेश दर अत्यल्प असल्यामळे उपरोक्त निश्चित करण्यात आलेल्या दरात महिला बचत गट यांचेकडून गणवेश तयार करून घेणे शक्य झाले नाही. तसेच कापड खरेदी करून गावातील शिंप्याकडून शिवून घेणेही शक्य झाले नाही. सबब शाळा व्यवस्थापन समितीने पात्र लाभार्थीना गणवेश वितरित करता यावेत या सदभावनेने त्यांच्या स्तरावर ठरावाद्वारे रेडीमेड गणवेशाची खरेदी करून विद्यार्थ्यांना गणवेश वितरित केलेले आहे. परिच्छेदात गणवेश वाटप योजनेअंतर्गत योजना राबवून खर्च ९,२०,२६९/- दाखविला आहे. तथापि प्रत्यक्षात प्राप्त रक्कम ९,७८,४३०/- असून शाळा व्यवस्थापन स्तरावर गणवेश वाटपाकरिता झालेला खर्च रूपये ९,७८,२७५/- आहे.

२. शाळा व्यवस्थापन समिती मार्फत शासनाने दिलेल्या वर्गवारी नुसार (सामान्य, OTSP, TSP, विशेष घटक योजना, अल्पसंख्याक) याप्रमाणे लाभार्थ्याची निवड करून शाळा व्यवस्थापन समितीने विद्यार्थ्यांची शारिरीक मापदंडानुसार नियोजन करून आवश्यक असलेल्या मापानुसार गणवेश खरेदी करण्यात आले. लाभार्थ्यांना लाभ देण्यात आल्याबाबत विद्यार्थी व पालक यांचे स्वाक्षरीच्या सत्यप्रत सोबत जोडलेला आहे.

३. सदर गणवेश पात्र व मंजूर लाभार्थी वापरत असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे.

४. अल्पसंख्याक लाभार्थी विद्यार्थी यांचे बाबतचे स्वतंत्र विवरणपत्र (ब) नाही तथापि या कार्यालयाचे पत्र क्रमांक /पंसय/शिवि/ २६०/२०१०, दि. २७/०८/२०१० अन्वये अल्पसंख्याक विद्यार्थी गणवेश करिता ४६२५ विद्यार्थ्यांसाठी गणवेश निधी मागणी करण्यात आली होती. प्रत्यक्षात एकूण २९०४ विद्यार्थ्यांना ५८०८००/- रूपये प्राप्त झाले होते. सदर निधी शाळास्तरावर वितरित करण्यात आला, संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयानुसार त्यामधून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शाळास्तरावरून गणवेश वाटप करण्यात आलेले आहेत. वाटपाबाबत विद्यार्थी व पालकांच्या स्वाक्षरीच्या सत्यप्रती सोबत जोडलेल्या आहे.

५. खर्च विवरण अहवाल गणवेश वितरणकरिता एकूण रुपये ९,७८,४३०/- प्राप्त झाले असून शाळास्तरावर रूपये ९,७८,२७५/- वितरित करण्यात आले. यामधून ९१५६ विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सोबत जोडले आहेत.

**परिच्छेद क्रमांक ४.५३ शालेय पोषण आहार योजना शिजविलेले अन्न देण्याकरिता अनुदान वाटपातील अनियमितता**

१. शिक्षणाधिकारी प्राथ. यांचे वितरण आदेशानुसार दि. ३० सप्टेंबरची लाभार्थी शाळांची पटसंख्या विचारात घेऊनच आणि गट शिक्षणाधिकारी यांनी मागणी केल्यानुसार अनुदान वितरित करण्यात येत असल्याचे शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प. यवतमाळ यांचे पत्र क्र. १६२३ दि. ३१/०३/२०११ (केंद्र हिस्सा) व पत्र क्र. १६२४ दि. ३१/०३/२०११ (राज्य हिस्सा) या दोन्ही पत्रामध्ये अनुदान वितरणाबाबत नमूद आहे. तसेच तालुकास्तरावरून शाळांना मुख्याध्यापकाकडून दरमहा प्राप्त होणाऱ्या मागणी पत्रानुसारच प्रत्यक्ष शाळास्तरावर विद्यार्थ्यांना अन्न शिजवून दिल्यानंतर मुख्याध्यापकाकडून प्राप्त होणाऱ्या देयकानुसार सत्यता पडताळून शाळा स्तरावर अनुदान वितरित करण्यात येतात.

२. तालुका स्तरावरून शाळास्तरावर वितरित केलेल्या अनुदाना संदर्भात मुख्याध्यापकांकडून शालेय पोषण आहार योजनेचे खर्चाचे अहवाल पं.स. दिग्रस येथे दरमहा मुख्याध्यापकाकडून उपलब्ध होतात.

**परिच्छेद क्र. ४.५४ पंचायत समिती दिग्रस : प्राथमिक शाळेतील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश वाटपातील अनियमितता**

१. प्रथमतः एकूण ३० शाळेमधील एकूण विद्यार्थी संख्या ५५८ यांना रूपये २००/- प्रमाणे जादा शोधन झालेले रूपये १,११,६००/- बाबत गट शिक्षणाधिकारी पं.स. यांनी सदर बाब लक्षात येताच वरील शाळेकडून दर्शविलेली विद्यार्थी संख्येनुसार रूपये १,११,६००/- चलान नंबर ९/७ दिनांक १४/३/२०१२ रु.१,११,६००/- खात्यात भरणा करण्यात आले.

२...पुढील प्रमाणे आहे..

(अ) जि.प.प्राथमिक उर्दु शाळा कलगाव इयत्ता १ ली ते ४ थी ची उर्दु माध्यमाची शाळा असून सन २०१०-११ मध्ये या शाळेत शिकत असलेले १ ते ४ चे १६० विद्यार्थी हे अल्पसंख्याक विद्यार्थी असल्यामुळे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश पुरविण्याचे योजनेसाठी सर्व १६० विद्यार्थ्यांना पात्र असल्यामुळे प्रति विद्यार्थी २०० प्रमाणे ३२,०००/- रूपये अनुदान शाळेला वितरित करण्यात आले होते.

(ब) उच्च प्राथमिक उर्दू शाळा चिरकुटा येथील मुख्याध्यापकाच्या मागणीनुसार ०७ विद्यार्थ्याकरिता रूपये २००/- प्रमाणे रूपये १४००/- वितरित करण्यात आले होते. त्यापैकी ०२ विद्यार्थी हे इयत्ता ७ चे असल्यामुळे ते या योजनेचे लाभार्थी नसल्याचे मुख्याध्यापकाचे लक्षात येताच त्यांनी चलान क्रमांक ९/६३ दि.२२/०२/२०१२ नुसार रूपये ४००/- भरणा केले आहे.

(क) जिल्हा परिषद प्राथ.उर्दू शाळा डेहणी येथील ३२ विद्यार्थ्यांना रूपये २००/-प्रमाणे ६४००/- वितरित करण्यात आले होते परंतु मुख्याध्यापकाची मागणी ३० विद्यार्थ्यांची असल्यामुळे ०२ विद्यार्थ्याकरिता जादा शोधन झालेले रूपये ४००/- चलान क्र.९/६२ दि.२२/०२/२०१२ नुसार वसूल करून भरणा केले आहे.

(ड) जि.प.प्राथ. मराठी शाळा वाईलिगी,फेटरी,निंभा,सिंगद या ४ शाळांनी लेखी मागणीपत्र विहित मुदतीत सादर केले नव्हते परंतु दिनांक ३१ मार्च २०११ ला अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे गणवेश वाटप करावयाचे असल्याने सदर ०४ शाळेतील विद्यार्थी मागणीपत्र अभावी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये याकरिता केंद्रप्रमुखाकडून माहिती घेऊन सदर देयकामध्ये संबंधीत विद्यार्थ्याचा समावेश करण्यात आला आहे.

३. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाकरिता शिक्षणाधिकारी प्राथ.जि.प. यवतमाळ यांचेकडून दि.२८/०३/२०११ चे आदेशानुसार रूपये ४,३४,४००/- अनुदान प्राप्त झाले. सन २००८-०९ व २००९-१० मध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाकरिता निधी प्राप्त न झाल्यामुळे वंचित झालेले विद्यार्थी त्याच शाळेत वरच्या वर्गात शिकत असल्यामुळे कोणताही पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहीलेला नाही.

४. प्राथमिक शाळेतील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश पुरविणेबाबत रूपये ५,३८,०००/- खर्च झालेला होता. त्यामध्ये जादा प्रदान झालेली रक्कम रूपये १,११,६००/- चलान नंबर ९/७ दि.१४/३/२०१२ अन्वये वसूल करण्यात आलेली आहे.त्यामुळे प्रत्यक्षात खर्च ४,२६,४००/-झालेला आहे. त्यामुळे रूपये १,०४,८००/- जादा खर्च झालेला नाही.

५. जादा खर्चाची देयके चुकून पारीत झाल्यांनतर,अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना सन २०१०-११ मध्ये गणवेश वाटप करण्याचे बाबीवर अतिप्रदान रक्कमेबाबतची बाब लक्षात येताच सदर रक्कम शाळेकडून वसूल करून रक्कमेचा भरणा करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर योजनेवर झालेला खर्च अनुदान मर्यादेतच झालेला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.५५ पंचायत समिती कळंब : शालेय पोषण आहार खर्चातील अनियमितता :**

१. बँकेला पाठविलेल्या रक्कम अदा करावयाच्या यादीवर सर्व शाळेचे बँक खाते क्रमांक व बँक शाखेचे नाव नमूद केलेले आहे.कार्यालयाकडून बँकेला पाठविण्यात आलेले ८ देयके व बँक यादीचे छायांकित प्रती सोबत जोडलेली आहेत.

२. शासन निर्णय क्रमांक शापोआ २०१०/प्र.क्र./प्रशि-४ दिनांक ०२/०२/२०११ नुसार प्रत्यक्ष उपस्थितीनुसार आहार वाटप करण्यात आले आहे.

३. किरकोळ साहित्य रु.५०० पर्यंत भाजीपाला खरेदी करतांना रोखीने केले आहे. किराणा साहित्याची खरेदी शाळेकडून करण्यात येत नाही. तो शासनामार्फतच पुरविण्यात येतो. अन्न शिजवण्याचे काम स्थानिक पातळीवरील नेमणूक केलेल्या व्यक्तीकडून केल्या जात असल्याने व त्यांचे मानधन अल्यल्प असल्याने व त्यांचेकडे बँक खाते नसल्याने रोखीने रु. ७५०/- इतके मानधन दिले असून त्याची पोच ठेवण्यात आली आहे.

४. साठा नोंदवहीवर मुख्याध्यापक व समिती अध्यक्ष, सचिव यांचे स्वाक्षरी घेण्यात आलेली साक्षांकित/छायांकित प्रती सोबत जोडले आहे.

५. शेरेबुक प्रत्येक शाळेत ठेवलेले असते. विस्तार अधिकारी (शिक्षण) शाळांना नियमित भेटी देऊन मार्गदर्शन करतात व त्याची नोंद भेट नोंदवहीत करतात. याबाबतचे अभिलेख्याच्या प्रती सोबत जोडण्यात आले आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.५६ : शालेय पोषण आहार अनुदान वाटपाबाबत :**

१. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शाळास्तरावर अन्न शिजविण्याकरिता महिला बचत गट/स्वयंसेवी संस्था/परित्यक्त्या/गरजु महिलांना शाळा व्यवस्थापन समिती मार्फत करार पद्धतीवर अन्न शिजवून वाटप करण्याचे काम दिले जाते.अन्न शिजवून दिल्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेतल्या जात नाही. परंतु अन्न शिजविणे संबधात दैनंदिनी नोंद वही क्र.१ वर नोंदी असतात. सदर नोंदवही मुख्याध्यापक व अध्यक्ष व्यवस्थापन समिती यांनी सांक्षाकिंत केली असते.

२. गट शिक्षणाधिकारी तसेच विस्तार अधिकारी शिक्षण यांनी वेळोवेळी भेटी देऊन मार्गदर्शन केलेले आहे.सदरहू बाबी संबंधात गट शिक्षणाधिकारी तसेच विस्तार अधिकारी व केंद्र प्रमुख यांच्या भेटीच्या अहवालाच्या सत्यप्रती जोडण्यात येत आहे.

३. वित्तीय वर्ष सन २०१०-११ चे अनुदान उपयोगिता प्रमाणपत्र व खर्च अहवाल या कार्यालयाचे पत्र क्रमांक/जाक्र/पंसरा/शापोआ/ ५१७ /दिनांक ६/४/२०११ अन्वये वरिष्ठ कार्यालयाला सादर केलेले आहे.सोबत अहवालाची सत्यप्रती जोडण्यात येत आहे.

४. वित्तीय वर्ष सन २०१०-११ चे अखर्चीत अनुदान रुपये १७०१९१५/-खर्च करण्याची अनुमती शासनाचे पत्र क्र./शापोआ/२०११ / प्र.क्र./३०८/ प्राशि/४ /दिनांक ८/०७/२०११ अन्वये देण्यात आलेली होती. सदर पत्राची सत्यप्रत जोडण्यात येत आहे. शाळांना अन्न शिजवून दिल्यामुळे अखर्चित अनुदान खर्च करण्यात आले.

**परिच्छेद क्र. ४.५७ पंचायत समिती महागाव : दुर्बल घटकातील विद्यार्थ्यीनींना उपस्थिती भत्त प्रदानातील अनियमिततेबाबत :**

१. उपस्थिती भत्ता अनुसुचित जाती / जमाती, भटक्या जाती व विमुक्त जमाती विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्याबाबतची शाळेच्या दस्ता ऐवजावरून खात्री करून भत्ता वाटप करण्यात आलेला आहे.शाळेच्या उपस्थिती भत्ता वाटप रजिस्टरवर जातीचा उल्लेख आहे. सोबत शाळेचे हजेरीपटाची छायाप्रत संलग्न केली आहे.

२. उपस्थिती भत्ता वाटपाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त असून सोबत छायाप्रत संलग्न केली आहे.

३. मुख्याध्यापकांनी उपस्थिती भत्ता ग्रामशिक्षण समितीसमोर वाटप केल्याबाबत व रक्कम मिळाल्याबाबतची विद्यार्थ्यांची स्वाक्षरी नोंदवही ठेवली आहे. त्यावर ग्रामशिक्षण समितीचे सदस्यांच्या स्वाक्षरी आहेत.नमुन्या दाखल काही नोंदवहयांच्या छायाप्रती संलग्न केल्या आहेत.

**परिच्छेद क्रमांक ४.५८ पंचायत समिती महागाव : शालेय पोषण आहार योजनांतर्गत शिजवलेले अन्न देण्याकरिता अनुदान प्रदानातील अनियमितता :**

१. महाराष्ट्र शासन पुरक पत्र क्र.शापोअ-२००६/८२०१-०६/प्राशि-४/दिनांक ११ सप्टेंबर २००६ नुसार शालेय पोषण आहार योजना अंतर्गत शिजविलेले अन्न विद्यार्थ्यांना देण्यासाठी मुख्याध्यापकांच्या अहवालानुसार व विद्यार्थ्यांचे उपस्थितीनुसार अन्न शिजवून देणे करिता अनुदान वाटप करण्यात आले आहे.सोबत काही निवडक मुख्याध्यापकांचा उपस्थिती अहवाल संलग्न केला आहे.

२. अन्न शिजविण्यासाठी तांदुळ, दाळ, तेल, साखर इत्यादी साहित्याचा शाळा स्तरावर शासनाकडून पुरवठा झाला आहे. त्याबाबतच्या पावत्या संलग्न केल्या आहेत. त्यानुसारच मागणीची खात्री करूनच अनुदान वितरण केले आहे.

३. मुख्याध्यापकांनी इयत्ता १ ते ५ करिता १०० ग्रॅम तांदुळ, २० ग्रॅम दाळ, १० ग्रॅम सोयाबिन, ५ ग्रॅम तेल व इतर २ ग्रॅम साहित्य असे एकूण १३७ ग्रॅम साहित्य मिळवून शिजविलेले अन्न ३०० ते ३२५ ग्रॅम देण्यात आलेले आहे. तसेच इयत्ता ६ ते ८ करिता ४५० ते ४७५ ग्रॅम शिजविलेले अन्न नियमित विद्यार्थ्यांना देण्यात आले असून विस्तार अधिकारी शिक्षण व केंद्र प्रमुखांनी तपासण्या केल्या आहेत. उदाहरणादाखल काही शेरेबुक नोंदवहीच्या छायाप्रती संलग्न केल्या आहेत.

४. मुख्याध्यापकांनी सादर केलेल्या थकित देयकानुसार दिनांक ३१/०३/२०११ रोजी प्राप्त झालेल्या अनुदानाप्रमाणे खर्चाची देयक अदा करण्यात आले.सदर देयके त्याच आर्थिक वर्षातील होती. तसेच सकस आहाराचा विद्यार्थ्यांना त्याच आर्थिक वर्षात लाभ देण्यात आला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.५९ पंचायत समिती दिग्रस : प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप योजनेतील अनियमिततेबाबत :**

१. महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक/पीआरई-२००३/९१७/२००३/प्राशि-४, मुंबई दिनांक २० मे २००४ नुसार या योजनेंतर्गत गणवेशाकरिता कापड खरेदी व शिलाई करून घेण्याची कार्यवाही ग्रामशिक्षण समितीचे ठरावानुसार केली आहे. परंतु ग्रामिण भागात व आजुबाजुच्या परिसरात सर्वच ठिकाणी महिला शिलाई बचत गट स्थापन नसल्यामुळे स्थानिक शिंप्यांकडून गणवेश शिलाई करून घेतले आहेत. त्यामुळे स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध झाला आहे. व शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना शासनाने ठरवून दिलेल्या अनुदानात त्वरित व चांगल्या दर्जाचे गणवेश वाटप करण्यात आले.

२. मुख्याध्यापकांनी शाळास्तरावर स्थानिक शिंप्यांकडून ग्रामशिक्षण समितीसमोर गणवेशाची मापे घेऊन गणवेश शिलाई करून घेतलेले आहेत.मापांबाबत नोंदवही ठेवली नाही परंतु स्थानिक शिंप्याकडून प्रत्यक्ष मापे घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य व चांगल्या दर्जाचे गणवेश प्राप्त झाले आहेत. याबाबतची काही शाळास्तरावरील नोंदवहीची छायाप्रत संलग्न केली आहे.

३. सदर गणवेश पात्र विद्यार्थ्यांनाच देण्यात आले असून याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्राची छायाप्रत संलग्न केली आहे.

४. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले असून गणवेश प्राप्त झाल्याबाबत विद्यार्थ्यांची स्वाक्षरी नोंदवहीची छायाप्रत सोबत संलग्न केली आहे.

५. प्राप्त अनुदानानुसार खर्चाचे नियोजन केल्यामुळे अनुदान अखर्चीत राहिले नाही. याबाबतचा फलश्रुती अहवाल सोबत जोडला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.६० पंचायत समिती मारेगाव : शालेय पोषण आहार अंतर्गत शिजवलेले अन्न देण्यासाठी शाळास्तरावर वितरित केलेल्या अनुदानाबाबत :**

१. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले तांदुळ व धान्य माल (किराणा) पुरक पदार्थ यांचा हिशेब नोंदवहीत दरमहा नोंदी मुख्याध्यापक घेतात. वर्ग १ ते ५ व वर्ग ६ ते ८ अशा २ गटात शाळेतील विद्यार्थ्यांची वर्गवारी नोंदवहीत केली जाते. वर्ग १ ते ५ च्या विद्यार्थ्यांना प्रतिदिन प्रतिविद्यार्थी १०० ग्रॅम तांदुळ व वर्ग ६ ते ८ करिता प्रतिदिन प्रतिविद्यार्थी १५० ग्रॅम तांदुळ असे प्रमाण घेऊन सदर महिन्यातील एकूण कामाचे दिवस याला गुणाकार करून तांदुळ मागणी केंद्रप्रमुखांकडे केली जाते. तसेच वर्ग १ ते ५ व वर्ग ६ ते ८ च्या विद्यार्थ्यांची पुरक पदार्थांची मागणी केंद्रप्रमुखांकडे मुख्याध्यापक करतात. केंद्रप्रमुख केंद्रातील एकूण शाळांची (वर्ग १ ते ८) जि.प. व खाजगी व्यवस्थापनाच्या लाभार्थी शाळा नोंदवून संकलीत तक्ता केंद्रनिहाय तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी यांचेकडे सादर करतात. केंद्रातील एकूण केंद्रसंख्या यांचे संकलन करून सदरहू माहिती जिल्हा शाखेकडे एक प्रत तसेच एक प्रत पंचायत समितीच्या लेखा विभागात सहायक लेखा अधिकारी यांचेकडे सादर करतात. सदर मागणी मंजूर झाल्यावर अंतीम मंजुरी घेऊनच देयके पारीत केली जाते.

२. एकूण शाळेच्या १० ते १५% शाळेच्या अभिलेख्यांची तपासणी करणे आवश्यक आहे. काही शाळांचे अभिलेखे उपलब्ध करून देता आले यापुढे नियमाप्रमाणे शाळांचे अभिलेखे तपासणीकरिता उपलब्ध करून देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक शापोआ२००९/३४/०३ प्रशि ४ दि. १८ जून २००९ च्या आदेशातील बाब क्रमांक १० मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेमध्ये तांदुळाबरोबर पाककृतीनुसार आवश्यक लागणारे धान्यादी माल (उदा. कडधान्य, दाळी, मिठ, मिरची, तेल इत्यादी) निविदा मार्फत कंत्राटदारामार्फत मागणीप्रमाणे पुरवठा लाभार्थी शाळेत केला जातो. इंधन व मजुरी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रु. ०.५०/- म्हणजेच ५० पैसे प्रमाणे ग्रामशिक्षण समितीला अनुदान देण्याचे निर्देश आहे. शासन निर्णय दिनांक १८ जून २००९ नुसार रुपये १.५८/- व रुपये २.१०/- प्रति विद्यार्थी खर्च करण्यात आलेला आहे.

४. शाळेची पटसंख्या कमी असल्यामुळे बचत गट इच्छुक नव्हते त्यामुळे स्थानिक विधवा,मागासवर्गीय गरजू महिलांची प्राधान्याने नियुक्ती करून शालेय पोषण आहार शिजविण्यात आला.

५. शासनाकडे शाळानिहाय देयकाची रक्कम अदा करण्यासाठी लेखा विभागाकडे मंजुरीसाठी देयके ठेवण्यात येते. देयके मंजूर झाल्यावर सदर देयक मुख्याध्यापकांच्या शाळेच्या खात्यात रक्कम जमा करतात. (उदा. पुरक पोषण आहाराची व इंधनाची रक्कम ) स्वयंपाकी, मदतनिस मानधनाची रक्कम संबंधीतांच्या बँकेच्या खात्यात जमा करतात. शासनाकडून ज्याप्रमाणे रक्कम प्राप्त होते त्याच नियमाप्रमाणे पंचायत समिती स्तरावर लेखाधिकारी रक्कम मंजूर करतात व बँकेमार्फत शाळेच्या खात्यामध्ये जमा करतात. शिक्षण विभागामध्ये महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६१ चे नियम ५१ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नमुना १२ मध्ये शाळास्तरावर साठानोंदवही ठेवण्यात आलेली आहे. केंद्रप्रमुख यांनी तपासणी करून अहवाल पंचायत समिती स्तरावर सादर करतात. तसेच या अंतर्गत रक्कम दुबार प्रदान झाली नाही.

६. पुरक पोषण आहार करिता प्राप्त अनुदानाच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधीत शाळेचे मुख्याध्यापकाकडून घेण्यात आलेले आहे. अवलोकनार्थ सादर.

**परिच्छेद क्रमांक ४.६१ : पंचायत समिती मारेगाव : शिक्षण विभागामार्फत इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाकरिता शाळास्तरावर वितरित केलेल्या रकमेबाबत :**

१. सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षातील सदर योजनेचे अनुदान मार्च २०११ मध्ये प्राप्त झाले . त्यामुळे सदर अनुदान शाळास्तरावर उशिराने प्रदान करण्यात आले. परंतु सन २०१०-२०११ याच सत्रातील लाभार्थी विद्यर्थ्यांना गणवेशाचा लाभ देण्यात आलेला आहे.

२. सदर लाभ शाळानिहाय विद्यार्थ्यांना मिळाला किंवा नाही याची खात्री शाळाभेटीत गटशिक्षणाधिकारी / विस्तार अधिकारी (शिक्षण) व केंद्रप्रमुखांच्या सहाय्याने करण्यात आली. प्रत्येक शाळेत गणवेश वितरण रजिस्टर ठेवण्यात आले आहे. त्यात वर्षनिहाय नोंदी ठेवण्यात आल्या आहे. गणवेश वितरण ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्ष व सदस्यांच्या उपस्थितीत वितरित करण्यात येते. तसेच त्यावर गणवेश मिळाल्याबाबत संबंधीत विद्यार्थ्याची किंवा विद्यार्थ्याच्या पालकांची स्वाक्षरी घेतल्या जाते. पंचायत समिती स्तरावर सदर टिपणी लेखा परिक्षणनास सादर केली आहे व त्याची तपासणी करण्यात आली आहे.

३. वरील खर्चाचे विनीयोग प्रमाणपत्रे पंचायत समिती स्तरावर शाळांमध्ये ठेवण्यात आलेले आहे. सदर गणवेश कापड खरेदी शिलाई करणे व विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करणे त्यांना गणवेश प्राप्त झाल्याबाबतचा स्वाक्षरीचे मुळ अभिलेख मुख्याध्यापकांनी प्रमाणित केले आहे तसेच शाळा तपासणीच्या वेळी सदर अभिलेख केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी तपासून प्रमाणित केले आहे.

४. उपरोक्त २०१०-११ मध्ये मंजूर झालेला गणवेश निधीची रक्कम जरी शाळेला उशिरा प्राप्त झाली तरी सदर मागणी शाळेच्या UDISE च्या विद्यार्थी संख्येवर अधिन राहून मागणी करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देतांना UDISE च्या विद्यार्थी संख्येवर अधिन राहूनच लाभ देण्यात आला.

५. अल्पसंख्याक योजनेअंतर्गत देण्यात येणारे गणवेश अनुदान हे प्रती विद्यार्थी रुपये २००/- प्रमाणे दोन गणवेशाकरिता मुलांमुलींना अनुदान प्राप्त झाले. त्याचे स्थानिक पातळीवर बचत गटाकरून गणवेश शिवून विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले. इतर योजने अंतर्गत प्राप्त अनुदान एक ड्रेस प्रती मुलगा रुपये ५७.२१/- प्रमाणे व प्रति मुलगी रुपये ६९.७५/- प्रमाणे प्राप्त रक्कम खर्ची घालण्यात आली. ग्रामशिक्षण समिती व मुख्याध्यापक यांनी सभा घेऊन तसे ठरविण्यात आले. व शासनाच्या मिळालेल्या अनुदानातून फक्त कापड खरेदी करावा व शिलाई विद्यार्थ्यांच्या पालकांली द्यावी असा ठराव प्रत्येक शाळेत घेण्यात आला त्याप्रमाणे कार्यवाही मुख्याध्यापकांनी केली व विद्यार्थ्यांना दोन गणवेश मिळाले.

६. महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शा.नि.क्र.असस २००९/प्र.क्र. ३६/कार्यासन-१ दि. २४ फेब्रुवारी २००९ च्या आदेशान्वये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांमध्ये मुस्लीम, बौद्ध, शिख, जैन व पारसी या धर्माच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यापैकी बौद्ध धर्माचे विद्यार्थी एससीपी योजनेअंतर्गत सुद्धा येतात ही जरी बाब खरी असली तरी मुख्याध्यापकांच्या सभेत गणवेशाचा लाभ कोणत्याही योजनेतून देवू शकतात फक्त सदर विद्यार्थी गणवेशाकरिता दुसऱ्या योजनेत येता कामा नये. अशा प्रकारच्या सूचना सभेतून दिल्यानंतर सदर लाभार्थी कोणत्याही एकाच योजनेमध्ये समाविष्ठ केला जातो.

**परिच्छेद क्रमांक ४.६२ पंचायत समिती आर्णी : अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रोत्साहन भत्ता अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत :**

१. विहित शासन निर्णयानुसार अल्पसंख्याक विद्यार्थ्याच्या पालकांना प्रती दिवस २ रु. प्रमाणे प्रोत्साहन भत्ता दिला जातो सदर उपस्थिती भत्त्यासाठी आवश्यक असणारी विद्यार्थ्याची उपस्थिती,७५% उपस्थिती बाबतची प्रमाणपत्रे मुख्याध्यापक/केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी शिक्षण यांचे स्वाक्षरीसह संलग्न करण्यात येत आहे.कमाल मर्यादेचे वर कोणालाही लाभ दिला नाही.

२. शाळानिहाय विद्यार्थीनिहाय ७५ % उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थी व वाटप केलेल्या पालकांची यादी व प्रोत्साहन भत्ता वाटप केल्याचे मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र व केंद्रप्रमुख यांचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. तसेच उपयोगीता प्रमाणपत्र सुद्धा घेण्यात आलेले आहे. शाळानिहाय आढावा घेतला असता अनुदान वितरित झालेले असून कोणतेही अनुदान शिल्लक नाही.

३. सदर योजनेच्या माध्यमातून अल्पसख्यांक विद्यार्थ्यांनाच्या पालकांना प्रति दिन २ रु. प्रमाणे प्रोत्साहन भत्ता वितरित करण्यात आला. याशिवाय विद्यार्थ्याना दुहेरी लाभ देण्यात आला नाही गट शिक्षण अधिकारी यांचे प्रमाणपत्र सोबत संलग्न करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.६३ पंचायत समिती आर्णी : शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शिजविलेले अन्न देण्यासाठी अनुदान प्रदानातील अनियमिततेबाबतः**

१. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक पुरक क्र.शा.पो.आ /२००६ / २०१-०६ / प्रशि-४ दिनांक ११ सप्टेंबर २००६ अन्वये शालेय पोषण आहार योजना अंतर्गत शासन निर्णयाप्रमाणे पटसंख्येनुसार प्रतिदिन विद्यार्थी उपस्थिती झाल्याच्या पटसंख्येनुसार अनुदानाचे वाटप केल्याबाबत संबंधित मुख्याध्यापकांचा अहवाल प्राप्त आहे.

२. अन्न शिजविण्यासाठी आवश्यक तांदुळ, दाळ, तेल, साखर इत्यादी बाबत प्राप्त साठा व दररोज प्रति विद्यार्थी अन्न वाटपाचे शाळास्तरावरील साठापंजी रजिस्टर प्राप्त आहे तसेच प्रति विद्यार्थी अन्नासाठी उपयोगात आलेल्या उपयोगात आलेल्या धान्यानुसार शालेय पोषण आहाराची मागणी केलेली आहे.

३. शाळा स्तरावरील पर्यवेक्षकीय यंत्रणांच्या भेटीमध्ये विद्यार्थ्यांना वेळापत्रकानुसार व ठरवून दिल्यानुसार आहार दिला जातो. याची वेळोवळी पडताळणी केल्या जाते. पर्यवेक्षकीय यंत्रणेचा पाहणी अहवाल उपलब्ध आहे.

४. शालेय पोषण आहारातंर्गत प्रमाणक क्र. ९८१,९८२,१०६३,१०६४,१०८९ सर्व देयके डिसेंबर, २०१० मध्ये पारित करण्यात आले असून एकच प्रमाणक क्र. १६५१ दि. ३१.३.११ ला पारित करण्यात आलेले आहे. सर्व उपप्रमाणके सन २०१०-११ मधीलच आहे.प्रत्यक्ष लाभ त्याच आर्थिक वर्षामध्ये देण्यात आलेला आहे.

**कोविड काळातील शालेय पोषण आहार वितरणाबाबत :**

मा.पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार कोविड काळात शालेय पोषण आहाराच्या वितरणाबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर.

उप सचिव महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे दिनांक २७ मार्च २०२० चे पत्राचे अनुषंगाने तसेच शिक्षण संचालक (प्राथ.) म.रा.पुणे यांचे समदिनांकाचे पत्र २७ मार्च २०२० नुसार शालेय पोषण आहार योजनेतर्गत ग्रामीण भागातील शाळास्तरावर शिल्लक असलेला तांदुळ व डाळी/कडधान्याचे विद्यार्थ्यांना वितरण करणेबाबत आदेश दिलेले आहेत. शाळास्तरावर शिल्लक असलेला तांदुळ व धान्यादी साठा विद्यार्थ्यांना/पालकांना टप्प्याने शाळेमध्ये बोलाविणे, एक मिटरचे अंतर राखुन सामाजिक अंतर ठेवणे तसेच विद्यार्थी आजारी असल्यास घरपोच देण्याचे नियोजन करणेबाबत निर्देश होते. तांदुळ, डाळी व कडधान्य वाटप करतेवेळी जिल्हाधिकारी यांनी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता घ्यावयाच्या खबरदारीबाबत दिलेले आदेश व सुचनांचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन होणार नाही याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले होते.

सदर काळात कडक लॉकडाऊन चालू असल्यामुळे शाळेत जावून विद्यार्थ्यांना वाटप करण्याकरिता मुख्याध्यांपकाना शाळेत जाता यावे म्हणून पोलीस प्रशासनाकडून संमती घेण्यात आली व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता घ्यावयाच्या खबरदारीबाबत दिलेले आदेश व सूचनांचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेऊन मुख्याध्यापकांनी शिल्लक धान्य रांगेत सामाजिक अंतर ठेवून उभे राहणे, प्रत्येकाने मास्कचा वापर करणे आणि वेळोवेळी सॅनिटायजरने हात स्वच्छ करणे या नियमाचे पालन करून धान्य वितरित करण्यात आले.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे अभिप्राय :-**

**मोफत गणवेश वाटप योजना :**

राज्य शासनाच्या १०३ विकास गटाकरिता इ. १ ली ते ४ थी च्या अनुसुचित जाती /जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता मोफत गणवेश व लेखनसाहित्य वाटप योजना सन १९७९ पासून राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत् पात्र विद्यार्थ्यासाठी एक गणवेश राज्य शासनाच्या निधीतून देण्यात येतो. तसेच समग्र शिक्षा अभियानातंर्गत मोफत गणवेश योजना ही शासकीय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इ. १ ली ते ८ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली, अनुसुचित जाती मुले, अनुसुचित जमाती मुले तसेच दारिद्रयरेषेखालील पालकांची मुले यांना लागू आहे. समग्र शिक्षा अभियाना अंतर्गत गणवेशासाठी राज्यातील ३६,०७,२९२ लाभार्थी विद्यार्थ्याकरिता प्रति गणवेश रु. समग्र शिक्षा अभियानांतर्गत गणवेशासाठी रु. ३००/- या दराने दोन गणवेश संचाकरिता रु. ६००/- प्रति विद्यार्थी याप्रमाणे तरतूद आहे. सदर योजनेचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीमार्फत पात्र विद्यार्थ्यांना देण्यात येतो.

**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे अभिप्राय :**

**शालेय पोषण आहार योजना**

राज्य व केंद्र शासनाच्या , स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानीत व अंशतः अनुदानीत शाळा या ठिकाणी इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे विद्यार्थी शालेय पोषण आहार योजनेचे लाभार्थी आहेत. सदर योजनेंतर्गत इ.१ ली ते ५ वी या प्राथमिक वर्गातील प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो. तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी या उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ७०० उष्मांक आणि २०० ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो. योजनेतर्गत केंद्र शासनाकडून प्रतिदिन प्रति विद्यार्थी प्राथमिक वर्गासाठी १०० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी १५० ग्रॅम तांदुळ पुरविण्यात येतो. शासन निर्णय दि.१९ जुलै २०१९ नुसार प्रति दिन प्रति लाभार्थी आहार खर्चाची विभागणी खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

**ग्रामीण भागातील आहार खर्चाची विभागणी**

**लाभार्थी :-**

१. प्राथमिक

(अ) अनुज्ञेय आहार खर्च रु. ४.४८/-

(ब) धान्यादी माल पुरविण्यासाठी खर्च रु. २.८२/-

(क) इंधन आणि भाजीपाला यासाठी लागणारा खर्च रु. १.६६/-

२. माध्यमिक

(अ) अनुज्ञेय आहार खर्च रु.६.७१/-

(ब) धान्यादी माल पुरविण्यासाठी खर्च रु. ४.२२/-

(क) इंधन आणि भाजीपाला यासाठी लागणारा खर्च रु.२.४९/-

सदर इंधन व भाजीपाला यासाठीची रक्कम थेट शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर वर्ग करण्यात येते. संबधित शाळा व्यवस्थापन समितीने केंद्र शासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार सदर निधी योजनेवर खर्च करणे अपेक्षीत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, शालेय पोषण आहार योजनेतील शिजवलेले अन्न देण्याकरिता अनुदान वाटप आणि प्रोत्साहन भत्ता यामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत चौकशी करण्यात आली आहे काय? पंचायती राज समितीने परिच्छेद क्र. ४.५४, परिच्छेद क्र.४.५७, परिच्छेद क्र.४.६०, परिच्छेद क्र.४.६१, परिच्छेद क्र.४.६२ बाबत चर्चा केली होती. या संदर्भात चौकशीचे आदेश देखील देण्यात आले होते. या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत याबाबत माहिती देण्याबाबत सूचना केली यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, परिच्छेद क्रमांक ४.५२ ते ४.६३ चौकशीमध्ये घेतलेले आहेत. त्यापैकी परिच्छेद क्रमांक ४.५२, परिच्छेद क्रमांक ४.५४, परिच्छेद क्रमांक ४.५७, परिच्छेद क्रमांक ४.६०, परिच्छेद क्रमांक ४.६१ व परिच्छेद क्रमांक ४.६२ हे गणवेश व उपस्थिती भत्त्याबाबत होते. परंतु, शालेय पोषण आहाराच्या परिच्छेदांसोबत ते एकत्रितपणे नमूद झालेले आहेत.

शालेय पोषण आहाराशी संबंधित परिच्छेद क्रमांक ४.५३, परिच्छेद क्रमांक ४.५५, परिच्छेद क्रमांक ४.५६, परिच्छेद क्रमांक ४.५८, परिच्छेद क्रमांक ४.५९, परिच्छेद क्रमांक ४.६३ बाबत चौकशी केलेली आहे. ऑडिटमध्ये जे मुद्दे होते त्या अनुषंगाने चौकशी करताना पटसंख्येनुसारची उपस्थिती व मुख्याध्यापकांचा अहवाल ही बाब तपासली होती. साठापंजी रजिस्टरनुसार नोंदी जुळतात का, हे पाहिले. त्यानंतर पर्यवेक्षकीय यंत्रणांचे अहवाल तपासले होते. दिलेला लाभ व अदा केलेली रक्कम याची शहानिशा करून तपासणी केली. त्या परिच्छेदामध्ये जे नमूद केले होते, त्यामध्ये अनियमितता आढळून आली. कारण त्यावेळेस तसे रेकॉर्ड सापडले यावर समितीने असे मत व्यक्त केले की, आपण प्रत्येक परिच्छेदाची सर्व माहिती दिलेली आहे. चौकशीसंबंधीची जी उत्तरे देण्यात आलेली आहेत, परिच्छेद खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. सभागृहाच्या पटलावर याबाबतचा अहवाल ठेवायचा म्हटल्यावर समितीला आपले म्हणणे रेकॉर्डवर घ्यावेच लागेल व त्या चौकशीवर विभागीय सचिव आपण समाधानी आहात काय अशी विचारणा केल्यावर विभागीय सचिव शालेय शिक्षण यांनी सर्व माहिती पाहिलेली व वाचलेली आहे असे समितीस विदित केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

यवतमाळ जिल्हा परिषदेचे सन २०१०-२०११ या वर्षाचे लेखापरिक्षण स्थानिक निधी लेखापरिक्षण संचालनालय कार्यालयाकडून करण्यात आले. यावेळी पंचायत स्तरावर पंचायत समित्यांकडून राबविण्यात येत असलेल्या शासनाच्या विविध योजनांच्या अभिलेख्यांची तपासणी लेखापरिक्षकांकडून करण्यात आली. त्यानुसार यवतमाळ जिल्ह्यात तालुकास्तरावर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करणे, शालेय पोषण आहार योजना, दुर्बल घटकातील विद्यार्थीनींना उपस्थिती भत्ता प्रदान करणे व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रोत्साहान भत्ता देणे इत्यादी योजनांची तपासणी लेखापरिक्षकांकडून करण्यात आली. लेखापरिक्षकांकडून तपासणींच्या अनुषंगाने या योजनांच्या कार्यपद्धतीमधील त्रृटींचे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. या लेखा आक्षेपासंदर्भात समितीस जिल्हा परिषद व ग्रामविकास विभागाकडून प्राप्त झालेली माहिती, मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांच्या साक्षीत प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समिती विषयनिहाय खालीलप्रमाणे शिफारशी करीत आहे.

**प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करणे.—**प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करणे योजनेअंतर्गत यवतमाळ पंचायत समितीकडून रु. ९,२०,२६९/-, महागांव पंचायत समितीकडून रु. ८,७७,४२५/-, मारेगाव पंचायत समितीकडून रु.९३,०४४/- व दिग्रस पंचायत समितीकडून रु. ५,३८,८००/- इतकी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत ग्राम शिक्षण समितीने कापड खरेदी व शिलाई करून लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करणे आवश्यक असताना यवतमाळ पंचायत समितीने रेडीमेड गणवेशाची खरेदी करून विद्यार्थ्यांना वितरित केले आहे. दिग्रस पंचायत समितीकडून ५५८ विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी रु. १,११,६००/- इतकी रक्कम दोनदा वितरित करण्यात आलेली आहे. या पंचायत समितीमध्ये लाभ दिलेले विद्यार्थी व लाभापासून वंचित राहीलेले विद्यार्थी या संबंधातील माहिती ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे गणवेशांसाठी करण्यात आलेल्या तरतुदीपेक्षा रु. १,०४,८००/- इतकी रक्कम जास्त खर्च करण्यात आलेली आहे. महागांव पंचायत समितीकडून प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना महिला बचत गटांऐवजी स्थानिक शिंप्याकडून गणवेश शिलाई करून घेण्यात आले आहे. मारेगाव पंचायत समितीकडून सन २०१०-२०११ चे अनुदान माहे मार्च, २०११ मध्ये खर्ची करण्यात आलेले असून सदरहू अनुदान शाळेच्या खात्यावर माहे मे व जून, २०११ मध्ये जमा झाले असल्याने या अनुदानातून लाभ देण्यात आलेला नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे सन २०१०-२०११ या वर्षामध्ये विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहिले आहेत. या पंचायत समित्यांमध्ये अल्पसंख्याक लाभार्थी विद्यार्थीबाबत विवरणपत्र तपासणीसाठी उपलब्ध न झाल्याने अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची एकूण संख्या व वाटप झालेल्या गणवेशाची एकूण संख्या याबाबतची पडताळणी करता आली नाही. गणवेश अनुदान मागणीचे अभिलेखे, उपप्रमाणके साठानोंदी, गणवेश वाटपासंदर्भातील पोचपावत्या, विद्यार्थ्यांची मापे घेण्यात आलेला नस्त्या, सदर गणवेशपात्र व मंजूर लाभार्थी वापरत असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र, खर्च अहवालासह नस्त्या इत्यादी संदर्भातील शाळास्तरावर अभिलेखे पुर्णतः उपलब्ध न झाल्याने शासन आदेशान्वये व वित्तीय औचीत्याचे पालन करून नियमानुसार खर्च करण्यात आला आहे काय, याबाबत तपासणी करता आली नाही.

**शालेय पोषण आहार योजना.—**दिग्रस पंचायत समितीस शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत रु.६९,६२,३९६/- इतक्या प्राप्त झालेल्या अनुदानाच्या रकमेतून रु.१८,२५,००५/- शाळांना वितरित केली आहे. शालेय पोषण आहार योजना राबविताना शाळास्तरावर दिनांक ३० सप्टेंबरच्या पटसंख्येनुसार अनुदान वितरित केल्याबाबत देयकाचे तसा तपशील नाही. तसेच शाळांना त्यांच्या मागणीप्रमाणे अनुदान वितरित केल्याबाबत मुख्याध्यापकांचे मागणी पत्र आढळून आले नाही. त्यामुळे पटसंख्या व मागणीनुसार अनुदान वितरित केल्याची सत्यता पडताळता आली नाही. या पंचायत समिती अंतर्गतच्या मुख्याध्यापकांचे खर्चाचे अहवाल लेखा परिक्षणात तपासणी करिता उपलब्ध झाले नाहीत. कळंब पंचायत समिती अंतर्गत शाळांना रु.४,०८,४८१/- अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. तेथील बँकेकडे पाठविण्यात आलेल्या व देयकासोबत जोडण्यात आलेल्या शेड्यूलवर शाळेचे खाते क्रमांक नमूद नसताना सदरील रक्कम बँकेकडे पाठविण्यात आलेले असून अन्न शिजविण्याचे मानधन व किराणा साहित्य खरेदीचे प्रदान धनादेशाऐवजी रोखीने केले आहेत. शाळानिहाय मुख्याध्यापकांचे पटसंख्येचे अहवाल व विस्तार अधिकारी (शिक्षण) यांनी नियमित शाळेला भेटी देऊन मार्गदर्शन केल्याबाबत शेरेबुक लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही. महागाव पंचायत समितीकडून शालेय पोषण आहार योजनेतंर्गत रु.१४,९५,०४१/- इतकी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. अन्न शिजविण्यासाठी आवश्यक तांदुळ, डाळ, तेल, साखर इत्यादीबाबत पावत्या प्राप्त केल्या नाहीत त्यामुळे दर दिवशी प्रती विद्यार्थी उपयोगात आलेल्या धान्यानुसार पोषण आहाराची मागणी करून त्यानुसार पंचायत समितीने अनुदानाची रक्कम प्रदान केल्याची खात्री करता आली नसून प्रतिदिन विद्यार्थी उपस्थित असल्याच्या संख्येनुसार अन्नाचे वाटप केल्याबाबत संबधित मुख्याध्यापकांचा अहवाल प्राप्त झाला नाही. राळेगाव पंचायत समितीकडून रु.१८,३५,३३०/- इतकी रक्कम वितरित केली आहे. गट शिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी (शिक्षण) यांचे मार्गदर्शन अहवालासह उपलब्ध नसून खर्चाचे अहवाल विहित मुदतीत सादर केले नाही व अखर्चीत अनुदान परत केल्याचे आढळून येत नाहीत. मारेगाव पंचायत समितीकडून रु.२१,७६,२४२/- इतकी रक्कम शाळास्तरावर खर्च करण्यात आलेली आहे. शालेय पोषण आहाराकरिता आवश्यक असलेले तांदूळ व इतर पुरक पदार्थ यांचा हिशेब

विहित केलेल्या प्रपत्रात पंचायत समितीच्या लेखा शाखेमध्ये मागणी योग्य असल्याचे तपासणी करून देयके सादर करून व संवितरण अधिकाऱ्यांकडून मंजूर करून घेणे आवश्यक होते परंतु या प्रमाणे कार्यवाही केली नसल्याचे आढळून आले. पंचायती समिती स्तरावर रक्कम प्रदान संबंधित खर्च उपप्रमाणके रक्कम मिळण्याबाबत संबंधित पोचपावत्या, अन्न शिजवून देणाऱ्यास देय असलेल्या रकमेबाबत मुलांचे उपस्थिती हजेरीपट व त्यानुषंगाने अनुज्ञेय रकमेचे हिशेब तसेच अन्न शिजवण्यासंबंधी लागणारे इतर पुरक पदार्थ खरेदीसंबंधात उप प्रमाणके शाळास्तरावरच ठेवली जात असल्याने एकूण शाळेच्या १० ते १५ टक्के शाळेच्या अभिलेख्याची तपासणी करता आली नाही. अन्न शिजवून देण्यासाठी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी ५० पैसे याप्रमाणे ग्रामशिक्षण समितीला अनुदान देणे आवश्यक असताना नियमबाह्यरित्या शाळांना वेगवेगळया प्रमाणकाद्वारे ५० पैसे व्यतिरिक्त उर्वरित रक्कम रुपये १.५८/- व रुपये २.१० प्रतिविद्यार्थ्यांप्रमाणे सुद्धा शाळास्तरावर रक्कम प्रदान केली आहे आदेशाप्रमाणे फक्त ५० पैसे प्रमाणे रक्कम प्रदान करणे अनुज्ञेय असल्याचे दिसून येत नाही. गावपातळीवर जास्तीत जास्त रोजगार निर्माण होऊन आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी महिला बचत गट किंवा महिला मंडळ यांना अन्न शिजवण्याचे काम देणे अनिवार्य केले आहे. ते न मिळाल्यास गावातील विधवा, मागासवर्गीय गरजू महिलांची प्राधान्याने नियुक्ती करून त्यांचे मार्फत अन्न शिजवून घेणे अनिवार्य केले आहे. परंतु वरील प्रमाणे नियुक्तीची कार्यवाही टाळण्याकरिता कोणत्याही बचत गटाचे नाव दर्शवून त्यांचा सदस्य किंवा बचत गट असल्याचे नोंदवून साध्या पावतीवर रक्कम मिळाल्याबाबत पोचपावती घेतल्या गेल्या. त्यामुळे शासनाचा बचतगटांना रोजगार उपलब्ध करून देणे व ग्रामीण भागाचा विकास व्हावा हा उद्देश सफल झाला नाही.

तसेच खाजगी शाळा यांचेसुद्धा पंचायती समितीमार्फत रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. पुरक पोषण आहार संबंधित केलेल्या प्रदान रकमेबाबत सर्व शाळांकडून अनुदान विनियोग व उपयोगात असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त होणे आवश्यक आहे.

**दुर्बल घटकातील विद्यार्थीनींच्या उपस्थिती भत्त्यांबाबत.—**दुर्बल घटकातील विद्यार्थीनींना सन २०१०-२०११ या वर्षामध्ये रु. १३,७४,८१४/- इतका उपस्थिती भत्ता प्रदान केला आहे. संबधित विद्यार्थ्यांनी अनुसुचित जाती/जमाती, भटक्या जाती व विमुक्त जमातीमधील तसेच विशेष मागास प्रवर्गातील असल्याबाबत तसेच दारिद्रय रेषेखालील असल्याचे दाखले सादर केलेले निदर्शनास आले नाहीत. संबधित शाळांचे मुख्याध्यापक यांनी उपस्थिती भत्ता प्रदान केल्याचे पृष्ठार्थ गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती महागाव यांना उपयोगिता प्रमाणपत्र व लाभार्थी विद्यार्थीनींचे उपस्थिती बाबतचे प्रमाणपत्र नस्तीसोबत संलग्नित केलेले आढळून आले नाही. तसेच शाळेच्या संबधित मुख्याध्यापकांनी संबधित पात्र व गरजु मुलींना ग्राम शिक्षण समिती समोर उपस्थिती भत्ता वाटप केल्याबाबत व रक्कम मिळाल्याबाबत विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या नोंदवहया लेखापरिक्षणास सादर केले नाहीत.

**अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या पालकांना देण्यात येत असलेला प्रोत्साहन भत्त्यांबाबत.—**पंचायत समिती स्तरावरून अल्पसंख्याक विद्यार्थी असलेल्या शाळांना रु. २,७०,८४८/- अनुदान वितरित करण्यात आले आहे. पंचायत समिती आर्णी शिक्षण विभाग यांनी अनुदान वाटप केलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांकडून विद्यार्थी ७५% उपस्थित असण्याबाबत अहवाल प्रत्यक्षात एकुण विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन ते किती दिवस उपस्थित होते. यांचे नियोजन करून हे विद्यार्थी शैक्षणिक वर्षात उपस्थित असल्याबाबत दिवसाला २ ने परिगणित करून येणाऱ्या रक्कमेनुसार वितरण केलेले नसून केवळ खर्ची घालण्याच्या दृष्टीने वितरित करण्यात आला आहे. त्यामुळे शाळास्तरावरील विद्यार्थ्यांना उपस्थितीनुसार अनुदान वितरित झाले नाही. त्यामुळे शाळा निहाय अनुदान रक्कम शिल्लक असल्याचे स्पष्ट झाले आहे. तरी शाळानिहाय आढावा घेऊन शिल्लक असलेली अनुदानाची रक्कम शासन खाती जमा करण्यात यावी.

दि. ३१/८/२००९ चे शासन निर्णय नुसार परीच्छेद क्र. २ राज्य शासनाचे शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या व केंद्र शासनाच्या स्वतः विद्यमान योजनेच्या माध्यमातून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहन उपस्थिती भत्ता शासनाच्या प्राप्त अनूदानातून पंचायत समिती स्तरावर शाळानिहाय लाभ देण्यात येतो. परंतु एका शाळेतील विद्यार्थ्यांना दुहेरी लाभ देण्यात आला नसल्याने आवश्यक अभिलेख्याअभावी पडताळणी करता आली नाही.

**प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप योजनेंतर्गत ग्राम शिक्षण समितीने कापड खरेदी व शिलाई करून लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करणे आवश्यक असताना यवतमाळ पंचायत समितीने रेडीमेड गणवेशाची खरेदी करून विद्यार्थ्यांना वितरित केले आहे. गणवेश वाटपामधून महिला बचत गटांना रोजगार मिळणे अपेक्षित होते. परंतु सदर उद्देश साध्य न झाल्यामुळे आक्षेप घेण्यात आलेला आहे. यामध्ये गणवेशांचे दर अतिशय अत्यल्प होते. दर अत्यल्प असल्यामुळे कापड खरेदी करून गणवेश शिवणे शक्य नव्हते त्यामुळे ज्यांनी या दरात पुरवठा केला त्यांच्याकडूनच खरेदी करण्यात आली मिळालेल्या माहितीवरून समितीने समाधान व्यक्त केले. तसेच ग्रामीण भागात व आजूबाजूच्या परिसरात सर्वच ठिकाणी महिला शिलाई बचत गट स्थापन नसल्यामुळे स्थानिक शिंप्याकडून गणवेश शिलाई करून घेतले आहे यावर समिती अशी शिफारस करीत आहे**

की, प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने जिल्ह्यात ज्या ठिकाणी बचत गटाची स्थापना करण्यात आली नाही अशा ठिकाणी महिला शिलाई बचत गट स्थापन करण्याकरिता प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

शालेय पोषण आहार योजना राबविताना शाळास्तरावर अन्न शिजविण्याकरिता महिला बचत गट/स्वयंसेवा संस्था/परित्यक्त्या/गरजू महिलांना शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करार पद्धतीवर अन्न शिजवून वाटप करण्याचे काम दिले जाते ते अनिवार्य केले आहे परंतु वरील प्रमाणे नियुक्तीची कार्यवाही टाळण्याकरिता कोणत्याही बचत गटाचे नाव दर्शवून त्यांचा सदस्य किंवा बचत गट असल्याचे नोंदवून साध्या पावतीवर रक्कम मिळल्याबाबत पोचपावती घेतल्या गेल्या त्यामुळे शासनाचा बचत गटांना रोजगार उपलब्ध करून देणे व ग्रामीण भागाचा विकास व्हावा हा उद्देश सफल झाला नाही त्यामुळे उक्त प्रकरणांची चौकशी करून त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात देण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद,यवतमाळ

## जिल्हा परिषद यवतमाळ येथील ग्रामपंचायतीच्या अपहार प्रकरणांबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.२८ (सन २०१६-१७) :**

१. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक डीईएन २००६/प्र.क्र.७७१/आस्था-१२ दिनांक २८-०९-२००६ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक असतांना कार्यवाही न केल्यामुळे ग्रामपंचायतीची १४४७ चौकशी न केलेल्या अपहाराच्या प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ३६.७० कोटी गुंतवणुक पडलेली आहे तसेच २,४८१ चौकशी केलेल्या प्रकरणांमध्ये रक्कम रु.७.०० कोटी वसूल करावयाची आहे.

२. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०९६/ प्र.क्र.११५/२१-अ दिनांक २७-०६-१९९६ अन्वये प्रत्येक महिन्यात अंतर्गत तपासणीकरिता ग्रामपंचायती संख्या निश्चित केलेली असतांना सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी न केल्यामुळे ग्रामपंचायतीच्या अपहार प्रकरणात वाढ झालेली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भातं समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाचे अनुपालन खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. ग्रामपंचायतीत एकूण १४४७ प्रकरणात चौकशी न केलेल्या अपहाराच्या प्रकरणाबाबतचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. (१) | मागील प्रकरणांची संख्या (२) | गुंतलेली रक्कम (३) | चौकशी झालेली प्रकरण संख्या (४) | गुंतलेली रक्कम (५) |
|---|---|---|---|---|
| १. | १४४७ | ३६,७०,४५,३९६ | ६५३ | ४,७४,४६,७०४ |

| समायोजित रक्कम (६) | वसूलपात्र रक्कम (७) | वसूल झालेली रक्कम (८) | वसूल न झालेली रक्कम (९) | चौकशीकरिता प्रलंबित प्रकरणे (१०) |
|---|---|---|---|---|
| ३,८८,६२,३१२ | ८५,८४,३९२ | १३,०१,२१० | ७२,८३,१८२ | ७९४ |

२. ग्राम पंचायतीत एकूण २४८१ प्रकरणात चौकशी केलेल्या अपाहारच्या प्रकरणाबाबतचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. (१) | चौकशी करण्यात आलेली प्रकरणे (२) | वसूलपात्र रक्कम (३) | वसूल झालेली रक्कम (४) | वसुलीकरिता शिल्लक रक्कम (५) |
|---|---|---|---|---|
| १ | २४८१ | ७,००,१३,८९९ | २,८४,५५,१३१ | ४,१५,५८,७६८ |

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

ग्रामपंचायतीच्या अपहार प्रकरणांसंबंधी समितीने विचारणा केली की, २ हजार ४८१ प्रकरणांमध्ये सुमारे ७ कोटी रुपये रकमेची वसुली करायची आहे. याची सद्यस्थिती काय आहे, अपहार प्रकरणांतील किती चौकशी प्रलंबित आहेत, किती व्यक्तींवर कारवाई करण्यात आली, त्यापैकी किती जणांवर फौजदारी कारवाई करण्यात आली त्याबाबतची माहिती द्यावी. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, चौकशी न केलेली एकूण १४४७ प्रकरणे होती. तसेच त्यामध्ये गुंतलेली रक्कम ३६ कोटी ७० लाख ४५ हजार ३९६ रुपये

एवढी होती. त्यापैकी ९३६ प्रकरणांची आम्ही चौकशी केली आहे. त्यामध्ये २५ कोटी ४७ लाख ११ हजार ८८७ रुपये एवढी रक्कम गुंतलेली होती. चौकशीअंती समायोजित झालेली रक्कम १६ कोटी २४ लाख १२ हजार १६ रुपये एवढी आहे. आता वसुलपात्र रक्कम ८ कोटी १२ लाख २५ हजार ६१३ रुपये एवढी आहे. आज रोजी ५१३ प्रकरणे प्रलंबित असून त्यामध्ये ९ कोटी ७५ लाख ९८ हजार २२९ रुपये रक्कम गुंतलेली आहे. वसुलीबाबत आमचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. उर्वरित वसुलीसाठी आम्हाला दोन महिन्यांची संधी दिली तर बहुतेक प्रकरणांबाबतची कार्यवाही पूर्ण होईल. यावर समितीने खुलाश्याच्या अनुषंगाने विचारणा केली की, या प्रकरणांमध्ये प्रामुख्याने कोण दोषी आहेत ? तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ग्रामसेवक, सरपंच यांच्यासह काही जण यामध्ये दोषी आहेत. त्यांच्यातील काही जणांना ताकीद देणे, ठपका ठेवणे, नोकरीतून बडतर्फ करणे अशा कारवाया केलेल्या आहेत. तसेच ज्या प्रकरणात ही प्रकरणे सन २०१६-१७ मधील आहेत व आता सन २०२१ सुरू आहे. अनियमितता झाल्याचे सिद्ध झालेले असेल तर किती दिवस आपण वाट पाहणार आहोत ? भ्रष्टाचार झाला असेल तर ताबडतोब वसुली करतो. जर विहित मुदतीत वसुली झाली नाही तर संबंधितावर विभागीय चौकशी प्रस्तावित केली जाते. विभागीय चौकशीमध्ये जर ५० हजार रुपयांच्या वर अपहार केल्याचे सिद्ध झाले तर त्याच्यावर एफआयआर दाखल केला जातो. आतापर्यंत आपण किती जणांवर एफआयआर दाखल केले आहेत ?

यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस उर्वरित प्रकरणे निकाली काढण्याबाबत पुरेपुर प्रयत्न करण्याबाबत आश्वासन देऊन विदित केले की, जुन्यात जुने प्रकरण सन २००४ मधील आहे. अशी एक-दोन प्रकरणे आहेत. इतर सर्व प्रकरणे अलीकडच्या काळातील आहेत.

समितीस मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, एकूण प्रकरणे, निकाली काढण्यात आलेली प्रकरणे व त्यामध्ये गुंतलेली रक्कम आणि वसूल केलेली रक्कम याबाबतची सांगितलेली आकडेवारी आणि अनुपालन अहवालातील आकडेवारीमध्ये तफावत दिसून येत आहे. संबंधित लोकांनी शासनाच्या पैशांचा अपहार केलेला आहे, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कारवाई वेळेत झालीच पाहिजे. एफआयआर दाखल करणे हा नंतरचा विषय असला तरी त्यापूर्वी लवकरात लवकर संबंधितांकडून वसुली करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

अगोदर वसुली करण्याचाच प्रयत्न असतो. वसुली झाली नाही तर विभागीय चौकशी प्रस्तावित करतो. त्यामध्ये ५० हजारांपेक्षा जास्त रकमेचा अपहार केल्याचे सिद्ध झाले तर एफआयआर दाखल केला जातो.

यावर समितीने विचारणा केली की, यामध्ये सर्वात जुने प्रकरण सन २००४ मधील आहे. म्हणजे सुमारे १७ वर्षांपासून हे प्रकरण प्रलंबित आहे. एवढया कालावधीत निकाली न निघालेली प्रकरणे दोन महिन्यांमध्ये निकाली काढणे कसे शक्य आहे ? त्यातून जे कर्मचारी मृत आहेत त्यांच्याबाबत आपण काहीच करु शकत नाहीत. त्यामुळे अशा प्रकरणांची देखील शॉर्ट लिस्ट तयार केली पाहिजे. आपण या कामासाठी हवे तर तीन महिन्यांचा कालावधी घ्या परंतु प्रकरणे मात्र निकाली निघाली पाहिजेत. अन्यथा, आपण बदलीने इतर ठिकाणी जाऊन आपल्या जागी दुसरे अधिकारी आले की हे काम आहे तेथेच राहते. तसेच समितीच्या माहितीप्रमाणे सन १९८९-९० पासूनची देखील काही प्रकरणे आपल्याकडे प्रलंबित आहेत. तसेच चौकशीकरिता प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या ७९४ एवढी दाखविलेली असली तरी तशी ७७९ प्रकरणे आहेत.

यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आपण उल्लेख केलेली जुनी प्रकरणे निकाली निघालेली आहेत. तरी माहिती तपासून पाहतो. असे समितीस आश्वासन दिले.

तदनंतर समितीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, अनियमितता झालेल्या प्रकरणांची वर्षनिहाय यादी उपलब्ध आहे का ? असल्यास समितीस सादर करावी.

यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पंचायत समिती व वर्षनिहाय प्रकरणांची यादी तयार केलेली आहे. सदर यादी मी समितीस सादर करतो.

यावर समितीने विचारणा केली की, यामध्ये दोषी आढळून आलेल्यांवर काय कारवाया करण्यात आल्या आहेत ? यामध्ये आयुक्त कार्यालयाची काय भूमिका आहे ? कारण आयुक्त कार्यालय जिल्हा परिषदेतील प्रकरणांबाबत कोणताही निर्णय घेत नसल्यामुळे तीस-तीस वर्षांपासूनची प्रकरणे प्रलंबित आहेत. आयुक्त कार्यालयामार्फत दरवर्षी जिल्हा परिषदेचे ऑडिट केले जाते का ? ताकीद देणे, ठपका ठेवणे, बडतर्फ करणे, गुन्हा दाखल करणे, इत्यादी प्रकारच्या कारवायांचा समावेश आहे.

यानंतर उपायुक्त यांनी समितीला खुलासा केला की, सहायक आयुक्त (निरीक्षण) यांचेमार्फत निरीक्षण तपासणी केली जाते.

यावर समितीने विचारणा केली की, आपल्या निरीक्षण अहवालामध्ये या मुद्यांचा समावेश आहे का ? एकदा आपण तपासून पाहावे. जर आपल्या निरीक्षण अहवालामध्ये या बाबी आल्या असत्या तर त्या आतापर्यंत क्लिअर व्हायला हव्या होत्या. पुढे समितीने उपायुक्तांच्या असेही निदर्शनास आणून दिले की, याचा अर्थ असा होतो की, जिल्हा परिषद व आयुक्त कार्यालयामध्ये समन्वय नाही. त्याच कारणाने शेकडो प्रकरणे प्रलंबित आहेत.

यावर उपायुक्त यांनी समितीला सदर बाब तपासून पाहण्याबाबत आश्वासन देऊन विदित केले की, माननीय आयुक्त हे प्रत्येक महिन्याला विभागातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा आढावा घेत असतात. पुढे त्यांनी सन २०१६-१७ रोजीचा आयुक्त कार्यालयाचा निरीक्षण अहवाल आमच्या निरीक्षण टिपणीनुसार यवतमाळ जिल्हा परिषदेची ३०९ व विविध पंचायत समित्यांची २९५ प्रकरणे प्रलंबित आहेत. अशी माहिती दिली. यावर समितीने पुढीलप्रमाणे निदर्शनास आणून दिले की, आपल्या निरीक्षण अहवालानुसार सुमारे ६०० प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिसत आहे. परंतु लेखापरिक्षण अहवालामध्ये १४४७ प्रकरणे आहेत. याचा अर्थ असा होतो की, लेखापरिक्षण, आयुक्त कार्यालय व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांच्यामध्ये समन्वय नाही.

यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, निरीक्षण टिपणीमध्ये या अपहारांच्या प्रकरणांचा समावेश होत नाही. त्यांचे मुद्दे वेगळे असतात. मिळालेल्या खुलाशावरून समितीने उपायुक्तांना विचारणा केली की, आयुक्त कार्यालयाच्या निरीक्षणामध्ये या बाबी आल्याच पाहिजेत. कारण मुख्य मुद्दा आर्थिक निरीक्षणाचाच आहे. यावर उपायुक्तांनी समितीला विदित केले की, वेगळी टीम असते. लोकल फंडचे ऑडिटर सदर ऑडिट करतात. आयुक्त कार्यालयामार्फत सदर कार्यवाही होत नाही.

समितीचा आक्षेप तोच आहे की, आयुक्त कार्यालय लेखापरिक्षणातील परिच्छेदांचा निरीक्षण अहवालामध्ये समावेश करीत नाही त्यामुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी सदर प्रकरणे निकाली काढत नाहीत. ते पंचायती राज समिती येण्याची वाट पाहत बसतात.

समितीचे असे मत आहे की, आयुक्त कार्यालय हे जिल्हा परिषदेचे व्यवस्थित सुपरव्हिजन करीत नसल्यामुळे एवढी प्रकरणे प्रलंबित आहेत. आयुक्त कार्यालयाने त्यांच्या निरीक्षण अहवालामध्ये लेखापरिक्षणातील परिच्छेद समाविष्ट केले पाहिजेत. यामध्ये आयुक्त कार्यालयाची भूमिका महत्त्वाची असते. आयुक्त कार्यालयाने वेळोवेळी लक्ष घालून प्रकरणांचा निपटारा करण्याबाबत कार्यवाही केली पाहिजे. शासनाच्या पैशांचा अपहार करून लोक बिनधास्त फिरत असतील तर याबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. हा केवळ या जिल्हा परिषदेचा विषय नाही. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचा विचार केला तर ही रक्कम खूप मोठी आहे. वर्षानुवर्षे या सर्व गोष्टी चालत आलेल्या आहेत. त्यामुळे ग्रामविकास विभागाचे सचिव व संचालक, स्थानिक निधी लेखा यांची एकत्रित साक्ष घेऊन यावर तोडगा काढण्याबाबत चर्चा करु.

**सदर परिच्छेदाच्या अनुषंगाने साक्ष आयोजित करण्यात येईल. समितीने विचारणा केली की, प्रकरणे निकाली काढण्याचा अधिकार कोणाला आहे? यावर उर्वरित प्रकरणे किती दिवसांमध्ये निकाली निघतील? माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावरच प्रकरणे निकाली काढली जातात. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, समितीला दोन महिन्यांचा कालावधी मागितला होता. परंतु समितीने तीन महिन्यांचा कालावधी देतो, असे सांगितले आहे. त्यामुळे आम्ही उर्वरित प्रकरणे तीन महिन्यांमध्ये निकाली काढू.**

**यावर समितीने पुढीलप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढीलप्रमाणे निदेश दिले की, सदर परिच्छेदातील संपूर्ण प्रकरणांचा आढावा घ्यावा. प्रलंबित प्रकरणांमध्ये वसुली झाली नसल्यास ती तातडीने करून फौजदारी कारवाई करण्याचे निश्चित करावे. ज्या प्रकरणांत दोषसिद्धी झाली आहे त्यामध्ये तातडीने प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करावी. अपहारातील रक्कम नियमाप्रमाणे वसूल करावी. याबाबत वसुलीचा तसेच एकूण संपूर्ण प्रकरणांचा आढावा घेऊन, त्याची चौकशी करून त्याबाबत समितीला लेखी स्वरुपात अहवाल पाठवावा. याबाबत समिती संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेईल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अहवाल पाठविण्याबाबत संमती दर्शविली.**

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :-**

ग्रामपंचायतीतील चौकशी न केलेल्या व समितीने दिलेल्या निर्देशानुसार ५१३ प्रलंबीत प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :-**

पंचायती राज समितीचे भेटीचे वेळी

प्रलंबीत प्रकरणांची संख्या :- ५१३/-

चौकशी झालेली प्रकरणांची संख्या :- १७३/-

गुंतलेली रक्कम :-२४९१५४३४/-

समायोजीत रक्कम :-१२९०४४७०/-

वसुलपात्र रक्कमः-१२०१०९६४/-

वसुली झालेली रक्कमः- ४२२०३०५/-

वसुली करिता शिल्लक रक्कमः- ७७९०६५९/-

चौकशी करिता शिल्लक प्रकरणे :- ३४०/-

आक्षेपीत रक्कम :- ४०७०८५४१/-

अफरातफर प्रकरणात प्रलंबीत ५१३ प्रकरणांपैकी १७३ प्रकरणांची चौकशी पूर्ण करण्यात आलेली असून ३४० प्रकरणे निकाली काढण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. ३४० प्रकरणात सेवानिवृत्त झालेले ग्रामविकास अधिकारी ग्रामसेवक मयत असल्यामुळे काही ग्रामसेवकांवर विभागीय चौकशी तसेच फौजदारी गुन्हे दाखल असल्यामुळे प्रकरणी कार्यवाही करण्यास कालावधी लागत आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**ग्रामविकास विभाग यांचे अभिप्राय :-** मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय आयुक्त हे सक्षम प्राधिकारी आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस विभागीय सचिव यांनी माहिती दिली की, ग्रामपंचायतीतील चौकशी न केलेल्या व समितीने दिलेल्या निर्देशानुसार ५१३ प्रलंबित प्रकरणांची सद्यःस्थिती काय आहे, अपहार प्रकरणातील किती रक्कम सद्यःस्थितीत प्रलंबित आहे, ती वसूल केली आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत? ज्या प्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत, अशी किती प्रकरणे आहेत, त्याबाबतची माहिती सांगावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला की, समितीने भेट दिल्यानंतर १७३ प्रकरणांमध्ये जबाबदारी निश्चित करून साधारणतः ४२ लाख, २० हजार, ३०५ रुपये एवढी रक्कम वसूल केली आहे. ३४० प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी साधारणतः १७० प्रकरणांमध्ये न्यायप्रविष्ट असणे किंवा ग्रामसेवकांचा मृत्यू झालेला असणे अशी विविध कारणे आहेत. उर्वरित प्रकरणांवर कारवाई सुरू आहे. यावर समितीने विचारणा केली की, काही वसुली करणे बाकी आहे किंवा जी वसुली केली जात आहे ती वेतन किंवा अन्य बाबींवर बोजा चढवून केली जात आहे काय? तसेच आपल्याला संबंधितांचे सहकार्य मिळत नाही, अशी किती प्रकरणे आहेत? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, प्रकरणपरत्वे कारवाई केली जाते, ४२ लाख रुपयांची वसुली झालेली आहे. ३४० प्रकरणांपैकी १७० प्रकरणे अशी आहेत की, त्यामध्ये न्यायप्रविष्ट असणे किंवा ग्रामसेवकांचा मृत्यू झालेला असणे, अशी कारणे आहेत.

यावर समितीने पुढीलप्रमाणे प्रश्न उपस्थित केला की, न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये स्टे दिलेला आहे काय, न्यायालयातील केसेसचा स्टेटस काय आहे, न्यायालयाने त्या प्रक्रियेला स्टे दिलेला आहे काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, त्या प्रकरणांमध्ये एफ.आय.आर. दाखल झाला असेल किंवा आपल्या विभागाकडूनच एफ.आय.आर. दाखल झाला असेल किंवा ग्रामसेवक किंवा संबंधितांचे

निधन झाले असेल तर अशी प्रकरणे प्रलंबित आहेत. ज्या प्रकरणांमध्ये निकाल लावू शकतो अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून आम्ही निकाल करतो किंवा न्यायालयाच्या आदेशाची वाट पाहतो जेणेकरून आपल्या व न्यायालयाच्या आदेशांमध्ये विसंगती येऊ नये. यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढीलप्रमाणे सूचना केली की, न्यायालयाचे आदेश पाहून आपली वसुली कशी करता येईल ते पहावे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारात्मक संमती दर्शवली.

**अभिप्राय व शिफारशी :**

जिल्हा परिषदेने शासन निर्णयानुसार अपहारांच्या प्रकरणांबाबत कार्यवाही करणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही न केल्यामुळे ग्रामपंचायतींच्या अपहार प्रकरणात वाढ झालेली असून ग्रामपंचायतीची १४४७ चौकशी न केलेल्या अपहाराच्या प्रकरणांमध्ये रु. ३६,७०,४५,३९६/- (रूपये छत्तीस कोटी सत्तर लाख पंचेचाळीस हजार तीनशे शहाण्णव फक्त) इतकी रक्कम गुंतलेली आहे तसेच २४८१ चौकशी केलेल्या प्रकरणांमध्ये रु. ७,००,१३,८९९/- (रुपये सात कोटी तेरा हजार आठशे नव्याण्णव) इतकी रक्कम वसूल करावयाची आहे. यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या अपहार प्रकरणांची चौकशी न झालेल्या प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम व चौकशी झालेल्या प्रकरणांमध्ये वसूल करावयाची रक्कम मोठ्या प्रमाणात असल्याने या सर्व प्रकरणांचा आढावा घेऊन अपहारातील रक्कम नियमाप्रमाणे वसूल करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करून याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने सादर केलेली माहिती, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या घेण्यात आलेल्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, चौकशी न झालेल्या एकूण १४४७ प्रकरणांमधील ९३६ प्रकरणांची चौकशी पूर्ण केली आहे. चौकशीअंती समायोजित झालेली रक्कम रु. १६ कोटी २४ लाख १२ हजार १६ रूपये एवढी असून वसुलपात्र रक्कम ८ कोटी १२ लाख २५ हजार ६१३ रूपये एवढी आहे. अपहारांची एकूण ५१३ प्रकरणे प्रलंबित असून त्यामध्ये रु. ९ कोटी ७५ लाख ९८ हजार २२९ रूपये रक्कम गुंतलेली आहे.

उर्वरित अपहारांच्या प्रकरणांवर कारवाई होऊन गुंतलेली रक्कम वसूल करण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही होण्यासाठी घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, समितीने यवतमाळ जिल्ह्यास भेट दिल्यानंतर उर्वरित ५१३ अपहारांच्या प्रकरणांमधील १७३ प्रकरणांची चौकशी पूर्ण केलेली असून केलेल्या कारवाईत एकूण ४२ लाख २० हजार ३०५ रूपये एवढी रक्कम वसूल केलेली आहे. आता एकूण ३४० अपहारांची प्रकरणे प्रलंबित असून साधारणतः १७० प्रकरणांमध्ये न्यायप्रविष्ठ असणे किंवा ग्रामसेवकाचा मृत्यु झालेला असणे यासह विविध कारणे आहेत. उर्वरित अपहारांच्या प्रकरणांमधील रक्कम वसूल करण्याची कारवाई सुरू आहे.

पंचायती राज समितीने राज्यातील अनेक जिल्ह्यांना भेट दिली असता समितीच्या निदर्शनास आले की, अनेक जिल्ह्यात योजना राबविताना मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झालेला असून या प्रकरणांची विहित वेळेत चौकशी पूर्ण करून कारवाई न केल्याने या अपहारांमध्ये शासनाची मोठ्या प्रमाणात रक्कम गुंतलेली आहे. अपहारांच्या प्रकरणांमध्ये शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता, गट विकास अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांची देखील चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक असताना फक्त कनिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांची चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात येते, अपहारांच्या प्रकरणांमध्ये गुंतलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर सेवानिवृत्तीनंतर चार वर्षाच्या आत कारवाई पूर्ण करणे आवश्यक असताना सेवानिवृत्त होईपर्यंत या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून दंडात्मक रक्कम वसूल करण्यात येत नाही, तसेच अनियमिततेतील रक्कम वसूल करणे शिल्लक असतानाही निवृत्त होताना दोषी असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना "ना-देय प्रमाणपत्र" देण्यात येते. अपहरणांमध्ये गुंतलेली रक्कम एक रकमी अथवा व्याजासह वसूल करणे आवश्यक असताना सदरहू रक्कम हप्ते पाडून वसूल करण्यात येत असल्याने उशिराने ५ ते १० वर्षात रक्कम वसूल करण्यात येते. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ अंतर्गत विभागीय चौकशी करून कारवाई करण्याची कार्यपद्धती विहित केलेली असतानाही विभागीय चौकशी वेळेत पूर्ण करण्यात येत नाही. तसेच अपहारांची काही प्रकरणे वर्षानुवर्ष न्यायालयीन प्रक्रियेमध्ये राहत असल्याने शासनाची मोठ्या प्रमाणात रक्कम वसूलीविना गुंतून राहते. परिणामतः जिल्हास्तरावर राबविण्यात येत असलेल्या योजनांवर त्याचा विपरित परिणाम होत असून ज्या उद्देशाने शासनाने योजनांची अंमलबजावणी सुरू केलेली असते त्या योजनेलाच खिळ बसुन फलनिष्पत्ती अभावी सदरहू योजना असफल ठरते. योजना राबवित असताना शासनाकडून तरतूद करण्यात आलेल्या निधीची रक्कम ही सर्वसामान्य जनतेची असल्याने कोणत्याही परिस्थितीत अनियमिततेतील गुंतलेली रक्कम वसुलीविना माफ करता येणार नाही. **सदरच्या रक्कमा वेळीच वसूल करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासकीय प्रमुखांची असून विनाविलंब कारवाई केली असती तर आजच्या स्थितीत अपहारांच्या प्रकरणांमध्ये ज्या गैरपद्धतीने मोठ्या प्रमाणात रक्कम गुंतलेली आहे अशी परिस्थिती उद्‌भवली नसती. असे समितीचे मत असल्याने अपहरणांच्या प्रकरणांबाबत कारवाईस होत असलेल्या दिरंगाईमुळे गुंतलेली रक्कम वर्षानुवर्षे वसूल होत नसल्याने समिती यावर तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

जिल्हा परिषदांच्या अपहारांच्या प्रकरणांमध्ये गुंतलेल्या रक्कमा तातडीने वसूल करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, स्थानिक निधी लेखा संचालनालय कार्यालय व विभागीय आयुक्त कार्यालय यांनी समन्वयाने कार्यवाही करावी. सहायक आयुक्त (निरीक्षण) यांचेमार्फत करण्यात येत असलेल्या निरीक्षण तपासणीमध्ये अपहारांच्या वसुलीबाबतच्या लेखा परिक्षणांच्या मुद्यांचाही समावेश करून त्याबाबतची सद्यःस्थिती निरीक्षण अहवालामध्ये समाविष्ट करावी. प्राप्त अहवालानुसार प्रत्येक महिन्याला आयुक्तस्तरावर विभागातील सर्व संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची आढावा बैठक घेऊन गुंतलेली रक्कम वसूल करण्याबाबत अत्यावश्यक कार्यवाही करण्यात यावी. तसेच दिर्घकाळापासून मोठ्या प्रमाणात शासनाची गुंतलेली रक्कम वसूल करण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर कार्यवाही होण्यासाठी ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी देखील योग्य ती कार्यवाही करावी. त्यानुसार न्यायप्रविष्ट प्रकरणे वगळून ज्या प्रकरणांची चौकशी पूर्ण झालेली आहे त्या प्रकरणातील संबंधित दोषींवर रक्कम वसुलीसह वेतनवाढ रोखणे, वेतनवाढ कायमस्वरूपी बंद करणे, निलंबित/बडतर्फ करणे व सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या निवृत्तवेतनाच्या रकमेमधून वसूली करणे अशा प्रकारची कारवाई तातडीने करण्यात यावी. ज्या प्रकरणांमधील अधिकारी/कर्मचारी मयत झालेले आहेत अशा व्यक्तींच्या मालमत्तेवर जसे की जमीन किंवा मिळकत यावर बोजा चढविण्याची कार्यवाही करण्यात यावी. न्यायालयीन प्रकरणासंदर्भातील प्रकरणे लोक अदालतमध्ये पाठविण्यासंदर्भात व शासनाची बाजू योग्य प्रकारे न्यायालयात मांडून प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीनुसार अपहारांच्या वसूलीबाबतचा सविस्तर अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

# प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, यवतमाळ

## ई वर्ग जमिनीचे मालकी व हर्रासामधील अनियमितता प्रकरणांबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१०० (सन २०१६-१७)**

१. शासनाकडून हस्तांतरीत झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत असलेल्या शेत जमिनी हर्रास पद्धतीने १ वर्षाकरिता वहितीस देण्याबाबतची कार्यवाही करण्याकरिता आदेशीत करण्यात आले किंवा कसे सदरची शेतजमिन हर्रास करून रक्कमा जिल्हा निधीत जमा करण्यात आले किंवा कसे या बाबत खुलासा सादर करावा.

२. सदरची शेतजमिनी जिल्हा परिषद मालकीची आहे किंवा कसे याबाबत ७/१२ महसुली विभागाकडून घेण्यात आले सबब जिल्हा परिषद मालकीची शेतजमिन किती आहे व कोणत्या ठिकाणी आहे याबाबत खुलासा झाला नाही.

३. पंचायत समिती अंतर्गत सर्व जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समिती मुख्याध्यापक सचिव ग्रामपंचायत व सरपंच यांना पत्र पाठवुन तलाठ्याकडून गावनिहाय व महसूली पुरावे गोळा केल्यास व ज्या गावात ई वर्ग जमिन नाही तेथील तलाठीकडून ई वर्ग जमिन नसल्याचे लेखी घेतल्यास पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जमिनीची निश्चिती होवुन नोंदवहया अदयावत करता येईल अतिक्रमण झालेल्या जमिनीवरील अतिक्रमण काढण्याची उपाययोजना करता येईल.

४. ज्या जमिनी सामाजिक वनीकरणामध्ये गेल्या त्यातील सामाजिक वनीकरणाची झाडे पुर्णतः नष्ट झाली असताना ती शेती करण्यायोग्य करून नियमित हर्रास करणे आवश्यक असताना जिल्हा परिषद उत्पन्न वाढीसंबधीत ध्येय धोरण ठरविता येईल तसेच शेत जमिनीचा हर्रास न झाल्याने जिल्हा परिषदेस उत्पन्न मिळु शकले नाही. योग्य ती उपाययोजना करणे ही बाब आर्थीक नियमास धरुन नाही.

५. जी शेतजमीन जिल्हा परिषदेच्या मालकीची आहे त्यावर अतिक्रमण होवु नये तिचा योग्य विनियोग करण्याकरिता जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे कळवुन त्या शेतजमिनी जिल्हा परिषदेने स्वतःच्या नावे न केल्याने अनावश्यकरीत्या इतर ग्रामस्थ उपविभागीय अधिकारी तहसिलदार यांचेकडे जमिनीची मागणी करून महसूल विभागाचे सक्षम प्राधिकरण ती जमिन सरकारची आहे म्हणून पूर्ण प्रक्रिया पार पाडुन जिल्हा परिषदेच्या परवानगीशिवाय मागणी करणाऱ्यास देऊन टाकतात. त्यामुळे ते जिल्हा परिषदेच्या मालमत्तेच्या दुरुपयोग होतो त्यावर आळा घालणे व मत्ता महसूली लेख्यात जिल्हा परिषदेच्या नावे करण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना करणे अनिवार्य ठरते.

६. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक ०४.१२.२०१० अन्वये जिल्हा परिषद पंचायत समितीच्या ताब्यातील जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याबाबत आदेश पारीत केले आहे त्यातील सुचना क्रमांक १ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी जमिनीचे भूसर्वेक्षण व भुलेखापरिक्षण करावे. त्यासाठी अदयावत तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आदेशीत असून सुद्धा जिल्हा परिषदेने कोणत्याही प्रकारची कार्यवाही न केल्याचे आढळुन आले सबब सदर जमिनीवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. शासनाकडून जिल्हा परिषद शाळांना हस्तांतरीत झालेल्या जमिनीपैकी शेती करण्यायोग्य असणाऱ्या जमिनीची हर्रास करण्याकरिता मार्च महिन्यात दिनांक १५/०३/२०१६ रोजी जिल्हा परिषद कार्यालयाकडून पत्रव्यवहार करून हर्रास करण्याच्या सूचना सर्व पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आल्या होत्या. शेत जमिनीच्या हर्रासापोटी जमा होणारी रक्कम स्थानिक शाळा पातळीवर शाळा व्यवसस्थापन समिती व मुख्याध्यापक यांचे संयुक्त खात्यात जमा करण्यात येत असून सदर रक्कम शाळा व्यवसस्थापन समितीचे खात्यात जमा करण्यात आल्याने जिल्हा स्तरावर जमा करण्यात आली नाही.

२. सर्व शेतजमिनीचे सातबारा संबंधित शाळेकडे उपलब्ध आहे. जिल्हा परिषद शाळांच्या ताब्यात असणारी एकूण जमीन २८६१ हेक्टर आहे.

३. पंचायत समिती अंतर्गत शाळेच्या ताब्यात असणाऱ्या शेत जमिनीची रेकॉर्ड शाळा स्तरावर आहे. ज्या ठिकाणी अतिक्रमण हटविण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

४. ज्या जमिनी सार्वजनिक वनीकरनासाठी हस्तांतरीत झालेल्या आहे. अशा जमिनी आज रोजी सामाजिक वनीकरणाच्या ताब्यातच असून त्यावर शासनाचे धोरणानुसार अंमलबजावणी तथा वृक्ष लागवड असल्याने याबाबत जिल्हा परिषदेला शेत जमिनीचा हर्रासाबाबत धोरण ठरवता आले नाही.

५. परिच्छेदामध्ये नमूद केल्यानुसार अशा प्रकारची मागणी कोणत्याही स्तरावर किंवा जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकडे झालेली नाही जिल्हा परिषदेच्या मालमत्तेच्या दुरुपयोग झाल्याचे आढळुन आलेले नाही.

६. भुलेखापरिक्षण व भूसर्वेक्षण करण्यासंबंधी कार्यवाही करण्यात आलेली नाही मात्र लवकरच त्यासंबंधी कार्यवाही करण्यात येईल. कृपया वरील आक्षेपाची १ ते ६ मुद्दे हे माहिती स्वरुपाचे असल्याने ई-वर्ग जमिनीचा हर्रास व सदर हर्रासापोटी प्राप्त होणारी रक्कम सदर शाळांच्याकडेच असते व त्याचा विनियोग भौतिक सुविधा पूर्ण करण्याकरिता केला जातो.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना विचारणा केली की, जिल्हा परिषद शाळांच्या ताब्यात एकूण किती जमीन आहे. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विदित केले की, जिल्हा परिषद शाळांकडे एकूण २ हजार ८६१ हेक्टर इतकी जमीन आहे. त्यापैकी ५६३ ई वर्ग जमिनी शाळेसाठी आहेत. तसेच १७.३८ हेक्टर जमिनीमध्ये वनीकरण झाले आहे. समितीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना विचारणा केली की, सदर जमीन शिक्षण विभागाच्या नावे करण्यात आली आहे काय ? याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विदित केले की, सदर जमीन राज्य शासनाच्या मालकीची आहे. समितीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना विचारणा केली की, शासनाच्या जमिनी संबंधित विभागाच्या नावे करून घेण्यात यावे असे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले होते. त्या शासन निर्णयानुसार सदर जमीन जिल्हा परिषद किंवा शिक्षण विभागाच्या नावे करण्यात आली आहे काय ? यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विशद केले की, तशी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. काही ठिकाणी भोगवटा प्रमाणपत्र दोन असल्यामुळे तशी कार्यवाही करता येत नाही.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, जिल्हा परिषद शाळांच्या ताब्यात सुमारे २ हजार ८६१ हेक्टर जमीन आहे. या जमिनी संबंधित विभागाच्या नावे करून घेण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. शासन निर्णयाप्रमाणे यासंदर्भात कार्यवाही करण्यात आहे काय ? तसेच उमरखेड येथील पंचायत समितीच्या जमिनीवर अन्य लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. सदर जमीन जिल्हा परिषद किंवा संबंधित विभागाच्या नावे करून घेतले तर त्या जमिनीमधून उत्पन्न मिळू शकते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, अनौपचारिक बैठकीमध्ये हा विषय निघाला होता. त्यामुळे मी या सर्व जमिनीची माहिती मागितलेले आहेत. याबाबतची चौकशी करून आवश्यक कारवाई करण्यात येईल.

समितीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना विचारणा केली की, २ हजार ८६१ हेक्टर जमिनीतून जिल्हा परिषदेला किती उत्पन्न प्राप्त होत आहे ? यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विदित केले की, यामधील काही जमीन पडीत आहे. उर्वरित जमिनीचा दरवर्षी लिलाव केला जातो. लिलावाच्या माध्यमातून मागील वर्षी १ कोटी ४ लाख रुपये उत्पन्न प्राप्त झाले आहेत. समितीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सुचित केले की, जमिनीच्या तुलनेत उत्पन्न अतिशय कमी आहे. उत्पन्न वाढविण्याची आवश्यकता आहे. याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विशद केले की, उत्पन्न वाढण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

समितीने शिक्षणाधिकारी यांना विचारणा केले की, किती हेक्टरवर अतिक्रण करण्यात आले आहे? यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केली की, दिग्रसमध्ये ८.१ हेक्टरवर, घाटंगीमध्ये ६.४२ हेक्टरवर, महागावमध्ये १८.१९ हेक्टरवर, मालेगावमध्ये १०.०८ हेक्टरवर, पुसदमध्ये १०.२१ हेक्टरवर असे एकूण ४९.८५ हेक्टरवर अतिक्रमण करण्यात आले आहे. समितीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या निदर्शनास आणले की, उमरखेड येथील तक्रार करण्यात आलेल्या अतिक्रमीत जमिनीचा यामध्ये समावेश करण्यात आला नाही. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विशद केले की, सदर जमीन शिक्षण विभागाची नाही. तद्नंतर समितीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना विचारणा केली की, या जमिनींवर कोणी अतिक्रमण केले आहे, सदरचे अतिक्रमण किती दिवसांपासूनचे आहे आणि सदर अतिक्रमण काढण्यासाठी आपण काय कार्यवाही केलेली आहे? याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विशद केले की, स्थानिक पातळीवर शाळा समिती ही यावर कार्यवाही करीत आहे.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केले की, जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेच्या ज्या ज्या जमिनीवर अतिक्रमण झाले त्याबाबतचा अहवाल मागवून त्यावर योग्य ती कार्यवाही करून तो अहवाल एक महिन्याच्या आत समितीला सादर करण्यात यावा. यावर मुख्य कार्यकारी

अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर प्रकरणाची संबंधित सर्व गट विकास अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन त्यावर योग्य ती कार्यवाही करून सदर अहवाल समितीला दोन महिन्यात सादर करण्यात येईल. समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केले की, जमिनीचे हराशी करण्याचे अधिकार कोणाला आहेत? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की, अशा जमिनीचे हराशी करण्याचे अधिकार संबंधित गट विकास अधिकारी यांना आहेत. याबाबत समितीने मत व्यक्त केले की, राज्यामध्ये अनेक जिल्ह्यांमध्ये अशी अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे उक्त प्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :-**

१. पंचायत समिती दिग्रसमध्ये ८.१ हेक्टरवर, घांटजीमध्ये ६.४२ हेक्टरवर, महागांवमध्ये १८.१९ हेक्टरवर, मालेगावमध्ये १०.०८ हेक्टरवर अतिक्रमण करण्यात आलेले असून सदर जमिनींवर अतिक्रमण झालेले आहे त्याबाबत चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे? नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :-**

संबधीत पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांना यजिप/लेप/वशि/६८१/ २०२१ ला जिल्हा परिषद यवतमाळ दिनांक १५/०३/ २०२१ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पत्र देऊन शासन परिपत्रक दिनांक १० ऑक्टोबर २०१३ नुसार अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करणेबाबत सुचित केले आहे. दिनांक २२/०३/२०२१ या कार्यालयाचे पत्राद्वारे संबंधीत गटशिक्षणाधिकारी यांना अतिक्रमण काढण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे या स्तरावरून निर्देश देण्यात आले. दिनांक ११ जुन २०२१ ला तहसीलदार पुसद, महागाव, दिग्रस, घांटजी, मारेगाव यांना ई-वर्ग जमिनीवरील अतिक्रमणाबाबत कळविण्यात आले. पुसद, दिग्रस, महागाव येथील अतिक्रमण प्रकरणी दावे दाखल असून या कार्यालयाकडून वकीलांची नेमणूक करण्यात आली असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे.

पंचायत समिती दिग्रस तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा काटी येथील जमीन ८०१ हेक्टर ई-वर्ग जमिनीवर झालेल्या अतिक्रमणाबाबत उपविभागीय अधिकारी पुसद यांचेकडे प्रकरण दाखल करण्यात आलेले आहे. पंचायत समिती घांटजी अंतर्गत ई-वर्ग जमिनीवर अंजी नृसिंह येथील जमीन २.८३ हेक्टर/कोई खुर्द येथील जमीन ३.५९ हेक्टर अशी एकूण ६.४२ जमिनीवर अतिक्रमण आहे. या अतिक्रमण संदर्भात तहसीलदार घांटजी यांचेकडे प्रकरण दाखल करण्यात आलेले आहे.

पंचायत समिती महागाव अंतर्गत ई-वर्ग जमिनीवर करंजखेड येथील जमीन ४.३९ हेक्टर तसेच मोहदी येथील ५.६३ हेक्टर टेंभी काळी येथील २.५ हेक्टर असून फुलसांवगी येथील ५.६७ एकूण १८.१९ हेक्टरवर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक २५/०८/२०२१ रोजी अतिक्रमण हटविण्याचे आदेश जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडून प्राप्त झाले. संबंधीत जागेवरील अतिक्रमण काढण्यात आले आहे.

पंचायत समिती मारेगाव अंतर्गत बोटोणी शाळेच्या जमीन ८.९९ हेक्टर ई-वर्ग जमिनीवरील अतिक्रमण गावठाण बसवून करण्यात आले. तहसिलदार मारेगाव यांचेकडे सदर प्रकरण दाखल करण्यात आले आहे.

पंचायत समिती पुसद अंतर्गत कुंभारी तांडा २.०५ हेक्टर/भोजला मुले ०.८१ हेक्टर/सावरगाव बंगला ४.३५ हेक्टर/आसोला ३ हेक्टर अशी एकूण १०.२१ हेक्टर जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे. या सर्व जमिनीच्या अतिक्रमणा संदर्भात संबंधीत तहसीलदार यांचेकडे सदर प्रकरण दाखल करण्यात आलेले आहेत.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :-**

**ग्रामविकास विभाग यांचे अभिप्राय :-**

सदर मुद्याबाबत शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद यांनी सुरक्षा भिंती किंवा कुंपन घालुन अतिक्रमण रोखण्याची कार्यवाही करणे अपेक्षित आहे. तसेच, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना मालमत्ता अधिकारी म्हणून घोषीत केले आहे. या दोन्ही अधिकाऱ्याच्या समन्वयाने महसूल यंत्रणेच्या सहकार्याने अतिक्रमण हटविणे आवश्यक आहे. यापुढे जिल्हा परिषद यवतमाळ यांनी तातडीने कार्यवाही करावी . सध्या जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने अपर मुख्य सचिव, महसूल यांना अशी विचारणा केले की, दिग्रसमध्ये ८.१ हेक्टरवर घाटंजीमध्ये ६.४२ हेक्टरवर महागांवमध्ये १८.१९ हेक्टरवर, मालेगावमध्ये १०.०८ हेक्टरवर अतिक्रमण करण्यात आलेले असून सदर जमिनीची सद्य:स्थिती काय आहे. यावर अपर मुख्य सचिव, महसूल यांनी खुलासा केला की, ही यादी मोठी आहे. ती आपल्या रेकॉर्डवर आहे. शालेय शिक्षण विभागाच्या ताब्यात असलेल्या किंवा जिल्हा परिषदेच्या ताब्यात असलेल्या ज्या जागा आहेत, त्यावर जी अतिक्रमणे झालेली आहेत, ती प्रामुख्याने कृषक स्वरुपाची आहेत त्यासंबंधी कारवाई करण्याबाबतचा निर्णय तिन्ही विभागांनी मिळून घ्यावा असे समितीचे निर्देश आहेत. या अनुषंगाने ज्यांच्या ताब्यात ती जागा आहे, ज्यांनी अतिक्रमण केले आहे त्यांना नोटिस देणे आणि त्यासंबंधी फौजदारी गुन्हा दाखल करणे, यासंबंधी ग्रामविकास विभागाने २ ते ३ वेळा परिपत्रक काढून सर्वांना सूचना दिलेल्या आहेत. जिल्हा परिषद यवतमाळ यांनी देखील तशा सूचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे त्या कारवाई करीत आहेत. हा प्रश्न येथील असेल किंवा कदाचित इतर ठिकाणचाही प्रश्न असेल त्यामुळे ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव व मी एकत्र चर्चा करून यावर पुन्हा वेगळ्या काही सूचना निर्गमित करण्याची गरज आहे का हे पाहू. सकृतदर्शनी पाहिले तर अगोदरच्या सूचना आहेत जी संपती जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत किंवा शाळेच्या ताब्यात आहेत, त्या सर्व त्यांच्याकडे निहित झालेल्याच आहेत. त्यांची मालकी कायद्याने झालेली आहे. ग्रामविकास विभागाचा त्यासंबंधीचा शासन निर्णय आहे. मंत्रिमंडळाचा निर्णय देखील आहे. त्यामुळे त्याचे संरक्षण त्यांनी केले पाहिजे. अतिक्रमण नियमित करण्यासाठीचा जो शासन निर्णय आहे तो केवळ रहिवासासाठीचा आहे. तो या केसेसना कदाचित लागू होणार नाही. त्यामुळे बाकीच्या केसेसमध्ये याची कारवाई कशी करायची, यासंबंधीचे एक सविस्तर परिपत्रक महसूल व ग्रामविकास विभागांना मिळून काढावे लागेल. आम्ही तशा सूचना पुढच्या १५ दिवसांमध्ये करु.

समितीने अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांना सुचना केले की, ग्राम पंचायतींच्या हद्दीमध्ये असलेल्या मोकळ्या जागा, शाळेच्या देखभालीसाठी शाळेकडे असलेल्या जमिनी, अशा जागांवर बऱ्याच ठिकाणी अतिक्रमण करून त्या ठिकाणी मोठमोठे कॉम्प्लेक्स बांधण्यात आलेले आहेत. ग्राम पंचायतीला त्यामधून कोणत्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नाही, ग्राम पंचायतीच्या हद्दीमध्ये, गावठाणमध्ये असलेले अतिक्रमण काढण्याची प्रक्रिया ग्राम पंचायतीला करता येते. अतिक्रमण शाळेच्या हद्दीत असेल तर ते काढण्याची प्रक्रिया शाळेला करता येते. पोलीस बंदोबस्त घेऊन अतिक्रमण काढता येते. हा विषय पूर्ण राज्याचाच आहे. बऱ्याचशा आपल्या मालकीच्या जागा किंवा आपल्या ताब्यात असलेल्या जागांबाबत आवश्यक कार्यवाही करणे आवश्यक आहे. अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, यासाठी गावठाण विस्तार मोहिम राबविण्यात येईल. बऱ्याच गावांसाठी अशी विस्तार मोहिम राबविण्याची गरज आहे. अनेक वर्षापासून हे काम झालेले नाही. त्यामुळे ग्राम पंचायतींचे उत्पन्नही वाढेल. या विषयावर आमची एक बैठक यापूर्वीच झालेली आहे. पुढच्या वेळेस आम्ही आराखडा घेऊन येऊ. ज्या जागा जिल्हा परिषदेच्या किंवा शाळेच्या ताब्यात आहेत, परंतु त्या जागांवर अतिक्रमण झालेले आहे, अशा जागांबाबत गुन्हा दाखल करणे, तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी यांचेकडे प्रकरण दाखल करणे आणि मग त्यांनी कार्यवाही करणे सध्या अशी प्रक्रिया आहे. यामध्ये सरळ साधेपणा कसा आणता येईल याबाबत अतिरिक्त मुख्य सचिव यांच्यासोबत चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**अभिप्राय व शिफारशी :**

जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत असलेल्या शेत जमिनी हर्रास पद्धतीने वहितीस देण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे काय, हर्रास करून प्राप्त झालेली रक्कम जिल्हा निधीत जमा करण्यात आली आहे काय, जिल्हा परिषद मालकीच्या शेतजमिनी किती व कोणत्या ठिकाणी आहेत याबाबतची माहिती लेखा परिक्षणास प्राप्त झालेली नाही. तलाठ्यांकडून ई-वर्ग जमिनीबाबत गावनिहाय व महसूली पुरावे गोळा केल्यास नोंदवह्या अद्ययावत करता येतील व त्यानुसार अतिक्रमण झालेल्या जमिनीवरील अतिक्रमण काढण्याची उपाययोजना करता आली असती परंतु यापद्धतीने कार्यवाही करण्यात आलेली नाही. ज्या जमिनी सामाजिक वनीकरणामध्ये गेल्या त्यातील झाडे पुर्णतः नष्ट झाली असताना ती शेती करण्यायोग्य करून नियमित हर्रास न केल्याने जिल्हा परिषदेस उत्पन्न मिळु शकले नाही. जिल्हा परिषदेच्या मालमत्तेचा दुरूपयोग होतो त्यावर आळा घालणे व मत्ता महसूली लेख्यात जिल्हा परिषदेच्या नावे करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही. जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी जमिनीचे भूसर्वेक्षण व भुलेखापरिक्षण करणे अनिवार्य असतानाही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदरहू लेखा परिक्षणाच्या मुद्याच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर असलेल्या जमीनी, या जमीनींवर झालेले अतिक्रमण व सदरचे अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत केलेली कार्यवाही याबाबतची सविस्तर माहिती सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

त्यानुसार जिल्हा परिषदेने सादर केलेली माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस प्राप्त झाली की, ज्या जमिनी सार्वजनिक वनीकरणासाठी हस्तांतरीत झालेल्या आहेत त्या जमिनी वृक्ष लागवडीकरिता त्यांच्याच ताब्यात असल्याने जिल्हा परिषदेला शेत जमिनीचा हर्रासाबाबत धोरण ठरवता आले नाही. जिल्हा परिषद शाळांच्या ताब्यात एकूण २८६१ हेक्टर जमीन असून या सर्व शेतजमिनींचे सातबारा संबंधित शाळांकडे उपलब्ध आहेत. या जमिनीमधील काही जमीन पडीक असून उर्वरित जमीन हर्रास पद्धतीने वहितीस देण्याबाबतचा लिलाव करण्यात येतो. शेत जमिनीच्या हर्रासापोटी जमा होणारी रु. १ कोटी ४ लाख इतकी रक्कम शाळा व्यवस्थापन समिती व मुख्याध्यापक यांचे संयुक्त खात्यात जमा करण्यात येत असल्याने जिल्हास्तरावर रक्कम जमा करण्यात येत नाही. हर्रासापोटी प्राप्त होणाऱ्या रक्कमेचा विनियोग भौतिक सुविधा पूर्ण करण्याकरिता केला जातो. दिग्रसमध्ये ८.१ हेक्टरवर, घाटंगीमध्ये ६.४२ हेक्टरवर, महागावमध्ये १८.१९ हेक्टरवर, मालेगावमध्ये १०.०८ हेक्टरवर व पुसदमध्ये १०.२१ हेक्टरवर अतिक्रमण करण्यात आलेले आहे. सदरहू अतिक्रमण हटविण्यासंदर्भात कायदेशीररित्या कार्यवाही स्थानिक पातळीवर करण्यात येत असून भुलेखापरिक्षण व भूसर्वेक्षण करण्यासंबंधी कार्यवाही तातडीने करण्यात येईल. तसेच गावठाण विस्तार मोहिम राबविण्याबाबत आढावा बैठक घेण्यात आली असून अतिक्रमण हटविण्याच्या प्रक्रियेत सुलभता आणण्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील नियम २८८ नुसार ११ व्या अनुसूचिनुसार विद्यमान मंडळामध्ये निहित असलेली सर्व जंगम व स्थावर मालमत्ता ही जिल्हा परिषदेमध्ये निहित होतील. त्यानुसार स्थानिय क्षेत्रासाठी उत्तराधिकारी म्हणून जिल्हा परिषद असून ई-क्लास जमिनी जिल्हा परिषद मालकीच्या असल्याने महसूल विभागाकडे असलेल्या मालमत्ता जिल्हा परिषदेंच्या नावे करण्याचे शासन आदेश आहेत. असे असतानाही अनेक जिल्हा परिषदेकडील मालमत्तेच्या अभिलेखांवर अद्यापही संबंधित जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायतींची नावे नोंदविण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदांकडून करण्यात आलेली नसल्याने या जमिनी आजही महसूल विभागाच्या ताब्यात आहेत. या जमिनींचे लेखा परिक्षण देखील करण्यात येत नसल्याने जिल्हा परिषदांकडे ई-क्लास जमिनी किती आहेत याबाबतची अचुक माहिती देखील त्यांच्याकडे उपलब्ध होत नाहीत. त्यामुळेच या शासकीय जमिनींवर व्यक्ती अथवा संस्था यांच्याकडून अतिक्रमण करण्यात येते. सदर अतिक्रमण दुर करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद/पंचायत समिती/ ग्राम पंचायत यांच्या निष्काळजीपणामुळे त्वरित कार्यवाही करण्यात येत नसल्याने कालांतराने सदरचे अतिक्रमण दूर करणे कठीण जाते.

**यापुढील जिल्हा परिषदेंचा विस्तार व विकास कामांसाठी जागांची असलेली गरज लक्षात घेता सध्या अस्तित्वात असलेल्या जमिनी/जागा/इमारती यांचे अतिक्रमणापासून रक्षण करण्यासाठी जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्राम पंचायती यांनी त्यांच्या ताब्यातील मोकळया जमिनींचे भू-सर्वेक्षण व भू-लेखापरिक्षण अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून तातडीने करून घ्यावे, या जमिनींची मालमत्ता नोंदवहीत नोंद घेण्यासह या नोंदवह्या अद्ययावत ठेवण्यात याव्यात. प्रत्येक मालमत्ता संदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे पडताळणी करून व्यवस्थीत ठेवावीत. या सर्व जमिनींना आवश्यकतेनुसार आवारभिंत/कुंपण घालावे व मालकीबाबत स्पष्ट फलक लावावेत. शासकीय जमिनींची वेळोवळी पाहणी करून अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित व्यक्ती अथवा संस्थेविरूद्ध पोलीसात फिर्याद नोंदवून अतिक्रमण हटविण्यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. अतिक्रमणास जबाबदार असणाऱ्या संबंधित पदाधिकारी/ अधिकारी/कर्मचारी यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी. तसेच जिल्हा परिषदांकडे असलेल्या ई-क्लास जमिनी हर्रास पद्धतीने लागवडीसाठी देताना जास्तीत जास्त उत्पन्न वाढविण्यासाठी बाजारमुल्यानुसार हर्रास करण्यात यावे. उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस, घाटंगी, महागाव, मालेगाव व पुसदमध्ये जिल्हा परिषदेच्या ई-क्लास जमिनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. सदरहू अतिक्रमण दूर करण्याच्या दृष्टीने कार्यवाही होणे अत्यावश्यक आहे. तथापि, ग्रामीण भागात कुटूंबांचा झालेल्या विस्तारामुळे अनेक कुटूंब विभक्त झालेली आहेत त्यामुळे निवासी प्रयोजनासाठी जमिनींची मागणी वाढली असून गावातील दुर्बल घटकातील गरजू कुटूंब गावातील मिळेल त्या शासकीय जमिनींवर बऱ्याच कालावधीपासून अतिक्रमण करून राहत आहेत. **या गरजू कुटूंबांचा सहानुभूतीपुर्वक विचार करून या अतिक्रमणांबाबत नियमानुकूल करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेणे आवश्यक आहे. गरजूंना घरकुल उपलब्ध करून देणे व ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढविणे यासाठी गावठाण विस्तार मोहिम प्रभाविपणे राबविण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी, समिती शिफारस करीत आहे.**

गरजु कुटूंबांनी केलेल्या अतिक्रमणा व्यतिरिक्त असलेल्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमण दूर करण्याबाबतची कार्यवाही तातडीने होणे आवश्यक आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार सदरहू अतिक्रमण दूर करण्याचा अधिकार जिल्हा परिषद/पंचायत समिती/ ग्रामपंचायत यांना आहेत. **उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना मालमत्ता अधिकारी म्हणून घोषित केले असून त्यांनी व शिक्षणाधिकारी,**

**जिल्हा परिषद समन्वयाने महसूल व पोलीस यंत्रणेच्या सहकार्याने अतिक्रमण हटविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी. आवश्यक त्या प्रकरणांमध्ये दावे दाखल करण्यासह कार्यालयाकडून वकिलांची नेमणूक करून प्रकरणे न्यायालयात निकाली काढण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. तसेच सद्य:स्थितीत "ज्या जागांवर अतिक्रमण झालेले आहे अशा जागांबाबत गुन्हा दाखल करणे, तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी यांचेकडे प्रकरण दाखल करणे आणि नंतर त्यांनी कार्यवाही करणे", या राबविण्यात येत असलेल्या प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्याबाबत शासनस्तरावर करण्यात येत असलेली कार्यवाही तातडीने पूर्ण करून नवीन कार्यपद्धती लवकरात लवकर अंमलात आणावी व याबाबत केलेले कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी, समिती शिफारास करीत आहे.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, यवतमाळ

### प्रजिमा-३४ ते लोहारा बुटी इसापूर मार्ग राज्य मार्ग-२५७ ला जोडणारा रस्ता सा.क्र.८/०० ते ११/०० ता. पुसद उष्णमिश्रीत पद्धतीने डांबरी नुतनीकरण करणे.

**परिच्छेद क्रमांक ३.२३७ (सन २०१६-१७) :**

सदर कामा करिता रक्कम रु. १८,७३,०४४/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. विभागाचे कार्यव्यापी अंदाजपत्रक (Working Estimate) तयार करून त्यावर कार्यकारी अभियंता याची तांत्रिक मान्यता (Technicaly Approveded) घेतल्याचे दर्शविले आहे परंतु त्यावर सुधारित तांत्रिक मान्यता/दिनांक नमूद केले नाही तसेच कार्यालयीन टिपणीवर वाढीव कामाबाबत उल्लेख केला नसून कामाचे कार्यव्यापी अंदाजपत्रक हे पूर्ण झाल्यानंतर मुल्यांकनानुसार तयार केल्याचे दिसून येते. यावरून निरीक्षण टिपणीचा आधार घेऊन सुधारित तांत्रिक मान्यता घेतल्याचा भास निर्माण करून कंत्राटदारास वाढीव कामे करण्यास मुभा दिल्याचे निष्पन्न होते.

२. सदर बांधकामावर वापराचे डांबराच्या बिलाची पडताळणी केली असता श्री एस.व्ही.भास्कर यांनी रिफायनरीचे बिल क्र. २४२२००१८०४ दिनांक १४.३.२०१६ व बिल क्रमांक ६००००७१६७२ दि. १३.१२.२०१६ मधून सदर कामाचे कंत्राटदार श्री. एस.व्ही.भास्कर यांना सदर कामाकरिता ३४.८० मे.टन डांबर घेतले आहे परंतु रिफायनरीचे बिलाची झेरॉक्स प्रत जोडलेली असून मुळ प्रत लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही. सदर झेरॉक्स प्रतीवर किती प्रमाणात किमतीवर डांबर वापरण्यात आले या बाबत नमूद करून उपअभियंता यांनी स्वाक्षरीनिशी प्रमाणित करणे आवश्यक होते. परंतु तशा प्रकारची कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसून सदर कामावर डांबर वापरण्यात आल्याची खात्री करता आली नाही.

३. सदर कंत्राटदार श्री. एस.व्ही.भास्कर यांचे पत्र दि.२५.८.२०१६ नुसार त्याच्याकडे साहित्य उपलब्ध असल्याने १९.९९ टक्के कमी दराने पुर्णपणे करण्यास तयार झाले परंतु कंत्राटदाराकडे साहित्य उपलब्ध असल्याबाबतची साहित्य यादी नस्तीत उपलब्ध नाही.

४. तहसीलदार, उमरखेड यांचा तात्पुरता परवाना क्र. ०१७, दि.२०.९.२०१६ नुसार चलान क्र. ०००४३४६०९२२०१६१७ दि.१९.३.२०१६ नुसार रु.१५,११५/- रु. ५० ब्रास गौण खनिज करिता स्वामित्वधन शासनखाती भरल्याचे नमूद आहे. परंतु सदर चलनाची प्रत नस्तीत उपलब्ध नाही तसेच उपरोक्त परवाना या कामासाठी नसून झाडगाव ते शेंबाळपिंपरी या शासकीय रस्त्याकरिता दिली असल्याचे नमूद आहे म्हणून उपरोक्त रक्कम रु. १५,११५/- वसुलपात्र ठरते.

५. महसूल व वन विभागाच्या गौण खनिज सुधारित स्वामित्वधनाबाबत शासन निर्णय क्र.गौखनि १०/०२०६/प्रक्र ५७ ख दि.११.५.२०१५ अन्वये बांधकामावर वापरण्यात येणाऱ्या गौण खनिजाकरिता प्रती ब्रास रु.४००/- प्रमाणे वसूल करणे आवश्यक आहे. प्रथम देयकातून १२ ब्रास खनिज स्वामित्वधन रु.५३७६/- पावतीद्वारे भरणा केल्याचे नमूद आहे परंतु सदर स्वामित्वधनाची पावती लेखापरिक्षणास सादर केली नसून रक्कम रु. ५३७६/- वसूलपात्र ठरते.

६. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २००५/प्रक्र १८७/ राम-२, दि.०८.१०.२००७ नुसार रिफायनरी मधून डांबराच्या ब्राउझर कामाचे स्थळी पोहचल्या नंतर संबंधित अधिकारी यानी रिफायनरीतून प्राप्त चलान व डिलेव्हरी मेमोच्या मुळ प्रती वरून डांबरावरची प्रत मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे तसेच या बाबत प्रत्येक कामनिहाय एक नोंदवही ठेवावी व त्यामध्ये ब्राउझर क्रमांक व चलान क्रमांक डीलेव्हरी मेमो क्र. डांबराचे वजन प्रत तपासणी व चाचणी अधिकाऱ्याचे नाव इत्यादी तपशील ठेवावा परंतु अशी कार्यवाही केल्याचे आढळले नाही. त्यामुळे अंदाजपत्रकीय तरतुदी नुसार विहित केलेल्या प्रतीचे डांबर वापरल्याची पडताळणी करता आली नाही.

७. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. बीडीजी-२०१६/नुसार १० टक्क्याहुन अधिक कमी दराच्या निविदा भरणारे कंत्राटदारकडून कामे अर्धवट स्थितीत सोडून देणे सारख्या बाबी उदभवत असल्याचे दिसून आल्यामुळे सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना क्र. ३ नुसार कंत्राटदारकडून रुपये २३,२८,५१४/- इतक्या रुपयेचा धनाकर्षाच्या रुपाने Performance सिक्युरीटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र. २ मध्ये सादर करवून घेणे आवश्यक होते. परंतु विभागाने तशी कार्यवाही केली नसल्यामुळे कंत्राटदाराचे हित जोपासल्याचे निदर्शनास येते.

८. देयकासोबत जोडण्यात आलेल्या तुलनात्मक तक्त्याची पडताळणी केली असता सदर बांधकामावर रु.६६,२९३/- ने वाढ तर रु. ५,७१५/- ने बचत झालेली आहे. महा.जि.प. व पं.स. लेखासंहीता, १९६८ चे नियम १२० (१) अन्वये एखाद्या बाबीवर झालेली बचत ही विशेष प्राधिकाराशिवाय मुळ प्राकलनात योजलेली नसेल असे जादा बांधकाम पार पाडण्यासाठी लावली जाउ नये असे असताना बचत जादा कामाकरिता वापरून लेखासंहीता नियमाचा भंग केला आहे. प्रत्यक्ष जागेची पाहणी न करता ढोबळ मानाने अंदाजपत्रक तयार केल्यामुळे सदर नियमबाह्यता झालेली आहे.

९. अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग याचे परिपत्रक क्र.जिआर/३/का ४/५१६९, दि.९.१.१९८७ व महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. १०९९/प्रक्र/५६/३५, दि.३०.६.२००० अन्वये साहित्याचा वापर करण्यापुर्वी शासकीय प्रयोगशाळेतून चाचणी करून घेणे बंधनकारक आहे परंतु चाचणी अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.खुलासा करावा.

१०. महा.जि.प. व पं.स. लेखा संहीता १९६८ चे नियम ६७ नुसार कामाची प्रगती नोंदवही नमुना नंबर २३ व नियम १९७ नुसार पूर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना नंबर ६९ ठेवलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. प्रत्यक्ष काम करताना काही बाबीमध्ये वाढ करणे आवश्यक असते. तर काही बाबीमध्ये बचत होते. त्याअनुषंगाने लेखासंहीता १९६८ चे नियम ११८(०१) नुसार उप अभियंता यानी निदर्शनास आणुन दिल्यानुसार कार्यकारी अभियंता यांनी स्थळ निरीक्षण करून कार्यव्यापी प्राकलनास मंजुरी दिली आहे याला (Technicaly Approveded) असा शिक्का मारून तांत्रिक मान्यता प्रदान आहे व त्यानुसार कंत्राटदाराने काम केले आहे.

२. सदर कामाकरिता कंत्राटदाराने सादर केलेल्या डांबराचे देयक क्र. २४२२००१८०४ दिनांक १४.३.२०१६ नुसार १५.५३३ तसेच देयक क्र. ६००००७१६७२ दि.१३.१२.२०१६ नुसार १९.२७० डांबरा पैकी १७.५० टन डांबर वापरण्यात आले आहे. देयका सोबत जोडलेली डांबराची झेरॉक्स प्रतिवर उपअभियंता यांनी वापरलेल्या ३०.२० मे.टन डांबराबाबत प्रमाणित केले आहे. प्रत सोबत जोडली आहे.

३. या कामाचे कंत्राटदार श्री. एस. व्ही. भास्कर पुसद यांनी त्यांचे पत्र दि. २५.८.२०१६ नुसार त्याचे कडे स्वतःचे मालकीचे रोलर मिक्सर ट्रॅक्टर व पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असल्याचे नमूद केले आहे. पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

४. परिच्छेदात नमूद केल्यानुसार स्वामीत्वधनाची रक्कम रु. १५,११५/- कंत्राटदाराकडून वसूल करून शासनखाती भरणा करण्यात आली आहे.

५. आक्षेपानुसार वसुलपात्र रक्कम रु. ५,३७६/- भरणा केली आहे.

६. सदर कामा करिता ३०.२० मे.टन डांबर वापरण्यात आले. या बाबतचे विवरणपत्र मोजमाप पुस्तीकेमध्ये पान क्र. ३७२६ पान क्र. ८० ला नोंदविले आहे. चलान क्रमांक डिलेवरी मेमो क्र. डांबराचे वजन व प्रत तपासणी कार्यकारी अभियंता यांनी केलेली आहे व डांबराचे चलान साक्षांकीत केली आहे. कंत्राटदाराने खरेदी केलेल्या डांबराचे देयक सादर केलेले असून त्या सोबत डांबराचे गुणवत्तेचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे तसेच डांबराचा वापर करण्यात आलेल्या कारपेट मिक्स व प्रिमिक्स सिलकोट यांचे चाचणी अहवाल प्राप्त करण्यात आले आहे. प्रत सोबत जोडलेली आहे.

७. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१६/प्रक्र २/इमा-२, दि.१२.२.२०१६ अन्वये प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन किमतीच्या किमतीपेक्षा १०% पर्यत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या १% एवढ्या रक्कमेचा धनाकर्ष परफॉरमन्स सिक्युरीटी मधून निविदेच्या लिफाफा क्र. २ मध्ये सादर करणे बाबत निर्देश आहेत. उपरोक्त प्रमाणे या विभागाने कंत्राटदार श्री. एस. व्ही. भास्कर यानी एफडीआर च्या स्वरूपात युनियन बँक ऑफ इंडिया पुसद शाखा यांचे फडीआर क्र. ००५१४ दि. २.९.२०१६ अन्वये रु.४,८८,९००/- जमा करण्यात आलेला आहे.

८. निविदेतील कलम ३८(१) नुसार काही बाबीमध्ये २५% किंवा रुपये ५०००/- ने वाढ झाल्यामुळे निविदेतील कलम ३८(०२) नुसार कार्यवाही करून सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आली आहे. तसेच जादा बाबी मंजूर दराने करण्यास तयार असल्याबाबत लेखा संहीता नियम १५६ नुसार कंत्राटदाराची हमीपत्र घेण्यात आले आहे. लेखासंहीता १२०(०१) चे नियमाचे उल्लंघन होऊ नये

करिता उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. प्रत्यक्ष काम करताना उद्भवलेल्या बाबीनुसार त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन काम करण्यात आले आहे.

९. या कामाकरिता वापरण्यात आलेल्या साहित्याची गुणवत्ता परिक्षण प्रयोगशाळेतून करण्यात आलेले असून चाचणी अहवाल या सोबत जोडले आहे.

१०. महा.जि.प.व व पं.स.लेखासंहीता, १९६८ चे नियम ६७ नुसार कामाची प्रगती नोंदवही नमुना नंबर २३ व नियम १९७ नुसार पूर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना नंबर ६९ ठेवण्यात आली असून आवश्यक नोंद घेण्यात आली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने कार्यकारी अभियंता, बांधकाम -२ यांना अशी विचारणा केली की, प्रजिमा-३४ ते लोहारा बुटी इसापूर राज्य मार्ग २५७ ला जोडणाऱ्या रस्त्याच्या वाढीव कामासंदर्भात मुल्यांकनानुसार कार्यव्यापी अंदाजपत्रक तयार करून केवळ सुधारित तांत्रिक मंजुरी घेतल्याचा भास निर्माण करण्यात आला आहे कंत्राटदार श्री.एस.व्ही.भास्कर यांच्याकडे साहित्य उपलब्ध असल्याबाबतची यादी नस्तीत जोडलेली नसतांना त्यांची १९.९९ टक्के कमी दराची निविदा का मंजूर करण्यात आली आहे ? यावर कार्यकारी अभियंता बांधकाम - २ यांनी विदित केले की, सदर कंत्राटदार श्री.एस.व्ही.भास्कर यांच्याकडे स्वतःच्या मालकीचे साहित्य उपलब्ध असल्याबाबतची यादी त्यांनी नस्तीत जोडलेली आहे. समितीने कार्यकारी अभियंता बांधकाम - २ यांना विचारणा केली की, लेखा परिक्षण करते वेळी सदर माहिती उपलब्ध करून देण्यात आली नव्हती काय. जिल्ह्यात बांधकाम विभागाच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याचे दिसून येत आहे. सदर कामासाठी किती निविदा प्राप्त झाल्या होत्या ? यावर कार्यकारी अभियंता, बांधकाम - २ यांनी विदित केले की, सदर कामासाठी ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. समितीने कार्यकारी अभियंता यांना विचारणा केले की, सदर काम श्री. एस. व्ही. भास्कर या कंत्राटदाराकडे दिले होते, त्यांनी साहित्य उपलब्ध असल्याची यादी निविदेसोबत जोडलेली नाही, हा लेखापरिक्षणामधील आक्षेप आहे यावर कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, संबंधितांनी सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे.

संचालक स्थानिक निधी लेखा यांनी कार्यकारी अभियंता, बांधकाम यांच्या निदर्शनास आणले की, कंत्राटदार श्री. एस. व्ही भास्कर यांच्याकडे सदर कामासाठी आवश्यक असणारी मशिनरी स्वतःच्या मालकीची होती काय? तसेच त्यांचे पत्र दिनांक २५.८.२०१६ नुसार त्यांच्याकडे साहित्य उपलब्ध असल्याने १९.९९ टक्के कमी दराने काम पुर्णपणे करण्यास तयार झाले. परंतु कंत्राटदाराकडे साहित्य उपलब्ध असल्याबाबतची साहित्य यादी नस्तीत उपलब्ध नाही. हा आक्षेप वाचून दाखवल्यानंतर तो आपण मान्य केला आहे. श्री. एस. भास्कर यांनी त्यांच्याकडे मशिनरी उपलब्ध असल्याची खात्री त्यांनी केव्हा दिली ? यावर कार्यकारी अभियंता यांनी विशद केले की, कंत्राटदार श्री. एस. व्ही. भास्कर यांच्याकडे मशिनरी उपलब्ध असल्याची खात्री त्यांनी दिनांक २५.०८.२०१६ रोजी दिलेली आहे. समितीने कार्यकारी अभियंता यांना विचारणा केली की, आरसी बुक, साहित्य खरेदी केलेली तारीख या सर्व बाबींची माहिती देण्यात आली आहे काय ? यावर कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, सदर माहिती देण्यात आली आहे.

**समितीने कार्यकारी अभियंता यांच्या उत्तरावर तीव्र नापसंती व्यक्त केली. बांधकाम विभाग हे सर्व नियम धाब्यावर बसवून कामे करीत आहे. प्रत्येक कामामध्ये अनियमितता दिसून येत आहे. कोणालाही काम देऊन कामामध्ये अनियमितता घडवून आणलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या सर्व कामांची सखोल चौकशी करून चौकशीचा अहवाल समितीला एका महिन्याच्या आत सादर करण्यात यावा. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर उक्त प्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सदर प्रकरणाची एका महिन्याच्या आत चौकशी करून सदर अहवाल समितीला सादर करण्यात येईल.**

**समितीच्या निदेशानुसार विभागाकडून प्राप्त झालेला चौकशी अहवाल**

जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक २ :- सन २०१६-२०१७

| अ. क्र. | कामाचे नाव | प्रजिमा ३४ ते लोहरा बुटी इसापुर मार्ग राज्य मार्ग २५७ ला जोडणारा रस्ता सा.क्र. ८/०० ते ११/०० ता.पुसद उष्ण मिश्रीत पद्धतीने डांबरी नुतनीकरण करणे. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| २. | कंत्राटदाराचे नाव | श्री. एस. व्ही. भास्कर |
| ३. | तत्कालीन कार्यकारी अभियंता | श्री. अनिल अहिरराव |
| ४. | तत्कालीन उप अभियंता | श्री. एस. सी. राठोड |
| ५. | तत्कालीन शाखा अभियंता | श्री. एस. सी. कासेटवार |
| ६. | प्रशासकीय मान्यता क्रमांक/दिनांक | बांधकाम समिती सभा दिनांक २२/०७/२०१६ |
| ७. | तांत्रिक मान्यता क्रमांक/दिनांक | ४५/१८/२०१६-२०१७ |
| ८. | निविदा प्रक्रिया | प्रथम अभिप्राय :- प्राकलीत दरापेक्षा १९.३३ कमी दराने |
| ९. | कामाचे कार्यारंभ आदेश | २५६४/१७/०९/२०१६ |
| १०. | काम पूर्ण दिनांक | काम पूर्ण दिनांक २१/१२/२०१६ |
| ११. | कामाचा दोष निवारण कालावधी | १२ महिने |
| १२. | मजिप लेखा संहिता १९६८ चे ८७ नुसार कामावर साहित्य वापरण्यापूर्वी शासकीय प्रयोग शाळेतून साहित्याचे चाचणी अहवाल घेण्यात आले आहे का? | **अभिप्राय.—**साहित्याचे चाचणी अहवाल नस्तीमध्ये उपलब्ध आहे. |
| १३. | मजिप लेखा संहिता १९६८ चे नियम ९७ व १९७ नुसार अनुक्रमे नमुना-४० व नमुना - ६९ मध्ये नोंदी घेण्यात आल्या आहे का? | **अभिप्राय.—**मजिप लेखा संहिता १९६८ चे नियम ९७ व १९७ नुसार अनुक्रमे नमुना-४० व नमुना -६९ मध्ये नोंदी घेण्यात आल्या आहेत. |
| १४. | मोजमाप पुस्तीकेवर शाखा अभियंता व उप अभियंता यांची दिनांकित स्वाक्षरी घेण्यात आली आहे का? | **अभिप्राय.—**मोजमाप पुस्तीकेवर शाखा अभियंता व उप अभियंता यांची दिनांकित स्वाक्षरी घेण्यात आली आहे. |
| १५. | मजिप लेखा संहिता १९६८ (३) नुसार कार्यकारी अभियंता यांची ५ टक्के तपासणी घेण्यात आली आहे का? | **अभिप्राय.—**मजिप लेखा संहिता १९६८ चे नियम १६८ (३) नुसार कार्यकारी अभियंता यांची ५ टक्के तपासणी घेण्यात आली आहे. |
| १६. | **आक्षेपातील मुद्दा क्रमांक १.—**कमी जादा बाबी बाबत कार्यव्यापी प्राकलनास मान्यता देऊन सुधारित तांत्रिक मान्यता घेतल्याचा भास निर्माण कंत्राटदारास वाढीव काम करण्यास मुभा दिल्याबाबत. | **अभिप्राय.—१** प्रत्यक्ष काम करतांना अंदाजपत्रकातील बाब क्र. १,२,३, मध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. निविदेतील कलम ३८ (१) नुसार रु. ५०००/- पेक्षा जादा वाढ झालेल्या बाबींकरिता विभागाने निविदेतील कलम ३८ (२) नुसार जादा बांधकामाकरिता सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेतली आहे. व मजिप लेखा संहिता १९६८ चे नियम ११४ नुसार सुधारित अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम प्राधीकारी म्हणून कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक मान्यतेचा भास निर्माण करून कंत्राटदारास जादा काम करण्याची मुभा देण्यात आलेली नाही. |

| अ. क्र. | कामाचे नाव | प्रजिमा ३४ ते लोहरा बुटी इसापुर मार्ग राज्य मार्ग २५७ ला जोडणारा रस्ता सा.क्र. ८/०० ते ११/०० ता.पुसद उष्ण मिश्रीत पद्धतीने डांबरी नुतनीकरण करणे. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १७. | **आक्षेपातील मुद्दा क्रमांक २ व ६.—**महाराष्ट्र शासन सा.बां.वि. शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०११/प्र.क्र.४६७/ रस्ते १, दिनांक २१/११/२०११ मधील परिच्छेद एक ड नुसार डांबर खरेदी केल्याबाबत चलनाची मुळ प्रत जोडणे आवश्यक आहे. डिलेव्हरी मेमो, प्रतवारी व चाचणी या बाबत स्पष्टता करावी. | **अभिप्राय.—**डांबर खरेदीची चलनाची मुळ प्रत नस्ती सोबत जोडल्याचे आढळून आले आहे. व लेखापरिक्षणा नंतर निदर्शनास आल्यावर कार्यकारी अभियंता यांनी सत्यप्रतीवर डांबर वापराबाबत प्रमाणित केले आहे. तसेच डांबराची चाचणी अहवाल, डांबराची प्रतवारी व डांबराचे गुणवत्तेबाबत प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदर कामाकरिता कंत्राटदाराने ३०.२० मे. टन डांबर वापरल्याने प्रमाणीत केले आहे व त्याची नोंद मोजमाप पुस्तीका ३७२६ पा.क्र. ८० वर घेण्यात आली आहे. |
| १८. | **आक्षेपातील मुद्दा क्रमांक ३.—**कंत्राटदार यांनी साहित्य उपलब्धतेबाबत यादी जोडलेली नाही. | **अभिप्राय.—**हे सत्य आहे. कंत्राटदाराने फक्त साहित्य असल्याबाबत दिनांक २५/८/२०१६ रोजी विभागास पत्र दिले आहे. व ते पत्र नस्तीमध्ये उपलब्ध आहे. |
| १९. | **आक्षेपातील मुद्दा क्रमांक ४ व ५.—**महाराष्ट्र शासन महसूल वन विभाग शासन निर्णय क्र. गौणखनिज १०/२०१६ प्र.क्र. ५७, दिनांक ११/५/२०१६ अन्वये प्रती ब्रास रु. ४००/- प्रमाणे एकुन स्वमीत्व धनाची रक्कम १५११५/- व ५३७६ कंत्राटदाराकडून वसुली दर्शवावी. | **अभिप्राय.—**लेखापरीक्षा नंतर निदर्शनास आल्यावर विभागाने कंत्राटदाराकडून धनादेश क्र. २७१ दिनांक २८/१/२०२१ अन्वये गौणखनिजाची रक्कम रु. १५११५/- वसुलीकरिता प्राप्त झाला परंतु बँकेतून अनहारीत झाला आहे. तसेच धनादेश क्र. २६९ दिनांक २८/१/२०२१ अन्वये गौणखनिजाची रक्कम रु. ५३७६/- वसुली करिता प्राप्त झाला परंतु बँकेतून अनाहारीत झाला त्यामुळे वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे. |
| २०. | **आक्षेपातील मुद्दा क्रमांक ७.—**महाराष्ट्र शासन सा.बां.वि. शासन निर्णय क्रमांक बी.डी.जी.-२०१६ प्र.क्र. २/इमा-२, दिनांक १२/२/२०१६ नुसार परफॉरमन्स सिक्युरिटीची रक्कम कमी घेण्यात आली आहे. आक्षेपामध्ये परफॉरमन्स सिक्युरेटीची रक्कम रु. २३,२८,५१४/- दर्शवण्यात आली आहे. | **अभिप्राय.—**सदर कामाच्या करारनाम्याची किंमत रु. १८,६३,०४४/- असून महाराष्ट्र शासन सा.बां.वि. शासन निर्णय क्रमांक बी.डी.जी.-२०१६ प्र.क्र. २/इमा २ दिनांक १२/०२/२०१६ नुसार परफॉरमन्स सिक्युरेटीची रक्कम एफ.डी.आर.क्र. ०५१४ दिनांक ०२/०९/२०१६ अन्वये रु. ४,८८,९००/- घेण्यात आली होती. घेण्यात आलेली परफॉरमन्स सिक्युरिटीची रक्कम योग्य आहे. |

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :-**

सदर कामांमधील निवीदा मध्ये अनियमितता असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. कंत्राटदार श्री. एस.व्ही.भास्कर यांच्याकडे साहित्य उपलब्ध असल्याबाबतची यादी नस्तीत जोडलेली नसतांना त्यांनी १९.९९ टक्के कमी दराची निविदा मंजूर करण्यात आली. यासंदर्भात समितीने नापंसती व्यक्त केली असून सदर प्रकरणांची चौकशी करून अहवाल समितीस तात्काळ सादर करावा असे निर्देश दिले. सदर प्रकरणात दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे? नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :-

सदर प्रकरणी चौकशी केल्यानुसार उपरोक्त कामाचे कंत्राटदार यांनी त्यांचे पत्र क्रमांक दिनांक २५/०८/२०१६ त्यांचेकडे स्वतःचे मालकीचे रोलर, मिक्सर, ट्रॅक्टर व पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असल्याचे व सदर काम मला १९.९९% कमी दराने परवडते असल्याबाबतचे पत्र सादर केलेले असून नस्ती सोबत जोडण्यात आले आहे. उपरोक्त प्रमाणे कंत्राटदाराने करारनामा करते अगोदरच साहित्याची नावे असलेले पत्र दिले असल्यामुळे निविदा मंजूर करण्यात आली.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**ग्रामविकास विभाग यांचे अभिप्राय.—**जिल्हा परिषदेने दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोंव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, प्रजिमा-३४ ते लोहारा बुटी इसापूर राज्यमार्ग-२५७ जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाच्या निविदेत अनियमितता असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे कंत्राटदार श्री एस.व्ही. भास्कर यांच्याकडे साहित्य उपलब्ध असल्याबाबतची यादी जोडली नसताना त्यांची १९.९९ टक्के, कमी दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. याबाबत विभागाने काय कार्यवाही केलेली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, सदर प्रकरणी आम्ही तपासणी केली आहे. जेव्हा १५ टक्केच्या खाली दर जातो तेव्हा संबंधित कंत्राटदाराचा रेट ॲनालीसिस फॉर्म जोडला जातो. त्यामध्ये साहित्यांची उपलब्धता, उपकरणांची उपलब्धता आणि मनुष्यबळ उपलब्धता या तीन बाबी तपासल्या जातात. जर १५ टक्क्यांच्या खाली दर देत असेल आणि सदर तीन बाबींची पूर्तता करीत असेल तर त्याची निविदा स्वीकारण्यात येते. त्यामुळे सदर निविदा स्वीकारलेली आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

पुसद तालुक्यातील प्रजिमा-३४ ते लोहारा बुटी इसापूर मार्ग राज्य मार्ग-२५७ ला जोडणारा रस्ता उष्णमिश्रीत पद्धतीने डांबरी नुतनीकरण करण्यासाठी रु. १८,७३,०४४/- इतकी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. या कामाच्या कार्यालयीन टिपणीवर वाढीव कामाबाबत उल्लेख केला नसून कामाचे कार्यव्यापी अंदाजपत्रक काम पूर्ण झाल्यानंतर मुल्यांकनानुसार तयार केल्याचे दिसून येते. सदर कामासाठी कंत्राटदार श्री. एस. व्ही. भास्कर यांनी ३४.८० मे. टन डांबर घेतले आहे. परंतु रिफायनरीच्या बिलाची झेरॉक्स प्रत जोडलेली असून मूळ प्रत लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही. सदरहू झेरॉक्स प्रत उप अभियंता यांनी प्रमाणित केलेली नाही. याबाबतची नोंदवही ठेऊन डांबराबाबतची प्रत मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक होते परंतु अशी कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार विहित केलेल्या प्रतीचे डांबर वापरल्याची पडताळणी करता आली नाही. कंत्राटदाराकडे साहित्य उपलब्ध असल्याने १९.९९ टक्के कमी दराने काम पूर्णपणे करण्यास तयार झाले परंतु कंत्राटदाराकडे साहित्य उपलब्ध असल्याबाबतची साहित्य यादी नस्तीत उपलब्ध नाही.साहित्यांचा वापर करण्यापूर्वी शासकीय प्रयोगशाळेतून चाचणी करून घेणे बंधनकारक असतानाही चाचणी अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झालेला नाही. तसेच ब्रास गौण खनिजकरिता स्वामित्वधनाची रु. १५,११५/- इतकी रक्कम शासनखाती भरल्याचे नमूद केले आहे. परंतु चलनाची प्रत नस्तीत उपलब्ध नाही. प्रथम देयकातून १२ ब्रास खनिज स्वामित्वधन रु. ५३७६/- पावतीद्वारे भरणा केल्याचे नमूद आहे परंतु सदर स्वामित्वधनाची पावती लेखापरिक्षणास सादर केली नाही. त्यामुळे रु. १५,११५/- व रु. ५३७६/- इतकी रक्कम वसुलपात्र ठरते. कंत्राटदाराकडून परफॉरमन्स सिक्युरिटी म्हणून रु. २३,२८,५१४/- इतक्या रकमेचे धनाकर्ष घेणे आवश्यक असतानाही तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

प्रजिमा-३४ ते लोहारा बुटी इसापूर मार्ग राज्य मार्ग-२५७ ला जोडणाऱ्या रस्त्याच्या जागेची पाहणी न करता ढोबळ मानाने अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असल्याने कंत्राटदारास वाढीव कामे करण्यास मुभा दिल्याचे निष्पन्न झाले असून या रस्त्याच्या कामाबाबतची निविदा प्रक्रिया नियमानुसार राबविण्यात आलेली नसून कंत्राटदाराचे हित जोपासण्यात आले असल्याचे लेखा परिक्षकांनी आक्षेपात नमूद केले आहे. त्यानुसार या रस्त्याच्या कामामध्ये अनियमितता झालेली असल्यामुळे या कामाची सखोल चौकशी करून याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले.

समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने चौकशी अहवालासह सादर केलेली माहिती व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, या कामाची स्थळ निरीक्षण करून कार्यव्यापी प्राकलनास मंजुरी दिली आहे याला (Techniacaly Approved) असा शिक्का मारून तांत्रिक मान्यता प्रदान आहे व त्यानुसार कंत्राटदाराने काम केले आहे. देयका सोबत जोडलेल्या डांबराच्या झेरॉक्स प्रतिवर उप अभियंता यांनी वापरलेल्या ३०.२० मे. टन डांबराबाबत प्रमाणित केले असून डांबराच्या गुणवत्तेचे प्रमाणपत्र देखील सादर केले आहे. कंत्राटदाराकडे स्वतःच्या मालकीचे रोलर, मिक्सर, ट्रॅक्टर व पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असल्याचे व सदरचे काम १९.९९% कमी दराने परवडत असल्याबाबतचे पत्र सादर केले आहे. या कामाकरिता वापरण्यात आलेल्या साहित्यांची गुणवत्ता परिक्षण प्रयोगशाळेतुन करण्यात आलेली असून चाचणी अहवाल सादर केलेला आहे. स्वामित्वधनाची रक्कम रु. १५,११५/- व आक्षेपानुसार वसुलपात्र रु. ५,३७६/- इतकी रक्कम शासनखाती जमा केलेली आहे. निम्नतम निविदानुसार परफॉरमन्स सिक्युरीटीची रक्कम म्हणून रु. ४,८८,९००/- एफडीआरच्या स्वरूपात जमा केली आहे.

या प्रकरणाबाबत घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीत सचिवांनी समितीस निदर्शनास आणले की, सदर प्रकरणाची त्यांनी तपासणी केली आहे. जेव्हा १५ टक्केच्या खाली दर जातो तेव्हा संबंधित कंत्राटदाराचा रेट ॲनालीसिस फॉर्म जोडला जातो. त्यामध्ये साहित्यांची उपलब्धता, उपकरणांची उपलब्धता आणि मनुष्यबळ उपलब्धता या तीन बाबी तपासल्या जातात. सदर तीन बाबींची पूर्तता करीत असेल तर त्याची निविदा स्वीकारण्यात येते. त्यानुसार या रस्त्याच्या कामासाठी कंत्राटदाराची निविदा स्वीकारलेली आहे.

**प्रजिमा-३४ ते लोहारा बुटी इसापूर मार्ग राज्य मार्ग -२५७ ला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाच्या संदर्भात लेखापरिक्षकांनी नोंदविलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने समितीस प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीनुसार समितीच्या निदर्शनास आले की, या कामासाठी प्राप्त झालेल्या निम्नतम निविदानुसार योग्य कार्यपद्धती राबविण्यात आली नाही. त्यामुळेच लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याच्या वेळी त्या तारखेसंबंधी आवश्यक कालावधीची नोटीस जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना पाठविण्यात आलेली असताना व अभिलेखे सादर करण्यास संधी दिल्यानंतरही रस्त्यासाठी वापरण्यात आलेल्या डांबराच्या बिलाची मुळ प्रत, डांबराबाबतची प्रत मोजमाप नोंदवही, कंत्राटदाराकडे साहित्य उपलब्ध असल्याबाबतची साहित्य यादी, साहित्यांचा वापर करण्यापूर्वी शासकीय प्रयोगशाळेत चाचणी केल्याबाबतचा गुणवत्ता अहवाल व गौण खनिजाच्या स्वामित्वधनाच्या चलनाची प्रत व रक्कम जमा केल्याबाबतची पावती लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेले नाही. यास्तव या प्रकरणाची तपासणी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी व त्यानुसार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये कारवाई करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी तेथील रस्ते चांगल्या दर्जाचे होणे अत्यावश्यक आहे. यासाठी रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामात रिफायनरीतून प्राप्त होणाऱ्या डांबराची प्रत कामावर वापरण्यापूर्वी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी मानकानुसार तपासून घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार प्रत्येक काम निहाय प्लान्टवर याबाबतची एक नोंदवही असावी व त्यामध्ये बाऊझर क्रमांक, चलन क्रमांक, डिलीव्हरी मेमो क्रमांक, डांबराचे वजन, ग्रेड तपासणी व चाचणी अधिकाऱ्यांचे नाव इत्यादी तपशील नोंदवावा.**

**तसेच रस्ते, पूल व इमारतींची बांधकामे व दुरूस्तीची कामे विहित कार्यपद्धतीनुसार स्पर्धात्मक निविदा बोलावून करण्यात येतात. प्राप्त होणाऱ्या निविदामध्ये निम्नतम निविदाकारास काम प्रदान करण्यात येते. निविदा प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी निविदा ई-टेंडरींग द्वारे मागविण्यात येतात. परंतु बऱ्याच कामांच्या निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा खूप कमी दराने प्राप्त होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या कंत्राटदारांकडून अटी व शर्तीचे पालन न करणे व कामे अर्धवट स्थितीत सोडून देणे इत्यादी बाबी होत असल्याने ठरविलेल्या कार्यक्रमानुसार सदरहू कामे पूर्ण होत नाहीत व या कामांच्या गुणवत्तेवर त्याचा विपरित परिणाम होत असल्याचे निदर्शनास येत आहेत. यासाठी शासनाने आदेशीत केल्यानुसार "निविदा प्रक्रियेमधील कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा अधिक दराने कमी असेल तर या किंमतीत काम पूर्ण करता येणे शक्य असल्याची खात्री करून या कामाच्या नियोजनाबाबतचा सविस्तर तपशील कंत्राटदाराकडून प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. तसेच निम्नतम निविदा कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दराची असेल तर कंत्राटदाराच्या निविदाधीन किंमतीच्या १% व कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे तेवढ्या रकमेचा धनाकर्ष (Demand Draft) कंत्राटदाराकडून घेणे बंधनकारक आहे. प्राप्त झालेला धनाकर्ष मंजूर होऊन रक्कम प्राप्त झाल्यानंतरच कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही करावी व समाधानकारक काम पूर्ण झाल्यानंतर सदरहू रक्कम कंत्राटदारास परत करावी. ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण या अंतर्गत रस्त्याची कामे उत्कृष्ट दर्जाची होण्यासाठी कामाचा दर्जा व गुणवत्ता शासनाने निर्गमित केलेल्या मानकाप्रमाणेच होण्यासाठी उपरोक्त नमूद कार्यपद्धतीनुसारच अशा निम्नतम निविदांच्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत व या कामांची सर्व अभिलेखे लेखा परिक्षकांना विहित वेळेत लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करून देण्याबाबत सर्व संबंधितांना सक्त सूचना देण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करत आहे.**

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, यवतमाळ

## जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे

**परिच्छेद क्रमांक : ३.१०३२ (२५) (सन २०१६-२०१७)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षण सुरू करण्याचे ठरले जाते. त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबधित जिल्हा विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्याच्या सदर्भात जिल्हा परिषदांना अर्धसमास पत्राने अभिलेखे कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरिक्षण कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. जिल्हा परिषद अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न झाल्यास आक्षेपबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबधित जिल्हा परिषद विभागाना निवड केलेले परिच्छेद कळवून ते सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद गांर्भीयाने लक्ष देत नसल्याचे दिसून येते वर नमूद केल्या प्रमाणे संबधित जिल्हा परिषद विभागास लेखे उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ते उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेखे सादर करण्यासाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. ही बाब गंभीर स्वरुपाची असल्याने पंचायत राज समितीच्या निर्देशनास आणण्यात येत आहे. उदा. जिल्हा परिषद विभागानी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत घेतलेल्या आक्षेप खाली दर्शविण्यात आले.

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | यवतमाळ | शिक्षण | — | — |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे कडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**परिच्छेदाचे अनुपालन खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :**

१. शासनाच्या या धोरणानुसार कोणतेही खाजगी शाळेकडून सन २०१६ - २०१७ मध्ये तुकडी मान्यता व शाळेची मान्यता बाबत प्रस्ताव शिक्षण विभाग प्राथमिक या कार्यालयात प्राप्त नसल्याने व दिनांक २८/८/२०१५ च्या शासन निर्णयानुसार तुकडी व नैसर्गिकवाढ बंद केल्यामुळे या विभागाकडून अशी प्रकारची मान्यता दिली नसल्याने माहिती निरंक होती परंतु दस्ताऐवज व नस्ती निरंक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस लेखापरिक्षणास देण्यात आले नाही. या संबधित शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र माशाअ २००९/(५९९/०९) माशी-१, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोंव्हेबर २०११ शासन निर्णयानुसार वित्तीय वर्ष् सन २०१३-२०१४ मध्ये खाजगी शाळेकडून अनुदान मंजुरी बाबत प्रस्ताव या कार्यालयास अप्राप्त असल्याने सदर माहिती व दस्ताऐवज निंरक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस देता आले नाही या संबधित शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात येत आहे.

३. शासनाच्या या धोरणानुसार कोणतेही खाजगी शाळेकडून सन २०१६-२०१७ मध्ये तुकडी मान्यता व शाळेची मान्यता बाबत प्रस्ताव शिक्षण विभाग प्राथमिक या कार्यालयात प्राप्त नसल्याने व दिनांक २८/८/२०१५ च्या शासन निर्णयानुसार तुकडी व नैसर्गिकवाढ बंद केल्यामुळे या विभागाकडून अशा प्रकारची मान्यता दिली नसल्याने माहिती निंरक होती पंरतु दस्ताऐवज व नस्ती निंरक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस लेखापरिक्षणास देण्यात आले नाही. या संबधित शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात येत आहे.

४. राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळामध्ये शिक्षण सेवक योजना लागू न करण्याबाबत महाराष्ट्र शासन शालेय शिक्षय व क्रिडा विभाग शासन क्रमांक पीआरई २००६/(५११८/०६)प्राशि - १, मंत्रालय, मुंबई, दि २५ मे २००९ व ११ मार्च २०१२ च्या शासन निर्णयानुसार विनाअनुदानित अशंता: अनुदानित शाळेला उक्त शासन निर्णयानुसार शाळेला शिक्षण सेवक योजना लागू नसल्यामुळे शिक्षण सेवक मान्यता या कार्यालयाकडून सन २०१६ - २०१७ मध्ये देण्यात आलेल्या नाही. तथापी अनुदानित व विनाअनुदानित शाळेला पदभरती करण्याबाबत शासन निर्णय, महाराष्ट्र शासनशालेय शिक्षण व क्रिडा विभाग शालेय शिक्षण सकिंर्ण २०११/(४४७/

११)(अ)/ प्राशि-३, मंत्रालय, मुंबई, दि २ मे २०१२ नंतर शिक्षक भरती बंद असल्यामुळे एकाही शिक्षकाचे दि २ मे २०१२ नंतर या कार्यालयाकडून वैयक्तिक मान्यता आदेश देण्यात आले नसल्याने व (शिक्षण सेवकाचा कालावधी हा ३ वर्षाचा असतो) खाजगी शाळेत कोणताही शिक्षण सेवक हा सन २०१६ - २०१७ मध्ये नसल्याने त्यास वेतन श्रेणी लागू करण्याची प्रक्रिया व प्रस्ताव विभागास प्राप्त नसल्याने माहिती निंरक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस तपासणी देय झाले नाही. याबाबत शासन निर्णय अनुपालन सोबत सादर करण्यात येत आहे.

५. शासनाच्या या धोरणानुसार कोणतेही खाजगी शाळेकडून सन २०१६-२०१७ मध्ये तुकडी मान्यता व शाळेची मान्यता बाबत प्रस्ताव शिक्षण विभाग प्राथमिक या कार्यालयात प्राप्त नसल्याने व दिनांक २८/८/२०१५ च्या शासन निर्णयानुसार तुकडी व नैसर्गिकवाढ बंद केल्यामुळे या विभागाकडून अशी प्रकारची मान्यता दिली नसल्याने माहिती निंरक होती परंतु दस्ताऐवज व नस्ती निरंक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस लेखापरिक्षणास देण्यात आले नाही या संबधित शासन निणर्याची प्रत सादर करण्यात येत आहे

६. महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई याचे शासन निर्णय क्र माशाअ/२०११/(२१०/११)/माशि -३, दि १७/२/२०१२ नुसार यवतमाळ जिल्ह्यातील एकही संस्थेचे व शाळेचे हस्तांतरण व स्थंलातरण मंजुरीचे प्रस्ताव सन २०१६-१७ या वर्षात कार्यालयात प्राप्त झाले नाही व शासनास सुद्धा पाठवण्यात आले नसल्याने त्यासंबधित प्रस्ताव व लेखे निरंक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस दर्शवता आले नाही. याबाबत शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात आलेली आहे.

७. खाजगी शाळेची वार्षिक तपासणी शिक्षण विभाग प्राथमिक कडून न होता ती गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत समिती स्तरावर करतात. त्या अन्वये सदर माहिती ही पंचायत समिती स्तरावर असून पंचायत समितीने लेखापरिक्षणाच्या वेळी लेखापरिक्षणास दर्शविण्यात आलेले आहे.

८. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई याचे आदेश क्र. शासन निर्णय क्र. नाहप्र २००९/(६६३/०९)/ माशि - १, दि ७/८/२००९ नुसार शिक्षण विभाग, प्राथमिक जि.प., यवतमाळ कार्यालयाकडून खाजगी शाळेला नाहरकत प्रमाणपत्र सन २०१६-२०१७ मध्ये दिलेले नाही तथापी याबाबतच्या धोरणाची अमलबजावणी उक्त शासन निर्णय अन्वये महाराष्ट्र शासनाकडून होत असल्याने खाजगी शाळेकडून शिक्षण विभागास कोणतेही प्रस्ताव प्राप्त झाले नसल्याने यासंबधी कोणतेही कार्यवाही शिक्षण विभागाकडून झाली नसल्याने त्याबाबतचे कोणतेही दस्ताऐवज नसून निंरक होती. शासन निर्णयाची प्रत सहप्रतीत सादर करण्यात आलेली आहे.

९. शासनाच्या या धोरणानुसार कोणतेही खाजगी शाळेकडून सन २०१६-२०१७ मध्ये तुकडी मान्यता व शाळेची मान्यता बाबत प्रस्ताव शिक्षण विभाग प्राथमिक या कार्यालयात प्राप्त नसल्याने व दिनांक २८/८/२०१५ च्या शासन निर्णयानुसार तुकडी व नैसर्गिकवाढ बंद केल्यामुळे या विभागाकडून अशी प्रकारची मान्यता दिली नसल्याने माहिती निंरक होती पंरतु दस्ताऐवज नस्ती निंरक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस लेखापरिक्षणास देण्यात आले नाही. या संबधित शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात येत आहे.

१०. महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय क्र. अविवि-२०१५ क्र ८०/१/ का.- मंत्रालय, मुंबई, दिनांक ७ ऑक्टोबर २०१५ नुसार अल्पसंख्याक शाळेचे देखभाल व दुरुस्ती व साहित्य खरेदी मंजुरीचे प्रस्ताव शासन निर्णयानुसार मा.जिल्हाधिकारी यवतमाळ व तथा जिल्हा नियोजन अधिकारी यवतमाळ यांच्याकडे शाळेचे प्रस्ताव परस्पर सादर करतात तसेच प्रस्तावास मंजुरी देण्याचे अधिकार शासनाने नेमून दिलेल्या निवड समिती मार्फ मंजूर करून सदर प्रस्ताव शासनास सादर करतात त्यामुळे अल्पसंख्याक शाळेचे देखभाल व दुरुस्ती व साहित्य खरेदी मंजुरीचे प्रस्तावास या कार्यालयास सादर करण्यात आलेलेनसल्याने माहिती निरंक होती. त्यामुळे या कार्यालयात नस्ती ठेवण्यात आलेली नसल्यामुळे लेखापरिक्षणाच्या वेळेस दर्शविण्यात आलेली नाही. शासन निर्णय लेखापरिक्षणाच्या वेळेस दाखविण्यात आले आहे व सोबत जोडण्यात आलेले आहे.

११. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शालेय शिक्षण संकिर्ण २०११/(४४७/११)(अ) /प्राशि-३, मंत्रालय, मुंबई, दि. २ मे २०१२ पासून विना अनुदानित इंग्रजी माध्यम शाळेच्या कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता देण्यात येऊ नये याबाबत शासन निर्णय असल्यामुळे मान्यता देण्यात आलेल्या नाही तसेच महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित इंग्लिश माध्यम शाळेला शासनाकडून कोणताच निधी देण्यात येत नाही सदर शिक्षकाच्या वेतनाचा व शाळेचा संपूर्ण खर्च हा संस्था चालक करत असल्यामुळे सदर शाळेला आज पावेतो एकही शिक्षकाचे वैयक्तिक मान्यता शासन निर्णयानुसार देण्यात आलेली नाही व शासनाकडून कोणताच लाभ दिला गेला नाही तसेच यासंबधित कोणत्याही खाजगी विना अनुदानित इंग्लिश माध्यमाच्या शाळेचे शिक्षकाचे वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव व लेखे प्राप्त नसल्याने माहिती निंरक होती. तसेच दस्ताऐवज व नस्ती निंरक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस लेखापरिक्षणास देण्यात आले नाही या संबधित शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्रमांक : ३.१०३२ (२६) :**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते. त्यासंबधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबधीत जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्येक लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषदांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रास /अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशाप्रकारचे परिच्छेद लेखापरीक्षा पुर्नविलोकन अवहालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना १५ दिवसांच्या सादर करणेबाबत सुचीत लक्ष देत नसल्याचे आढळून येते वर नमूद केल्याप्रमाणे संबधित जिल्हा परिषद विभागास लेखे उपलब्ध करून देण्यासासठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायतीराज समित्याचे निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल जिल्हा परिषदांच्या विभागाने उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहे.

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचा विभाग | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेंद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २६ | यवतमाळ | वित्त | ०१ | — |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे कडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जि.प.यवतमाळ अंतर्गत १६ पंचायत समिती व १३ विभाग असे एकूण २१ विभाग असून सर्व विभाग/ पंचायत समिती यांचे कडून जमा खर्चाचे लेखे प्राप्त करावे लागतात. प्राप्त झालेल्या संपूर्ण विभाग / पंचायत समिती यांच्या लेख्यांचा लेखाशिर्षनिहाय जमा व खर्चाचा ताळमेळ घेऊन एकत्रीकरण करून वार्षिक लेखा तयार होत असतो. या संपूर्ण प्रक्रियेत बराच अवधी लागतो त्यामुळे जि.प.चा एकत्रीत वार्षिक लेखा म.जि. प.व पं.स. अधिनियम, १९६१ चे कलम १३६ तसेच म.जि.प.व.पं.स. लेखासंहिता १९६८ चे नियम ६५(१) अन्वये ३० जून पर्यंत सादर करण्यात आलेला नाही.

जि.प., यवतमाळ ने वार्षिक लेखा सन २०१६-२०१७ हा सहायक संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा यवतमाळ यांचेकडे पत्र क्र. ९२० दिनांक ३१/०५/२०१८ अन्वये सादर केलेला आहे. सदर कार्यालयाने पत्र क्र ६२९ दिनांक ०३/०८/२०१८ ला उक्त वार्षिक लेखाची तपासणी करून वार्षिक लेखा पुढील कार्यवाहीस्तव सहसंचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा अमरावती यांचेकडे सादर केला. सहसंचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा अमरावती यांनी वार्षिक लेख्यास मंजुरी पत्र क्र. ८३१, दिनांक ०६/०८/२०१८ अन्वये प्रमाणित करून शासनास सादर करण्यसा प्रस्तावित केले होते.

या कार्यालयाचे पत्र क्र. १११५ दिनांक १६/०८/२०१८ नुसार ७ प्रतित वार्षिक लेखा शासनाकडे सहसंचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा अमरावती यांच्या मार्फत सादर करण्यात आलेला आहे. सदर लेख्यास जि.प.सर्वसाधारण सभेने विषय क्र. ०५, ठराव क्र. ०५, दिनांक ११/ १०/२०१८ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. उक्त वर्षाचा वार्षिक लेखा शासनाच्या **राजपत्रात** शासन राजपत्र भाग-२ संकीर्ण सुचना व जाहिराती गुरुवार ते बुधवार ऑक्टोबर ११-१७, २०१८/ अश्विन १९-२५, शके १९४० अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

वरील प्रक्रियेप्रमाणे जिल्हा परिषद यवतमाळ यांनी वार्षिक लेखाचे नियमाप्रमाणे लेखापरिक्षण करून शासनाच्या **राजपत्रात** वरीलप्रमाणे वार्षिक लेखा प्रसिद्ध केलेला आहे. सबब लेखापरिक्षणास अभिलेखे सादर केले नाही असे म्हणणे संयुक्तीक होणार नाही.

**परिच्छेद क्रमांक : ३.१०३२ (२७)**

मुंबई स्थानिक निधि लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम (६)१ नुसार योग्य वाटतील अशा लेख्याच्या संदर्भात जिल्हा परिषदांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते. व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो तरी सुद्धा लेखापरिक्षणास कागदपत्रे / अभिलेखे उपलबध केले जात नाही. जिल्हा परिषद अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात. अशाप्रकारचे परिच्छेद लेखापरिक्षण लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापी, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद गांर्भीयाने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभागास लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायत राज समितीचया निरर्देशनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेच्या विभागांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आलेले आहेत.

| अ. क्र.<br>(१) | जिल्हा परिषदेचे नाव<br>(२) | जिल्हा परिषदेचा विभाग<br>(३) | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेंद क्रमांक<br>(४) | गुंतलेली रक्कम रुपये<br>(५) |
|---|---|---|---|---|
| २७ | यवतमाळ | भ.नि.नि. | १२ | निरंक |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे कडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. सर्व कर्मचाऱ्याचे वेतन देयक हे पंचायत राज सेवार्थ या प्रणालीवरे Online केले जाते आणि देयके कोषागारात सादर करतांना शासकीय कपाती चलान देयकासोबत सादर करून देयक मंजूर झाल्यानंतर परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत कपातीचे शेडयुल विभागीय स्तरावर सर्व कर्मचाऱ्याची जुळवणुक करून चलान व शेडयुलची प्रत वित्त विभागात खतावणी करण्याकरिता सादर करण्यास विलंब झाल्याने लेखा परिक्षण कालावधीत सदर चलान व शेडयुल लेखापरिक्षणास सादर करण्यात आले नाही. विभाग स्तरावरून चलान व शेडयुल प्राप्त करण्याकरिता या विभागाकडून वारंवार पाठपुरावा करण्यात आल्यानंतर खात्यात खतावणी करून सर्व खातेदारांना वार्षिक लेखा चिठठी R-३ वितरित करून सर्व नोंदवह्या अद्यावत करण्यात आलेले आहे. सोबत प्रत संलग्न करण्यात आलेली आहे.

२. भविष्य निर्वाहनिधी. अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये विभाग स्तरावरून चलान व शेडयुल खतावणी करण्याकरिता वेळेवर सादर न केल्यामुळे लेखा परिक्षण कालावधीत जमा व खर्चाची माहीती सादर करता आली नाही. मंजूर चलान व शेडयुल प्राप्त झाल्यानंतर सर्व खातेदारांचे खात्यात रक्कमेची खतावणी करण्यात येऊन सर्वाना हिशोब चिठठ्याचे वितरण करण्यात आले आहे. व शासनाकडून सन २०१६-१७ या वर्षाचे भविष्य निर्वाह निधी चे व्याजाची रक्कम रु. ३८,३४,४२,०००/- प्राप्त झालेले आहेत. त्याची प्रत सोबत संलग्न करण्यात येत आहे.

३. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये एकुन २१५५ कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या रक्कमा संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे व शासनाकडून २३४४००००/- व्याज प्राप्त झाले आहे. तसेच अंशदानासह रक्कम जमा करण्यात आहे आहे. हिशोब चिठठ्या (R-३)वितरित करण्यात आले आहे. सोबत R-६ व जमेबाबतची झेरॉक्स प्रत संलग्न करण्यात येत आहे.

४. सन २००१-०२ ते २०१-१९ या कालावधीचे ठेव संलग्न विमा योजनेचे शासनाकडून येणे असलेले रक्कमेची मागणी रु. ३५१७७३४/- या कार्यालयाचे पत्र क्रमांक ३२५५/१८ दि.०९/१०/२०१८ अन्वये मागणी करण्यात आलेली असून प्रत सोबत संलग्न करण्यात येत आहे. सबब अनुदानाची मागणीबाबत सतत पाठपुरावा सुरू आहेत.

५. आर्थिक वर्ष सन २०१६-१७ पर्यंत सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना शासनाकडून प्राप्त अंशदानासह रक्कम जमा करण्यात आली आहे. तसेच नोंदवह्या अद्यावत करण्यात आलेल्या आहेत.

सोबत नोंदवही (R-४), (R-५), ब्राडशिट (R-६), व इतर सर्व लेजर नोंदवहया अद्यावत करण्यात आले आहे. गोषवारा प्रत जोडलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने परिच्छेद क्रमांक : ३.१०३२ (२५) : जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना माहिती विचारली असता मुख्य कार्यकारी यांनी समितीला विदीत केले की, सदर बाब ही खाजगी शाळांच्या रेकॉर्डबद्दलची होती. परंतु रेकॉर्ड जिल्हा परिषद स्तरावर नसतात. त्यामुळे आवश्यक तो अभिलेख सादर करता आला नाही. यावर मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने यासंदर्भात सदर बाब तपासून घ्यावी अशा सूचना संचालकाना केली. यावर सदर बाब तपासून घेण्याबाबत संचालकांनी मान्य केले.

समितीने मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांना **परिच्छेद क्रमांक ३.१०३२ (२६) संदर्भातील** अनुषंगाने माहिती विचारली असता मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यानी समितीला पुढीलप्रमाणे माहिती दिली की, सदर परिच्छेद वित्त विभागाशी संबंधित आहे. यामध्ये वार्षिक लेख्याची मागणी करण्यात आली होती. परंतु त्यावेळी वार्षिक लेखा तयार नव्हता व त्यामुळे दाखविता आला नाही. नंतर लोकल फंडाकडून तपासून शासनाच्या गॅझेटमध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. या मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने लोकल फंड ऑडिटसाठी गेले त्यावेळी लेखे तयार नव्हते. यापुढे नोव्हेंबरपूर्वी लेखे तयार राहतील यादृष्टीने काळजी घ्यावी अशी सुचना संचालकानी केली.

समितीने **परिच्छेद क्रमांक ३.१०३२ (२७) संदर्भात** परिभाषित अंशदायी योजनेंतर्गत शासन हिस्सा कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे का, तसेच सन २०१५-१६ मध्ये शासन हिश्श्याची रक्कम किती होती अशी विचारणा केली की असता मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी समितीला अशी माहिती दिली की, त्यावेळी आर-३ उपलब्ध नसल्यामुळे दाखविता आल्या नाहीत. त्यानंतर अद्ययावत करून सर्व कर्मचाऱ्यांना वितरित करण्यात आल्या आहेत. ठेव संलग्न विम्याच्या थकबाकीची आम्ही वेळोवेळी शासनाकडे मागणी करतो. परंतु अद्याप ती रक्कम शासनाकडून येणे बाकी आहे. तसे असले तरीही आम्ही कोणत्याही कर्मचाऱ्याला लाभापासून वंचित ठेवत नाहीत. सेसमधून सदर रक्कम कर्मचाऱ्याला प्रदान करून नंतर शासनाकडून प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करतो. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने समाधान व्यक्त केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :-**

सन २०१६-२०१७ या अहवाल वर्षांत लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून दिले नसल्याप्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर समितीच्या निर्देशानुसार महाराष्ट स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार संबंधितास २५ हजार रुपये दंड, सेवा पुस्तिकेत नोंद आणि १ वेतनवाढ रोखणे याबाबत कारवाई केली आहे काय त्यानुसार प्रकरणे व परिच्छेद निहाय अहवाल वर्षांची माहिती समितीस सादर करण्यात यावी. भविष्यात लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित न होण्याच्या दृष्टीने मंत्रालयीन विभागाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे? नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :**

प्रस्तुत ३.१०३२ (२५),(२६),(२७) बाबत मा. पंचायती राज समिती इति वृत्तं पान क्र एस-९४ वर चर्चा झाली होती. याबाबत जिल्हा परिषदेने आपली बाजु मांडली होती. सदर परिच्छेदाबाबत महाराष्ट्रं स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कार्यवाही करणेबाबत निर्देश प्राप्तं नव्हंते . तथापी सदर परिच्छेदांचे अनुपालन खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**३. १०३२ (२५)**

१. शासनाच्या या धोरणानुसार कोणतेही खाजगी शाळेकडून सन २०१६-२०१७ मध्ये तुकडी मान्यता व शाळेची मान्यता बाबत प्रस्ताव शिक्षण विभाग प्राथमिक या कार्यालयात प्राप्त नसल्याने व दिनांक २८/८/२०१५ च्या शासन निर्णयानुसार तुकडी व नैसर्गिकवाढ बंद केल्यामुळे या विभागाकडून अशा प्रकारची मान्यता दिली नसल्याने माहिती निंरक होती, पंरतु दस्ताऐवज व नस्ती निंरक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस लेखापरिक्षणास देण्यात आले नाही. या संबधित शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. माशाअ २००९/(५९९/०९)माशी-१, मंत्रालय, मुबई, दिनांक १५ नोंव्हेबर २०११ शासन निर्णयानुसार वित्तीय वर्ष सन २०१३-२०१४ मध्ये मुल्यांकन करून प्रस्ताव दि १७/७/२०१४ रोजी पाठविण्यात आले. सन २०१६-२०१७ मध्ये खाजगी शाळेकडून अनुदान मंजुरी बाबत प्रस्ताव या कार्यालयास अप्राप्त असल्याने सदर माहिती व दस्ताऐवज निंरक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस देता आले नाही या संबधित शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात येत आहे.

३. शासनाच्या या धोरणानुसार कोणतेही खाजगी शाळेकडून सन २०१६-२०१७ मध्ये तुकडी मान्यता व शाळेची मान्यता बाबत प्रस्ताव शिक्षण विभाग, प्राथमिक या कार्यालयात प्राप्त नसल्याने व दिनांक २८/८/२०१५ च्या शासन निर्णयानुसार तुकडी व नैसर्गिकवाढ बंद केल्यामुळे या विभागाकडून अशी प्रकारची मान्यता दिली नसल्याने माहिती निंरक होती पंरतु दस्ताऐवज व नस्ती निंरक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस लेखापरिक्षणास देण्यात आले नाही. या संबधित शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात येत आहे.

४. राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळामध्ये शिक्षण सेवक योजना लागु न करण्याबाबत महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन क्रमाक पीआरई. २००६/(५११८/०६) /प्राशि -१, मंत्रालय, मुबई, दि. २५ मे २००९ व १९ मार्च २०१२ च्या शासन निर्णयानुसार विनाअनुदानित अशंताः अनुदानित शाळेला उक्त शासन निर्णयानुसार शाळेला शिक्षण सेवक योजना लागु नसल्यामुळे शिक्षण सेवक मान्यता या कार्यालयाकडून सन २०१६-२०१७ मध्ये देण्यात आलेल्या नाही. तथापी अनुदानित व विनाअनुदानित शाळेला पदभरती करण्याबाबत शासन निर्णय महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शालेय शिक्षण सर्किर्ण २०११ / (४४७/११)(अ) / प्राशि-३ मंत्रालय मुबई दि २ मे २०१२ नंतर शिक्षक भरती पंद असल्यामुळे एकाही शिक्षकाचे दि २ मे २०१२ नंतर या कार्यालयाकडून वैयक्तिक मान्यता आदेश देण्यात आले नसल्याने व (शिक्षण सेवकाचा कालावधी हा ३ वर्षाचा असतो) खाजगी शाळेत कोणताही शिक्षण सेवक हा सन २०१६-२०१७ मध्ये नसल्याने त्यास वेतन श्रेणी लागु करण्याची प्रक्रिया व प्रस्ताव विभागास प्राप्त नसल्याने माहिती निरंक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस तपासणी देय झाले नाही. याबाबत शासन निर्णय अनुपालना सोबत सादर करण्यात येत आहे.

५. शासनाच्या या धोरणानुसार कोणतेही खाजगी शाळेकडून सन २०१६-२०१७ मध्ये तुकडी मान्यता व शाळेची मान्यता बाबत प्रस्ताव शिक्षण विभाग प्राथमिक या कार्यालयात प्राप्त नसल्याने व दिनांक २८/८/२०१५ च्या शासन निर्णयानुसार तुकडी व नैसर्गिकवाढ बंद केल्यामुळे या विभागाकडून अशी प्रकारची मान्यता दिली नसल्याने माहिती निंरक होती पंरतु दस्ताऐवज व नस्ती निंरक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस लेखापरिक्षणास देण्यात आले नाही या संबधित शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात येत आहे.

६. महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. माशाअ/२०११/(२१०/११)/माशि-३, दि. १७/२/२०१२ नुसार यवतमाळ जिल्हयातील एकही संस्थेचे व शाळेचे हस्तांतरण व स्थंलातरण मंजुरीचे प्रस्ताव सन २०१६-१७ या वर्षात कार्यालयात प्राप्त झाले नाही व शासनास सुद्धा पाठवण्यात आले नसल्याने त्यासंबधित प्रस्ताव व लेखे निरंक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस दर्शवता आले नाही. याबाबत शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात आलेली आहे.

७. खाजगी शाळेची वार्षिक तपासणी शिक्षण विभाग प्राथमिक कडून न होता ती गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत समिती स्तरावर करतात. त्या अन्वये सदर माहिती ही पंचायत समिती स्तरावर असून पंचायत समितीने लेखापरिक्षणाच्या वेळी लेखापरिक्षणास दर्शविण्यात आलेले आहे.

८. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुबई याचे आदेश क्र शासन निर्णय क्र नाहप्र २००९/(६६३/०९)/ माशि -१ दि ७/८/२००९ नुसार शिक्षण विभाग प्राथमिक जि.प यवतमाळ कार्यालयाकडून खाजगी शाळेला ना हरकत प्रमाणपत्र सन २०१६-२०१७ मध्ये दिलेले नाही तथापी याबाबतच्या धोरणाची अमलबजावणी उक्त शासन निर्णय अन्वये महाराष्ट्र शासनाकडून होत असल्याने खाजगी शाळेकडून शिक्षण विभागास कोणतेही प्रस्ताव प्राप्त झाले. नसल्याने यासंबधी कोणतीही कार्यवाही शिक्षण विभागाकडून झाली नसल्याने त्याबाबतचे कोणतेही दस्ताऐवज नसून निंरक होती. शासन निर्णयाची प्रत सहप्रतीत सादर करण्यात आलेली आहे.

९. शासनाच्या या धोरणानुसार कोणतेही खाजगी शाळेकडून सन २०१६-२०१७ मध्ये तुकडी मान्यता व शाळेची मान्यता बाबत प्रस्ताव शिक्षण विभाग प्राथमिक या कार्यालयात प्राप्त नसल्याने व दिनांक २८/८/२०१५ च्या शासन निर्णयानुसार तुकडी व नैसर्गिकवाढ बंद केल्यामुळे या विभागाकडून अशी प्रकारची मान्यता दिली नसल्याने माहिती निंरक होती, परंतु दस्ताऐवज व नस्ती निरंक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस लेखापरिक्षणास देण्यात आले नाही. या संबधित शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात येत आहे.

१०. महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय क्र. अविवि-२०१५ क्र ८०/१/का.- मंत्रालय, मंबई, दिनांक ७ ऑक्टोंबर २०१५ नुसार अल्पसंख्याक शाळेचे देखभाल व दुरुस्ती व साहित्य खरेदी मंजुरीचे प्रस्ताव शासन निर्णयानुसार मा.जिल्हाधिकारी यवतमाळ व तथा जिल्हा नियोजन अधिकारी यवतमाळ यांच्याकडे शाळेचे प्रस्ताव परस्पर सादर करतात तसेच प्रस्तावास मंजुरी देण्याचे अधिकार शासनाने नेमुण दिलेल्या निवड समिती मार्फत मंजूर करून सदर प्रस्ताव शासनास सादर करतात त्यामुळे अल्पसंख्याक शाळेचे देखभाल व दुरुस्ती व साहित्य खरेदी मंजुरीचे प्रस्तावास या कार्यालयास सादर करण्यात आलेले नसल्याने माहिती निंरक होती. त्यामुळे या कार्यालयात नस्ती ठेवण्यात आलेली नसल्यामुळे लेखापरिक्षणाच्या वेळेस दर्शविण्यात आलेली नाही. शासन निर्णय लेखापरिक्षणाच्या वेळेस दाखविण्यात आले आहे व सोबत जोडण्यात आलेले आहे.

११. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शालेय शिक्षण सकिंर्ण २०११/(४४७/११) (अ)/प्राशि-३, मंत्रालय, मुबई, दि. २ मे २०१२ पासून विना अनुदानित इंग्रजी माध्यम शाळेच्या कर्मचाऱ्याना वैयक्तिक मान्यता देण्यात येऊ नये याबाबत शासन निर्णय असल्यामुळे मान्यता देण्यात आलेल्या नाहीत तसेच महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित इग्लिंश माध्यम शाळेला शासनाकडून कोणताच निधी देण्यात येत नाही सदर शिक्षकाच्या वेतनाचा व शाळेचा संपूर्ण खर्च हा संस्था चालक करत असल्यामुळे सदर शाळेला आज पावेतो एकही शिक्षकाचे वैयक्तिक मान्यता शासन निर्णयानुसार देण्यात आलेली नाही व शासनाकडून कोणताच लाभ दिला गेला नाही तसेच यासंबधित कोणत्याही खाजगी विना अनुदानित इग्लिंश माध्यामाच्या शाळेचे शिक्षकाचे वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव व लेखे प्राप्त नसल्याने माहिती निंरक होती. तसेच दस्ताऐवज व नस्ती निंरक असल्याने लेखापरिक्षणाच्या वेळेस लेखापरिक्षणास देण्यात आले नाही या संबधित शासन निर्णयाची प्रत सादर करण्यात येत आहे.

**३. १०३२ (२६)**

लेखापरिक्षणास वार्षिक लेखा सन २०१६-२०१७ तपासणीस उपलब्ध न करून देणे :- जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत १६ पंचायत समित्या व १५ विभाग यांचेकडून जमा व खर्चाचे लेखे प्राप्त करून वार्षिक लेखा तयार होतो. लेखापरिक्षणाच्या वेळी सन २०१६-२०१७ चा वार्षिक लेखा तयार नसल्याने तो दर्शविता आला नाही. ही बाब लेखापरिक्षणास लेखे उपलब्ध करून न देणे मध्ये अंतर्भुत होत नाही. त्यामुळे पुढील कार्यवाही केली नाही.

सन २०१६-२०१७ चा वार्षिक लेखा पुढे ऑक्टोबर, २०१८ मध्ये राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**३.१०३२ (२७)**

सदरचा परिच्छेद नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना व भविष्य निर्वाह निधी जमा खर्चाची माहिती उपलब्ध न करून देणे बाबत आहे. याबाबतीत लेखापरिक्षणाच्यावेळी विभाग व पंचायत समिती कडून जमा रकमांचे शेडयुल व चलान विहित वेळेत प्रात होत नसल्याने जमा खर्चाचा हिशेब अदयावत/तयार नव्हता. त्यामुळे तो देता आला नाही. ही बाब लेखापरिक्षणास अभिलेखे न दर्शविणे या कलमात येणार नाही असे मत आहे. याबाबत लेखापरिक्षकांच्या अर्धसमास पत्राला विभागाकडून उत्तर देऊन नोंदवहया अपुर्ण असल्याचे कळविल्याचे परिच्छेदात नमूद आहे. पुढे चलान व शेडयुल प्राप्त करून नोंदवहया अदयावत करण्यात आल्या आहेत.

तसेच मा.पंचायती राज समिती इतिवृत्तामध्ये याबाबत चर्चा होवून शासन हिस्साची रक्कम जमा करणेबाबत सुचित केले होते. ती कार्यवाही आजरोजी पूर्ण झाली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**ग्रामविकास विभाग यांचे अभिप्राय.—**जिल्हा परिषद यवतमाळ यांनी दिलेल्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणेबाबत किती कर्मचारी आणि अधिकारी यांच्यावर आपण कार्यवाही केलेली आहे, किती दंड वसूल केला आहे, किती लोकांवर प्रशासकीय कार्यवाही करण्यात आलेली आहे याबाबत माहिती देण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, सदर प्रकरणी जी कार्यवाही करण्यात आलेली आहे त्याबाबतचा प्रस्ताव माननीय विभागीय

आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात आलेले आहेत. सदर साक्षीमध्ये जे तीन मुद्दे आहेत त्याबद्दल आपल्या परवानगीने सांगू इच्छितो. पहिला मुद्दा खाजगी शाळेची तुकडी आणि नैसर्गिक वाढ बंद केल्यामुळे जी माहिती असते ती शिक्षणाधिकारी स्तरावर नसते. सदर बाबीचे रेकॉर्ड आणि अधिकार हे संचालक स्तरावर असतात. ऑडिटच्या वेळेस रेकॉर्ड मागविण्यात आले होते. परंतु ते उपलब्ध नसल्यामुळे किंवा तसे अधिकार नसल्यामुळे तशी ऑडिटच्या वेळेस माहिती देण्यात आली होती. दुसरा मुद्दा असा आहे की, सन २०१६-१७ चा वार्षिक लेखा मागविण्यात आला होता. जिल्हा परिषदेला खर्च करण्याकरिता एक वर्षाची आर्थिक मुदत असते. सन २०१६-१७ च्या लेख्यासाठी खर्च करण्याची मुदत मार्च २०१८ पर्यंत होती. सन २०१८ मध्ये सदर लेखा तयार झाला होता. माहे ऑक्टोबर, २०१८ च्या **राजपत्रा**मध्ये तो प्रसिद्ध देखील करण्यात आला होता. सदर मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने संचालक यांनी यासंदर्भात अधिक माहिती दिली की,जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम आणि लेखा संहितेतील तरतुदीनुसार ३० जूनला जिल्हा परिषदेचे वार्षिक लेखे अंतिम करून ते लोकल फंडकडून प्रमाणित करून घेण्यात यावेत व १५ नोव्हेंबरला ते **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात यावेत. दुसरी बाब अशी आहे की, लोकल फंडद्वारा जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाचे लेखापरिक्षण केले जाते तेव्हा त्या वार्षिक लेखा तपासणीसाठी १५ दिवसांचा कालावधी दिला जातो. उक्त १५ दिवसांमध्ये त्यांनी तो वार्षिक लेखा तपासावयाचा असतो. त्या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये परिच्छेद घेऊन त्यामध्ये तो वार्षिक लेखा अंतर्भूत केला पाहिजे. एकदा लेखापरिक्षण अहवाल प्रसिद्ध केल्यानंतर दोन वर्षांनी त्याला कुठलाही रिलीव्हर्स राहत नाही. तशा प्रकारची कायदेशीर तरतूद आहे. वार्षिक लेखा म्हणजे मासिक लेख्यांचे रूपांतर वार्षिक लेख्यामध्ये करणे. याबाबतची वेळीच कार्यवाही केली तर कुठे काही दुरुस्ती असेल तर ते करता येते. सर्वसाधारणपणे ३१ मार्चला वर्ष संपल्यानंतर अखेरची शिल्लक लोकल फंडला कळविण्याची तरतूद आहे. मागील दोन वर्षामध्ये १० एप्रिल पर्यंत शिल्लक कळविण्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. परिच्छादांच्या अनुषंगाने ही फक्त एकाच जिल्हा परिषदेची बाब नाही. माझ्याकडे पूर्ण राज्याचे स्टेटमेंट आहे. त्यामध्ये सन २०१६-१७ चे लेखे अजून अंतिम झालेले नाहीत. वार्षिक लेखे हा लेखापरिक्षणासाठी आत्मा असतो. आमच्या विभागाने त्या आधारेच लेखापरिक्षण करणे अपेक्षित असते. त्यामुळे आमचे सबमिशन आहे की, संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी व पंचायत समितीचे बीडीओ यांनी याबाबतची वेळीच कार्यवाही करणे गरजेचे आहे. हे वेळेत प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. आपल्या कायद्यामध्ये ज्या तरतुदी दिलेल्या आहेत, त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत ३० जूनला वार्षिक लेखे अंतिम झाले पाहिजेत. कायद्यामध्ये बदल झाला तरच यामध्ये सूट मिळेल अन्यथा आपल्याला ते पूर्ण करणे गरजेचे आहे. सध्या चालू वर्षाच्या लेखापरिक्षणाची व जे लेखे प्रमाणित केले गेले नाहीत अशा लेखांची कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे या कालावधीत सदर प्रकरणे प्रकर्षाने सबमिट करावेत. वास्तविक पाहता ज्या कालावधीचे लेखापरिक्षण झाले आहे, त्याचे वार्षिक लेखे आज आम्ही तपासण्यात कुठलाही अर्थ नाही. जर सदर प्रकरणे सबमिट केले तर चालू वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये त्या वर्षाचा संदर्भ देऊन त्याला पूरक अहवाल म्हणून तशा प्रकारच्या लेखा आक्षेपांची आम्ही नोंद घेऊ. यावर समितीने संचालकाला विचारणा केली की, याच संदर्भात किती लेखा आक्षेप काढण्यात आले होते, त्यापैकी आज रोजी किती आक्षेप प्रलंबित आहेत, त्या माध्यमातून शासनाची अजून किती रक्कम वसूल होणे अपेक्षित आहे. यावर संचालकानी समितीला उत्तर दिले की, सन १९६२ ते सन २०१९-२० पर्यंत जिल्हा परिषदेचे १ लाख ८९ हजार ८०० व पंचायत समितीचे ९७ हजार असे एकूण २ लाख ८७ हजार परिच्छेद प्रलंबित आहेत. सद्यःस्थिती सन २०२०-२१ चे लेखापरिक्षण सुरू आहे. पंचायत राज समितीने पुनर्विलोकन अहवालात गंभीर परिच्छेद म्हणून नमूद केलेले जिल्हा परिषदेचे ३१ हजार २२० तर पंचायत समितीचे १४ हजार ६९१ असे एकूण ४५ हजार ९११ परिच्छेद प्रलंबित आहेत. सदर परिच्छेद वगळण्याचे अधिकार संचालक स्तरावर आहेत. द्दत्यामुळे ग्राम विकास विभागाने यासाठी वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे, विभागीय आयुक्तांच्या स्तरावर समित्या देखील घटित केलेल्या आहेत. आमच्या विभागाचे सहसंचालक हे या समित्यांचे सदस्य आहेत. त्यांनी एक कालबद्ध कार्यक्रम आखून परिच्छेद पडताळणी करावी. त्यासाठी गरजेनुसार कॅम्प लावावेत. पीआरसीबाबत सांगावयाचे झाले तर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची उत्तरे तयार असतील तर संचालकांनी प्रत्येक जिल्हा परिषदेला भेट देऊन १०० परिच्छेद वगळण्याची कार्यवाही करावी. संबंधितांनी राज्याच्या ठिकाणी सर्व रेकॉर्ड घेऊन येऊ नये. कारण मूळ रेकॉर्ड पाहिल्यानंतरच परिच्छेद वगळला जातो. या अनुषंगाने माननीय अपर मुख्य सचिव, ग्राम विकास यांच्याद्वारे सर्व विभागीय आयुक्तांना सूचित करण्यात आलेले आहे. जेवढे प्रलंबित परिच्छेद आहेत त्या सर्व परिच्छेदांचे अनुपालन वेळेत सादर करून जास्तीत जास्त परिच्छेद कसे वगळले जातील यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. वर्षानुवर्षे जुने असलेले परिच्छेद क्षुल्लक कारणासाठी वगळलेले नाहीत. लेखा संहितामध्ये अशी तरतूद आहे की, प्रयत्न करूनही एक हजार रुपयांपर्यंतची वसुली होत नाही अशा परिच्छेदांबाबत एक प्रमाणपत्र देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांच्या स्तरावर अनुपालन सादर करून लोकल फंडकडून ते परिच्छेद वगळून घेऊ शकतात. अशा पद्धतीने कार्यवाही केली तर मोठ्या प्रमाणावर परिच्छेद वगळले जाऊ शकतात. आज परिस्थिती अशी आहे की, मागील दहा ते पंधरा वर्षापूर्वीचे रेकॉर्ड पाहायला गेलो तर सदर रेकॉर्ड उपलब्ध होत नाहीत आणि रेकॉर्ड उपलब्ध न झाल्यामुळे अनुपालन होत नाही. त्यामुळे याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. वारंवार त्याच त्याच चुका काढणे हा लेखापरिक्षणाचा उद्देश नाही. वसुली झालेले परिच्छेद वगळण्यात यावेत. अनेक प्रकरणांमध्ये वसुली झाली नाही परंतु ॲथॉरिटी चुकलेली आहे व **नॉनव्हॅल्यू** असलेले मोठ्या प्रमाणावर परिच्छेद प्रलंबित आहेत. सदर परिच्छेद सादर केले तर परिच्छेदांची संख्या कमी होईल, असे मला

वाटते. तसेच मी आताच लेखा संहितेमधील तरतुदीबाबत माहिती दिलेली आहे. उक्त तरतुदीनुसार कार्यवाही केली तर मला वाटते ५० हजार परिच्छेद कमी होऊ शकतात.

यावर समितीने संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा यांना विचारणा केली की, लहान-लहान परिच्छेद वगळण्याची आपली जाबाबदारी आहे. कारण तीन-तीन महिने राहून लेखापरिक्षणाची कार्यवाही केली जाते. ५० हजार ते २ लाख रुपयांपर्यंतचे परिच्छेद जिल्हा स्तरावर वगळू शकतात. जिल्हा स्तरावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी सदर परिच्छेदांवर स्पष्टीकरण देऊ शकतात. वित्त विभागाचे प्रधान सचिव यांच्यासोबत चर्चा करून याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. यावर संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांनी अशी माहिती दिली की, महालेखाकार (एजी) ऑडीटमध्ये (लेखापरिक्षण) Entry Conference And Exit Conference असते त्यापद्धतीने संबंधित खाते प्रमुख आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निमंत्रित करून लेखापरीक्षा कालावधीत सर्व उपलब्ध परिच्छेद सादर करण्यात यावेत, असे आम्ही त्यांना सांगतो. लेखापरिक्षणानंतर अहवाल वाचनावेळी सर्व साधारण परिच्छेदाचे अनुपालन दिले तर उक्त परिच्छेद वगळण्याबाबत एक परिपत्रक निर्गमित करून सूचना देण्यात येतील तसेच अलीकडकच्या काळामध्ये या समितीने नंदुरबार, अमरावती आणि जळगाव या तीन जिल्ह्यांना भेटी दिलेल्या आहेत. या तीन जिल्ह्यांच्या भेटीदरम्यान जे संदर्भ समितीपुढे आले होते, त्यासंदर्भात एक परिपत्रक निर्गमित करून या समितीचे समिती प्रमुख व ग्राम विकास विभागाच्या सचिवांना सादर केलेले आहे. जेव्हा एखादे ऑडीट केले जाते तेव्हा संबंधित खाते प्रमुख किंवा गट विकास अधिकारी यांच्यासमोर त्या लेखापरिक्षण अहवालाचे वाचन केले जाते. त्यांच्या सहमतीने किंवा संबंधित अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केल्यानंतरच सदर अहवाल निर्गमित केला जातो.

तदनंतर विभागीय सचिवांनी समितीला असे विदीत केली की, १५ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या निधीला केंद्र सरकारने पीएफएमएस अनिवार्य केलेले आहे. एकही रुपया चेक किंवा अन्य पद्धतीने खर्च करता येणार नाही. सर्व पैसे ऑनलाईन पद्धतीनेच खर्च करावयाचे आहेत. केंद्र सरकार लेखापरिक्षण देखील ऑनलाईन पद्धतीने करीत आहे. ऑनलाईन पद्धतीने लेखापरिक्षण करण्यासाठी देखील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देत आहोत. यावर संचालकांनी त्यानी दिलेल्या माहितीवर होकारार्थी संमती दर्शविली.

त्यावर विभागीय सचिव यांनी अधिकची माहिती दिली की, आता झेडपी एफएमएस प्रणाली सुरू केली आहे. त्या माध्यमातून जिल्हा परिषदेचे सर्व अनुदान ऑनलाईनद्वारे दिले जाते व त्यामध्ये खर्चाची माहिती दिली जाते. यामध्ये थोडी सुधारणा करून त्यांनी जिल्हा परिषदेचे लेखापरिक्षण ऑनलाईन पद्धतीने सुरू केले तर अधिक सोयीचे होईल. आपण आता लेखापरिक्षणाची कार्यवाही प्रायोगिक तत्वावर ऑनलाईन पद्धतीने करण्यास सुरुवात केली तर पूर्वी येणाऱ्या जुन्या सर्व अडचणी दूर होतील, असे मला वाटते. यावर संचालक यांनी अशी माहिती दिली की, सन २०१२-१३ पर्यंत परिच्छेद वगळण्याचे संदर्भ फिजिकली घेतले जात होते. परंतु सन २०१३-१४ नंतर ते संदर्भ ऑनलाईन पद्धतीने घेतले जात आहेत. यावर समितीने असे निदेश दिले की, सचिव यांनी केलेल्या सुचनेच्या अनुषंगाने समितीच्या माध्यमातून योग्य त्या शिफारशी करण्यात येतील. शासनाचा कोट्यवधी निधी गुंतलेला असल्यामुळे आपण लवकरात लवकर प्रलंबित परिच्छेदाबाबत वित्त विभागाच्या सचिवांची चर्चा करून धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. यावर विभागीय सचिव यांनी होकारार्थी सहमती दर्शविली.

तदनंतर संचालक यांनी समितीला अशी माहिती दिली की, परिच्छेदामध्ये आक्षेपाधिन, वसूल पात्र व तात्पुरती अमान्य असे तीन प्रकार असतात. आक्षेपाधिन आणि तात्पुरती अमान्य परिच्छेदातील रक्कम मोठी दिसत असली तरी ती रक्कम वसूल होणारी नाही. वसूल पात्र परिच्छेदातील रक्कम चलनाने भरल्याशिवाय तो परिच्छेद निकाली निघू शकत नाही. आक्षेपाधिन परिच्छेदातील किरकोळ त्रुट्या दूर करतील तेव्हा तो परिच्छेद वगळण्यात येतो आणि ती रक्कम कमी करण्यात येते. परंतु उक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने उत्तर देणे बंधनकारक आहे.

समितीचे सचिव यांनी अशी विचारणा केली की, आपण आता अशी माहिती देत आहात. परंतु ऑडीटच्या माध्यमातून असे होत नाही. ऑडीटमध्ये अपहार झाला असे नमूद केले जाते. यावर संचालक यांनी विदित केले की, ऑडीट स्वतःचे डोके कोठेही लावत नाही. उक्त विषयाच्या अनुषंगाने जी कागदपत्रे सादर केलेली आहेत, त्यानुसार ऑडीट केले जाते. जेवढ्या परिच्छेदाचे अनुपालन द्याल आणि जेवढे कागदपत्रे सादर कराल तेवढे परिच्छेद कमी निघतील. यावर समितीने होकारार्थी सहमती दर्शविली.

**अभिप्राय व शिफारशी :**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या दिनांकास लेखापरिक्षण सुरू करण्यात येणार आहे. त्या दिनांकाबाबत आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबधित जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना देण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यानंतर आवश्यक अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषदांना अर्धसमास पत्राने अभिलेखे उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात येते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिलेला असतानाही लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध करून दिली

जात नाहीत. यवतमाळ जिल्हा परिषदेचे लेखापरिक्षण करण्यात आले त्यावेळेस जिल्हा परिषदेच्या शिक्षण, वित्त व भविष्य निर्वाहनिधी संदर्भातील महत्त्वाचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही सदरहू अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याने हे परिच्छेद लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

यासंदर्भात जिल्हा परिषद, यांच्याकडून सादर करण्यात आलेली माहिती, मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिव यांच्या घेण्यात आलेल्या साक्षीत समितीस माहिती प्राप्त झाली की, सन २०१६-२०१७ मध्ये खाजगी शाळांकडून तुकडी मान्यता व शाळेची मान्यता बाबत प्रस्ताव, अनुदान मंजुरीबाबत प्रस्ताव, शिक्षक सेवकांना वेतन श्रेणी लागू करण्याबाबतचे प्रस्ताव, जिल्ह्यातील संस्थेचे व शाळेचे हस्तांतरण/स्थलांतरण मंजुरीचे प्रस्ताव व अल्पसंख्याक शाळेचे देखभाल/दुरूस्ती व साहित्य खरेदीचे प्रस्ताव प्राप्त झाले नसल्याने याबाबतचे दस्ताऐवज निरंक आहेत. तसेच खाजगी शाळेची तुकडी आणि नैसर्गिक वाढ बंद केल्यामुळे जी माहिती उपलब्ध असते ती शिक्षणाधिकारी स्तरावर नसते तर या सर्व बाबींचे अभिलेखे व अधिकार संचालक स्तरावर असतात. सदरहू बाब लेखापरिक्षणाच्या वेळी लेखापरिक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती.

जिल्हा परिषद, यवतमाळ अंतर्गत १६ पंचायत समिती व १५ विभाग असून सर्व विभाग/पंचायत समिती यांचेकडून जमा खर्चाचे लेखे प्राप्त झाल्यानंतर लेखाशिर्षानिहाय एकत्रीकरण करून वार्षिक लेखा तयार करण्यात येतो. या संपूर्ण प्रक्रियेस बराच अवधी लागतो. सन २०१६-२०१७ च्या लेख्यासाठी खर्च करण्याची मुदत माहे मार्च, २०१८ पर्यंत होती. लेखापरिक्षणाच्या वेळी सन २०१६-२०१७ चा वार्षिक लेखा तयार नसल्याने दर्शविण्यात आला नाही. या वार्षिक लेखाचे नियमाप्रमाणे लेखापरिक्षण करून शासनाच्या **राजपत्रात** माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे.

नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना व भविष्य निर्वाहनिधीबाबत विभाग व पंचायत समितीकडून जमा रकमांचे शेड्युल व चलन विहित वेळेत प्राप्त न झाल्याने जमा खर्चाचा हिशेब अद्ययावत नव्हता त्यामुळे लेखापरिक्षणास सदरहू माहिती देता आली नाही. पुढे चलान व शेड्युल प्राप्त करून नोंदवह्या अद्ययावत करण्यात आल्या आहेत.

लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध न करून देण्यासंबंधित या महत्त्वाच्या विषयावरील साक्षीमध्ये स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाचे संचालक यांनी समितीच्या निदर्शनास आणले की, **"सन १९६२ ते २०१९-२०२० पर्यंत जिल्हा परिषदेचे १ लाख ८९ हजार ८०० व पंचायत समितीचे ९७ हजार असे एकूण २ लाख ८७ हजार परिच्छेद प्रलंबित आहेत. त्यापैकी गंभीर स्वरूपाचे जिल्हा परिषदेचे ३१ हजार २२० तर पंचायत समितीचे १४ हजार ६९१ असे एकूण ४५ हजार ९११ परिच्छेद प्रलंबित आहेत."**

मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० मधील कलम (३) व कलम (६) नुसार लेखापरिक्षणास विहित वेळेत सर्व कागदपत्रांसह अभिलेखे उपलब्ध करून देणे बंधनकारक असून लेखापरिक्षकांचे आक्षेप असल्यास त्याच वर्षी अभिलेखे सादर करून आक्षेप दूर करण्याबाबत आदेशित केले आहे. परंतु यवतमाळ जिल्हा परिषदेचे लेखापरिक्षण सुरू असताना लेखापरिक्षकांना शिक्षण, वित्त व भविष्य निर्वाह निधी संदर्भातील अभिलेखे विहित वेळेत उपलब्ध करून न दिल्याने सदरहू परिच्छेद लेखापरिक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. या आक्षेपाच्या अनुषंगाने समितीस प्राप्त झालेल्या माहितीनुसार असेही निदर्शनास येते की, लेखापरिक्षणाच्या दिनांकाबाबत संचालक, स्थानिक निधी लेखा कार्यालय यांच्याकडून कळविण्यात आलेले असतानाही लेखापरिक्षणाची पूर्व तयारी जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत स्तरावर करण्यात आलेली नसल्याने परीक्षणासाठी आवश्यक असलेले अभिलेखे विहित वेळेत उपलब्ध झालेली नाहीत. तसेच आक्षेपांबाबतच्या अहवालाचे अंतिम वाचन करत असतानाही या प्रकरणाबाबतचे अभिलेखे सादर करणे अथवा त्यासंदर्भात योग्य स्पष्टीकरण देऊन परिच्छेद वगळण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही. **याकरिता यापुढे जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम व लेखा संहितेतील विहित केलेल्या दिनांकानुसार जिल्हा परिषदेचे वार्षिक लेखे अंतिम करून स्थानिक निधी लेखा कार्यालयाकडून प्रमाणित करून घेण्यासह विहित वेळेत राजपत्रात प्रसिद्ध करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करावी. तसेच नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना व भविष्य निर्वाह निधीबाबत विभाग व पंचायत समितीकडून जमा रकमांचे शेड्युल व चलान विहित वेळेत प्राप्त करून जमा खर्चाचा हिशेब अद्ययावत ठेवण्याबाबत संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि पंचायत समितींच्या गट विकास अधिकारी यांनी दक्षता घ्यावी यासाठी त्रैमासिक आढावा घेण्याचे बंधन उक्त अधिकाऱ्यांवर टाकण्यासंदर्भात शासनाने तातडीने परिपत्रक निर्गमित करावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात शासनाच्या विविध कल्याणकारी व विकासाच्या योजना राबविण्यात येतात. यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त होत असतो. तसेच जिल्हा परिषदाही त्यांच्या स्वनिधीच्या अंदाजपत्रकात विकास कामांकरिता निधीची तरतूद करत असते. सदरहू निधी योग्य प्रकारे खर्च झाला आहे काय याबाबतचे लेखापरिक्षण स्थानिक

निधी लेखापरीक्षा संचालनालय यांच्या कार्यालयाकडून करण्यात येते. लेखापरिक्षण करत असताना पुनर्प्रत्ययी परिच्छेद, मोघम व किरकोळ स्वरूपाचे परिच्छेद आवश्यक ती पुर्तता करून वगळणे आवश्यक असून अपहार, अतिप्रदान व गंभीर स्वरूपाची अनियमितता/गैरव्यवहार व त्यानुषंगाने रक्कम वसुली इत्यादी प्रकारचे महत्त्वाचे परिच्छेदच पंचायती राज संस्थानच्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट झाले पाहिजेत असे समितीचे स्पष्ट मत आहे.

जिल्हास्तरावर लेखापरिक्षणात काढण्यात आलेले आक्षेप व या आक्षेपांचा निपटारा जलदरीत्या होण्यासाठी जिल्हा परिषदांकडून योग्य प्रकारे कार्यवाही होत नाही. तसेच यासाठी जिल्हा स्तरावर व विभागीय स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितींच्या बैठकीत लेखा आक्षेपांचे अनुपालन तपासून मान्य करणे हे काम समाधानकारक होत नसल्याने मोठ्या प्रमाणात आक्षेपांचे परिच्छेद प्रलंबित राहतात. **यामधील वर्षानुवर्ष जुने, मोघम व किरकोळ स्वरूपाचे परिच्छेद तपासून वगळण्याबाबत योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे. प्रयत्न करूनही एक हजार रूपयांपर्यंतची वसुली होत नसेल असे परिच्छेद तपासून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर अनुपालन सादर करून परिच्छेद वगळण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. काही परिच्छेदांबाबत अनेक वर्षांपूर्वीचे अभिलेखे उपलब्ध होत नसल्याने अनुपालन सादर करणे शक्य होत नाही. असे परिच्छेद तपासून वगळण्याबाबतची कार्यवाही होणे आवश्यक आहे. आक्षेपाधिन व तात्पुरती अमान्य परिच्छेदांमधील रक्कम मोठ्या प्रमाणात निदर्शनास येत असली तरी सदरहू रक्कम वसूल होणार नाही व वसूल पात्र परिच्छेदांतील रक्कम चलनाने भरल्याशिवाय तो परिच्छेद निकालीही काढता येणार नाही. अशा परिच्छेदांबाबत निर्णय जबाबदारीने घेऊन आक्षेपाधिन परिच्छेद त्यातील बाबींची नियमानुसार पुर्तता केल्यानंतर सदरचे आक्षेप वगळण्याबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. आक्षेपांचा तात्काळ निपटारा करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय लेखापरीक्षा समितीच्या बैठकांचा वार्षिक कार्यक्रम निश्चित करून प्रलंबित आक्षेपांचे अनुपालन तयार करण्याबाबत योग्य त्या सूचना संबंधित खातेप्रमुख व गट विकास अधिकारी यांना निर्गमित कराव्यात. परिच्छेदांचे अनुपालन तयार झाल्यानंतर शिबिर आयोजित करून मुख्य लेखापरिक्षक यांना निमंत्रित करून प्रलंबित परिच्छेद वगळण्याबाबतची आढावा घेऊन त्यानंतर रितसर कार्यवाही करण्यात यावी. तसेच राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स अंतर्गत स्थानिक निधी लेखापरीक्षा विषयक कामांच संगणकीयकरण तातडीने पूर्ण करून अहवालातील परिच्छेदांचे अनुपालन विषयक कामे, लेखापरिक्षण अहवाल निर्गमन, अहवालाचे अनुपालन व लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल निर्मिती इत्यादी कामे जलद गतीने होण्यासाठी जिल्हा परिषद/ पंचायत समित्या/ग्रामपंचायत स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण देण्यात यावे व उपरोक्त नमूद केलल्या मुद्यांबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

# प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, यवतमाळ

## सर्वसाधारण शिफारशी

**(१) गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :**

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः **यवतमाळ** जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या रक्कमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देशित केले आहे. सदर गैरव्यवयहाराची / अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी ती वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रक्कमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून वसूल केल्या असत्या तर या रक्कमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या, शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरित परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियिमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोप पत्र दाखल करून असे प्रकरण सहा महिन्यांत निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रूपयांचा निधी तरतूद करून मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रूपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारे होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्टया अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्त्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत शासनाविषयी नाराजी व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यता यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रक्कमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून यवतमाळ जिल्हा परिषदेमधील रकमा शासन खाती **जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(२) लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे :**

समितीने **यवतमाळ** जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखापरिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती ती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध**

**असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परिक्षक सुरुवातीला कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असून देखील संबंधित अधिकारी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देता नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम,१९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १००/- रूपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,०००/- रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परिक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तरतूदीनुसार रुपये २५०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार यवतमाळ जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची प्रकरणनिहाय संपूर्ण माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(३) नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरून समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरूद्ध जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केली जात नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण अंगिकारल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करू नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निःपक्षपातीपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषीविरूद्ध कार्यवाही करून त्याच शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास ती समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्त्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवत व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल. परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करून "दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती" या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट – "अ"
# शासनाचे आदेश व परिपत्रके

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी
प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण सेवक
योजना लागू न करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक: पीआरई-२००६/(५११८/०६)/प्राशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक २५ मे, २००९

**वाचावे :-** १ ) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग, क्रमांक:पीआरई-२००२/(३३९५/०२)/प्राशि-१, दिनांक २७ फेब्रुवारी, २००३
२ ) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग, क्रमांक:एसएसएन-१०९९/(३४०/९९)/माशि-२, दिनांक २६ एप्रिल, २००६

**प्रस्तावना :-** राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित किंवा अंशत: अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय, अध्यापक विद्यालय व सैनिकी शाळा यांना शिक्षण सेवक ही योजना लागू न करण्याचे व अशा शाळांमध्ये नियुक्त करण्यात आलेले सहशिक्षक नियमित वेतनश्रेणीत कार्यरत राहतील असे आदेश शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र.एसएसएन-१०९९/(३४०/९९)/माशि-२, दिनांक २६ एप्रिल, २००६, दिनांक २६.४.२००६ च्या अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

२. शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक:पीआरई-२००२/(३३९५/०२)/प्राशि-१, दिनांक २७ फेब्रुवारी, २००३ च्या अन्वये राज्यातील जिल्हा परिषदा/ नगरपालिका/ नगरपरिषदा/ शिक्षण मंडळे, नगरपालिका, महानगरपालिका व कटक मंडळाच्या प्राथमिक शाळांना तसेच मान्यताप्राप्त अनुदानित, अंशत: अनुदानित व विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांमधून मानधन तत्वावर शिक्षण सेवक नियुक्त करण्याची योजना सुरु करण्यात आली. ही योजना मान्यता प्राप्त खाजगी कायम विनाअनुदानित प्राथमिक शाळांना लागू नव्हती. यास्तव, मान्यता प्राप्त खाजगी माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय, अध्यापक विद्यालय व सैनिकी शाळा यांच्या प्रमाणेच राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित किंवा अंशत: अनुदानित प्राथमिक शाळांना शिक्षण सेवक योजनेतून वगळण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग, क्रमांक:पीआरई-२००२/ (३३९५/०२)/ प्राशि-१, दिनांक २७ फेब्रुवारी, २००३ अन्वये राज्यात सुधारित शिक्षण सेवक योजना लागू कण्यात आलेली आहे. त्या शासन निर्णयाच्या जोडपत्रातील परिच्छेद क्र.१८ मध्ये शिक्षण सेवक योजना लागू नसलेल्या संवर्ग नमूद केलेला आहे त्यात खालील बाबीचाही समावेश करण्यात यावा.-

अ) राज्यातील १०० टक्के विनाअनुदानित किंवा अंशत: अनुदानित तत्वावर शासन मान्यता दिलेल्या प्राथमिक शाळांना शिक्षण सेवक ही योजना लागू राहणार नाही.

ब) या शाळेतील योग्य मार्गाने नियुक्त झालेल्या सहशिक्षक पदावरील नियुक्त्या नियमित स्वरुपाच्या राहतील.

३. हे आदेश सन २००९-१० च्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत आहेत.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००९०५२५१३१३४०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( झं.सा.रणदिवे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

शिक्षण संचालक (प्राथमिक ) महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
सर्व जिल्हाधिकारी
सर्व शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) जिल्हा परिषदा
सर्व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ
सर्व मुख्य कार्यकारी, विदर्भ व मराठवाडयातील नगरपालिका
सर्व शिक्षणाधिकारी, महानगरपालिका/शिक्षण मंडळे
महालेखापाल, ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर
महालेखापाल ( लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा कोषाधिकारी
सर्व अधीक्षक, वेतन पथक ( प्राथमिक )
वित्त विभाग/ नियोजन विभाग/ सामान्य प्रशासन विभाग / ग्राम विकास व जलसंधारण विभाग / आदिवासी
विकास विभाग / सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग / रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, सर्व कार्यासने
निवड नस्ती, प्राशि-१

**राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण सेवक योजना लागू न करण्याबाबत ...**

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

**शासन निर्णय क्र.पीआरई-२०११/प्र.क्रं. ११७/प्राशि १**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.

**दिनांक :- १९** मार्च **२०१२**

**पहा:-**
१) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग पीआरई-२००२/(३३९५/०२)/प्राशि-१, दिनांक २७/०२/२००३
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन - १०९९ / (३४०/९९) / माशि -२, दिनांक २६/०४/२००६
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. पीआरई - २००६ / (५११८/०६) /प्राशि -१ दिनांक २५/०५/२००९

**शासन निर्णय -**

राज्यात शिक्षणसेवक ही योजना मान्यताप्राप्त १०० टक्के अनुदानित माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक विद्यालये, सैनिकी शाळा यामध्ये सुरू करण्यात आलेली आहे. विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या व अंशत: अनुदानित शाळांना ही योजना लागू नाही. या शाळातील सह शिक्षक पदावरील नियुक्त्या नियमित स्वरुपात राहतील असे संदर्भांधीन २६ एप्रिल, २००६ च्या शासन निर्णयान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार प्राथमिक शाळांच्याबाबतीत ही बाब स्पष्ट करण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन २५ मे, २००९ च्या शासन निर्णयान्वये स्पष्टीकरण करण्यात आले. तथापि, सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ येथे " हे आदेश सन २००९-१० च्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत आहेत. " असे नमूद करण्यात आले आहे. शिक्षण सेवक योजना विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळांना लागू नसल्याने सदर वाक्य वगळण्यात येत आहे. प्राथमिक शाळांच्या बाबतीत उक्त दिनांक २६ एप्रिल, २००६ चे आदेश लागू राहतील.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१२०३१९०५२३५०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( वि.फ. वसावे)
**कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
मा.मंत्री(शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री(शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक(प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद.
निवड नस्ती प्राशि - १.

राज्यातील दिनांक ३ ते ५ ऑक्टोबर,२०११ या कालावधीत विद्यार्थी उपस्थितीबाबत राबविण्यात आलेल्या विशेष पटपडताळणी मोहीमेच्या आधारावर करावयाच्या कारवाई बाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय, क्रमांक:संकीर्ण-२०११/( ४४७/११)/(अ)/प्राशि-३
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०२ मे, २०१२.

संदर्भ :- (१) शासन परिपत्रक, क्रमांक:संकीर्ण-२०११/(४४७/११)/(अ)/प्राशि-३, दिनांक१९सप्टेंबर, २०११,
(२) शासन निर्णय, क्रमांक:संकीर्ण-२०११/(४४७/११)/प्राशि-३, दिनांक २९ नोव्हेंबर, २०११,

प्रस्तावना :-

(१) भारतीय संविधानामधील तरतूदीनुसार राज्यातील सर्व मुलांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. यासाठी राज्य शासनाने सर्व दूरवर शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनामार्फत प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळा चालविण्यात येतात. तसेच सामाजिक न्याय व आदिवासी विभागा अंतर्गत निवासी शाळा व आश्रम शाळा सुध्दा चालविण्यात येतात.

(२) राज्यामध्ये सुमारे १ लाख शाळा सुरु असून त्यात सुमारे २ कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शालेय शिक्षण विभागाची एकूण मंजूर अर्थसंकल्पिय तरतूद सुमारे रुपये २९००० कोटी एवढी असून यापैकी सुमारे ८७ टक्के निधी या सर्व शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्ती वेतनावर खर्च केला जातो. तसेच विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, मोफत पाठयपुस्तके, शालेय पोषण आहार, इत्यादी सुविधा वर खर्च केला जातो.

(३) गेल्या काही वर्षापासून शाळेमध्ये बोगस विद्यार्थी नोंदविणे, गुणवत्तापुर्वक शिक्षण न देणे, पटावर जास्त विद्यार्थी दर्शवून जादा तुकडयांची मागणी करणे, गरज नसतांना जादा शिक्षकांच्या नियुक्त्या करणे, एकाच मुलाचे नाव अनेक शाळांच्या पटावर असणे, फसवणूक करुन शासकीय अनुदान लाटणे, विद्यार्थी व पालक यांना आमिष दाखवून एका शाळेतील विद्यार्थी दुसऱ्या शाळेत पळविणे, इत्यादी अशा प्रकारच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आणण्यात येत होत्या.

(४) म्हणून वरील तक्रारी लक्षात घेता, या सर्व बाबींची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर नांदेड जिल्हयामध्ये विद्यार्थी विशेष पटपडताळणी मोहिम राबविण्याचा शासनाने दिनांक २४ ऑगस्ट,२०११ रोजी निर्णय घेतला. त्यानुसार नांदेड जिल्हयामध्ये दिनांक ७ ते १० सप्टेंबर, २०११ या कालावधीत सार्वत्रिक निवडणूकीच्या धर्तीवर शालेय शिक्षण विभागाच्या कर्मचाऱ्यांशिवाय पटपडताळणी मोहिम राबविण्यात आली.

(५) नांदेड जिल्हयात राबविण्यात आलेल्या विशेष पटपडताळणी मोहिमेमध्ये, खालील बाबी दिसून आल्या :-

(i) शाळेमध्ये पटपडताळणी केलेले विद्यार्थी व प्रत्यक्ष शाळेमध्ये उपस्थित असलेले विद्यार्थी यामध्ये मोठी तफावत असणे,

(ii) अन्य जिल्हयातील विद्यार्थ्यांची उपस्थिती दर्शविणे,

(iii) एकाच विद्यार्थ्याला सकाळपाळी व दुपारपाळी मध्ये उपस्थित करण्याचा प्रयत्न करणे,

(iv) एकाच विद्यार्थ्याचे नाव अनेक शाळांच्या पटावर दाखविणे,

(v) जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुले खाजगी शाळांमध्ये आणून बसविणे,

(vi) विद्यार्थ्यांना आमिष दाखविणे,

(vii) शाळांमध्ये भौतिक सुविधा नसतांना तात्पुरत्या भौतिक सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, इत्यादी.

(viii) नांदेड जिल्हयामध्ये राबविण्यात आलेल्या विशेष पटपडताळणी मोहिमेमध्ये जिल्हयातील शाळांमध्ये साधारणत: एकूण १,४०,१९५ विद्यार्थी शाळेत हजर नसल्याचे किंवा पटावर खोटी नोंद असल्याचे दिसून आले.

(६) नांदेड जिल्हयामध्ये राबविण्यात आलेल्या वरील मोहिमेचा अहवाल लक्षात घेता, शासनाने राज्यातील सर्व जिल्हयामध्ये तक्रारींची सत्यता तपासण्यासाठी विशेष पटपडताळणी मोहिम राबविण्याचा निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०११ रोजी घेतला. वरील शासन निर्णयानुसार प्रत्येक जिल्हयामध्ये त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली सार्वत्रिक निवडणूकीच्या धर्तीवर व तत्वानुसार शिक्षण विभागाच्या कर्मचाऱ्याशिवाय दिनांक ३ ते ५ ऑक्टोबर,

२०११ या कालावधीत विशेष पटपडताळणी मोहिम राबविण्यात आली. मोहिमेत स्पष्ट करण्यात आले होते की, गैरप्रकार करणाऱ्या शिक्षण अधिकारी व शाळेचे मुख्याध्यापक यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल असे या शासन निर्णयामध्ये स्पष्ट करण्यात आले होते.

(७) वरील अहवालावरून खालील बाबी दिसून आल्या. :-

(७.१) राज्यातील एकूण १,००,८८७ शाळांमध्ये पटनोंदणीप्रमाणे नोदविलेली पटसंख्या २,०३,६९,६३८ एवढी असली तरी, उपस्थिती विद्यार्थ्यांची संख्या १,८२,९९,११८ अशी असून अनुपस्थित विद्यार्थ्यांची संख्या २०,७०,५२० (१०.१६%) एवढी होती.

(७.२) जास्त अनुपस्थितीचे प्रमाण खाजगी विनाअनुदानित (इंग्रजी शाळा वगळून)(१४.११%), कायम विना अनुदानित उच्च माध्यमिक (१३.२६%), खाजगी अनुदानित/अंशत: अनुदानित (१०.८४%), म.न.पा./ न.पा./कटक मंडळे (१६.५९%), अपंग शाळा (२७.०२%), सामाजिक न्याय विभाग (२२.७९%), आदिवासी विकास विभाग (१३.४२%), असे होते.

(७.३) (अ) २० ते ४९.९९% अनुपस्थिती असलेल्या शाळांची संख्या:- ९,६८७

(ब) ५०% पेक्षा जास्त अनुपस्थिती असलेल्या शाळांची संख्या :- २६५९

(८) राज्यातील सर्व जिल्हयामध्ये दिनांक ३ ते ५ ऑक्टोबर, २०११ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष पटपडताळणी अहवालाचे विश्लेषण करून आणि तद्नुषंगिक गैरव्यवहाराचे निराकरण करण्याच्या व पुढील रुपरेषा ठरविण्याच्या दृष्टीने शिफारशी करण्याकरिता दिनांक २९.११.२०११ च्या शासन निर्णयान्वये मुख्य सचिव, महाराष्ट्र यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. सदर समितीच्या दिनांक ४.१.२०१२, दिनांक १६.१.२०१२, दिनांक २३.१.२०१२ आणि दिनांक ३०.१.२०१२ रोजी अशा एकूण चार बैठका आयोजित केल्या होत्या. शालेतील बोगस विद्यार्थी शोधून काढणे, शाळांमध्ये शिक्षणाची शिस्त लावणे, व शासकीय निधीचा अपव्यय टाळणे, इत्यादी उपाययोजना करण्यासाठी समितीकडे प्राप्त झालेल्या

विशेष पटपडताळणी मोहिमेच्या अहवालाचे तुलनात्मक विश्लेषण व या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून समितीने एकूण १७ शिफारशी केल्या आहेत. सदर शिफारशींच्या अनुषंगाने निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

(१) मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने केलेल्या शिफारशी व इतर सर्व बाबी विचारात घेवून शाळेमध्ये शैक्षणिक अनुशासन निर्माण करणे, शासकीय निधीचा अपव्यय टाळणे आणि शैक्षणिक क्षेत्रात वाढत असलेल्या अपप्रवृत्तीला आळा घालणे, इत्यादी संदर्भात ठोस कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे. :-

(१.१) एकाच गावामधील प्राथमिक शाळेला व माध्यमिक शाळेला इयत्ता पाचवी ते सातवीचे वर्ग जोडलेले आहेत अशा ठिकाणी पुरेसे विद्यार्थी उपलब्ध असल्यास ते तसेच चालू ठेवावेत. मात्र ज्या शाळांमध्ये पुरेसे विद्यार्थी उपलब्ध नाहीत अशा शाळांचे इयत्ता पाचवी ते सातवीचे वर्ग एकाच शाळेला जोडावेत व विहित प्रक्रियेच्या माध्यमातून वर्ग बंद करून संबंधित शिक्षकांचे अन्यत्र समायोजन करण्यात यावे.

(१.२) इथून पुढे प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षक निश्चितीसाठी दिनांक १५ जुलैचा पट विचारात घेतला जावा.

(१.३) ज्या शाळांतील विद्यार्थी अनुपस्थिती २० टक्के पेक्षा जास्त आहे, अशा शाळांची मान्यता रद्द कां करण्यात येवू नये, याबाबत शिक्षण विभागामार्फत कारणे दाखवा नोटीस देवून, योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(१.४) ज्या शाळांतील विद्यार्थी अनुपस्थिती ५० टक्के पेक्षा जास्त आहे, अशा संस्थेविरुध्द व मुख्याध्यापक यांचे विरुध्द फौजदारी स्वरुपाचे

गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात यावी. व विहित पध्दतीने त्या शाळांची मान्यता काढून घेण्याची कार्यवाही सुरु करावी.

(१.५) ५० टक्के पर्यंत अनुपस्थिती असलेल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेच केवळ अन्य शाळांमध्ये समायोजन करण्यात यावे.

(१.६) ५० टक्के पेक्षा जास्त विद्यार्थी अनुपस्थिती असलेल्या शाळांची सन २०११-१२ या वर्षाची संच मान्यता देण्यापूर्वी, ज्या अधिकाऱ्यांनी शाळेची पटपडताळणी केली असेल, त्या अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्यात यावी व आवश्यक वाटल्यास त्यांना निलंबित करण्यात यावे.

(१.७) ५० टक्के पेक्षा जास्त विद्यार्थी अनुपस्थिती असलेल्या शाळांमधील कार्यरत शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरवून त्यांचे समायोजन न करता त्यांच्या सेवा समाप्त करण्यात याव्यात.

(१.८) अतिरिक्त ठरलेले शिक्षक १००% समायोजित झाल्याशिवाय खाजगी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये नवीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करु नये.

(१.९) मूळ पटनोंदणी पेक्षा ज्या शाळांमध्ये पटपडताळणीच्या वेळी जास्त विद्यार्थी आढळून आले आहेत, अशा शाळांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा घेण्यात यावा.

(१.१०) पुढील शैक्षणिक वर्षापर्यंत प्रत्येक शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांना युआयडी (UID) चा क्रमांक देण्याची कार्यवाही पूर्ण करावी. युआयडी (UID) चा क्रमांक दिल्याशिवाय शाळांना सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून अनुदान देण्यात येवू नये. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष मोहिम हाती घ्यावी.

(१.११) सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागाकडून त्यांचे अधिपत्याखालील आश्रमशाळांची वेगळया यंत्रणेमार्फत तुर्त फेरतपासणी करण्यात येवू नये.

(१.१२)जिल्हाधिकारी यांनी शासनास पाठविलेला विशेष पटपडताळणी अहवाल शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी सीलबंद करून आपल्या ताब्यात ठेवावा.

(१.१३) ज्या शाळांची मान्यता काढण्यात येईल किंवा शाळा सद्य:स्थितीत बंद आहेत अशा शाळांच्या विद्यार्थ्यांचे नजिकच्या इतर शाळांमध्ये समायोजन करण्यात यावे.

(१.१४) सामाजिक न्याय विभागामार्फत मंजूर करण्यात येत असलेल्या नवीन आश्रम शाळांना यापुढे इयत्ता पहिली पासून मान्यता न देता इयत्ता पाचवी पासून मान्यता द्यावी.

(१.१५) राज्यातील सर्व खाजगी अनुदानित, विना अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा व सामाजिक न्याय, आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीतील आश्रम शाळा तसेच इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा यांची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत दरवर्षी नियमित आकस्मिक तपासणी करण्यात यावी व तपासणी अहवाल संबंधित विभागाच्या शिक्षण संचालक (प्राथमिक), आयुक्त, समाज कल्याण आयुक्त, आदिवासी यांना सादर करावा. याबाबतचा शासन निर्णय संबंधित विभागाकडून निर्गमित करण्यात यावा. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना दरवर्षी आवश्यक निधी देण्यात यावा.

(१.१६) महानगरपालिका/नगरपालिका शाळातील अनुपस्थिती मोठया प्रमाणात आढळल्याने १० टक्के पेक्षा जास्त अनुपस्थिती असल्यास त्या ठिकाणच्या संबंधित अधिकाऱ्याचे स्पष्टीकरण घेण्यात यावे.

(१.१७) वरील निर्णयांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य सचिव यांनी वेळोवेळी योग्य ती कार्यवाही करावी.

२. वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी संबंधित प्रशासकीय विभागाने (उदा. शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग व नगर विकास विभाग) करावी व त्यासाठी आवश्यक ते आदेश त्या-त्या विभागाने स्वतंत्रपणे निर्गमित करावे.

(२.१) वरील शासन निर्णयामधील शालेय शिक्षण विभागाशी संबंधीत बाबींची अंमलबजावणी खाली दर्शविलेल्या अधिकाऱ्यांनी त्वरीत करावी. :-

| शासन निर्णय मुद्दा क्रमांक | कार्यवाहीसाठी सक्षम अधिकारी | संनियंत्रण अधिकारी |
|---|---|---|
| मुद्दा क्र.(१.१), (१.२), (१.३), (१.४), (१.५), (१.७), (१.८), (१.९), (१.१३) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व (माध्यमिक) | विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षण संचालक (प्राथमिक) आणि (माध्यमिक व उच्च माध्यमिक) |
| मुद्दा क्र.(१.६), | विभागीय शिक्षण उपसंचालक | शिक्षण संचालक (प्राथमिक) आणि (माध्यमिक व उच्च माध्यमिक) |
| मुद्दा क्र.(१.१०), | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व (माध्यमिक) | जिल्हाधिकारी |
| मुद्दा क्र.(१.१२), | शिक्षण संचालक (प्राथमिक) म.रा. | |
| मुद्दा क्र.(१.१५), | जिल्हाधिकारी | शिक्षण संचालक (प्राथमिक), |
| मुद्दा क्र.(१.१७), | शिक्षण संचालक (प्राथमिक) आणि (माध्यमिक व उच्च माध्यमिक), | |

(२.२) वरील निर्णयांची काटेकोरपणे अंमलबजावणी शासनाचे प्रचलीत धोरण व नियमांनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरीत करावी.

(२.३) शिक्षण संचालक (प्राथमिक)/(माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी वरील शासन निर्णयाची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्याकरिता प्रत्येक महिन्याच्या १५ व ३० तारखेला शासनास निर्णय निहाय सविस्तर अहवाल सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक :-२०१२०५०३०८१६२९५२७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( रत्नाकर गायकवाड )

मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

(१) सर्व विभागीय आयुक्त, कोकण विभाग, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.
(२) सर्व जिल्हाधिकारी,
(३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
(४) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
(५) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे,
(६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(७) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(८) महालेखापाल (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(९) स्थानिक निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
(१०) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
(११) अधिक्षक, सर्व जिल्हा वेतन पथक,
(१२) सर्व जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व (माध्यमिक),
(१३) आयुक्त, सर्व महानगरपालिका,
(१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व नगरपालिका व नगरपरिषदा,
(१५) सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
(१६) सर्व जिल्हा आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी,
(१७) मा. मुख्यमंत्री, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

(१८) मा. उपमुख्यमंत्री, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

(१९) मा.मंत्री, वित्त व नियोजन, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

(२०) मा. मंत्री, शालेय शिक्षण, यांचे खाजगी सचिव,

(२१) मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव,

(२२) सर्व विधान सभा व विधानपरिषद सदस्य,

(२३) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

(२४) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,

(२५) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

(२६) निवड नस्ती प्राशि-३.

माध्यमिक शाळा संहिता (सुधारित आवृत्ती १९८६)
मधील नियम १२.१ ते १२.५ मध्ये बदल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
शासन निर्णय, क्र. माशाह/२०११/(२१०/११)/माशि-३.
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १७ फेब्रुवारी, २०१२.

वाचा :- शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. माशाह-२०११/२१०/११/माशि-३.
दि. १२ जुलै, २०११.

प्रस्तावना

माध्यमिक शाळा संहितेतील नियमानुसार नोंदणीकृत संस्थाना खाजगी शाळा सुरु करण्याची परवानगी देण्यात येते. ज्या व्यवस्थापनास शाळा सुरु करण्याची परवानगी दिली जाते ते व्यवस्थापन माध्यमिक शाळा संहितेतील (सुधारित आवृती १९८६) नियम क्रमांक १२.१ ते १२.५ अन्वये बदलण्याची तरतूद आहे. राज्यामध्ये शाळांचे व्यवस्थापन बदलाबाबत गैरप्रकार होत असल्याबाबतच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आलेल्या आहेत. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्रमांक १२६१/२०१० अन्वये शाळा व्यवस्थापन बदलाबाबत मार्गदर्शक तत्वे अवलंबण्याचे आदेश दिलेले आहेत. वरील बाबी विचारात घेता शासन निर्णय दिनांक १२ जुलै, २०११ अन्वये राज्यातील शाळा व्यवस्थापन बदलास दिलेला स्थगिती आदेश रद्द करण्याची व माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक १२.१ ते १२.५ मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

शासन निर्णय दिनांक १२ जुलै, २०११ अन्वये शाळा व्यवस्थापन बदलास दिलेला स्थगिती आदेश रद्द करण्यात येत आहे व शाळा व्यवस्थापन बदलाबाबत माध्यमिक शाळा संहिता (सुधारित आवृत्ती १९८६) मध्ये नियम क्रमांक १२.१ ते १२.५ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत असून, नियम क्रमांक १२.६ समाविष्ट करण्यात येत आहे.

१२.१ प्रत्येक शाळा व्यवस्थापन बदलास शासन मान्यता आवश्यक राहील.

१२.२ शासनाने शाळा व्यवस्थापन बदलास दिलेली परवानगी लगतच्या नवीन शैक्षणिक वर्षापासून लागू राहील.

१२.३ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३६ अन्वये व्यवस्थापन बदल प्रस्तावास धर्मादाय आयुक्त यांची पूर्वपरवानगी आवश्यक राहील.

१२.४ जेव्हा शाळेच्या व्यवस्थापनात बदल करण्याचे योजिले असेल तेव्हा विभागीय शिक्षण उपसंचालक यांची पूर्वपरवानगी मिळविणे आवश्यक आहे.

१२.५ ज्या दोन शैक्षणिक संस्था, व्यवस्थापन बदल प्रक्रियेत समाविष्ट होतील त्या शैक्षणिक संस्था नोंदणी अधिनियम. १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० नुसार नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. शाळा व्यवस्थापनात बदल करण्याबाबत दोन्ही इच्छूक शैक्षणिक संस्थाचे ठराव असणे आवश्यक आहे. सदर ठरावावर दोन्ही शैक्षणिक संस्थाच्या व्यवस्थापनाच्या सर्व सदस्यांच्या स्वाक्ष-या असणे आवश्यक राहील. तसेच व्यवस्थापन बदलाबाबत सदर शैक्षणिक संस्थाच्या सदस्यांमध्ये कोणतेही मतभेद नसल्याचे प्रमाणपत्र विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे सादर करणे आवश्यक राहील.

१२.६ शाळा व्यवस्थापन बदलाबाबत खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

(अ) धर्मादाय आयुक्त व विभागीय शिक्षण उपसंचालकांकडून पूर्वपरवानगी मिळाल्यानंतर व्यवस्थापन बदल प्रक्रियेत समाविष्ट होणा-या दोन्ही शैक्षणिक संस्थांनी (व्यवस्थापन बदलास इच्छूक शैक्षणिक संस्था व व्यवस्थापन ताब्यात घेणारी शैक्षणिक संस्था) स्वखर्चाने संबंधित जिल्ह्यातील सर्वाधिक खपाच्या दोन मराठी वर्तमानपत्रात व राज्य स्तरावर खप असणा-या एका मराठी वर्तमानपत्रात उक्त व्यवस्थापन बदलाबाबत जाहीर प्रसिध्दी दयावी. शाळा परिसरातील नागरिक, संबंधित शाळेचे विद्यार्थी व त्यांचे पालक, संबंधित शाळेचे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, परिसरातील इतर शाळा यांनी उक्त व्यवस्थापन बदलाबाबत आपल्या हरकती व सूचना संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे वर्तमानपत्रात जाहीर प्रसिध्दी झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांचे आत पोहचतील अशा रितीने पाठवाव्यात.

(ब) विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या निर्देशानुसार शाळा व्यवस्थापन बदलाच्या कारणांबाबत संबंधित शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक यांनी चौकशी करावी व स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालकांना सादर करावा. अहवालात परिशिष्ट-अ मधील सर्व बाबींची व कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

(क) व्यवस्थापन बदलाबाबतच्या संदर्भात प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना विचारात घेऊन विभागीय शिक्षण उपसंचालकांनी सुनावणी घ्यावी व आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह प्रस्ताव शासनास सादर करावा.

(ड) विभागीय शिक्षण उपसंचालकांकडून प्राप्त झालेल्या या प्रस्तावावर शैक्षणिकहित व लोकहित विचारात घेऊन शाळा व्यवस्थापन बदलाबाबत शासनस्तरावरुन परवानगी देण्यात येईल. अशी परवानगी दिल्यानंतर विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी ३० दिवसांचे आत व्यवस्थापन बदलाबाबतचे आदेश निर्गमित करावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१२०२१७०९१३४५२४५००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

( र. प्र. आटे )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, यांना माहितीस्तव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ),महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / (प्राथमिक)
कार्यासन माशि-३ / निवडनस्ती.

शासन निर्णय, क्र. माशाह/२०११/(२१०/११)/माशि-३ दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ चे सहपत्र.

## परिशिष्ट-अ

१) दोन्ही संस्थांच्या ठरावाची प्रत. (सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीसह)

२) व्यवस्थापन बदलास इच्छूक दोन्ही शैक्षणिक संस्थेच्या सचिव व अध्यक्ष यांचे साक्षांकित छायाचित्रासह स्वाक्षरीचे नमुने याबाबतचे शपथपत्र.

३) दोन्ही संस्थांचे संस्था नोंदणी प्रमाणपत्र.

४) दोन्ही संस्थांच्या घटनांच्या प्रती व कार्यकारी मंडळांची यादी.

५) परिशिष्ट-१ (दोन्ही संस्थाचे)

६) शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी संमती पत्रे.

७) शाळा व्यवस्थापन बदलाबाबत वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली जाहीर नोटीस.(वर्तमानपत्रातील कात्रणाच्या मूळ प्रती)

८) प्राप्त झालेल्या हरकती / सूचना

९) दोन्ही संस्थांचे करारपत्र

१०) धर्मादाय आयुक्तांचे ना-हरकत प्रमाणपत्र.

११) मूळ संस्थेची मालमत्ता (फर्निचर व इतर वस्तू) कोणाकडे ठेवण्यात येणार आहे व कोणत्या अटीवर यांच्यासंदर्भात शपथपत्र.

१२) संस्था हस्तांतरणाची कारणे कोणती.

१३) संस्थेच्या आर्थिक व्यवहाराबाबत नोटराईज करारपत्र (रु. १००/- च्या स्टॅप पेपरवर असावे.)

१४) शाळेस नवीन संस्थेकडून पुरेशा भौतिक सुविधा पुरविण्याबाबत शपथपत्र.

१५) ज्या अटीवर जुन्या संस्थेस परवानगी दिलेली आहे, त्यानुसार नवीन संस्थेकडे शाळा गेल्यानंतर त्या अटीमध्ये बदल होणार नाही यासंदर्भात शपथपत्र.

१६)शाळेच्या परवानगी पत्राची/मान्यता पत्राची प्रत तसेच अतिरिक्त तुकडया व जादा तुकडया मान्यतेच्या प्रती.

१७) नवीन संस्थेची आर्थिक स्थिती दर्शविणारी कागदपत्रे.

१८) नवीन संस्थमार्फत अन्य शाळा चालविण्यांत येत असतील तर त्यांची नांव, पत्त्यांसह यादी

१९) नवीन संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या शाळांपेकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली आहे काय? किंवा सदर संस्थेबाबत तक्रारी आहेत काय? याबाबत शिक्षणाधिकारी यांचे स्पष्ट अभिप्राय.

२०) शाळेचा शाळेच्या व्यवस्थापन बदलापूर्वीचा तपासणी अहवाल.

२१) विभागीय शिक्षण मंडळाकडून शाळेस इंडेक्स नंबर मिळाल्याच्या पत्राची प्रत.

२२) व्यवस्थापन बदल प्रक्रियेत समाविष्ट होणा-या दोन्ही शैक्षणिक संस्थांचे कोणत्याही विषयाबाबत कोणत्याही न्यायालयात न्यायप्रविष्ट प्रकरण प्रलंबित नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

(२३) व्यवस्थापन बदलास इच्छूक संस्थेने मूळ शाळेचे सर्व अभिलेख (विद्यार्थी व कर्मचारी यांच्याबाबतचे ) व्यवस्थापन ताब्यात घेणा-या संस्थेस हस्तांतरित करण्याबाबतचे शपथपत्र.

*************************

## सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील धोरण

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय, क्र. नाहप्र २००९ /(६६३ /०९)/माशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ०७ ऑगस्ट २००९.

**शासन निर्णय :-**

सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा राज्यामध्ये सुरु करावयाची असल्यास संबंधित अभ्यासमंडळाच्या बायलॉजमध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य शासनामार्फत सदर शाळेस ना हरकत प्रमाणपत्र दिले जाते. देशातील इतर राज्यांमध्ये सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन राज्यातील सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांना दिल्या जाणाऱ्या ना हरकत प्रमाणपत्रांमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर शासन निर्णयान्वये सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांना द्यावयाच्या ना हरकत प्रमाणपत्रा संदर्भातील धोरण पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:-

१) ना हरकत प्रमाणपत्र हे तीन वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात येईल. प्रत्येक तीन वर्षांनी ना हरकत प्रमाणपत्राचे नूतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील. यापूर्वी देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाणपत्रांच्या बाबतीत देखील ज्या शाळांना ना हरकत प्रमाणपत्र देऊन तीन वर्षांचा कालावधी पूर्ण झालेला आहे अशा शाळांनी पुन्हा ना हरकत प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी अर्ज करणे आवश्यक राहील. प्रथमत: दिले जाणारे ना हरकत प्रमाणपत्र हे शासन स्तरावरुन दिले जाईल. प्रत्येक तीन वर्षानंतर ना हरकत प्रमाणपत्राचे नूतनीकरण हे संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या स्तरावरुन करण्यात येईल. नूतनीकरण करताना तपासावयाच्या बाबींसंदर्भात स्वतंत्रपणे सूचना संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना कळविण्यात येतील.

२) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा सुरु करण्यास दिलेले ना हरकत प्रमाणपत्र कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय काढून घेण्याचा अधिकार राज्य शासनास राहील. तसेच राज्य शासनाने दिलेल्या निर्देशांची सीबीएसई/ आयसीएसई/ आयबी अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांनी पूर्तता न केल्यास सदर ना हरकत प्रमाणपत्र कोणतेही कारण दिल्याशिवाय काढून घेण्याचे अधिकारदेखील राज्य शासनास राहतील.

३) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळातील विद्यार्थ्यांचे प्रवेश, बोनाफाईड जन्मपत्राच्या दाखल्यावर करण्यात यावेत.

४)सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळाच्या व्यवस्थापनांतर्फे राज्य शासनातर्फे शुल्क निर्धारण समितीने निर्धारित केलेले शुल्क आकारले जावे.

५) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळातील वर्गामध्ये विद्यार्थीक्षमता विहित नियमांप्रमाणेच राहील.

६) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळाच्या व्यवस्थापनांनी इ.१ ते ५ वीपर्यंत राज्य मंडळाचा इंग्रजी माध्यमाकरिता असलेला अभ्यासक्रम राबविणे बंधनकारक राहील. ज्या शाळांमध्ये राज्य मंडळाचा इंग्रजी माध्यमाकरिता असलेला अभ्यासक्रम इ. १ ते ५ वीपर्यंत राबविला जात नाही त्या शाळांनी राज्यमंडळाचा अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०१०-११) राबविणे अनिवार्य राहील.

७) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळेमध्ये इ. ८ वीपर्यंत त्रिभाषा सूत्र पाळले जावे. मराठी भाषा ही द्वितीय भाषा म्हणून शिकविली जावी.

८) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांचे व्यवस्थापन ज्यावेळी विविध पदांमध्ये उमेदवारांची नियुक्ती करतेवेळी उपस्थित राहण्याकरिता जिल्हा शिक्षणाधिकारी अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या सदस्याला व्यवस्थापनाने आमंत्रित करणे आवश्यक राहील.

९) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन शासनाने निर्धारित केलेल्या वेतननियमानुसार असावे.

१०) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनातर्फे कोणत्याही प्रकारच्या देणग्या विद्यार्थी अथवा पालकांकडून घेण्यात येणार नाहीत.

११) सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांतर्फे प्रॉव्हीडंट फंडाची योजना कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात यावी.

१२) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांतील विद्यार्थी काही कारणास्तव शाळा सोडून अन्य शाळेत प्रवेश घेऊ इच्छित असेल तर अशा कोणत्याही विद्यार्थ्यांवर त्याच शाळेमध्ये शिक्षण घेण्याबाबतची सक्ती केली जाऊ नये.

१३) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांतील सुरु असलेले वर्ग व विद्यार्थीसंख्येची माहिती संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये दि. ३१ ऑगस्टपूर्वी सादर करणे आवश्यक राहील.

१४) सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांतील प्रत्येक वर्ग वाढीस संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

१५) सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांनी ट्रॅफीक सेफ्टी गाईड लाईन्सची (पोलीस, अग्निशमन व वाहतुक विभाग यांनी निर्धारित केल्यानुसार ) काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१६) सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनानी फायर प्रोटेक्शन ॲरेंजमेंट (नॅशनल बिल्डींग कोड ऑफ इंडिया पार्ट-४ फायर प्रोटेक्शन १९९७ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा ) संदर्भात नियमानुसार व्यवस्था करणे आवश्यक राहील.

१७) सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांना राज्य शासनाचे सर्व नियम कायदे व आदेश यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१८) सीबीएसई/आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा या संपूर्णतः व्यवस्थापनांतर्फे स्वयंनिधीतून चालविल्या जातील व शासनाकडून त्यांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

१९) शासनातर्फे दिले जाणारे ना हरकत प्रमाणपत्र इ. १२ वी पर्यंत लागू राहील.

२०) शासनाने मागितलेली कोणतीही माहिती सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई मंडळाशी संलग्नित शाळांनी देणे बंधनकारक राहील. तसेच या शाळांची शैक्षणिक/लेखाविषयक तपासणी करण्याचे अधिकारदेखील राज्यशासनास राहतील.

सदर शासन निर्णयातील तरतुदी शासन स्तरावरुन सीबीएसई/आयसीएसई/आयबी/ आयजीसीएसई/ सीआयई मंडळांच्या अभ्यास मंडळांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत. तसेच या शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या उपरोक्त सर्व तरतुदीचे पालन राज्यातील सर्व सीबीएसई/ आयसीएसई/आयबी /आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांनी करणे बंधनकारक आहे. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/ सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा सुरु करावयाची असल्यास संलग्निकरणासाठी जी कागदपत्रे आवश्यक आहेत ती सर्व कागदपत्रे राज्य शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेताना सादर करणे बंधनकारक राहील. आवश्यक कागदपत्रांची यादी संबंधित मंडळांच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. ज्या शाळा संबंधित मंडळांच्या संलग्नतेसंदर्भातील नियमांची, अटी शर्तींची पूर्तता करणार नाही अशा शाळांचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २००९१००७१३०९३५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. सुवर्णा सि. खरात)
अपर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषदा
सर्व शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण), बृहन्मुंबई
मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव.
मा.मंत्री (शालेय शिक्षण)यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
मा. सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहायक.
माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई, सदर शासन निर्णयातील तरतूदी प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह.
शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील कार्यासन अधिकारी-प्राशि-३/उमाशि-१/माशि-२
निवड नस्ती माशि-१

**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार-२००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित इ. सर्व) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे त्यानुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करणे बाबत ...**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्र. एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५/टीएनटी-२**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २८ ऑगस्ट, २०१५

<u>वाचा</u> - १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : एसएसएन १०९१/२५७९/ माशि-१, दिनांक ३०.११.१९९१
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : एसएसएन १०९६/६०००/ माशि-१, दिनांक २०.०४.१९९६
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : माशाअ -२००८/ (९१८/०८)/ माशि-१, दिनांक २.०४.२००९
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : माशातु -२०१३/(१०७/१३)/ माशि-१, दिनांक २०.११.२०१३
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : पीटीआर -१११३/ (१/२०१३)/ एसएम-४, दिनांक १३.१२.२०१३
६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्र.संकीर्ण-२०१४/(१७७/२०१४)/एसएम-४. दि.२७.६. २०१४

**<u>प्रस्तावना-</u>**

महाराष्ट्र राज्याच्या सन २०१५ च्या वित्तीय स्थितीविषयक श्वेतपत्रिकेनुसार राज्यात १ ते १० आणि ० ते २० मुले असलेल्या सर्व शाळांची संख्या आणि त्यामध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व मुलांची दुसरीकडे सोय करण्याची शक्यता यासाठी शाळांची इष्टतम आवश्यकता तपासणे आवश्यक आहे. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक इत्यादी शाळांची संरचना विहित करणे तसेच प्राथमिक, उच्च प्राथमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इयत्ता पाचवी व इयत्ता आठवी चे वर्ग सुरु करणे इत्यादी बाबींचा निर्णय संदर्भाधीन क्रमांक (१) येथील आदेशान्वये घेण्यात आला होता. तसेच राज्यातील माध्यमिक शाळांना नवीन तुकडया मंजूर करणे, सुरु ठेवणे व टिकविणे बाबतचे निकष संदर्भाधीन क्र.(२) येथील आदेशान्वये विहित करण्यात आले होते. तथापि या आदेशांमध्ये संदिग्धता निर्माण झाल्याने त्यात बदल करण्याबाबत व अधिकाधिक स्पष्टता येण्यासाठी या सर्व निकषांचा आढावा घेऊन शासनास अहवाल सादर करण्यासाठी मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन क्र.(३) येथील आदेशान्वये समिती नेमण्यात आली होती. या समितीने सर्व निकषांबाबत विचारविनियम करुन आवश्यक अहवाल शासनास सादर केला तसेच सदर अहवाल शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन याबाबत सर्व नागरीकांकडून हरकती व सूचना सादर करणे बाबत आवाहन करण्यात आले होते. मा.प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा ) यांच्या अध्यक्षतेखाली समितीने सादर केलेला अहवाल तसेच

राज्यातील विविध संघटना, संस्था, नागरिक, लोक प्रतिनिधी यांचेकडून प्राप्त हरकती/सूचना विचारात घेऊन राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे निर्धारीत करणे, नवी शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे, शाळांच्या संरचनेमध्ये बदल करणे, तुकडी मंजूर करणे, टिकवणे इ. बाबतचे निकष विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

तसेच केंद्र शासनाच्या बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत एका शिक्षकाने ३० विद्यार्थ्यांना शिकवणे अपेक्षित आहे. हे ३० विद्यार्थी एकाच वर्गातील असावे असे नाही. कायद्यात अशी तरतूद करत असताना शिक्षक बहुवर्ग अध्यापक राहील हे अपेक्षिले गेले आहे. शिक्षक तसेच समाजाने हे समजून घेणे आवश्यक आहे की, प्रत्येक विद्यार्थी विशिष्ट असतो. त्याचे विचार, भावना तसेच शिकण्याची गती वेगळी असते. त्यामुळे ३० विद्यार्थी एकाच वर्गाची दिसत असले तरी त्यांच्या शिकण्याच्या पातळया ३० वेगवेगळया स्तरावर असतात. त्यामुळे या सर्व विद्यार्थ्यांना एकाच वर्गात आहेत म्हणून " एकाच स्तरावर समजून " सारखे शिकवता येणार नाही. असे बारकावे समजून न घेता शिक्षण सुरु राहिल्यास काही विद्यार्थी शाळेत नियमित उपस्थित राहून सुध्दा शिकू शकणार नाहीत. त्याची प्रचिती आजच्या शिक्षण व्यवस्थेत प्रकर्षाने जाणवत आहे. अशा प्रकारे बहुवर्ग/बहुस्तर अध्यापन जमत नसल्याने आलेल्या अपयशाचे दोषारोपण शिक्षण हक्क कायद्यातील काही तरतूदींवर केले जात आहेत. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन पुढील प्रमाणे सुधारित निकष विहित करण्यात येत आहेत.

शिक्षण हक्क कायद्यामध्ये विषय शिक्षणा एवढेच समाजीकरणाला महत्व दिले गेले आहे. वयानुरुप शाळा प्रवेश, सह शिक्षण ( विद्यार्थी-विद्यार्थीनींचे सोबत शिक्षण ), त्याच वर्गात एका पेक्षा अधिक वर्षे न ठेवण्याचे नियम तथा अपंग समावेशित शिक्षण याचे ठळक उदाहरण आहेत. त्यामुळे स्पष्ट परिभाषित केले नसले तरी प्रत्येक शाळेत प्रत्येक वयोगटाचे किमान काही विद्यार्थी अपेक्षित आहेत. आदर्श स्थितीत प्रत्येक प्राथमिक शाळांच्या प्रत्येक वर्गामध्ये ३० विद्यार्थी तर उच्च प्राथमिक शाळांच्या प्रत्येक वर्गामध्ये ३५ विद्यार्थी परिभाषित आहेत.

विविध कारणानी राज्यात काही शाळांच्या वर्गामध्ये एक सुध्दा विद्यार्थी नाही तर काही शाळांमध्ये एखाद्या वर्गात ८० च्या घरात विद्यार्थी आहेत. मात्र ज्या शाळांमध्ये प्रत्येक वर्गात अत्याधिक विद्यार्थी आहेत तेथे अतिरिक्त वर्ग खोल्या उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्या शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक आले तरी त्यांना वेगळी वर्गखोली उपलब्ध होणार नाहीत. याउलट शहरी भागात आणि काही मोठया गावांत एकच संस्था किंवा विविध संस्थांच्या एका पेक्षा अधिक अनुदानित शाळा आहेत, शिक्षण हक्क कायद्यानुसार ज्या दोन शाळा अंतराच्या निकषाच्या आत आहेत आणि तेथे विद्यार्थ्यांची संख्या सुध्दा कमी आहे, अशा शाळांमध्ये कमी विद्यार्थी असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या समाजीकरणास कमी वाव मिळतो. त्यामुळे यापैकी काही शाळांमधील विद्यार्थ्यांना अन्य शाळांमध्ये समायोजित करणे योग्य राहील. मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.९५/२०१० प्रकरणी दि.१२.४.२०१२ रोजी दिलेल्या निकालान्वये सदरचा अधिनियम वैध ठरवला असल्याने सदर निकालातील परि.८ चे अवलोकन होणे आवश्यक आहे.

8. By virtue of the 2009 Act, all schools established prior to the commencement of the said Act are thus obliged to fulfill the norms and standards specified inter alia in Sections 25, 26 and the Schedule of that Act. ( See Section 19 (2)). The State is also expected to first weed out those schools which are non-performing, or under-performing, or non-compliance schools and upon closure of such schools, the students and the teaching and non-teaching staff thereof should be transferred to the neighbourhood school. The provisions is meant not

only to strengthen the latter school by adequate number of students but to consolidate and to impart quality education due to the addition of teaching staff. Needless to observe, that if there is inadequate response to the government funded school, it is but appropriate that either the divisions thereof or the school itself be closed and the students and the staff of such schools be transferred to a neighbourhood school by resorting to Section 18 (3) of the 2009 Act. Only after taking such decisions could the School Development Plan represent the correct position regarding the need of government aided schools in every locality across the State. Besides, it will ensure proper and meaningful utilization of public funds. In absence of such exercise, the end result would be that on account of existing non-performing or under-performing or non-compliance schools, the School Development Plan would not reckon that locality for establishment of another school. In our view, even the State Government (s), by resorting to the provision of the 2009 Act, must take opportunity to re-organise its financial outflow at the micro level by weeding out the non-performing or under-performing or non-compliance schools receiving grant-in-aid, so as to ensure that only such government funded schools, who fulfill the norms and standards, are allowed to continue, to achieve the object of the 2009 Act of not only providing free and compulsory education to the children in the neighbourhood school but also to provide quality education. Thus, there is a power in the 2009 Act coupled with the duty of the State to ensure that only such government funded schools, who fulfill the norms and standards, are allowed to continue with the object of providing free and compulsory education to the children in the neighbourhood school. Validity and applicability of the 2009 Act qua unaided non-minority schools.

उपरोक्त सर्व बाबींची आवश्यकता विचारात घेऊन विद्यार्थी संख्येचे निकष ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. नवीन शाळा सुरु करणे, तुकड्या सुरु करणे, विद्यार्थी संख्येच्या आधारे शिक्षक संख्या निश्चित करणे (PTR) याबाबतचे संदर्भाधीन शासन निर्णय व याआधीचे सर्व शासन निर्णय जे या निर्णयाशी विसंगत असतील ते अधिक्रमित करण्यात येत असून शासन आता पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय दिनांक २ जुलै,२०१३ अन्वये १ ली ते ४ थी च्या शाळांना ५ वा तर १ली ते ७वी च्या शाळांना ८ वा वर्ग जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे १२,०२७ शाळा १ली ते ५वी आणि ५,७८९ शाळा १ली ते ८वी च्या झाल्या आहेत. तरी सुध्दा २०१४-२०१५ च्या U-DISE प्रमाणे राज्यात चौथा वर्ग असलेल्या शाळा ८४,१९८ तर पाचवा वर्ग असलेल्या शाळा ५५,५८४ आहेत. त्यात २८,६१४ ची तफावत आहे, ग्रामीण भागात ही तफावत २६,७९८ असून काही मोठी गावे सोडल्यास इतर ठिकाणी विद्यार्थ्यांना १ किमीच्या आत ५ व्या वर्गाचे शिक्षण मिळत नसल्याची शक्यता आहे.

याचप्रमाणे १३,२२८ ग्रामीण भागातील शाळा जेथे फक्त सातवा वर्ग आहेत तेथे विद्यार्थ्यांना ३ किमी च्या आत उच्च प्राथमिक शिक्षण मिळत नसण्याची शक्यता आहे. राज्यातील शिक्षण हक्क कायद्याची अंमजबजावणी काटेकोरपणे व्हावी या दृष्टिने खालील निर्देश देण्यात येत आहे.

१.१ एखाद्या शाळेचे विद्यार्थी समायोजित करावे लागत नसल्यास स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सर्व शाळा( ग्रामीण आणि शहरी ) मध्ये इयत्ता ५ वी चा आणि इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्यात यावा. असे करत असतांना अधिकची वर्ग खोली बांधावी लागत असल्यास सदर

कार्यवाही पुढील टप्प्यांमध्ये करण्यात यावी. स्थानिक स्वराज्य संस्थातंर्गत शाळांची संख्या जास्तीतजास्त असल्यामुळे अशा वर्गखोली बांधण्याचा खर्च त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थानी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या निधीतून करावयाचा आहे. सर्व शिक्षा अभियानातून त्या बांधकामाकरीता उपलब्धतेनुसार निधी मंजुर करुन शक्य तितक्या लवकर शाळा खोल्या बांधण्यात याव्यात.

१.२ वरील प्रमाणे शाळांमध्ये वर्ग जोडल्यानंतर जेथे अतिरिक्त शिक्षक पद मंजूर करावे लागणार नाही अशा शाळांचे प्रस्ताव अनुक्रमे इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग जोडण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/ आयुक्त, महानगर पालिका/ मुख्याधिकारी, नगरपालिका यांच्या शिफारशीसह सादर करण्यात यावेत.

१.३ वरीलप्रमाणे कार्यवाही करुन सुध्दा दुर्गम आणि डोंगराळ भागात काही विद्यार्थ्यांना १ किमीच्या आत इयत्ता ५वी चा वर्ग आणि ३ किमीच्या आत इयत्ता ८वी चा वर्ग उपलब्ध होत नसल्यास अशा मुलांना अशासकीय शाळांमध्ये सामावून घेण्यासाठी अतिरिक्त शिक्षक पद मंजूर करावे लागत असल्यास तसे प्रस्ताव शासनास पाठवेण्यात यावे. मात्र असे अतिरिक्त शिक्षक मंजूर झाल्यानंतर त्या शिक्षकाने वर्ग भरविण्याकरिता त्या शाळेत अतिरिक्त वर्ग खोली उपलब्ध आहे याची शहानिशा प्रथम करण्यात यावी.

२) बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ मधील तरतुदी विचारात घेऊन राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे मंजूर करणे, एकाच वर्गात अधिक विद्यार्थी आल्यास शिक्षक पदे मंजूर करणे/सुरु ठेवणे इत्यादी बाबतचे निकष पुढील प्रमाणे विहित करण्यात येत आहेत.

**२.१ प्राथमिक शाळा ( इयत्ता १ ली ते ४ थी किंवा इयत्ता १ ली ते ५ वी )**

२.१.१ शाळेमधील सर्व विद्यार्थी मिळून ६० पर्यन्त २ शिक्षक, त्यानंतर वाढ होणाऱ्या प्रत्येक ३० विद्यार्थ्यांमागे एक अतिरिक्त शिक्षक.

२.१.२ एखाद्या प्राथमिक शाळेत वर्ग ३ किंवा ४ किंवा ५ मध्ये एकाच वर्गात कमीत कमी २० पेक्षा अधिक विद्यार्थी असतील तर त्या त्या वर्गासाठी वेगळे शिक्षक अनुज्ञेय राहतील. मात्र तुकडी व्यवस्था बंद करण्यात आल्यामुळे संपूर्ण शाळेत शिकत असलेल्या एका वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची संख्या यासाठी विचारात घ्यावयाची आहे.

२.१.३ कोणत्याही शाळेत अतिरिक्त शिक्षक पद देय असताना त्या शिक्षकासाठी अतिरिक्त वर्गखोली असणे बंधनकारक राहील. वर्ग खोली नसल्यास शिक्षकाचे जादा पद मंजूर करण्यात येवू नये.

२.१.४ वर्ग १ आणि २ मध्ये २० पेक्षा अधिक विद्यार्थी असले तरी बहुवर्ग अध्यापन पध्दतीने वर्ग चालवायचे आहेत. त्याप्रमाणे वर्ग ३,४ आणि ५ मध्ये प्रत्येकी २० पेक्षा कमी विद्यार्थी असल्यास बहुवर्ग अध्यापन पध्दती वापरायची आहे.

**२.२ उच्च प्राथमिक शाळा ( इयत्ता ५ वी ते ७ वी किंवा इयत्ता ६ वी ते ८ वी )**

२.२.१ नवीन शाळा सुरु होत असल्यास आणि पहिल्या वर्षी फक्त सहावा वर्ग असल्यास ३५ विद्यार्थ्यांसाठी २ शिक्षक (१ विज्ञान/गणित आणि १ भाषा ) अनुज्ञेय राहील.

२.२.२ सध्या अस्तित्वात असलेल्या अन्य शाळांमध्ये तीनही वर्ग मिळून ३६ पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास ३ शिक्षक ( १ विज्ञान/गणित, १ भाषा, १ समाजशास्त्र ) अनुज्ञेय राहील.

२.२.३ विद्यार्थ्यांची संख्या १०५ पेक्षा अधिक झाल्यास ३५ च्या पटीमध्ये १ अतिरिक्त शिक्षक अनुज्ञेय होईल. मात्र प्रत्येक शिक्षकासाठी एक वर्ग खोली असणे आवश्यक आहे. अन्यथा जादा शिक्षक पद मंजूर करु नये.

**२.३ माध्यमिक शाळा ( इयत्ता ९वी ते १०वी )**

**२.३.१** नवीन शाळा सुरु होत असल्यास त्यात फक्त ९ वा वर्ग राहील. किमान ४० विद्यार्थ्यांचा निकष राहील व त्यास २ शिक्षक ( १ विज्ञान/गणित +१ भाषा/समाजशास्त्र ) अनुज्ञेय राहील.

२.३.२ सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये इयत्ता ९वी व १० वी चे दोनही वर्ग मिळून ४० पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास ३ (१ भाषा,१ विज्ञान/गणित, १ समाजशास्त्र) शिक्षक अनुज्ञेय राहतील.

२.३.३ नववी किंवा दहावी कोणत्याही वर्गामध्ये ६० पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एक शिक्षकाचे जादा पद अनुज्ञेय होईल व चाळीशीच्या पटीने विद्यार्थी संख्येस १ शिक्षक अनुज्ञेय राहील.

२.३.४ मात्र, सुरुवातीच्या तीन शिक्षकांपेक्षा अतिरिक्त शिक्षक मंजूर करतांना प्रत्येक शिक्षकामागे एक अतिरिक्त वर्ग खोली उपलब्ध असणे आवश्यक आहे. अतिरिक्त वर्ग खोली उपलब्ध नसल्यास अतिरिक्त शिक्षक पद मंजूर करु नये.

२.३.५ एखाद्या शाळेत तीन पेक्षा अधिक शिक्षक पद मंजूर झाल्यास इंग्रजी,गणित. विज्ञान, समाजशास्त्र, मराठी, शारिरीक शिक्षण व कार्यानुभव आणि इतर विषयांच्या शिक्षक संख्या समतोल ठेवून पुढची पदे मंजूर करावयाची आहेत.

**२.४ मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक आणि पर्यवेक्षकांची पदे :-**

**२.४.१ प्राथमिक शाळा (१ ली ते ५ वी)**

**२.४.१.१** विद्यार्थ्यांची संख्या १५० पेक्षा अधिक झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय होईल.

**२.४.१.२** सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या १३५ पेक्षा कमी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहणार नाही.

**२.५.२ उच्च प्राथमिक शाळा (६वी ते ८वी)**

**२.५.२.१** १०० पेक्षा अधिक विद्यार्थी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहील.

**२.५.२.२.** सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या ९० पेक्षा कमी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहणार नाही.

**२.५.३ माध्यमिक शाळा ( वर्ग ९ वी व १० वी )**

**२.५.३.१** १०० पेक्षा अधिक विद्यार्थी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहील.

**२.५.३.२** सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थीची संख्या ९० पेक्षा कमी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहणार नाही.

हा शासन निर्णय येण्यापूर्वीच्या निकषाप्रमाणे मान्य झालेल्या मुख्याध्यापकाचे पद अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना त्या त्या व्यवस्थापनाच्या अन्य शाळांमध्ये समायोजित करावे. पूर्ण जिल्हयात किंवा त्याच व्यवस्थापनाच्या कार्यक्षेत्रात मुख्याध्यापक अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना शिक्षकांच्या पदामध्ये रिक्त जागेवर समायोजित करावे, परंतु त्यांना वेतन संरक्षण (Pay Protection) देण्यात यावे. अशा अतिरिक्त झालेल्या शिक्षकांना जिल्हयात किंवा संस्थेत सेवानिवृत्ती किंवा अन्य कारणाने मुख्याध्यापकाचे पद रिक्त झाल्यास अशा पदावनत लोकांना प्रथम पदोन्नती देण्यात यावी.

**२.६ संयुक्त शाळा -**

(i) वर्ग १ ते ७ (ii) वर्ग १ ते ८ (iii) वर्ग १ ते १० (iv) वर्ग १ ते १२ (v) वर्ग ५ ते १० (iv) वर्ग ६ ते १० (vii) वर्ग ५ ते १२ (viii) वर्ग ६ ते १२ (ix) वर्ग ८ ते १२ (x) वर्ग ९ ते १२

वरील पैकी कोणत्याही प्रकारच्या शाळांमध्ये शाळेचा वेग-वेगळा भाग समजून एकापेक्षा अधिक मुख्याध्यापक पदे अनुज्ञेय ठरत असल्यास फक्त वरिष्ठ शाळेमधील मुख्याध्यापक पद अनुज्ञेय राहणारआहे.

२.६.१ सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या १०० पेक्षा कमी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय राहणार नाही.

**२.७ पर्यवेक्षक / उपमुख्याध्यापकांची पदे -**

उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक अथवा ज्या संयुक्त शाळांमध्ये १५ पेक्षा अधिक शिक्षकांची पदे अनुज्ञेय असतील तेथे १ पर्यवेक्षकाचे पद देय ठरेल व शिक्षकांची संख्या ३० पेक्षा अधिक झाल्यास एक अतिरिक्त उपमुख्याध्यापक अनुज्ञेय ठरेल. अशा रितीने १५ शिक्षकांच्या मागे १ पर्यवेक्षकाचे पद मंजूर करावे, तथापि कोणत्याही शाळेत ४ पेक्षा अधिक पर्यवेक्षकांची पदे अनुज्ञेय असणार नाही.

**२.८ इयत्ता ५वी ते १०वी, इयत्ता ५वी ते १२वी, इयत्ता ८वी ते १०वी च्या शाळा**

या शाळांमधून वर्ग ५ किंवा वर्ग ८ कालांतराने बंद होणार आहेत. परंतू त्या शाळेत वर्ग ५ किंवा वर्ग ८ मध्ये २० पेक्षा अधिक मुले असल्यास ते वर्ग बंद न करता ती शाळा तशीच सुरु ठेवावी. त्या परिस्थितीत शिक्षक पद मंजूरीचे निकष खालील प्रमाणे राहील :-

२.८.१ वर्ग ५ विद्यार्थी संख्या २० ते ३० पर्यंत असल्यास १ शिक्षक अनुज्ञेय राहील. त्यानंतर ३० च्या पटीत १ अतिरिक्त शिक्षक अनुज्ञेय राहतील.

२.८.२ वर्ग ८ मधील विद्यार्थी संख्या २० ते ३५ पर्यंत असल्यास १ शिक्षक अनुज्ञेय राहील व त्यानंतर ३५ च्या पटीत एक अतिरिक्त शिक्षक अनुज्ञेय राहतील.

मात्र वर्ग ५ किंवा वर्ग ८ मध्ये कोणत्याही वर्षी विद्यार्थी संख्या २० पेक्षा कमी झाल्यास त्या वर्गाना शिक्षकाचे पद अनुज्ञेय राहणार नाही

इयत्ता ५वी ते १०वी किंवा ५वी ते १२वी आणि ८वी ते १०वीच्या शाळेमधून ५ व्या किंवा ८व्या वर्गातील सर्व मुलांना इतर शाळांमध्ये एकदा समाविष्ट केल्यानंतर ती शाळा कायमची इयत्ता ६वी ते १०वी किंवा इयत्ता ६वी ते १२वी किंवा इयत्ता ९वी ते १०वी ची होणार आहे.

**२.९ थोडक्यात महत्वाचे :-**

२.९.१ तुकडी व्यवस्था बंद करण्यात आल्यामुळे ज्या-त्या वर्गामध्ये निकषापेक्षा अधिक विद्यार्थी झाल्यास जादा शिक्षक पद देण्यात येईल. तथापि अशा अतिरिक्त शिक्षकाने वर्ग भरविण्याकरीता त्या शाळेने अतिरिक्त खोली बांधल्यानंतरच ते पद भरण्याची परवानगी देण्यात येईल.

२.९.२ पुढील काळामध्ये इयत्ता १ली ते ५वी, ६वी ते ८वी किंवा ९वी ते १०वीच्या शाळांना नैसर्गिक वाढ राहणार नाही.

३. उपरोक्त प्रमाणे विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार शिक्षकांची संख्या मंजूर करताना शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे. अशा शिक्षकांना अतिरिक्त ठरविताना संबंधित शाळेमध्ये प्रत्येक विषयाचे शिक्षक उपलब्ध राहतील आणि आरक्षण धोरणांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. तसेच शिक्षकांच्या समायोजनाबाबत महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) नियमावली, १९८१ मधील तरतूदी आणि त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले प्रचलित निकष कायम राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१५०८२८१५३६१७४४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

KAPADNIS SWAPNIL YASHWANTRAO

Digitally signed by KAPADNIS SWAPNIL YASHWANTRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MA...ASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS,CID 920022, postalCode=400032, st=Maharashtra, cn=KAPADNIS SWAPNIL YASHWANTRAO
Date: 2015.08.28 15:44:40 +05 30

( स्वप्निल कापडणीस )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री यांचे कार्यालय,मंत्रालय,मुंबई,
३) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग,मंत्रालय,मुंबई,
४) प्रधान सचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई,
५) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय,मुंबई,
६) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई,
७) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य,
८) शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे-१,
९) शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे-१,
१०) शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे,
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१३) सर्व शिक्षणाधिकारी ( प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद,
१४) खाजगी सचिव, मा.मंत्री शालेय शिक्षण,मंत्रालय,मुंबई,
१५) सर्व कार्यासने, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) निवडनस्ती, ( टीएनटी-२ )

# परिशिष्ट – “ब”
# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

## मंगळवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१

### स्थळ - जिल्हा परिषद सभागृह, यवतमाळ

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(४) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(६) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(७) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद पदाधिकारी :**

(१) श्रीमती कालींदाताई यशवंत पवार, अध्यक्ष, जिल्हा परिषद, यवतमाळ

(२) श्री. बाळा जयवंतराव पाटील (कामारकर), उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, यवतमाळ

(३) श्री. श्रीधर धोंडबाजी मोहेड, सभापती, शिक्षण व आरोग्य समिती

(४) सौ. जयश्रीताई राजू पोटे, सभापती, महिला व बाल कल्याण समिती

(५) श्री. प्रज्ञानंद विजयराव खडसे, सभापती, उमरखेड

**स्थानिक निधी लेखा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. संजय शहा, संचालक

**जिल्हा परिषद, यवतमाळ :**

(१) डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. विनय ठमके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. शरद कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(४) श्री. अरविंद गुंडधे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)

(५) श्री. मनोजकुमार चौधर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा) (प्र)

(६) श्री. विशाल जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(७) श्री. अरूण मोहोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)

(८) श्री. राजेश कुलकर्णी, प्रकल्प संचालक

(९) श्रीमती ज्योती भोंडे, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

(१०) श्री. चंद्रशेखर खंडारे, मुख्य लेखा वित्त अधिकारी

(११) श्री. मोहन इंगोले, उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी (प्र.)

(१२) श्री. विजय देशमुख, उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

(१३) डॉ. एच.एस.पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१४) डॉ. राजीव खेरडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१५) श्री. राजेंद्र व्ही.माळोदे, कृषी विकास अधिकारी (प्र.)

(१६) श्री. के.एन.वानखेडे, कृषी विकास अधिकारी (प्र.)

(१७) श्री. बी.एम.दमाहे, कार्यकारी अभियंता (सिंचन)

(१८) श्री. प्रदीप कोल्हे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)

(१९) श्री. पियुष र.चव्हाण (जिल्हा समाज कल्याण अधिकारी)

(२०) कुमारी सोनाली माडकर, गट विकास अधिकारी

(२१) श्री. प्रविणकुमार वानखेडे, गट विकास अधिकारी

(२२) श्री. दि.मा.रावते, उप शिक्षण अधिकारी, शिक्षण विभाग

(२३) श्री. वा.ल.मोतीकर, सेवानिवृत्त उप शिक्षणाधिकारी

(२४) श्री. एम.डी.आंदेलवाड, गट विकास अधिकारी

(२५) श्री. एस.एम.कांबळे, सहायक लेखा अधिकारी

(२६) श्री. आर.पी.पवार, गट विकास अधिकारी

(२७) श्री. पी.एम.मडावी, गट विकास अधिकारी

(२८) श्री. पी.एस.नारकर, गट विकास अधिकारी

(२९) श्री. आर.व्हि.ठाकरे, शिक्षणाधिकारी (निरंतर)

(३०) श्री. दिवक चवणे, शिक्षणाधिकारी (माध्य)

(३१) श्रीमती पाटेकर, शिक्षणाधिकारी (प्राध्य)

(३२) श्री. चिंतामण वंजारी, शिक्षणाधिकारी (माध्य)

(३३) श्री. दिनकर पांडे, कार्यकारी अभियंता (सिंचन)

(३४) श्री. गजानन दळवी, पशुधन विकास अधिकारी

(३५) श्री. बी.एम.मेघावत, गट विकास अधिकारी

(३६) श्री. अमित आडे, उप कार्यकारी अभियंता

(३७) श्री. डि.एच.डाकोरे, कार्यकारी अभियंता (पा.पु)

(३८) श्री. जी.एल.मेश्राम, गट विकास अधिकारी

(४०) श्री. सी.जी.चव्हाण, गट विकास अधिकारी, पांधकवडा

(४१) श्री. के.झेड.राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी

(४२) डॉ. जी.के.रचकुंरवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(४३) श्रीमती मंगला वा.मुन, जिल्हा सहायक कक्ष अधिकारी

(४४) श्री. बी.के.बेंडे, कार्यकारी अभियंता

(४५) श्री. एस.सी.राठोड, बांधकाम क्र.२

(४६) श्री. पी.एल.चव्हाण, प्रभारी गट विकास अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१०-२०११ व २०१६-२०१७ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील यवतमाळ जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१

### स्थळ, जिल्हा परिषद, यवतमाळ

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(४) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(६) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(७) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(१०) श्री. कैलास पाटील, वि.स.स.

(११) श्रीमती मेघना बोर्डीकर, वि.स.स.

(१२) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(१३) श्री. अमरनाथ राजुरकर. वि.प.स.

(१४) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(१५) डॉ. राहुल पाटील, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. संजय शहा, संचालक

**जिल्हा परिषद, यवतमाळ :**

(१) डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. विनय ठमके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. शरद कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(४) श्री. अरविंद गुंडधे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)

(५) श्री. मनोजकुमार चौधर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा) (प्र)

(६) श्री. विशाल जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(७) श्री. अरूण मोहोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)

(८) श्री. राजेश कुलकर्णी, प्रकल्प संचालक

(९) श्रीमती ज्योती भोंडे, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

(१०) श्री. चंद्रशेखर खंडारे, मुख्य लेखा वित्त अधिकारी

(११) श्री. मोहन इंगोले, उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी (प्र.)

(शा.म.मु.) एचबी ३३७८—१६(१५०-३-२०२६)

(१२) श्री. विजय देशमुख, उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

(१३) डॉ. एच.एस.पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१४) डॉ. राजीव खेरडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१५) श्री. राजेंद्र व्ही.माळोदे, कृषी विकास अधिकारी (प्र.)

(१६) श्री. के.एन.वानखेडे, कृषी विकास अधिकारी (प्र.)

(१७) श्री. बी.एम.दमाहे, कार्यकारी अभियंता (सिंचन)

(१८) श्री. प्रदीप कोल्हे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)

(१९) श्री. पियुष र.चव्हाण, (जिल्हा समाज कल्याण अधिकारी)

(२०) कुमारी सोनाली माडकर, गट विकास अधिकारी

(२१) श्री. प्रविणकुमार वानखेडे, गट विकास अधिकारी

(२२) श्री. दि.मा.रावते, उप शिक्षण अधिकारी, शिक्षण विभाग

(२३) श्री. वा.ल.मोतीकर, सेवानिवृत्त उप शिक्षणाधिकारी

(२४) श्री. एम.डी.आंदेलवाड, गट विकास अधिकारी

(२५) श्री. एस.एम.कांबळे, सहायक लेखा अधिकारी

(२६) श्री. आर.पी.पवार, गट विकास अधिकारी

(२७) श्री. पी.एम.मडावी, गट विकास अधिकारी

(२८) श्री. पी.एस.नारकर, गट विकास अधिकारी

(२९) श्री. आर.व्हि.ठाकरे, शिक्षणाधिकारी (निरंतर)

(३०) श्री. दिवक चवणे, शिक्षणाधिकारी (माध्य)

(३१) श्रीमती पाटेकर, शिक्षणाधिकारी (प्राध्य)

(३२) श्री. चिंतामण वंजारी, शिक्षणाधिकारी (माध्य)

(३३) श्री. दिनकर पांडे, कार्यकारी अधियंता (सिंचन)

(३४) श्री. गजानन दळवी, पशुधन विकास अधिकारी

(३५) श्री. बी.एम.मेघावत, गट विकास अधिकारी

(३६) श्री. अमित आडे, उप कार्यकारी अभियंता

(३७) श्री. डि.एच.डाकोरे, कार्यकारी अभियंता (पा.पु)

(३८) श्री. जी.एल.मेश्राम, गट विकास अधिकारी

(४०) श्री. सी.जी.चव्हाण, गट विकास अधिकारी, पांधकवडा

(४१) श्री. के.झेड.राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी

(४२) डॉ. जी.के.रचकुंरवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(४३) श्रीमती मंगला वा.मुन, जिल्हा सहायक कक्ष अधिकारी

(४४) श्री. बी.के.बेंडे, कार्यकारी अभियंता

(४५) श्री. एस.सी.राठोड, बांधकाम क्र.२

(४६) श्री. पी.एल.चव्हाण, प्रभारी गट विकास अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०११-१२ व २०१७-२०१८ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ च्या संदर्भात यवतमाळ जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

## गुरूवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१

### स्थळ, जिल्हा परिषद सभागृह, यवतमाळ

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. कैलास पाटील, वि.स.स

(३) डॉ. राहूल पाटील, वि.स.स.

(४) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(६) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(७) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(८) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(९) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(१०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

(११) श्री. अंबादास दानवे, वि.स.स.

(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१३) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. संजय शहा, संचालक

**जिल्हा परिषद, यवतमाळ :**

(१) डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. विनय ठमके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. शरद कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(४) श्री. अरविंद गुंडधे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)

(५) श्री. मनोजकुमार चौधर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा) (प्र)

(६) श्री. विशाल जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(७) श्री. अरूण मोहोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)

(८) श्री. राजेश कुलकर्णी, प्रकल्प संचालक

(९) श्रीमती ज्योती भोंडे, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

(१०) श्री. चंद्रशेखर खंडारे, मुख्य लेखा वित्त अधिकारी

(११) श्री. मोहन इंगोले, उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी (प्र.)

(१२) श्री. विजय देशमुख, उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

(१३) डॉ. एच.एस.पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१४) डॉ. राजीव खेरडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१५) श्री. राजेंद्र व्ही.माळोदे, कृषी विकास अधिकारी (प्र.)

(१६) श्री. के.एन.वानखेडे, कृषी विकास अधिकारी (प्र.)

(१७) श्री. बी.एम.दमाहे, कार्यकारी अभियंता (सिंचन)

(१८) श्री. प्रदीप कोल्हे, कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा)

(१९) श्री. पियुष र.चव्हाण

(२०) कुमारी सोनाली माडकर, गट विकास अधिकारी

(२१) श्री. प्रविणकुमार वानखेडे, गट विकास अधिकारी

(२२) श्री. दि.मा.रावते, उप शिक्षण अधिकारी, शिक्षण विभाग

(२३) श्री. वा.ल.मोतीकर, सेवानिवृत्त उप शिक्षणाधिकारी

(२४) श्री. एम.डी.आंदेलवाड, गट विकास अधिकारी

(२५) श्री. एस.एम.कांबळे, सहायक लेखा अधिकारी

(२६) श्री. आर.पी.पवार, गट विकास अधिकारी

(२७) श्री. पी.एम.मडावी, गट विकास अधिकारी

(२८) श्री. पी.एस.नारकर, गट विकास अधिकारी

(२९) श्री. आर.व्हि.ठाकरे, शिक्षणाधिकारी (निरंतर)

(३०) श्री. दिवक चवणे, शिक्षणाधिकारी (माध्य.)

(३१) श्रीमती पाटेकर, शिक्षणाधिकारी (प्राध्य.)

(३२) श्री. चिंतामण वंजारी, शिक्षणाधिकारी (माध्य.)

(३३) श्री. दिनकर पांडे, कार्यकारी अभियंता (सिंचन)

(३४) श्री. गजानन दळवी, पशुधन विकास अधिकारी

(३५) श्री. बी.एम.मेघावत, गट विकास अधिकारी

(३६) श्री. अमित आडे, उप कार्यकारी अभियंता

(३७) श्री. डि.एच.डाकोरे, कार्यकारी अभियंता (पा.पु)

(३८) श्री. जी.एल.मेश्राम, गट विकास अधिकारी

(४०) श्री. सी.जी.चव्हाण, गट विकास अधिकारी, पांधकवडा

(४१) श्री. के.झेड.राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी

(४२) डॉ. जी.के.रचकुंरवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(४३) श्रीमती मंगला वा.मुन, जिल्हा सहायक कक्ष अधिकारी

(४४) श्री. बी.के.बेंडे, कार्यकारी अभियंता

(४५) श्री. एस.सी.राठोड, बांधकाम क्र.२

(४६) श्री. पी.एल.चव्हाण, प्रभारी गट विकास अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने यवतमाळ जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१०-२०११ व २०१६-२०१७ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०११-२०१२ व २०१७-२०१८ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील यवतमाळ जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

## मंगळवार, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१

### स्थळ, विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(६) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. सुनिल परब, कक्ष अधिकारी

(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. माधव नागरगोजे, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव/अधिकारी :**

(१) श्री. राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग

(२) डॉ. नितीन करीर, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग

(३) डॉ. प्रदीप व्यास, अपर मुख्य सचिव , सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) श्रीमती वन्दना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(५) श्रीमती आय. ए. कुंदन, सचिव, महिला व बाल विकास

(६) श्री. वि.ल. लहाने, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(७) श्री. सतिश तुपे, सह सचिव, वित्त विभाग

(८) श्री. अतुल कोदे, सह सचिव महसूल

(९) श्री. मंगेश वसंत मोहिते, सह सचिव, ग्रामविकास

(१०) श्री. प्रविण पुरी.सह सचिव, पाणीपुरवठा व स्वछता विभाग

(११) श्री. सुभाष कि. गावडे, सह सचिव, जलसंधारणा विभाग

(१२) श्री. दिनेश रा. डिंगळे, सामाजिक न्याय विभाग

(१३) श्री. गणेश पाटील, सह सचिव, कृषि विभाग

(१४) श्री. धीरज कुमार, आयुक्त, कृषि

(१५) श्री. दिलीप झेंडे, संचालक

(१६) श्री. विजय वृंदेवए, सह संचालक, आरोग्य विभाग

(१७) श्री. श्री. दे. लोंढे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१८) श्री. प्रविण जैन, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१९) श्री. एकनाथ काशीनाथ गागरे, उपसचिव

(२०) श्रीमती नीला रानडे, अवर सचिव, ग्रामविकास विभाग

(२१) श्री. संजय कुडवे , अवर सचिव, महसूल व वन विभाग

(२२) श्री. उमेश चंदिवाड, अवर सचिव, कृषी

(२३) श्री. प्रकाश कदम, अवर सचिव , कृषी

(२४) श्री. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परषिद यवतमाळ

(२५) श्री. विनय ठमके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ

(२६) श्री. गोकुळ देवरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी , महिला व बालकल्याण , जिल्हा परिषद यवतमाळ

(२७) डॉ. पि. एस. चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी , जिल्हा परिषद यवतमाळ

(२८) श्री. आर. व्ही. माकदे, कृषी विकास अधिकारी , जिल्हा परिषद यवतमाळ

(२९) श्री. पीयुष र. चव्हाण, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१०-२०११ व २०१६-२०१७ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०११-२०१२ व २०१७-२०१८ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात यवतमाळ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सह सचिव, वित विभाग, सह सचिव, महसूल विभाग, सह सचिव, ग्रामविकास विभाग, सह सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, सह सचिव, जलसंधारण विभाग, सह सचिव, सामाजिक न्याय विभाग, सह सचिव, कृषी विभाग, आयुक्त, कृषी विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, महसूल व वन विभाग, अवर सचिव, कृषी विभाग, सह संचालक, आरोग्य विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६.

### स्थळ : विधान भवन, मुंबई.

**उपस्थिती :**

(१) श्री. संतोष दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. प्रताप अडसड, वि.स.स.

(३) श्री. सुनिल कांबळे, वि.स.स.

(४) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स.

(५) श्री. दीपक केसरकर, वि.स.स.

(६) श्री. संजय गायकवाड, वि.स.स.

(७) श्री. सचिन अहिर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(८) श्री. बाबासाहेब देशमुख, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. शिवदर्शन साठ्ये, सचिव - ४

(२) श्री. रविंद्र जगदाळे, उप सचिव

(३) श्री. सुरेश मोगल, अवर सचिव

(४) श्री. पवन म्हात्रे, कक्ष अधिकारी.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत पहिला अहवालाच्या प्रारूपावर विचार करून ते किरकोळ सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई